
# विचारमुद्रा

## डॉ.यशवंत मनोहर यांचे लेख



संपादक

डॉ. इंद्रजित ओरके

# विचारमुद्रा

## डॉ.यशवंत मनोहर

: संपादन :

डॉ.इंद्रजित ओरके

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर-४४००२२

Vicharmudra : Dr.Yashwant Manohar
विचारमुद्रा : डॉ.यशवंत मनोहर
संपादन : डॉ.इंद्रजित ओरके

प्रकाशक
नितीन धनराज हनवते
युगसाक्षी प्रकाशन
राहुल अपार्टमेंट, त्रिमूर्तीनगर, रिंग रोड,
नागपूर-४४००२२
मो.फोन:९८२२७००२२२

पहिली आवृत्ती: २५ जुलै २०११

मुखपृष्ठ : भाऊ दांदडे

© प्रा.डॉ.पुष्पलता यशवंत मनोहर
'लुम्बिनी',४५,लोकसेवानगर,
नागपूर-४४००२२
मो.:९४२२१०२३९६

संगणकीय अक्षरजुळवणी आणि मुद्रणस्थळ
वैभव ऑफसेट
१७,कन्नमवार नगर,
वर्धा रोड, नागपूर-४४००२५
फोन:९८२२२०३४७४

किंमत:रुपये १०० फक्त

अख्ख्या दुनियेलाच तळहातावरचा फोड मानून
मला लिहायला भाग पाडणाऱ्या
माझ्यातील निष्ठुर अस्वस्थतेला...

– यशवंत मनोहर

# प्रस्तावना

## डॉ.इंद्रजित ओरके

महाराष्ट्र ही समाजसुधारकांची, क्रांतिकारकांची तसेच बुद्धिनिष्ठ विचारवंतांची भूमी म्हणून सर्वपरिचित आहे. या भूमीवरून झालेली समाजपरिवर्तनाची नानाविध आंदोलने, कित्येक प्रबोधनाच्या चळवळी, त्या चळवळींना पुरविली जाणारी वैचारिक रसद ही आधुनिक भारताच्या घडणीला दिशादर्शक ठरली आहे.

ज्या देशाची वैचारिक कुवत अधिक असेल तोच देश बदलत्या परिस्थितीचा सामना करण्यास सक्षम असल्याचे पुरावे इतिहासात आणि वर्तमानात आपल्याला बघायला मिळतात. प्राचीन काळातील ग्रीकचे तत्त्वज्ञान, युरोपियन तत्त्वज्ञान आणि भारतीय तत्त्वज्ञान यावरती नजर टाकल्यास या तत्त्वज्ञानातील वैचारिक प्रवाहाची महती पटते.

ग्रीक आणि युरोपियन तत्त्वज्ञानाने नानाविध वैज्ञानिक संशोधनाला, तंत्रज्ञानाला, औद्योगिकरणाला आणि सृजनशील कलांना विकासाच्या गतिमान वाटा मोकळ्या करून दिल्यात, भारतात मात्र वैचारिक प्रवाह काहीसा क्षीण राहिल्यामुळे विकासाचा वेग मंदावल्याचे ऐतिहासिक सत्य पुढे येते. याचा अर्थ असा नव्हे की, भारतात वैचारिक प्रवाहच नव्हता. बौद्धदर्शन, जैनदर्शन, लोकायत, सांख्य, अशा तत्त्वज्ञानातून वैचारिक प्रवाह हा धारदारपणे आणि जोरदारपणे वहात होता. परंतु वेद, उपनिषदे, तथाकथित धर्मकल्पना, कर्मकांड, यज्ञ, ईश्वर यासारख्या अलौकिक कल्पनांनी जडवादी तत्त्वज्ञानाची प्रचंड कोंडी केल्यामुळे इहवादी वैचारिक प्रवाहाची गती मंद झाली. काळ कोणताही असो ; सत्य आणि सत्ता यांच्यात नेहमीच तीव्र असा वर्गीय संघर्ष उफाळून येत असतो. या संघर्षात वैचारिक भूमिका ही नेहमीच सत्याची, वंचितांची व वैज्ञानिक प्रमेयाची बाजू घेत आलेली असते.

प्रगमनशील विचारांची, क्रांतदर्शी तत्त्वाची तळी उचलणारे हात जेव्हा वाढतात

तेव्हाच सत्याचे अनुभव प्रकर्षाला येतात आणि समाज परिवर्तनाच्या दिशेने प्रवास करू लागतो. परंतु समाजातील विचारवंत, प्रगतीशील लेखक, प्रबुद्ध नागरिक जेव्हा सत्याकडे, विदारक वास्तवाकडे पाठ फिरवून सत्तेचे पोवाडे गातो, सुखाने आणि आनंदाने आयुष्य सजवतो तेव्हा कोणत्याही काळातील, कोणत्याही खंडातील मानव समाज असो, तो समाज अज्ञान, अंधश्रद्धा, वर्गीय विषमता, खून, दरोडे, उपासमार, अमानुषता, लाचारी, वांशिक भेद, जातीय भेद आणि एकूणच अराजकतेच्या आगीत होरपळत असतो. तो सतत अस्थिर असल्यामुळे अस्वस्थ असतो. काळजीच्या काळोखात तो स्वतःला कोंबून घेतो. शेवटी परिस्थितीला शरण जातो. एके दिवशी तो सरणावर चढतो आणि युगालाही सरणावर चढवितो. सांगायचे तात्पर्य असे की वैज्ञानिक दृष्टीकडे सृजनशील वैचारिक प्रवाहाकडे समाज जेव्हा दुर्लक्ष करतो, तेव्हा तो अधोगतीच्या आणि अराजकतेच्या अंधःकारमय खाईत कळत व नकळतपणे कोसळतो.

अशा अंधःकारमय खाईत भारतीय समाज हजारो वर्षे सरपटणाऱ्या प्राण्यासारखा चाचपडत आलेला आहे. या चाचपडणाऱ्या समाजाला प्रकाशमान करण्यासाठी आणि आधुनिक तत्त्वांच्या सहाय्याने नव्या मानवी समाजाच्या निर्मितीसाठी काही तत्त्ववेत्त्यांनी, विचारवंतांनी, वैज्ञानिकांनी आपले आयुष्य वेचलेले आहे; आयुष्य चेतवले आहे. १९-२०व्या शतकात हा विचारप्रवाह महाराष्ट्रात पुन्हा नव्याने जोर धरू लागला. या सृजनशील प्रवाहात म.जोतीबा फुले, लोकहितवादी, आगरकर, महर्षी कर्वे, न्या.रानडे, विठ्ठल रामजी शिंदे, वि.का.राजवाडे, डॉ.श्री.व्यं.केतकर, त्र्यं.वि.सरदेसाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गं.बा.सरदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नरहर कुरुंदकर, डॉ.भा.ल.भोळे, डॉ.श्रीनिवासन खांदेवाले, कॉ.शरद पाटील, व्ही.एन.पाटील, डॉ.नरेंद्र दाभोळकर, डॉ.रावसाहेब कसबे, डॉ.सुहास पळशीकर, डॉ.यशवंत सुमंत, डॉ.यशवंत मनोहर अशा विचारवंत प्रतिभावंतांनी आपली विचारमुद्रा वैचारिक प्रवाहावर भक्कमपणे कोरली आहे.

सृजनशील वैचारिक प्रवाहाला गतिमान ठेवण्यासाठी वेळोवेळी ज्यांची नजर दक्ष असते आणि ज्यांची वाणी, लेखणी सतत नवनिर्मितीसाठी अस्वस्थ असते, अशा व्यक्तित्वात बंडखोर कवी, युगसाक्षी समीक्षक, प्रखर विचारवंत आणि आंबेडकरवादाची निष्ठेने मांडणी करणारा सर्जनशील लेखक आणि महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या परंपरेचा कठोर प्रवाही म्हणून डॉ.यशवंत मनोहर यांचे नाव वैचारिक साहित्यात सन्मानाने अधोरेखित होते. डॉ.यशवंत मनोहर यांचे व्यक्तित्व हे स्फटीकासमान (Prismatic Personality) आहे. प्रिझममधून एका प्रकाशकिरणाचे नानाविध रंग जसे उधळले जातात तसेच व्यक्तित्व डॉ.यशवंत मनोहर सरांना लाभले आहे. त्यांचे आजवर सात कवितासंग्रह, छोटी-मोठी चौतीस वैचारिक पुस्तके, लहान-मोठी पंचवीस समीक्षा

चार कादंबऱ्या, एक प्रवासवर्णन, चार ललितलेखसंग्रह, चार पत्रांचे संग्रह, त्यांच्यावरती तीन गौरवग्रंथ, उत्थानगुंफा या कवितासंग्रहावर एक समीक्षाग्रंथ, रमाई कादंबरीचे हिंदी, इंग्रजी, कन्नड अशा भाषेतील भाषांतरे, त्यांच्या विविधांगी लेखनाला पाच महाराष्ट्र राज्य पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशनसारखे इतर अनेक प्रतिष्ठाप्राप्त पुरस्कार व आजपर्यंत तीस वाङ्मयीन सन्मान प्राप्त झालेले आहेत. अशा या प्रज्ञा-प्रतिभावान-विचारवंताच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा परीघ नीट न्याहाळतो म्हटले तरी नजरेतून सुटण्याचा काहीसा संभवच अधिक दिसतो. डॉ.यशवंत मनोहर यांनी आजवर मराठी साहित्यसृष्टीला आपल्या बहुमोल, बहुआयामी प्रतिभेने आणि प्रज्ञेने संपन्न आणि समृद्धच तर केलेले आहे. तद्वतच मराठी साहित्यसृष्टीतील वैचारिक प्रवाहाला जिवंतही ठेवले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संगणकाचा उंदीर अख्ख्या विश्वातील वैचारिकतेला कुरतडत असताना डॉ.यशवंत मनोहर हा सजग विचारवंत विश्वातील परिस्थितीचे विदारक निरीक्षण आपल्या कवितांमधून आणि गंभीर लेखनातून नोंदवतो आहे, म्हणूनच त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या मौलिक वैचारिक लेखनाला 'विचारमुद्रा'च्या रूपाने संपादित करण्याचा माझा मानस आहे.

त्यांनी विविध नियतकालिकांमधून लिहिलेल्या तीस बहुमूल्य लेखांचा समावेश 'विचारमुद्रा' या ग्रंथात केलेला आहे. प्राचीन भारतीय समाजव्यवस्था ही जुलमी, अघोरी, धर्मांध व अमानुष होती. त्या समाजव्यवस्थेला त.बुद्ध, चार्वाकासारख्या विचारवंतांनी बदलविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. परंतु शोषण करणाऱ्या शक्ती प्रचंड शक्तिमान होत्या. त्यांचे कायदे एवढे कठोर होते की, हजारो वर्षे भारतीय समाज कूस बदलण्याचे स्वप्नच पाहू शकत नव्हता; परंतु १९व्या शतकात वैज्ञानिक विचारांनी भारतीय समाजबदलाची शक्यता काही अंशी निर्माण झाली होती. भारतीय विचारवंतांनी वैचारिक संघर्ष उभे केलेत; सामाजिक चळवळी उभारल्यात, काही प्रमाणात चळवळींना यशही मिळाले. १८५० सालात लोकहितवादींनी स्वस्थ, संपन्न, समृद्ध भारतीय समाजासाठी नव्या ग्रंथांची गरज, शतपत्रातील एका पत्रातून प्रतिपादिली होती. हा ग्रंथ एका शतकानंतर संविधानाच्या रूपाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला अर्पण करून लोकहितवादींच्या भूमिकेची, त्यांच्या इच्छेची पूर्ती केलेली आहे.

विश्वातील कोणताही विचारवंत असो तो सदैव विश्वमानवाचेच चित्र रेखाटत असतो. त्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरही अपवाद नाहीत. 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आदर्श जगाचे चित्र' विचारमुद्रेच्या पहिल्या प्रकरणात डॉ.यशवंत मनोहर यांनी समतोलपणे रेखाटले आहे. ते लिहितात, ''जात, धर्म, वर्ण वा वंश यांच्या कक्षेत वावरणाऱ्या भूमिका या जीवनाच्या सामग्र्याच्या भूमिका नसतात. त्या जीवनाचा तोडून तोडून विचार करीत असतात. या भूमिका त्या त्या

कक्षेतील लोकांच्या हिताच्या रूपरेषा मांडत असतात. या भूमिका जगातील बाकीच्या लोकांना गृहीत धरीत नाहीत. अशा भूमिकांना अंशलक्ष्यी भूमिका म्हणावे लागते. अंशलक्ष्यी भूमिका स्वयंकेंद्री असतात. म्हणून त्या इतरांकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा इतरांवर अन्याय करणाऱ्या असतात. संपूर्ण जीवनाचा सामग्र्याने, त्यांच्या संपूर्ण अंगोपांगासहित विचार करतो त्याला सिस्टम बिल्डर वा मेकर ऑफ युनिव्हर्स म्हटले जाते. तो जाती, वर्ग, धर्म वा देश अशी जगाची तोडून मांडणी करीत नाही. तर संपूर्ण मानवी जीवनाच्या हिताची, संपूर्ण जगाच्याच कल्याणाची मांडणी करतो. अशी मांडणी बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्धारपूर्वक आयुष्यभर केलेली आहे.'' या लेखातून लेखकाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विश्व समाजरचनेशी जोडले आहे. १३ ऑक्टोबर १९४५ च्या जनता पत्राचा हवाला देत लेखक लिहितो, ''प्रश्न केवळ अस्पृश्य समाजाचेच प्रश्न सोडविण्याचा नाही, ही मर्यादित ध्येयमर्यादा ओलांडून आपली तत्त्वप्रणाली, स्वातंत्र्य, समता व बंधुता या उदात्त आणि सर्वश्रेष्ठ तत्त्वांना भिडलेली आहे.'' लोकल प्रश्नांच्या आगीत जळत सुरू झालेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मन ग्लोबल वास्तवाच्या एका सर्वहितैषी आणि न्याय्य प्रारूपाच्या देदीप्यमान निर्मितीशिखरावर कसे झेपावून जाते, त्याचा थक्क करून सोडणारा अनुभव आपल्याला येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आमूलाग्र समाजक्रांतीचे तत्त्वज्ञानी होते. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातही त.बुद्धाच्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकराएवढा रॅशनल थिंकर झाला नाही.'' अशी मांडणी करताना लेखक पुढे लिहितो, ''शोषणयंत्रणेचे सामर्थ्य तिच्या पायाभूत तत्त्वात असते. म्हणूनच तिची पायाभूत तत्त्वेच नष्ट करावी लागतात. समाजजीवनाची पुनर्रचना करण्यासाठी हे आवश्यक आहे. हा एकाचवेळी मार्ग, दिशा आणि ध्येय बदलण्याचा मुद्दा असतो. साधने, उद्दिष्टे आणि मानसशास्त्रसुद्धा बदलावी लागतात आणि जुन्या सवयींना तिलांजली द्यावी लागते.

बुद्धाने माणसाच्या मानसशास्त्राचे नव्याने संशोधन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हेच प्रतीत्यसमुत्पादाचे मानसशास्त्र आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या संदर्भात पुरस्कारिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तृष्णाविहीन माणसांचे जग निर्मिण्याचा ध्यास घेतला आणि तसे तत्त्वज्ञान मांडले. माणसाला जगाचे परमसत्य मानले आणि या परमसत्याच्या निर्मितीसाठी तत्त्वज्ञान मांडले. या परमसत्याच्या विजयासाठी आपल्या प्रज्ञेला सर्जनशील केले. माणुसकीचे, करुणेचे आणि बुद्धिवादाचे संवर्धन करणाऱ्या शिक्षणाची मूलगामी रूपरेषा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली ही माणुसकीची, करुणेची आणि बुद्धिवादाची भूमिका फार सखोल आणि व्यापक आहे. द्वितीय महायुद्धाने मानुषता बेचिराख झालेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली होती व अनुभवली होती.

आईनस्टाईनच्या सापेक्षतावादाच्या वैज्ञानिक सिद्धान्ताने सत्ताखोर राष्ट्रे औद्योगिकरणात व युरेनियमच्या वापरात एवढी बेभान झाली की स्वातंत्र्य, समता, मानवता, करुणा, दयाभाव या मानवी मूल्यांचे बळी जाताना खुद्द आईनस्टाईनने प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आणि स्वतःच्या मेंदूने अनुभवले. तसे तर आईनस्टाईनवर कार्ल मार्क्स आणि स्पिनांझा यांचा प्रत्यक्ष प्रभाव पडलेला होता. तरीही त्याने न्यूटनला दूर सारून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याच्या नादात त्याच्या प्रयोगाने 'हिरोशिमा आणि नागासाकी'चा विध्वंस पाहिला. त्याचवेळी जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ सार्त्रला मानवतेची, नैतिकतेची, मानवी संवेदनांची गळचेपी होताना दिसली. अमानुष ॲलिनेशन घडविणाऱ्या भांडवलदारी संस्कृतीची त्याला किळस आली. त्याने पुढे खऱ्या नैतिकतेची कास धरली. डॉ.यशवंत मनोहर या विचारवंताने त.बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कारुणिक-प्रतित्यसमुत्पाद या सिद्धान्ताची केलेली मांडणी विश्वस्तरावर नुसती चर्चिली नाही तर त्या तत्त्वाप्रमाणे जगण्याचा संदेश देत आहे. ही मांडणी करताना लेखक कुठेही शबलित होत नाही. एवढी प्रगाढ निष्ठा त.बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनदर्शनावर जोपासली आहे. सामाजिक नैतिकता, करुणा आणि प्रतीत्यसमुत्पाद यांच्या मिलाफातूनच जग सुखी होण्याचे आंबेडकरांचे आदर्श जगाचे स्वप्न लेखकाने शब्दबद्ध केलेले आहे. डॉ.यशवंत मनोहर यांची ही मांडणी मराठीतील विचारसाहित्यात अपूर्व अशीच आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तित्व बहुआयामी आहे. या व्यक्तित्वाने समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदाशास्त्र, धर्मशास्त्र, साहित्य अशा अनेक विषयांवर स्कॉलरशिप सिद्ध केलेली आहे. हजारो वर्षे विषमता, उपासमार, अपमान, दारिद्र्य यात जगणाऱ्या समाजाची राजकीय इच्छाशक्ती वृद्धिंगत केल्याशिवाय त्याला सन्मानाचे जीवन मिळणार नाही. विश्वाच्या नव्या वर्गीय समाजरचनेत त्याला स्थान मिळावे. या हेतूने सर्वव्यापी अशा रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेची गरज प्रतिपादन केलेली होती. परंतु जिवंतपणी त्यांना प्रस्तुत राजकीय पक्षाची स्थापना करता आलेली नाही. तरीही दलित नेत्यांनी त्यांच्या नावाने खुल्या पत्रावर आधारित रिपब्लिकन पक्षाचे दुकान उघडले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातल्या रिपब्लिकन पक्षाची बेगडी आणि शब्दबंबाळ जाहिरातबाजी करीत स्वतःला त्या पक्षाचे वारसदार घोषित केले. डॉ.बाबासाहेबांच्या वैचारिकतेची कुवत नसलेल्या तथाकथित स्वयंघोषित नेत्यांनी डॉ.आंबेडकरांना केवळ दलितांचा नेता म्हणून लेबल चिकटविले. परिणाम असा झाला की आरपीआय हा भारतीय प्रजेचा सशक्त राजकीय पक्ष होण्याऐवजी दलितांचा अशक्त राजकीय पक्ष बनला आणि यातूनच पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांची वाताहात झाली. या संदर्भात डॉ.यशवंत मनोहर यांनी 'रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेची गरज' या लेखात दलित नेत्याच्या कुवतीचा/

निधी आणि कार्यकर्त्यांचा अपुरेपणा यामुळे छोट्या छोट्या परिवर्तनवादी पक्षांना राजकीय सत्तेपर्यंत जाणारी ताकदच प्राप्त होत नाही. त्यांचे विघटनच त्यांच्या राजकीय अवकाशाच्या आड येते. हे सर्व शोषितांचे पक्ष आणि शोषित समूह त्यामुळे सत्तेपासून कायम वंचित राहतात. एकत्र न येण्याची शिक्षा भोगत राहतात. हे विघातक वास्तव बदलायला हवे. या सर्व शोषितांच्या वाट्याला येणारे शोषण कमी अधिक प्रमाणात सारखेच आहे. हे समान अंतःकरणाचे घटक आहेत. वंचनेत ढकललेल्या सर्व परिवर्तनशील पक्ष्यांची आणि त्यांच्या लोकसमूहांची तहान-भूक फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्षच भागवू शकतो. पण डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत असा पक्ष स्थापन करता आला पाहिजे.

१९५६ सालची राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती आणि २०११ सालची परिस्थिती यात कमालीचे अंतर पडलेले आहे. संविधाननिष्ठ राजकारणाच्या सर्व शक्यताच आज राजकारणाने संपुष्टात आणलेल्या आहेत, एक परिस्थितीशरण मानसिकता या राजकारणाने जन्मास घातलेली आहे. यावेळी ग्रामीण भागातील मजूर, शेतकरी, शहरातील कामगार, मध्यमवर्गीय लोक, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, भटके-विमुक्त, आदिवासी, ओबीसी, स्त्रिया या सर्वांच्या बौद्धिक प्रबोधनाची आणि समदुःखी म्हणून त्यांना एकत्रित करण्याची गरज आहे. या सर्व लोकसमूहांना आणि त्यांच्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या सर्व पक्षांना आणि संघटनांना एकत्र गुंफण्याची गरज आहे. हे सर्व करणारा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची गरज आहे. पण हे सर्व पेलण्याची बौद्धिक क्षमता आणि संघटनकौशल्य नसणारांनी मात्र रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यासाठी तसदी न घेतलेलीच बरी. अशी उगीचच तसदी कोणी घेतली नाही तर रिपब्लिकन पक्ष जाती-पोटजातीबाहेर जाऊ न शकलेल्या सुमार लोकांनी लांच्छनास्पद स्थितीत नेला असा आरोप तरी दुनियेला करता येणार नाही. हे अनुभवांनी व्यक्त केलेले लेखकाचे निरीक्षण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील आर.पी.आय.चे वास्तवदर्शी व मर्मभेदक चित्रण करणारेच ठरते. डॉ.यशवंत मनोहर यांनी वंचितांच्या राजकीय सत्तेसाठी मांडलेला विचार तमाम वंचितांच्या सुखी आणि सुंदर जीवनासाठी एक विधायक ऊर्जा ठरतो.

आज सामाजिक चळवळ कुठेही दिसत नाही. धम्मचळवळ केवळ त्रिसरण पंचशीलाच्या मर्यादेत अडकलेली आहे. एवढेच नव्हे तर प्रतिक्रांतीच्या दारात या चळवळीचे धुरीण खेटे घालू लागले आहेत. कोणाहीजवळ भक्कम वैचारिकता नाही. तसा बाणेदारपणा नाही. तशी कुवत नाही. छोटे छोटे स्वार्थ या लोकांना आपल्या संकुचित वर्तुळातून बाहेर पडू देत नाही. त्यासाठी करायला हव्या त्या कष्टांची, त्यागाची वानवा आहे. काही वेगळे घडत नाही त्याचे हे कारण आहे. या गोष्टी

नसल्यामुळे सारी चळवळच बेचिराख झाली आहे. परिवर्तनाच्या चळवळीतील छोटी-छोटी बेटे बलदंड शक्तीच्या त्सुनामीत नष्ट होऊन जातात. नष्ट होण्याचे टाळण्यासाठी ही बेटे एकत्र येत नाहीत आणि एकसंध महाबेट होत नाहीत तोवर या बेटांचे उद्ध्वस्तीकरण अटळच आहे. आजवर हे उद्ध्वस्तीकरण होतच आहे, पण या बेटांना एकत्र गुंफण्याचे अभियान कोणी समर्थपणे राबविल्याचे उदाहरण नाही. डॉ.यशवंत मनोहर या विचारवंताने मांडलेले हे विवेचन हृदय आणि मेंदूला जागे करणारे आहे. व्यक्तिगत स्वार्थापोटी प्रागतिक चळवळीचे आणि त.बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत नवसमाजाच्या निर्मितीचे स्वप्नभंग करणारी प्रवृत्तीचे विश्लेषण लेखकाने प्रवाहीपणे केलेले आहे. आपली धम्मचळवळ आणि सामाजिक चळवळ या चळवळीतील नेतृत्वावर, अनुयायावर धार्मिकीकरणाचा प्रचंड प्रभाव आहे. धार्मिकीकरणाच्या, काशाय वस्त्राच्या प्रभावात व प्रावरणात या चळवळी फसलेल्या आहेत. त्यांच्यावर वैचारिकतेचा प्रभाव असता तर समाजाचे चित्र वेगळे असते. परिवर्तन म्हणा किंवा क्रांती म्हणा, यांना विचारांचे पाठबळ असेल तरच त्या जिवंत राहतात. नाहीतर निरर्थकपणे-निर्जीवपणे जगत राहतात. नव्हे अशा उपक्रमांना चळवळीचे रूप देऊन प्रतिक्रांतिवादी त्यांना चळवळ म्हणून जगवत असतात. खरे तर हे एक चळवळीचे आभासी चित्र असते. जीवनाच्या कुठल्याही एकाच अंगाची वाढ करणारी व्यवस्था सशक्तपणे कधीही उभी होऊ शकत नाही. कारण तिची इतरही अंगे असतात. ती क्षीण राहतात.

डार्विनच्या सिद्धान्तानुसार नामशेष होण्याच्या मार्गावर असतात. डॉ.यशवंत मनोहर सर एका चर्चेत म्हणाले होते, बौद्ध भिक्खुंनी शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरले पाहिजे. त्यांचे नेतृत्व केले पाहिजे. सरांचा हा विचार आंबेडकरवादाची, धम्माची कक्षा वाढविणारा आहे. पण जिथे वैज्ञानिक सत्याचा अभाव असेल, वैचारिकतेचा दुष्काळ असेल तिथे धम्मचळवळ फुलणारच नाही. हे त्या मागील अनेक सत्यापैकी एक सत्य आहे. त.बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून-आचारातून आरेखीत झालेला 'धम्म' हाही जागतिकीकरणाच्या अर्थयुगात व्यक्तिगत जगण्याचा, स्वत:ची जाहिरात 'आंबेडकरांचा शिष्य' म्हणून करून घेण्याचा एक सोपा आणि सपक व्यवसाय झाला आहे.

'धम्मचळवळ त्रिसरण - पंचशीलाच्या मर्यादेत अडकलेली आहे' हे विदारक सत्य सांगायला, लेखातून मांडायला त.बुद्ध, गॅलिलिओ, ब्रूनो, मार्क्स, म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे विचारवंत, तत्त्ववेत्ते निर्माण व्हावे लागतात. अशा विचारवंताला आयुष्याची किंमतही चुकविण्याचे सामर्थ्य घेऊन जगावे लागते. म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रबोधनाच्या राज्याचा विचारवंत म्हणून डॉ.यशवंत मनोहर यांनी प्रस्तुत तत्त्ववेत्त्याची, विचारवंताची भूमिका 'आर्थिक

स्वयंपूर्णांची दुर्बल घटकासंबंधीची कर्तव्ये' या लेखातून मार्मिकपणे मांडली आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संघटित शक्तीचे महत्त्व बारंवार समाजाला समजावून सांगितले. पण त्यांचे फारसे कुणी मनावर घेतले नसल्याची खंत लेखकाला आहे. 'एक आंधळा आणि एक लंगडा' जंगलाला लागलेल्या आगीत सापडतात. आणि समन्वय साधून आगीतून सुटका करतात. हे खूप छान उदाहरण लेखकाने एकीच्या संदर्भात दिलेले आहे. 'आम्ही भारताचे लोक' या लेखातून लेखकाने भारतीय नागरिकत्वाची मर्मग्राही चिकित्सा करून संविधानानुसार राष्ट्रीय नागरिकत्वाची मानसिकता रेखाटली आहे. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेतील भाषणाचा काही अंश या लेखात आहे. 'आज आपण अंतर्विरोधग्रस्त जीवनात प्रवेश करत आहोत. राजकारणात तत्त्वत: आपणाला समता मिळेल, पण आपल्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात विषमता असेल'. १९५० साली डॉ.आंबेडकरांनी संविधानसभेत केलेले चिंतन ६० वर्षानंतरही लेखकाने लेखातून का मांडले असावे? असा मी सूक्ष्मपणे पण समग्रलक्ष्यी विचार करू लागतो तेव्हा जाणवते की, ६० वर्षात भारत देशात बरीच वैज्ञानिक क्रांती झाली. नवे तंत्रज्ञान आले, औद्योगिकरणाचे आवाज सर्वत्र घुमू लागले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या आधुनिक भारतीय समाजाचे स्वप्न बऱ्याच अंशी भंग पावले. ज्यांच्याकडे जमीनदारी होती, कारखानदारी होती, उच्च श्रेणीतील प्रशासकीय नोकऱ्या होत्या, धनदौलत, संपत्ती मिळवून देणारी मंदिरे होती, ती औद्योगिक क्रांतीनंतरही प्रस्थापितांच्याच मुठीत राहिली. वैज्ञानिक क्रांतीने समग्रपणे प्रजेच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येईल ही आशा फोल ठरली. वैज्ञानिक क्रांतीमुळे जातीव्यवस्था नष्ट होईल. धारणी-मेळघाट, नंदूरबार, गडचिरोली या प्रदेशातील आदिवासींचे कुपोषण संपेल आणि हजारो वर्षांचे पीडित आणि वंचित नव्या माणुसकीने जगू लागतील हे चित्र स्वातंत्र्याच्या ६३ वर्षानंतरही कायम राहिले. त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे विज्ञानाचे फायदे घेणारा माणूस हा वैज्ञानिक दृष्टी स्वीकारू शकला नाही. तो घडलाही नाही. घडण्याची सुतराम शक्यताही नाही. कारण राजकीय सत्ता ज्या वर्गाच्या, थैलीशहांच्या आणि भांडवली प्रवृत्तीच्या हातात आहे. त्या भोगवादी प्रवृत्तींनी ग्लॅमरची स्वप्नाळू दुनिया सर्वसामान्यापुढे उभी करून तिलाच वास्तव दुनिया म्हणण्याची व मानण्याची मानसिकता घडविली आणि जागतिकीकरणात सर्वसामान्यातून तरुणांचा मोठा जमाव हातात भ्रमणध्वनी घेऊन भ्रमिष्टासारखा रस्तोरस्ती फिरू लागला. व्यवस्था परिवर्तनासाठी तरुणाई हे फार मोठे शस्त्र असते; पण भारतात तर व्यवस्थेनेच तरुणाला मॅनेज केले आहे. तरीही लेखक आशावादी आहे. 'जे लोक संविधानालाच आपली संस्कृती आणि अभंग जीवननिष्ठा मानतील तेच लोक 'आम्ही भारताचे लोक' या गौरवशाली बिरूदाचे धनी ठरतील.' हा लेखकाचा आशावाद धुसरतेतून मार्ग काढणारा प्रकाशकिरण

निश्चितच आहे.

भारतात औद्योगिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, कृषी, शैक्षणिक इ. क्रांती मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. असा देखावा दूरदर्शनच्या विविध चॅनल्सवरून आणि वृत्तपत्रांच्या विविध रकान्यावरून मोठ्या प्रमाणात उभा केला जातो. शेवटी या क्रांतीचे लाभार्थी कोण आहेत? हे मात्र मुद्दाम टाळले जाते. भारतीय संविधानाला अपेक्षित क्रांतीचे हे चित्र आहे काय? याचे उत्तर संसदेने दिल्यास बरे होईल. पण वर्तमान संसद तसे उत्तर देऊ शकणार नाही? हल्ली संसदेत जे सत्ताकारण सुरू आहे, ते फार धक्कादायक आहे आणि धोकादायक आहे. संसदीय राजकारणाची आणि सत्तासंघर्षाची चिकित्सा 'निवडणुकीमुळे आंबेडकरी चळवळीचे ठिकाण कळले' या लेखातून मार्मिकपणे लेखकाने केलेली आहे. 'आज भारतात एक शून्य बाजीराव प्रमाणे एक शून्य राजकारण सुरू आहे. संविधाननिष्ठ मन नसतानाही केवळ सत्तासंपादनासाठी चाललेले क्लेषदायक खेळ म्हणजे राजकारण नव्हे, ते सत्ताकारण आहे. संविधान सुरू होऊन इतकी वर्षे झाली तरी या देशात संविधानाला अपेक्षित मतदार नाहीत; संविधानाला अभिप्रेत लोकप्रतिनिधी नाहीत. निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी आहे; पण तत्त्व आणि व्यवहार यात आपल्या देशात जवळ जवळ विरोधच आहे. संविधानाला अभिप्रेत समाजपरिवर्तन हेच राजकारणाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी निःस्वार्थी, बुद्धिजीवी आणि संविधाननिष्ठ लोकांच्याच हाती सत्ता जायला हवी. पूर्वी माणसं समाजपरिवर्तनाच्या चळवळीतून राजकारणात जात असत. आता घरातून राजकारणात जातात. बव्हंशी लोकप्रतिनिधी हे धर्मांध, अंधश्रद्ध आहेत. स्थितीवादाचे आदर्श ठेवणारे आहेत. अशी परखड मीमांसा डॉ.यशवंत मनोहर या विचारवंताने यथोचित केलेली आहे. ''आपण समजतो की शिक्षणाच्या प्रसारामुळे ज्ञानाची वाढ होत आहे. जग अधिकाधिक सुजाण होत आहे. पण हा एक भ्रम आहे. कालच्याप्रमाणे आजच्याही जगात शहाणपणाचा दुष्काळ शहाण्या माणसांना जाणवतो. मूर्खांचे ठीक असते. त्याला मूर्खपणाच्या वातावरणात सुखाने राहता येते, पण शहाणी माणसे मात्र या वातावरणात गुदमरून जातात. हॅम्लेटला जगाचा सांधा निखळल्याची आणि जीवन कुजल्याची जाणीव होत होती; पण संवेदना हरवून बसलेले लोक जग सुरळीत चालले आहे असेच मानीत असतात.' अशा भयाण आणि विदारक सत्याची जाणीव डॉ.निर्मलकुमार फडकुले यांनाही एकेकाळी झाली होती. मनोहर सरांचा हा लेख खूपच विचारप्रवण ठरला आहे.

भारतीय लोकशाही कोणत्या दिशेने वाटचाल करते आहे, याचा गंभीर पुरावा प्रस्तुत विचारवंताने जनता दरबारातच सादर केलेला आहे. विवेकहीन माणसाच्या हातात सत्तेचे नेतृत्व जाणे ही राष्ट्रावर कोसळलेली फार मोठी आपत्ती असते. सर, पराभव तुमचा नाही. तो एकुणच लोकशाही मूल्यांचा आणि प्रागतिक मानवी मूल्यांचा

जबरदस्त पराभव आहे. हा पराभव भंडाऱ्यातून डॉ.आंबेडकरांनी अनुभवला. ज्ञानपीठ विजेते डॉ.शिवराम कारंथ यांनीही पचवला होता. लोकशाहीची चाके कोणत्या दिशेने चालतील हे जनतेनेच ठरवावे. मतस्वातंत्र्याचा अधिकार भारतीय लोकशाहीला काळोखाच्या गर्तेत तर लोटत नाही ना? अशी प्रचिती हा लेख वाचताना येते. या संदर्भात मला एरिक फ्रॉम या विचारवंताची आठवण होते. तो म्हणतो, आपल्या स्वतःजवळ विचार करण्याची क्षमता असेल, तरच मतस्वातंत्र्याच्या हक्काला काहीतरी अर्थ असतो. आपल्याकडील लोकशाही परिपक्व का नाही? याचे उत्तर एरिक फ्रॉम प्रमाणे डॉ.यशवंत मनोहरांच्या राजकीय विचारात दडले आहे. वैचारिक लेखनासोबतच काही व्यक्तीचरित्रपर लेखनही सरांनी केलेले आहे.

व्यक्तिचरित्रपर संवेदनशील आणि शैलीदार लेखनाचा मनोहारी नमुना लेखकाने निग्रांच्या चळवळीचे संचालक कृष्णा इंगळे, चित्रकार भाऊ दांदडे यांची विचारचित्रे, विजयी अस्वस्थ नायक : उत्तम कांबळे, महान लोककवी : नारायण सुर्वे, विठ्ठल उमप : लोककलांचा महानायक, वामन निंबाळकर अशा विविध लेखातून सादर केलेला आहे. दारूचे फुटले बांध, स्वप्नांची इच्छा, संस्कार, संकल्प, जयंती, साहित्य, भाषा आणि समाजविकास, मराठी कवितेचे छंदशास्त्र इ.लेख विचारप्रवण आहेत. विज्ञान, तत्त्वज्ञान आणि साहित्य या लेखातून ग्लोबल वार्मिंगचे धोके लेखकाने अधोरेखित केलेले आहे.

'मी पुस्तकपुत्र' हा लेख ललितलेखनाचे अप्रतिम मॉडेल असून या लेखातून विचारांचा प्रवाह शैलीमुळे कुठेही बाधित होत नाही. उदा.संविधानाच्या सूर्याने माझ्या प्रतिभेला अंधारात जाणेच अशक्य करून टाकले. संविधानाच्या पुस्तकाने माझ्या विचाराला समग्रलक्ष्यीपण दिले. समता, बंधुता अशा सर्वच सर्वहितैषी मूल्यांचे एक रॅशनल एस्थेटिक्स दिले. सदाशिव आठवलेंच्या 'चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान' या पुस्तकाने एका मोहक खोटेपणाचा सामना जडवादाने कसा केला ह्याची हकिकत मला सांगितली. माझ्यातल्या नास्तिकाचे बौद्धिक शस्त्रागार त्यामुळे समृद्ध झाले. तर्कतीर्थांच्या हिंदू धर्माच्या समीक्षेने मला धर्मसंस्थेचा विघातकपणा पटवून दिला. माझ्यातला बुद्धिवाद त्यामुळे झळाळून निघाला. माझ्यातील करुणेच्या आणि इहवादाच्या पाठीशी बुद्ध नावाचा हिमालय उभा राहिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांती-प्रतिक्रांतीच्या विश्लेषणाने आणि श्री.ग.सरदेसाई यांच्या भारतीय तत्त्वज्ञानःसामाजिक संघर्ष, या पुस्तकातील मीमांसेने भारतातील सामाजिक, आर्थिक शोषणाचा संतप्त करणारा नकाशा माझ्यापुढे मांडला. एक पुस्तकप्रेमी पुत्र पुस्तकाच्या सहवासातून सापेक्षी, सर्जनशील विचारवंत म्हणून कसा उदयास येतो, याची ऐतिहासिक मांडणी प्रवाहीपणे लेखकाने केलेली आहे. लेखकाची ताकद जशी त्यांच्या विचारप्रवाहात आहे तशीच त्यांची ताकद त्यांच्या भाषिक रचनेतही आहे. भाषेतून सूचक

चिन्हव्यवस्था निर्माण करण्याचे लेखकाचे कसब कमालीचे आहे. प्रभावी भाषा विकासशील मानसिक सामर्थ्याचा व कृतीचाच एक भाग असते. असे भाषिक सामर्थ्य आणि कुवत मराठी साहित्यविश्वात डॉ.यशवंत मनोहर सरांच्या वैचारिक लेखनातून जागोजागी झळकते.

'विचारमुद्रा' या पुस्तकातील सर्वच लेखांना सामाजिक मूल्यांच्या सोबतच वाङ्मयीन मूल्यांची मूल्यवेधक किनार लाभलेली आहे. डॉ.यशवंत मनोहर हे आंबेडकरवादाचे समर्थन करणारे व्यक्तिमत्त्व तर आहेच, शिवाय मराठी साहित्याच्या क्षेत्रात आंबेडकरवादाची सैद्धान्तिक मांडणी करणारे कडवे, निष्ठावान वाङ्मयसेवक आहेत. त.बुद्ध, म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या जीवनप्रेरणाच्या बळावरच त्यांचा वाङ्मयप्रवास आणि जीवनप्रवास सुरू आहे. लेखकाने व्यक्तिगत आयुष्यात कितीतरी हालअपेष्टा, मानापमान भोगल्याचे अनेक पुरावे त्यांच्या साहित्याच्या आणि जीवन व्यवहाराच्या निमित्ताने पाहायला मिळतील. पण त्यांच्या खाजगी आयुष्यातील सुखदु:खावर आंबेडकरवाद एवढा हावी ठरला की त्यांनी दु:खाचे कधीच भांडवल केले नाही. नाहीतर साहित्यात दु:ख आणि शोकांतिका यांचाही भला मोठा प्रांत आहे. २००९ सालची नागपूर मतदार संघातील लोकसभेची निवडणूक आठवली की, हे त्यांच्यावरील आंबेडकरवादाच्या प्रभावाची साक्ष पटते. सर, लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाले. त्यांचा झालेला पराभव, हा केवळ त्यांचा पराभव नव्हता. पराभवाच्या कारणांचा त्यांनी घेतलेला वेध मला वाटतं प्रगमनशील भारतीय राजकारणाला आणि लोकशाहीच्या विकासाला प्रेरक ठरेल. 'निवडणुकीमुळे आंबेडकरी चळवळीचे ठिकाण कळले.' या लेखातून त्यांनी केवळ पराभवाची मीमांसा केलेली नाही, तर आंबेडकरी चळवळीच्या ठिकऱ्या स्वत:च्या स्वार्थाखातर करणाऱ्या आंबेडकरी चळवळीतील तथाकथित कार्यकर्त्यांच्या बाजारू मानसिकतेचा त्यांनी समाचार घेतलेला आहे. तद्वतच आंबेडकरवादाला जीवनव्यवहारात यशस्वी करण्यासाठी 'बुद्धिजीवी, विचारवंत, साहित्यिक, समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील कार्यकर्ते, कलावंत यांचे एखादे केंद्रीय संघटन उभे व्हायला हवे.' अशी स्वच्छ भूमिका त्यांनी आंबेडकरवादाच्या निष्ठेतूनच घेतलेली आहे.

डॉ.यशवंत मनोहर हे बहुआयामी व्यक्तित्व आहे. कला, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान, मानव्यशास्त्रे इ.चा आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानांचा त्यांचा दांडगा अभ्यास व चिंतन आहे. या गंभीर अभ्यासाने त्यांनी स्वत:ची आंबेडकरवादी विचारवंत अशी 'विचारमुद्रा' ज्ञानक्षेत्रावर आणि समाजक्षेत्रावर कोरली आहे. आंतरशाखीय अभ्यास जेवढा सूक्ष्म आणि सखोल तेवढा समाजाच्या स्थितीगतीचे विश्लेषण करण्याची क्षमता आणि शक्यता अधिक अशी शक्यता आणि क्षमता डॉ.यशवंत मनोहर यांच्या व्यक्तिमत्त्वात दडली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञाशील विचारवंताने

मुक्ती कोण पथे ? हा निबंध लिहून नवी समाजजाणीव माणसात निर्माण केली होती. तीच जाणीव जागतिकीकरणात डॉ.यशवंत मनोहर या विचारवंताने 'क्रांती कोण पथे ?' लिहून विकसीत केल्याचे दिसून येते. भांडवलशाहीचे जागतिक स्तरावर कोणते परिणाम होतील याची सुस्पष्ट पण सर्वव्यापक अशी मांडणी प्रज्ञाविहार या पुस्तकात त्यांनी केलेली आहे. 'जागतिक बौद्धांसाठी समान धम्मसंहिता' असावी असा त्यांचा आग्रह आहे. ''भांडवली जागतिकीकरणाने आणि मूलतत्त्ववाद्यांनी एकूणच मानवी जीवनाला यातनांच्या आणि मरणांच्या हवाली केले आहे. पैशांच्या मागे धावण्याच्या नादात आपली माणुसकी हरपत चालली आहे.'' ही त्यांची मांडणी एकूणच जागतिकीकरणाच्या परिणामाची संसूचक आहे. वैज्ञानिक क्रांतीमुळे असे वाटत होते की, भावी माणूस अर्थपूर्ण रितीने मुक्त असेल. मूढपरंपरा नाकारणारा असेल, समाज सहानुभूतीपूर्ण व करुणापूर्ण असेल, तो विवेकी असेल, पण चित्र उलटे दिसू लागले आहे. ज्या प्रज्ञाप्रतिभेने १९व्या शतकात देवाचा मृत्यू मानवी डोळ्यांनी पाहिला. पण २०व्या शतकात कल्पनेपलीकडील एक नवा प्रश्न उभा ठाकला आहे. आज मानवाचाच मृत्यू ओढवला आहे आणि हे चित्र औद्योगिक-तंत्रज्ञानाच्या क्रांतीपर्वात दिसू लागले आहे. खरे तर ही मानवी समाजाची एक भीषण शोकांतिका आहे. या शोकसागरातून मानवी समाजाला बाहेर काढण्यासाठी डॉ.यशवंत मनोहर या विचारवंताची लेखणी सूर्यप्रकाशासारखी सर्वत्र संचार करते आहे.

'खरे तर परिवर्तनाचा वसा घेतलेला कोणताही प्रतिभावंत हा क्रांतीचा फौजी असतो. असा प्रतिभावंत नानाविध वेदनांच्या कळा सोसतो. चळवळीतील दगाबाज तर कधी दरिद्री मानसिकतेने जगणाऱ्यासाठी व्यथित होतो. हा लेखक 'आंबेडकरवादी समाजव्यवस्था' उदयास यावी म्हणून अखंडपणे स्वत: राबतो आहे व स्वत:च्या लेखणीला राबवतो आहे. ''जो लेखक मानवतेच्या परमोच्च शिखरावर विराजमान होतो, 'स्व'च्या मर्यादा ओलांडून तो वैश्विक बनतो. आकाशाएवढे होण्याची ही प्रक्रिया असते.'' असे महाराष्ट्रातील थोर समीक्षक व सृजनशील लेखक डॉ.वसंत आबाजी डहाके म्हणतात. अशा प्रक्रियेतून विचारमुद्रेच्या लेखकाचे व्यक्तित्व घडले आहे.

माझ्या आयुष्यात ज्ञाननिष्ठ व दर्शननिष्ठ जोपासणारे संस्कार डॉ.यशवंत मनोहर या गुरुवर्यांच्या सान्निध्यातच शक्य झाले. गुरूच्या विचारमुद्रेला शिष्याने प्रस्तावना लिहावी हा मी माझा गुरुकडून मिळालेला सन्मान समजतो. दुनियेतील प्रत्येक व्यक्तीला, क्रांतिकारी चळवळीतील तमाम कार्यकर्त्यांना व लेखकांना नवसमाज-निर्मितीच्या दिशेने प्रामाणिक वाटचाल करायची असेल तर त्याला 'विचारमुद्रा' हा चिंतनशील व सृजनशील लेखसंग्रह दिशादर्शक ठरेल.

••••

# अनुक्रमणिका

प्रस्तावना । ४

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आदर्श जग । १७
२. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेची गरज । २४
३. आर्थिक स्वयंपूर्णांची दुर्बल घटकांसंबंधीची कर्तव्ये । ३०
४. बाताहतीतून बाहेर येण्याचा मार्ग । ३६
५. आम्ही भारताचे लोक । ४२
६. भारतीयांचा मार्गदर्शक दिवस : संविधान दिवस । ४७
७. डॉ.आंबेडकरांची जयंती : कृतज्ञता दिवस । ५०
८. आंबेडकरी चळवळीतील वैचारिकतेचे अपहरण । ५२
९. विद्यार्थ्यांपुढील आव्हाने । ५५
१०. निवडणुकीमुळे आंबेडकरी चळवळीचे ठिकाण कळले । ५८
११. धम्ममर्म । ६३

१२. निष्ठांच्या चळवळीचे संचालक कृष्णा इंगळे । ६८
१३. भाऊ दांदडेंची विचारचित्रे । ७२
१४. विजयी अस्वस्थ नायक: उत्तम कांबळे । ७४
१५. महान लोककवी : नारायण सुर्वे । ७८
१६. विठ्ठल उमप : लोककलांचा महानायक । ८१
१७. वामन निंबाळकर । ८५
१८. दारूचे फुटले बांध । ८८
१९. भाषाच जेव्हा दारू पिते । ९१

२०. स्वप्नांची इच्छा । ९३
२१. संस्कार । ९५
२२. संकल्प । ९७
२३. जयंती । ९९
२४. साहित्य । १०१
२५. भाषा आणि समाजविकास । १०३
२६. मराठी कवितेचे छंदशास्त्र । १०८
२७. विज्ञान, तत्त्वज्ञान आणि साहित्य । ११३
२८. रौप्य महोत्सव : आनंद आणि जबाबदारी । ११६

२९. पराभूत ब्राह्मण्याचा राष्ट्रविघातक कांगावा । ११९

# १. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आदर्श जग

जात, वर्ण, धर्म वा वंश यांच्या कक्षेत वावरणाऱ्या भूमिका या जीवनाच्या सामग्र्याच्या भूमिका नसतात. त्या जीवनाचा तोडून तोडून विचार करीत असतात. या भूमिका त्या त्या कक्षेतील लोकांच्या हिताच्या रूपरेषा मांडत असतात. या भूमिका त्या त्या कक्षेबाहेरील लोकांना गृहीत धरीत नाहीत किंवा विषय झालेल्या कक्षेतील लोकांच्या हिताचे साधन म्हणून गृहीत धरतात, अशा भूमिका जीवनाचा समग्रलक्ष्यी विचार करीत नसतात. त्या जीवनाच्या काही अंशावर, काही भागांवरच स्थिरावतात. म्हणून अशा भूमिकांना अंशलक्ष्यी भूमिका म्हणावे लागते. अंशलक्ष्यी भूमिका स्वयंकेंद्री असतात म्हणून त्या इतरांकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा इतरांवर अन्याय करणाऱ्या असतात. या भूमिकांना जातेच्छा, पोटजातेच्छा, वर्णेच्छा, वर्गेच्छा, धर्मेच्छा वा वंशेच्छा अशी नावे देता येतील पण त्यांना जीवनाचा विचार वा तत्त्वज्ञान म्हणता येणार नाही.

संपूर्ण जीवनाचा सामग्र्याने, त्यांच्या संपूर्ण अंगोपांगासहित विचार करतो त्याला सिस्टम बिल्डर वा मेकर्स ऑफ युनिव्हर्स असे म्हटले जाते. तो जाती, वर्ग, धर्म वा देश अशी जगाची तोडून मांडणी करीत नाही तर संपूर्ण मानवी जीवनाच्या हिताची, संपूर्ण जगाच्याच कल्याणाची मांडणी करतो. अशी मांडणी जीवनाची समग्रलक्ष्यी मांडणी ठरते आणि असा विचारवंत संपूर्ण जीवनाचाच विचारवंत ठरत असतो आणि त्याचे तत्त्वज्ञान संपूर्ण जीवनाच्याच उन्नयनाचे तत्त्वज्ञान ठरत असते. त्याचे तत्त्वज्ञान संपूर्ण मानवी जीवनाचीच पुनर्मांडणी करणारे, पुनर्रचना करणारे तत्त्वज्ञान ठरते. रिकन्स्ट्रक्शन ऑफ दि वर्ल्ड हीच या तत्त्वज्ञानाची प्रतिष्ठा असते. या दृष्टीने युनिव्हर्सल फिलॉसॉफर्स म्हणून किंवा वैश्विक तत्त्वज्ञानी म्हणून बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकरांचा गौरवाने उल्लेख करायला हवा. बुद्धांचे तत्त्वज्ञान 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' या असीमाला पोटात घेते तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान संपूर्ण जगाचीच, त्यातील एकूण मानवी संबंधांचीच नवी सर्वन्यायी मांडणी करण्याचा विचार करते. १३-१०-१९४५ च्या जनता पत्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी

म्हटले आहे की 'प्रश्न केवळ अस्पृश्य समाजाचेच प्रश्न सोडविण्याचा नाही, हा मर्यादित ध्येयमर्यादा ओलांडून आपली तत्त्वप्रणाली स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या उदात्त आणि सर्वश्रेष्ठ तत्त्वांना भिडलेली आहे.' याप्रकारे पुढे संपूर्ण विश्वसमतेचे आणि सौंदर्याचे तत्त्वज्ञ ठरणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केवळ अस्पृश्यतेच्याच निर्मूलनापासून आपल्या कार्याचा आरंभ करावा लागला असे नाही, तर अस्पृश्यांमधील जाती आणि या जातींमधील पोटजातींपासून आरंभ करावा लागला. पण त्यांचे तत्त्वज्ञान या मर्यादांमध्ये अडकून मात्र पडले नाही. मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत हा त्यांच्या नियतकालिकांचा क्रम बघितला तरी त्यातील गतिशास्त्र आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. तद्वतच बहिष्कृत हितकारिणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, शेकाफे, रिपब्लिकन पक्ष हा त्यांनी काढलेल्या संस्थांचा-पक्षांचा प्रवास बघितला तरी त्यातील विस्तृत होत चाललेला अवकाश आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही. तसेच 'कास्ट इन इंडिया', 'क्रांती-प्रतिक्रांती' भारतीय संविधानातील त्याचे समग्रलक्ष्यी व्हिजन आणि 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' मधील त्यांचा संपूर्ण जगाचे रिकन्स्ट्रक्शन करायचा ध्यास हा सर्व प्रवासच सीमीताकडून असीमतेकडे चाललेला आहे. हे स्पष्टपणे मनावर ठसते. लोकल प्रश्नांच्या आगीत जळत सुरू झालेले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मन ग्लोबल वास्तवाच्या एका सर्वहितैषी आणि न्याय्य प्रारूपाच्या देदीप्यमान निर्मिती-शिखरावर कसे झेपावून जाते, त्याचा थक्क करून सोडणारा अनुभव आपल्याला येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आमूलाग्र समाजक्रांतीचे तत्त्वज्ञानी होते. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातही बुद्धाच्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकराएवढा रॅशनल थिंकर झाला नाही. सुधारणावादाची भूमिकाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रारंभीच्या काळात घेतली होती. १९३५ साली हिंदू धर्मत्यागाची घोषणा त्यांनी केली परंतु 'दिस इज माय लास्ट स्पीच अ‍ॅज हिंदू' असे ते १९३६ साली 'अ‍ॅनिहिलेशन ऑफ कास्ट' या भाषणाच्या निमित्ताने म्हणाले आणि सुधारणेचा विचार त्यांनी डोक्यातून काढून टाकला. शोषणयंत्रणेच्या तत्त्वज्ञानाच्या, ऐतिहासिक संचिताच्या, साहित्यकलांच्या, रूढी-परंपरांच्या आणि संस्कारांच्या पूर्णतः विरोधी छावणीत ते दाखल झाले. सुधारणावाद पायाभूत संरचना न बदलता त्यात काही दुरुस्त्या सुचवितो. पण प्रश्न शोषणयंत्रणेची पायाभूत तत्त्वे धुडकावून लावण्याचा असतो. शोषणयंत्रणेचा केवळ तपशील नाकारून भागत नाही. कारण तिची पायाभूत तत्त्वे पुन:पुन्हा त्यांना हवा तो शोषणाचा नवा तपशील जन्माला घालतात आणि सामान्य माणसांना त्या तपशिलात अडकवितात. शोषणयंत्रणेचे सामर्थ्य या तिच्या पायाभूत तत्त्वात असते. म्हणून शोषणयंत्रणेचा नायनाट करण्यासाठी या तिच्या पायाभूत तत्त्वांना प्रथम आग लावावी लागते. समाजजीवनाची पुनर्रचना करण्यासाठी हे आवश्यक आहे. हा एकाच वेळी मार्ग, दिशा आणि ध्येय बदलण्याचा मुद्दा असतो. साधनेही बदलण्याचा आणि उद्दिष्टेही

बदलण्याचा हा मुद्दा असतो. क्रांती म्हणजे संपूर्ण समाजाचे संपूर्ण मानसशास्त्र बदलणे आणि त्याच्या सर्व जुन्या सवयींपासून त्याला तोडणे! संपूर्ण जागतिक पातळीवर या सवयी वेगवेगळ्या नात्यांनी वावरतात. जाती, वर्ग, धर्म, वंश अशा वेगवेगळ्या रूपात या सवयी वावरतात आणि समाजाची परस्परविरोधी, परस्परजाचक विविधता कायम ठेवतात. वरील सर्वच संदर्भ समाजाला शोषक-शोषित या दोन गटात वाटून ठेवतात. शोषितांनाही परस्परजाचक गटात विभागून ठेवले जाते. कळत-नकळत या स्थितीमुळे शोषकही स्वतःच्या शोषणस्थितीचे संरक्षण करीत असतात.

यावेळी क्रांतिकारकाला अनेक व्यवधाने बाळगावी लागतात. प्रतिक्रांतीचे तपशीलवार चारित्र्य त्याला मांडावे लागते आणि क्रांतीचेही स्वच्छ शब्दात चरित्रचित्रण त्याला करावेच लागते. शोषितांच्या, वंचितांच्या परस्परविरोधी गटांना एकत्र आणणारे सूत्र निर्माण करण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. वंचितांना एकत्रित आणणारे सूत्र प्रस्थापित करणे म्हणजे त्यांना विभागणाऱ्या शोषणसूत्रांना त्यांच्या मनातून हद्दपार करणेच असते. ही प्रक्रिया घडणे आवश्यक असते आणि ते सोपेही नसते.

एका पर्यायी सम्यक जगाचे, त्याच्या सर्व घटकांचे नवे सर्जनशील सिद्धान्तन त्याला करावे लागते. या आदर्श जगातील माणसांच्या संबंधाचे नीतिशास्त्र त्याला मांडावे लागते. या नव्या जगातील समाज कसा असेल, त्याचे अर्थशास्त्र काय असेल, त्याचे राजकारण काय असेल, त्याची शिक्षणप्रणाली कशी असेल, त्याच्या संस्कृतीचा आशय कसा असेल, त्याच्या साहित्यशास्त्राचे स्वरूप काय असेल, त्याच्या जीवनाचे आणि साहित्यासकट सर्व कलांचे सौंदर्यशास्त्र काय असेल, परिवर्तनाच्या आणि विकासाच्या धारणा काय असतील, त्याच्या विज्ञाननिष्ठेसंबंधीच्या, बुद्धिवादासंबंधीच्या आणि समाजवादासंबंधीच्या धारणा काय असतील, त्याच्या मानवी जीवनाच्या सार्थक्यासंबंधीच्या कल्पना काय असतील आणि सुखासंबंधीची त्याची धारणा कोणती असेल, या आणि अशा सर्व प्रश्नासंबंधीचा पूर्ण नवा डिस्कोर्स, एक संपूर्ण नवे चर्चाविश्व, एक संपूर्ण नवा मूल्यकोश त्याला निर्माण करावा लागतो.

भारतात आणि जगातही क्रांतीकल्पना मांडली गेली, पण बहुतेकांच्या क्रांतीकल्पनेत प्रतिक्रांतीची मलिनता थोडीबहुत मिसळलेली आहे. त्यामुळे त्यांच्या क्रांतीकल्पनेला मिश्र अर्थव्यवस्थेसारखा निसरडा चेहरा प्राप्त झाला.

बुद्धाची आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची क्रांतीकल्पना पूर्णतः विशुद्ध आहे. ही कल्पना प्रथम प्रतिक्रांतीचे पूर्ण तत्त्वज्ञान नाकारते. या तत्त्वज्ञानाने दर

लोकमानसशास्त्राची घडण नाकारते. कुठल्याही वाटेने किंवा चोरवाटेनेही प्रतिक्रांतीच्या इच्छेचा एखादा कणही क्रांतीत शिरणार नाही याची पूर्ण खबरदारी ही क्रांतीकल्पना घेते.

प्रतिक्रांतीच्या तुरुंगात अडकलेले लोकमानस मुक्त करणे हे या क्रांतीकल्पनेला आपले प्रथम कार्य वाटते. अनेकदा सवयीनेच लोकमानस प्रतिक्रांतीला अपरिहार्यता मानते. शोषणयंत्रणेने पर्यायाची कोणतीही तरतूद या मानसशास्त्रात उरू दिलेली नसते. हे लोकमानस या सवयीमुळेच क्रांतीचे विरोधक बनते आणि आपल्याच गुलामीच्या सुधारित आवृत्त्यांची निर्मिती करण्यासाठी शोषणयंत्रणेला सहकार्य करते.

या विपरितात क्रांतीकारकाला क्रांतीचे ब्लूप्रिंट तयार करावे लागते. क्रांतीच्या मार्गातील अवरोध अधोरेखित करीत, त्यातून निघणाऱ्या मार्गांची मांडणी करीत क्रांतीच्या यशस्वीतेपर्यंतचा सर्व प्रवास चिकित्सा करीत मांडावा लागतो. वर्तमान, त्या वर्तमानाचा भूतकाळ आणि त्याच वर्तमानाचा भविष्यकाळ अशा त्रिमितींची मांडणी करावी लागते. यासाठी क्रांतिकारकाला जीवनाच्या स्थितीगतीचे संपूर्ण चरित्र बारकाईने माहीत असावे लागते. त्यासाठी क्रांतिकारकाला प्रथम माणसाच्या स्वभावावर लक्ष केंद्रित करावे लागते. माणसाच्या या स्वभावातील आणि या अशा असंख्य स्वभावांनी बनणाऱ्या मानवी जीवनातील असंख्य द्वंद्वांची सूक्ष्म जाण क्रांतिकारकाला असावी लागते.

म्हणून बुद्धाने माणसाच्या मानसशास्त्राचे नव्याने संशोधन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हेच प्रतीत्यसमुत्पादाचे मानसशास्त्र आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या संदर्भात पुरस्कारिले. माणसाचे मन तृष्णेचे गुलाम का होते ? ते तृष्णेचे संचालक कसे होते ? माणूस दैववादी कसा होतो ? माणूस अंधश्रद्ध, जातीवादी वा वर्चस्ववादी का होतो ? माणूस जाती, वर्ग, धर्मविहीन केव्हा होतो ? माणूस संकुचिताच्या सीमांमध्ये का अडकतो आणि तो असीम माणुसकीचा धारक कधी होतो ? माणूस विषमतावादी कधी होतो आणि माणूस बुद्धिवादी आणि समाजवादी केव्हा होतो ? या सर्व गोष्टींचे कारण कारणांमध्ये दडलेले आहे. कारण तसे परिणाम, पोषणद्रव्ये तसे फळ या न्यायाने हे सर्व घडते. मुळात जात नसलेल्या मुलाला जात शिकविली, तर ते जात होईल. मुळात दैववादी नसलेल्या मुलाला दैववाद शिकविला तर मुलगा दैववादी होईल. आळस शिकविला तर मूल आळशी होईल. प्रयत्नांची शिकवण दिली तर ते प्रयत्नवादी होईल. त्याला इहवाद शिकविला तर ते इहवादी होईल. त्याला बुद्धिवाद शिकविला तर ते बुद्धिवादी होईल. ईश्वर हे अंतिम आणि परम

सत्य आहे असे त्याला शिकविले तर ते ईश्वरवादी होईल. त्याला माणूस हेच जीवनाचे अंतिम आणि परमसत्य आहे असे शिकविले तर ते माणूसवादी होईल. व्यक्तीला कोणत्या गावाला पाठवायचे ते निश्चित करा. त्या गावाचे तिकीट काढा. त्या गावाला जाणाऱ्या गाडीत, विमानात व्यक्तीला बसवा. परिणाम कारणाच्या प्रकृतीवरती अवलंबून आहे. कारण तसा परिणाम. हेतू तसे कार्य. काय हवे ते आधी ठरवा आणि कारणांचे नियोजन करा. कारणांच्या पोटी कार्ये जन्माला येतात. कारणांच्या पोटी परिणाम जन्माला येतात. काळी कारणे काळी कार्ये. पांढरी कारणे पांढरे परिणाम. निसर्ग माणसाच्या शरीरात सतत बदल घडवत असतो. परंतु माणसाचे मन बदलताना निसर्ग कधीकधी हतबल होतो. आपले मन बदलण्यासाठी माणसाने निसर्गाला मदत करायची असते. असे झाले तर शरीर जसे अनिच्चं ठरते, तसे माणसाचे मनही अनिच्चं ठरते. त्याला निरंतर परिवर्तनशीलतेशी नाते जोडता येते. कधीकधी शेकडो वर्षे, हजारो वर्षे माणसाचे मन एकाच ठिकाणी खोळंबून असते. याला कारण माणसांचे मन थांबवणाऱ्या कारणांशी त्या मनाला करकचून बांधले गेले आहे असा होतो. माणसाचे मन गोठवणारी कारणे निकामी केली आणि माणसाला पंख देणारी कारणे सक्रीय केली तर माणसाचे मन गतिमानता होईल. जातीवर मात करणारी, वर्गावर विजय मिळविणारी आणि धर्मांना उल्लंघून जाणारी ऊर्जा ते होईल. माणसाच्या मनाचे पोषण तुम्ही कसे करता त्यावर हा परिणाम अवलंबून राहील.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तृष्णाविहीन माणसांचे जग निर्मिण्याचा ध्यास घेतला आणि तसे तत्त्वज्ञान मांडले. माणसाला जगाचे परमसत्य मानले आणि या परमसत्याच्या विशुद्ध निर्मितीसाठी तत्त्वज्ञान मांडले. या परमसत्याच्या विजयासाठी आपल्या प्रज्ञेला सर्जनशील केले.

त्यांनी प्रथम स्त्रियांना आणि पुरुषांना एका सांस्कृतिक पातळीत आणले. निसर्गनिर्मित वेगळेपणा म्हणजे विविधतेचा मुद्दा आहे. तो विषमतेचा वा विरोधाचा मुद्दा होऊ शकत नाही. स्त्री म्हणून, पुरुष म्हणून स्त्री-पुरुषात वेगळेपणा असला तरी बाबासाहेबांनी माणूस म्हणून त्यांच्यात विभेदाची कोणतीही तरतूद ठेवली नाही. हा मुद्दा अर्ध्या विषमताग्रस्त जगाला समतेची सनद देणारा मुद्दा आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुरुषांमधील जाती, वर्ग, वंश आणि धर्म यामुळे पडलेले उपभेद माणसाच्या प्रगतीला, त्याच्या माणुसकीच्या संवर्धनाला कसे मारक आहेत, ते सांगितले. त्यांच्या तत्त्वज्ञानाने स्त्रियांमधील अशा उपभेदांना विघातक ठरविले. संपूर्णच जगाच्या जीवनासाठी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे सूत्र प्रस्थापित केले. सर्जनशीलता आणि बुद्धिवाद या मूलभूत पायावर दुनियेसाठी

नव्या विकसनशील नीतीचे निर्माण केले. हुकुमशाहीला विरोध केला. सर्व व्यक्तींमध्ये सुसंवाद असण्याचे ध्येय बाळगले. हा सुसंवाद नसला तर एथिकचा एंड कसा होतो हे सूचित केले. माणूस हा मूलतः एका मानवी व्यवस्थितीचा भाग आहे. त्याच्या निर्मितीच्या प्रारंभकाळात ही व्यवस्थिती असते. पुढे त्याला त्याच्या या जाती, वर्ग, वंश आणि धर्मविहीन व्यवस्थितीपासून तोडले जाते. पण या कृत्रिम अव्यवस्थितीतून माणसाला काढणारा आणि त्याच्या मूळ व्यवस्थितीशी त्याला जोडणारा, त्याला त्या सुंदर व्यवस्थितीची जाणीव करून देणारा वैचारिक कार्यक्रम असेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आहे.

तृष्णा स्वार्थापोटी जन्माला येते. स्वार्थ जितका पेट घेतो, तितकी तृष्णा भडकते. तृष्णा माणसाला इतरांच्या सुखांना तुडवित एका अप्राप्य सुखाकडे जायला सांगते. या प्रक्रियेने माणूस सुखी होऊ शकत नाही. स्वार्थ आणि स्वार्थापोटी जन्माला येणारी तृष्णा त्याला माणूसही होऊ देत नाही, माणूसही राहू देत नाही आणि सुखीही होऊ देत नाही.

प्रामाणिकपणा, तृष्णाविहीनता, सदाचार अशा गोष्टींमुळे माणसाला माणूस म्हणून शक्य असलेले परमसुख तृष्णेमुळे अशक्य होते. तृष्णा त्याला निब्बाणापासून वंचित ठेवते. सम्यक माणूस म्हणून, विषमतातीत माणूस म्हणून संभवणाऱ्या परम मानवी जीवनापासून ही तृष्णाच माणसाला वंचित ठेवते. माणसाच्या मूळ व्यवस्थितीशी, त्याच्या परिपूर्ण माणुसकीशी माणसाला जोडणे म्हणजे एलिनेशनची शिकार ठरलेल्या माणसाला त्याच्या अधःपतनातून बाहेर काढणे होय. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान मानवी एलिनेशनच्या निर्मूलनाचे तत्त्वज्ञान आहे.

बुद्धिमान लोकांवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी फार मोठी जबाबदारी टाकलेली आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानात या लोकांना मार्गदर्शक दीपांचे स्थान आहे. हे लोक प्रामाणिक, निस्पृह, जागृत आणि सर्वहितैषी मात्र असलेच पाहिजेत. याप्रमाणेच माणुसकीचे, शीलाचे म्हणजे करुणेचे आणि बुद्धिवादाचे संवर्धन करणाऱ्या शिक्षणाची मूलगामी रूपरेषा डॉ.बाबासाहेबांनी मांडलेली आहे. बौद्धिक अन्न अशा स्वरूपात बाबासाहेब शिक्षणाचे चारित्र्यचित्रण करतात.

थोडे सुखी आणि बहुसंख्य दुःखी असे जग नसावे. थोडे सुस्थितीत आणि बहुसंख्य अभावात असे जग आदर्श असूच शकत नाही. थोड्यांना सर्व संधी आणि उरलेल्या सर्वांना संधीबंदी असे जग बाबासाहेबांना आदर्श वाटूच शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात समाजवादाचा एक अनोखा प्रयोग विशद केला गेला आहे. 'रक्ताचा एखादा थेंबही सांडू न देता लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणणारी शासनप्रणाली म्हणजे

लोकशाही' अशी लोकशाहीची व्याख्या बाबासाहेब आंबेडकरांनी केली. ही व्याख्या हुकूमशाहीच्या, हिंसेच्या, परिवर्तनाच्या संदर्भात इतकी बोलकी आहे की, तिच्यावर वेगळे भाष्य करण्याची गरजच नाही. अर्थात समाजवादाची प्रस्थापना या लोकशाही मार्गाने, प्रबोधनाच्या मार्गाने व्हावी अशी समाजवादाची वेगळी संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली आहे. हे वैश्विक समाजवादाचे प्रारूप आहे. त्यामुळेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ही लोकशाही समाजावादाची व्याख्या क्रांतीचीही समर्पक व्याख्या ठरते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आदर्श जगाचे चित्र पूर्ण रॅशनल आहे. त्यात गूढवादाला, अध्यात्माला कुठेही थारा नाही. ते माणसाला मानवी जगाचे परमसत्य मानते आणि मानवी जीवनाचे परमसौंदर्यही मानते. हे सौंदर्य नष्ट करण्याचा प्रयत्न इतर तृष्णाजन्य असत्ये करीत असतात. आज तर जागतिकीकरणाच्या काळात तृष्णेने इतकी बीभत्स, इतकी अमानुष आणि इतकी विनाशक रूपे धारण केली आहेत, की आजघडीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्श जगाच्या प्रारूपाची विशेषच गरज जगाला आहे. फक्त हे प्रारूप जगाला समजावून सांगायची गरज आहे.

हे आदर्श जगाचे चित्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाच्या असीम प्रज्ञेच्या धन्याने मांडलेले आहे. हा महामानव एकाच वेळी लोकलपासून ग्लोबलपर्यंतच्या प्रश्नांचा वेध घेत होता. त्यामुळेच सब्बे सत्ताच्या सुखाचे, कल्याणाचे आणि संवर्धनाचे हे सौंदर्यशास्त्र या प्रतिभावंताला मांडता आले. या मांडणीमागे एका संपूर्ण प्रज्ञानी आणि प्रबुद्ध जगाची निर्मिती व्हावी ही कळकळ आहे.

# २. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेची गरज

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या हयातीत रिपब्लिकन पक्षाची स्थापना करू शकले नाहीत आणि आजपर्यंत कोणाही 'दलित' पुढाऱ्याला रिपब्लिकन पक्षाची स्थापना करता आली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा सांस्कृतिक वकूबच १९५६ नंतरच्या एकाही दलित नेत्यामध्ये नव्हता. हा पक्ष केवळच दलित पुढाऱ्यांनी नव्हे तर शोषितांच्या सर्वच पुढाऱ्यांनी स्थापन करायचा होता. हे झाले नाही त्यामुळे रिपब्लिकन पक्ष खुल्या पत्रातून बाहेर येऊच शकला नाही.

३ ऑक्टोबर १९५७ रोजी या दलित पुढाऱ्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेचे नाव पुढे करून दलित फेडरेशनच (शेड्युल्ड कास्ट फेडरेशन) सुरू ठेवली. १९४२ साली विशिष्ट हेतूने स्थापन केलेली दलित फेडरेशन भारताचे संविधान सुरू झाल्यानंतर आपली अन्वर्थकता गमावून बसली आहे. संविधानाच्या सतराव्या अनुच्छेदाने अस्पृश्यता नष्ट केलेली आहे. अस्पृश्यता म्हणजे दलितत्व! हे दलितत्व कायम ठेवणे, ते पुढे नेत राहणे म्हणजे संविधानद्रोह ठरेल. 'आंबेडकर विरुद्ध आंबेडकर' असा विचित्र झगडा तो ठरेल. हे बाबासाहेब आंबेडकरांना चांगले ज्ञात होते. म्हणून जातीच्या पायावर उभा असलेला दलित फेडरेशन हा पक्ष बरखास्त करण्याचा आणि सर्वच सर्वहारांच्या वर्गीय हितसंबंधांना एका सूत्रात बांधणारा पक्ष स्थापन करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. 'रिपब्लिकन पक्ष' हे नावही त्यांनी पक्के केले. निधी आणि कार्यकर्त्यांचा अपुरेपणा यामुळे छोट्या छोट्या परिवर्तनवादी पक्षांना राजकीय सत्तेपर्यंत जाणारी ताकदच प्राप्त होत नाही. त्यांचे विघटनच त्यांच्या राजकीय अवकाशाच्या आड येते. हे सर्व शोषितांचे पक्ष आणि शोषित समूह त्यामुळे सत्तेपासून कायम वंचित राहतात. एकत्र न येण्याची शिक्षा भोगत राहतात.

हे विघातक वास्तव बदलायला हवे. या सर्व शोषितांच्या वाट्याला येणारे शोषण कमी अधिक प्रमाणात सारखेच आहे. 'हे समान अंतःकरणाचे घटक आहेत' म्हणून सत्ताधारी कॉंग्रेस पक्षावर नियंत्रण ठेवणारा प्रबळ पक्ष लोकशाही यशस्वी होण्याच्या

दृष्टीने आवश्यक आहे. भारतीय संविधानाची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करायला सत्ताधाऱ्यांना भाग पाडणारा किंवा अशी खरी अंमलबजावणी स्वत:च करू शकणारा पक्ष बाबासाहेबांना अभिप्रेत होता. असा पक्ष शक्य व्हावा म्हणून त्यांनी डॉ.राममनोहर लोहिया, एस.एम.जोशी, आचार्य अत्रे, मधु लिमये अशा काही मान्यवरांशी बोलणी सुरू केली होती. बाबासाहेबांच्याच अध्यक्षतेखाली दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी ३० सप्टेंबर १९५६ रोजी झालेल्या बैठकीत दलित फेडरेशन या राजकीय पक्षाऐवजी 'अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टी' या नावाचा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय झाला. १३ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरात त्यांना 'धर्मांतरानंतर शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनचे काय होणार?' असा प्रश्न एका वार्ताहराने विचारला. 'कदाचित तो कायम राहील किंवा नवा पक्ष स्थापन होईल. मी मात्र बौद्ध धर्मात प्रवेश केल्यानंतर शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनचा सदस्य राहणार नाही.' हे उत्तर बाबासाहेबांनी त्याला दिले. म्हणजे संविधानाचा अंमल सुरू झाल्यानंतर आणि पुढे धम्मस्वीकार केल्यानंतर दलित फेडरेशन अस्तित्वात असणे वा त्या फेडरेशनचे आपण सभासद असणे ही बाब खुद्द डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाच अप्रस्तुत वाटलेली आहे. या वाटण्यामागचे लॉजिक आपण समजावून घ्यायला हवे.

म्हणजे जातीच्या कक्षेत राहणारा पक्ष विद्यमान राजकारणात कुचकामी ठरेल हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चांगले लक्षात आले होते आणि म्हणून त्यांनी सर्वच छोट्या-मोठ्या परिवर्तनवादी पक्षांना आणि सर्वच शोषित मतदारांना एका बलदंड वर्गसूत्रात बांधणाऱ्या पक्षाचे प्रारूप तयार केले. त्या पक्षाचे नाव त्यांनी पक्के केले होते. 'भारतीय लोकसत्ताक पक्ष' म्हणजे 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' असे या पक्षाचे नाव होते आणि अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षाच्या धर्तीवर हा पक्ष काम करील अशी बाबासाहेबांची धारणा होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत रिपब्लिकन पक्ष भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतील जीवनादर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी कटिबद्ध असलेला आणि धम्मध्येयाची समाजात प्रत्यक्ष प्रस्थापना करण्यासाठी आकाशपाताळ एक करू इच्छिणारा पक्ष होता. हा पक्ष म्हणजे भारतीय समाजक्रांतीचेच प्रारूप होता. या पक्षाचा वैचारिक आशय भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकेत होता आणि त्याची व्यावहारिक सामग्री भारतातील सर्व छोट्या-छोट्या परिवर्तनवादी पक्षांमध्ये आणि हे पक्ष ज्या लोकसमूहांचे नेतृत्व करीत होते त्या सर्व शोषित लोकसमूहांमध्ये होती. मला शेटजी, भटजींचे राज्य नको. मला ८५ टक्के लोकांचे राज्य हवे असे बाबासाहेब म्हणाले होते. याप्रकारे देशातील सकलच अन्यायग्रस्तांची एकजूट करणारा आणि आपल्या एकजुटीने राजकीय सत्ता हातात घेऊ शकणारा रिपब्लिकन पक्ष दलित पुढाऱ्यांना ३ ऑक्टोबर १९५७ साली स्थापन करता आला नाही. त्यानंतर आजपर्यंत असा

पक्ष स्थापन करण्याची गरज कोणाला वाटली नाही. असा पक्ष स्थापन करणे कोणाला शक्य झाले नाही.

या देशातील सर्वच अन्यायग्रस्तांनी एकत्र यावे आणि या देशातील हिंदूसमाजरचना नष्ट करावी; या सर्व वंचितांनी एकत्र यावे आणि राजकीय सत्तेचे धनी व्हावे असे खूप ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणून ठेवलेले आहे. "It is obvious that these three classes (Shudras, Criminal Primitive Tribes and Untouchables) are naturally allies. There is every ground for them to combine for the destruction of the Hindu Social order. But they have not." शूद्र, गुन्हेगार म्हणवल्या जाणाऱ्या आदिम जमाती आणि अस्पृश्य यांनी एकत्र यावे आणि अन्यायी समाजरचना उलथून टाकावी. पण हे लोक एकत्र येत नाहीत आणि ते कार्य करीत नाहीत. (लेखन-भाषणे : खंड ५, पृ.११५-११६) दलित फेडरेशनच्या ७-१०-१९५१ च्या जाहीरनाम्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, भारताच्या संविधानाने बॅकवर्ड क्लासेस, एस.टी. आणि एस.सी. यांना या देशाचे मालक केले आहे. (खैरमोडे, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड १०, पृ.१६४) या सर्वांनीच एकत्र यावे आणि या देशातील राजकीय सत्ता हस्तगत करावी हे बाबासाहेबांनी १९४८ च्या लखनौच्या भाषणातही सांगितले आहे.

या सर्व गोष्टींचा साकल्याने अर्थ असा की डॉ.बाबासाहेबांच्या डोक्यात मागासजाती, भटके-विमुक्त, आदिवासी, अस्पृश्य, इतर अल्पसंख्य, स्त्रिया या सर्वांची एकजूट आहे. अशी एकजूट केल्याशिवाय या छोट्या-छोट्या घटकांना राजकीयदृष्ट्या बहुसंख्य होता येणार नाही आणि बहुसंख्य झाल्याशिवाय राजकीय सत्तेचे धनी होता येणार नाही. अशी एकजूट टाळली तर हे सर्व छोटे पक्ष आणि या पक्षांचे समूह कायमच राजकीय सत्तेच्या परिघाबाहेर राहतील. कायमच मतदार राहतील. कायमच सत्तावंचित राहतील. असे होऊ नये यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सतत प्रयत्न करीत होते. संविधान आणि धम्म यातून चितारलेला नवा भारत निर्मिण्याचे एक प्रभावी राजकीय साधन महणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची मांडणी केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या डोक्यातील पक्षाचा आवाज दलित पुढाऱ्यांना ऐकायलाच गेला नाही किंवा तो त्यांच्या बौद्धिक आणि राजकीय आवाक्याबाहेरचा होता. त्यामुळे तो त्यांना कळला नाही असेही म्हणता येईल. म्हणूनच १९५८ साली घटनानिर्मितीच्या मुद्यावरून मतभेद झाले. फाटाफुटीला प्रारंभ झाला. वेगवेगळ्या परिषदा झाल्या. दुरुस्त-नादुरुस्त असे खेळ झाले. दुरुस्तांचे तुकडे झाले. नादुरुस्तांचेही झाले. काही काँग्रेसकडे गेले. काही 'जनता' पक्षाकडे गेले. दलित फेडरेशनचे या पुढाऱ्यांनी केवळ नामांतर केले. सामाजिक, आर्थिक विषमतेत जळणाऱ्या सर्व

लोकांचे संघटन या पुढाऱ्यांना कधीच शक्य झाले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हा भव्य क्रांतीकार्यक्रम यशस्वी होणार नाही याची काळजी सरंजामदारांचे आणि भांडवलदारांचे प्रतिनिधित्व करणारे राज्यकर्ते घेतच होते. त्यांनी या पुढाऱ्यांना नाना पद्धतींनी मॅनेज केले. मग हे दलित पुढारी प्रतिक्रांतीच्या दारातील भिकारी झाले. हे भिकारी श्रीमंत भिकारी झाले पण या देशातील वंचित समूह गरीबच राहिले. दलित फेडरेशन तर सर्व अस्पृश्यांना तरी एकत्र बांधणारी होती. पण या पुढाऱ्यांनी अस्पृश्य संघापासून फेडरेशनला महार या जातीपर्यंत आणले. तिथून पोटजातींच्या ठिगळांपर्यंत नेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी व्हिजनचा हा सत्यानाश होता. या लाचार नेत्यांना धारेवर धरत १९७२ साली पँथर जन्माला आली, पण जुन्या लाचार पुढाऱ्यांवर पँथरच्या नेत्यांनीही पुढे मात केली. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी या पक्षांमागे काही गेले. काही समरसतेत गेले. या सर्व वाटा अर्थात आधीच्या नेत्यांनीच तयार करून ठेवल्या होत्या. आजतर अनेक पुढारी बीजेपीच्या दारात झोळ्या होऊन आणि काँग्रेस राष्ट्रवादीच्या दारात शेळ्या होऊन बसलेले आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत रिपब्लिकन पक्ष या पुढाऱ्यांना स्थापन करता येणे शक्य नव्हते. यांच्या वर्तनातून स्वार्थाचे आणि अहंकाराचे उच्चांक तेवढे दिसले. त्यामुळेच पक्षाचे दहा-दहा अध्यक्ष यांना करावे लागले. पण एखाद्या भटक्या-विमुक्ताला, एखादा आदिवासीला, एखाद्या स्त्रीला, एखाद्या अल्पसंख्याक व्यक्तीला, एखाद्या मातंगाला, चर्मकाराला वा भंगी बांधवाला अध्यक्ष करण्याचा विचारही यांच्या डोक्यात आला नाही. यांना खोरिप, गारिप आणि इतरही सर्व नेत्यांच्या नावांनी राष्ट्रीय पक्ष काढता आले. फक्त बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष मात्र काढताच आला नाही. रिपब्लिकन पक्ष आपण स्थापन केला असे दलित पुढाऱ्यांनी लोकांना खोटेच सांगितले. त्यांना भ्रमात ठेवले. त्यांची दिशाभूल केली. या सर्व नेत्यांनी पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना, ओबीसींना, भटक्या-विमुक्तांना, आदिवासींना डॉ.बाबासाहेबांच्या व्हिजनपासून मात्र वंचित ठेवले. इतर सर्व शोषित-पीडितांची नेतृत्वे पुढे आली तर आपले खुजे नेतृत्व अधिकच खुजे ठरेल, आपण निष्प्रभ ठरू. या भीतीपोटी या नेत्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विराट व्हिजनचा, मूलगामी क्रांतिकारक प्रारूपाचा बळी दिला असेच म्हटले पाहिजे. लोकांना बाबासाहेबांच्या भावनिक जयजयकारात गुंगवण्यापेक्षा या नेत्यांनी त्यांना बाबासाहेबांच्या व्हिजनशी जोडण्याचे कार्य मागल्या पन्नास वर्षांत केले असते तर? तर आजचे भारताचे चित्र निराळे दिसले असते. बुद्धमयतेचे क्षितिज विस्तारले असते. बाबासाहेबांचा रिपब्लिकन पक्ष यशस्वी झाला असता तर संविधानाचे शासन या देशात सुरू झाले असते. निर्माण झालेल्या प्रश्नांच्या आगीत नागरिकांना जळावे लागले नसते. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा

सर्व अरिष्टांपासून देश वाचला असता. लोकसंख्या, वीज टंचाई, पाणी टंचाई, पर्यावरणाचा ऱ्हास, नैतिकतेचा ऱ्हास आणि भ्रष्टाचाराचा धुमाकूळ अशा सर्वच अरिष्टांपासून देश वाचला असता. बेरोजगारी, महागाई, चंगळवाद, दहशतवाद अशाही सर्व अरिष्टांपासून देश वाचला असता.

काँग्रेस, राष्ट्रवादी, बीजेपी, शिवसेना या सर्व पक्षांनी आंबेडकर समाजातील नेतृत्व गिळंकृत केले. या नेत्यांना एकत्र येणे जमले असते आणि सर्वच छोट्या पक्षांना व त्यांच्या अन्यायग्रस्त समूहांना एकत्र घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष स्थापन करता आला असता तर या नेत्यांवर प्रतिक्रांतीच्या घशात जाण्याची वेळ आली नसती. उलट हे नेते आंबेडकरी क्रांतीचे शिल्पकार ठरले असते. पण यांनी ही संधी नासवली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाचे प्रारूप तयार केले त्यावेळची सामाजिक, राजकीय, आर्थिक, नैतिक स्थिती आणि या सर्वच संदर्भातील आजची स्थिती यांच्यात फार मोठे अंतर पडलेले आहे. १९५६ साली रिपब्लिकन पक्ष स्थापन होण्याची जेवढी गरज होती त्याहूनही ती आज अधिक आहे. आज काँग्रेस आहे. सोबत राष्ट्रवादी आहे. बीजेपी आहे. शिवाय शिवसेना आहे. देशातील शोषितांना या पक्षांनी परिवर्तनापासून वंचित ठेवण्यात यश मिळविलेले आहे. इथला नव्वद टक्के मतदार शोषित आहे आणि त्याला अंधश्रद्ध बनविण्याची, धर्मांध बनविण्याची वरील सर्वच पक्षांमध्ये स्पर्धा लागलेली आहे. त्यांच्या कल्याणाचे संविधान त्यांच्यापर्यंत जाऊ न देण्यात हे पक्ष यशस्वी झालेले आहेत. सर्व दैन्यग्रस्त मने या पक्षांनी विझवून टाकलेली आहेत. परिस्थितीविरुद्ध आवाज उठविण्याची त्यांची ऊर्जाच मारून टाकली गेली आहे. इथे राजकीय नियतीवादाचे पर्व सुरू आहे. लोकांना जैसे थे वादाची सवय लावण्यात इथले राजकारण पारंगत आहे. या सर्व दैन्यग्रस्तांना धर्मांच्या, प्रदेशांच्या, जातींच्या मुद्यांवरून परस्परांमध्ये भांडत ठेवण्यात आजचे राजकारण यशस्वी ठरले आहे. भ्रष्टाचाराच्या आणि अनीतीच्या आगीत देश जळतो आहे. परिवर्तनाच्या चळवळींची पार पिछेहाट झालेली आहे. देशात संविधान आहे पण ते गोरगरिबांच्या हितासाठी राबविले जात नाही. आधुनिक डामडौलाच्या बुरख्याआड देशात केवढीतरी विषमता, पराकोटीचे प्रतिगामित्व जपले जात आहे. लोकांनी सर्व प्रकारची मनमानी सहन करायला शिकावे यासाठी सत्तेचा वापर केला जातो आहे. संविधानाची उद्देशपत्रिका आणि आजचा राजकीय, धार्मिक आणि आर्थिक व्यवहार यांच्यात तिळमात्रही नाते उरले नाही.

अशा या भीषण काळात तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पक्षाची अधिकच गरज आहे. सर्व छोट्या पक्षांना आणि त्या पक्षांच्या लोकसमूहांना एकत्र गुंफणाऱ्या पक्षाची आज नितांत गरज आहे. जातींच्या, धर्मांच्या

चौकटीत मावणार नाही असा पक्ष स्थापन करणे आजच्या सत्ताधाऱ्यांना आणि उरलेल्या विरोधी राजकीय पक्षांना कधीही मान्य होऊ शकत नाही. वर्गीय पायावर उभा असलेला पक्ष इथे जन्माला येणार नाही असे सगळे विघटनशील पर्यावरण इथे राजकारण्यांनी निर्माण करून ठेवलेले आहे. ही अत्यंत प्रतिकूल परिस्थिती मात्र क्रांतीची वाट पाहात आहे. क्रांतिकारी पक्षाची वाट पाहात आहे. वंचनेत ढकललेल्या सर्व परिवर्तनशील पक्षांची आणि त्यांच्या लोकसमूहांची तहान-भूक फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्षच भागवू शकतो. पण डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असा पक्ष स्थापन मात्र करता आला पाहिजे.

१९५६ सालची राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती आणि वरील संदर्भातील आजची स्थिती यात केवढे तरी अंतर पडलेले आहे. धर्मांधतेने आणि भांडवली शक्तींनी संविधानाला अभिप्रेत राजकारण गिळायला प्रारंभ केला आहे. यावेळी संविधानाच्या प्रास्ताविकेच्या विजयाचे राजकारण करता येणे अशक्य नसले तरी सोपे नाही, ही बाब प्रथम लक्षात घेतली पाहिजे. संविधाननिष्ठ राजकारणाच्या सर्व शक्यताच आज राजकारणाने संपुष्टात आणलेल्या आहेत. एक परिस्थितीशरण मानसिकता या राजकारणाने जन्माला घातलेली आहे. यावेळी ग्रामीण भागातील मजूर, शेतकरी, शहरातील कामगार, छोटीमोठी कामे करणारी माणसे, मध्यमवर्गीय लोक, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, भटके-विमुक्त, आदिवासी, ओबीसी, स्त्रिया या सर्वांच्या बौद्धिक प्रबोधनाची आणि समदुःखी म्हणून त्यांना एकत्रित करण्याची गरज आहे. या सर्व लोकसमूहांना आणि त्यांच्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या सर्व पक्षांना आणि संघटनांना एकत्र गुंफण्याची गरज आहे. हे सर्व करणारा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची आवश्यकता आहे. जागतिकीकरणाची, उदारीकरणाची आणि खाजगीकरणाची सर्व अरिष्टे, धर्मांधतेची आणि साम्राज्यवादाची सर्व अरिष्टे समजावून घेऊन सर्व वंचितांच्या विजयाची, त्यांना सत्ताधारी बनविण्याची हमी देणारा रिपब्लिकन पक्ष आज हवा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या खुल्या पत्रात ही सर्व सूत्रे आहेत. या सर्व सूत्रांना आजच्या सर्व संदर्भात यशस्वीपणे पुढे नेण्याची गरज आहे. रिपब्लिकन पक्ष यासाठी हवा आहे. यासाठी रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याची नितांत गरज आहे. पण हे सर्व पेलण्याची बौद्धिक क्षमता आणि संघटनकौशल्य नसणारांनी मात्र रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यासाठी तसदी न घेतलेलीच बरी. अशी उगीचच तसदी कोणी घेतली नाही तर रिपब्लिकन पक्ष जाती-पोटजातीबाहेर जाऊ न शकलेल्या सुमार लोकांनी लांच्छनास्पद स्थितीत नेला असा आरोप तरी दुनियेला करता येणार नाही.

# ३. आर्थिक स्वयंपूर्णांची दुर्बल घटकांसंबंधीची कर्तव्ये

परिवर्तनाच्या चळवळीच्या जोरावर जे लोक आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाले ते लोक आपल्या आजूबाजूच्या दुर्बल लोकांना वा आर्थिक विपन्नावस्थेत जीवन व्यतीत करणाऱ्या लोकांना कोणतेही सहकार्य करीत नाहीत, त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नयनासाठी काहीही करीत नाहीत अशी स्थिती आपणाला दिसते. ज्यांचा आर्थिक विकास झाला तेही कधीतरी आर्थिकदृष्ट्या दुर्बलच होते आणि सामाजिकदृष्ट्या अगतिकच होते. परिवर्तनाच्या चळवळीने त्यांना पाठीवर घेतले आणि आर्थिक सुबत्ततेत आणून सोडले पण चळवळीचा हात धरून जी माणसे आर्थिकदृष्ट्या संपन्न झाली ती माणसे आपल्या आर्थिक सुबत्ततेचे श्रेय चळवळीला देण्याचे टाळतात आणि आपण आपल्या कष्टांच्या आणि योग्यतेच्या बळावर मोठे झालो. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झालो असे तारे तोडत असतात. असे का होते? परिवर्तनाच्या चळवळींपुढला हा मोठा अवघड पेच आहे.

:१:

काही काळापूर्वी आपणही भारतातील दुर्बल आणि वंचित समूहाचाच भाग होतो. याचा विसर आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झालेल्या लोकांना पडू नये. आपल्या मातृकोशाशी, आपल्या मातृचळवळीशी आपला संबंध तुटणार नाही याची काळजी आर्थिक संपन्नता लाभलेल्या लोकांनी घ्यायलाच हवी. आपणाला या संपन्न आर्थिक अवस्थेत आणणाऱ्या चळवळीचे वैचारिक चारित्र्य ही आपल्यासाठी एक महान नैतिकता आहे असे या लोकांना वाटले पाहिजे.

:२:

या नैतिकतेचे दोन भाग आहेत. विचारसंहिता आणि वर्तनसंहिता हे ते दोन भाग होत. आपल्याला स्वाभिमानाचे आणि सन्मानाचे मानवी अस्तित्व प्रदान करणाऱ्या चळवळीचे आपण कर्जदार असतो. हा मुद्दा जबरदस्तीचा नसतो. कृतज्ञतेचा असतो.

देणाऱ्याने आपणाला दिले त्याच्या कितीतरी प्रमाणात आपण त्याला परत द्यायला हवे. असे होते तेव्हा तो माणुसकीचा पुरावा ठरतो.

३:

ज्या चळवळीच्या पोटी आपण जन्मलो तिचे काहीएक वैचारिक संविधान आहे हे या चळवळीच्या लाभार्थींनी कायम लक्षात ठेवायचे असते. ही वैचारिकता बुद्धिवादी असते आणि त्याचवेळी परमकारुणिकही असते. करुणा पोटात वागविणारा बुद्धिवाद किंवा बुद्धिवाद पोटात वागविणारी करुणा अशी या आंबेडकरी चळवळीच्या संविधानाची प्रास्ताविका असते. करुणा म्हणजे इतरांची दुःखे आपली मानणारी आणि ही दुःखे नष्ट करण्यासाठी धडपडणारी प्रवृत्ती! दुःख कोणालाही नको असते पण माणसे कळत-नकळत स्वतःसाठी आणि इतरांसाठीही दुःखे निर्माण करीत असतात. माणसे स्वतःच्या सुखासाठी इतरांच्या आयुष्यात दुःखे फुलवितात. खूपदा माणसे इतरांची सुखे सहन न होऊन दुःखी होत असतात. खूप माणसे स्वतःच्या सुखांनी सुखी होत नाहीत. आपल्या सुखासाठी त्यांना इतरांची दुःखे लागतात. इतरांच्या दुःखांनी सुखी होणे हे माणसाचे लक्षणं नव्हे तो अमानुषतेचा दाखला असतो. ती सुजनता नसते. ती साक्षात दुष्टताच असते.

४:

मानवी जीवन या दुष्टतेच्या आगीत जळत आहे आणि दुष्टता तृष्णेच्या पोटी जन्माला येते. या तृष्णेला नियंत्रणात ठेवता आले तर दुःखाचा प्रश्न मिटतो. सुखाचा प्रश्न सुटतो. इतरांच्या सुखांना इजा न पोचवता आपल्याला सुखी होता येईल काय? इतरांच्या दुःखांनी सुखी होणे आपल्याला टाळता येईल काय? शुद्ध मानवी सुख इथेच कुठेतरी सांडलेले आहे. ते बुद्धाच्या मनाने वेचता आले पाहिजे. ते बाबासाहेब आंबेडकरांच्या मनाने फुलवता आले पाहिजे. ते जोतीबा फुल्यांच्या मनाने जगता आले पाहिजे. निब्बाणाचा हाच अर्थ आहे. निब्बाण म्हणजे मोक्ष नव्हे. स्वर्ग नव्हे. इतरांसाठी काही करता करता मिळते ते निरपेक्ष सुख म्हणजे निब्बाण! आपले सुख इतरांच्या दुःखांवर उभे असता कामा नये. ते इतरांच्या सुखांचा परिणाम असले पाहिजे. आंबेडकरी चळवळ मानवाच्या या सुखासाठी धडपडणारी चळवळ आहे.

५:

या आंबेडकरी चळवळीच्या खांद्यावर बसून जे आर्थिक दुर्दशेच्या परिघावरून आर्थिक स्वयंपूर्णतेच्या केंद्राकडे आले त्यानी या महासुखासाठी, माणसाला सुंदर आणि समृद्ध करणाऱ्या परमसुखासाठी आवश्यक ते प्रयत्न करायला हवेत. तसे सर्वहितकारी वर्तन केले पाहिजे. आपल्याला आर्थिक स्वयंपूर्णता देणाऱ्या चळवळीने

आहे. आपली चळवळ या प्रतिक्रांतीच्या विरोधात कायम लढलेली आहे. तेव्हा आपण हे लक्षात ठेवायला हवे की ज्या छावणीशी आपल्या चळवळीने युद्ध केले त्या छावणीशी आपण कोणत्याही अर्थाने जोडले जाता कामा नये.

६:

ही गोष्ट आर्थिक स्वयंपूर्णता लाभलेल्या सर्वच लोकांनी काळजीपूर्वक लक्षात ठेवली पाहिजे. या लोकांमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे सरकारी कर्मचारी असतील, लहान-मोठे अधिकारी असतील. शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर असतील, लहानमोठे उद्योजक असतील किंवा खाजगी क्षेत्रात वेगवेगळी कामे करणारे पगारी लोक असतील. हे सर्व लोक चळवळीमुळे स्वयंपूर्णता लाभलेले लोक आहेत. तेव्हा या सर्वच लोकांनी चळवळीच्या हेतुंकडे, तिच्या प्रेरणांकडे आणि तिच्या वैचारिक भूमिकेकडे पाठ फिरवू नये. कारण हे सर्व आर्थिक स्वयंपूर्णता लाभलेले लोक १९५६ पूर्वीच्या धर्मातील लोकांप्रमाणे वागायला लागले तर त्यांच्याकडे आदर्श म्हणून पाहणारे इतर सर्वसामान्य लोक त्यांच्याप्रमाणेच विचारभ्रष्ट होऊन चळवळीच्या तत्त्वज्ञानापासून दूर जातील आणि ज्या फांदीवर बसून आपण आर्थिक संपन्नतेचे झोके घेत आहोत ती फांदीच तोडण्याचे कुकर्म या आर्थिक संपन्नता लाभलेल्यांच्या हातून घडेल.

७:

चळवळीच्या वैचारिक सूत्रांशी प्रामाणिक राहून या सर्वांनीच सुसंघटित राहिले पाहिजे. स्वार्थासाठी प्रस्थापितांच्या या ना त्या राजकीय पक्षांसोबत, वा त्यांच्या सांस्कृतिक संघटनांसोबत सख्य साधण्याचे दुष्ट कृत्य या लोकांच्या हातून घडू नये. स्वार्थ-तृष्णा माणसाला कुठेही स्थिर होऊ देत नाही. ही तृष्णा आपल्या मनात मोहाचे नवनवे देखावे उभे करीत राहते आणि कुठेच आपल्या मनाला स्थिरावू देत नाही. ही इकडे तिकडे भटकण्याची प्रक्रिया तृष्णेमुळे साकार होते आणि चळवळीत भांडणे सुरू होतात. संघटनेचे तुकडे होतात. चळवळीच्या वैचारिक शिलाचे धिंडवडे निघतात.

८:

आंबेडकरी चळवळीतील आर्थिक सुबत्ता लाभलेल्या सर्वांनीच डोळे उघडे ठेवून चळवळीच्या स्थितीगतीवर लक्ष ठेवले पाहिजे. आज राजकीय चळवळीचे तीन-तेरा वाजलेले आहेत. त्यामागेही तृष्णा हेच कारण आहे. नेतृत्वाची तृष्णा, आर्थिक तृष्णा, लोकप्रियतेची तृष्णा असे तृष्णेचे वेगवेगळे प्रकार आहेत. आपली सामाजिक

चळवळही कुठे दिसत नाही. धम्मचळवळ केवळ त्रिसरण-पंचशीलाच्या मर्यादेत अडकलेली आहे. एवढेच नाही तर प्रतिक्रांतीच्या दारात या चळवळीचे धुरीण खेटे घालू लागलेले आहेत. कोणाहीजवळ भक्कम वैचारिकता नाही. तसा बाणेदारपणा नाही. तशी कुवत नाही. देशातील सर्व दुर्बल घटकांची, परिवर्तनासाठी काम करणाऱ्या छोट्या-छोट्या गटांची एकसंध फळी उभारण्याची कुवत कोणात नाही. छोटे-छोटे स्वार्थ या लोकांना आपल्या संकुचित वर्तुळातून बाहेरच पडू देत नाहीत. त्यासाठी करायला हव्या त्या कष्टांची, त्यागाची वानवा आहे. काही वेगळे घडत नाही त्याचे हे कारण आहे. या गोष्टी नसल्यामुळे सारी चळवळच बेचिराख झाली आहे.

९:

परिवर्तनाच्या चळवळीतील छोटी-छोटी बेटे बलदंड शक्तींच्या त्सुनामीत नष्ट होऊन जातात. नष्ट होण्याचे टाळण्यासाठी ही बेटे एकत्र येत नाहीत आणि एकसंध महाबेट होत नाहीत तोवर या बेटांचे उद्ध्वस्तीकरण अटळच आहे. आजवर हे उद्ध्वस्तीकरण होतच आहे पण या बेटांना एकत्र गुंफण्याचे अभियान कोणी समर्थपणे राबविल्याचे उदाहरण नाही.

१०:

या वाताहतीत बुद्धिजीवींची, कर्मचाऱ्यांची, अधिकाऱ्यांची आणि उद्योजकांची जबाबदारी अधिकच वाढते. या सर्वांचीच जबाबदारी जागतिकीकरणाच्या आणि खाजगीकरणाच्या काळात अधिकच वाढली आहे. पण ही जबाबदारी नेमकी कशा स्वरूपाची आहे ते या सर्व लोकांनी नीट समजावून घेतले पाहिजे आणि परिवर्तनाच्या एकाच वैचारिक सूत्रात निष्ठेने स्वतःला गुंफून घेतले पाहिजे. या सर्वच लोकांनी स्वतःपुरते, स्वतःच्या कुटुंबापुरते पाहण्याचे टाळले पाहिजे. त्यांनी स्वयंकेंद्रितता सोडली पाहिजे. बदलत्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक समीकरणांची आपली समज परिपक्व करून घेण्याची गरज आहे आणि इतरांचीही या संदर्भातील समज अद्ययावत ठेवण्यासाठी वरील सर्वच लोकांनी सतत प्रयत्नशील असले पाहिजे.

११:

याहीवेळी आपण जागतिक पातळीवरील समाजवादी आणि सेक्युलर शक्तींबरोबरच राहणे कसे आपल्या हिताचे आहे हे या लोकांनी नीट समजावून घेतले पाहिजे आणि आपण ज्या दुर्बल समूहांमधून आलो त्या दुर्बल समूहांनाही सांगितले पाहिजे. भटके-विमुक्त, आदिवासी, स्त्रिया, ग्रामीण समाजातील सर्व आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या विपन्नावस्थेत जीवन व्यतीत करणारे सर्व लोक हे आपले कुटुंब होय हे या लोकांनी

करण्याची गरज आहे. हे सर्व न करता आपापल्या छोट्या-छोट्या गटांपुरते पाहणारे लोक आपल्या छोट्या गटांचेही अहित करीत असतात आणि इतरही सर्व गटांचे अहितच करीत असतात असा त्याचा अर्थ होईल.

१२:

वेगवेगळ्या छोट्या आणि कालवरच्या वंचित समूहांमधील आर्थिक स्वयंपूर्णत्व लाभलेल्या लोकांवरही परंपरेनुसार स्वतःला उच्च समजणारे लोक अन्याय करीतच असतात. यांनी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होणे कालपर्यंत वर्चस्व भोगणारांच्या अहंकाराला मानवत नाही हे खरे आहे. त्यामुळे दुर्बल घटकांमधून आलेल्या या आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण लोकांचा नानापरींनी छळवाद होतो हे खरे आहे. त्यांच्यावर वेगवेगळे आरोप लावणे, त्यांना पुढे जाण्यापासून रोखणे, त्यांचा स्वाभिमान खच्ची करण्याचा प्रयत्न करणे हे सर्व प्रकार होतात पण खरी चारित्र्ये अशा अत्याचारांना पुरून उरतात. आणि दुर्बल गटांमधून आलेल्या या आर्थिकदृष्ट्या संपन्न लोकांना लढाईला सामोरे जाण्याशिवाय गत्यंतर नसते. ही लढाई लढत लढत या लोकांनी आदिवासी, भटके-विमुक्त, स्त्रिया, ग्रामीण भागातील इतर दुर्बल, मुस्लिम, ख्रिश्चन या सर्वच लोकांच्या एकीकरणासाठी प्रयत्नरत असले पाहिजे.

१३:

सर्वच दुर्बल घटकांशी संबंधित आर्थिक संपन्न लोकांनी बँका, हाऊसिंग सोसायट्या, पतसंस्था, शिक्षणसंस्था आणि नानाप्रकारचे छोटेमोठे उद्योग निर्माण करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करायला हवे. वेगवेगळ्या प्रकारच्या प्रसारमाध्यमातील आपला सहभाग वाढविण्याची शिकस्त करायला हवी. दैनिके, इतरही नियतकालिके काढण्यासाठी आकाश-पाताळ एक केले पाहिजे.

१४:

या सर्वांनीच व्यसनांपासून चार हात दूर राहिले पाहिजे. दुर्बल घटकांमधून आर्थिक संपन्न झालेल्या लोकांचा काटा काढण्याचा प्रयत्न हितशत्रू करीत असतातच. ते मद्य वगैरे सारख्या अमली पदार्थांचा हत्यारासारखा उपयोग करू शकतात हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. पंचशील ही आपल्या जगण्याची अपर्यायी शैली होय हे या लोकांनी मानले पाहिजे. इतर परिवर्तनवाद्यांची स्वच्छ मनाने दोस्ती करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. सर्व प्रकारच्या विधायक उपक्रमांमध्ये आपली आर्थिक ताकद घेऊन सहभागी व्हायला हवे. आपले वैचारिक चारित्र्य आपल्या वर्तनातून प्रकाशित व्हायला हवे. हे पंचशील नावाचे चारित्र्य प्रत्येकच अर्थसंपन्न व्यक्तीने जपले पाहिजे.

:१५:

महाराष्ट्रातील, भारतातील आणि जगातील सर्व परिवर्तनवादी पुस्तके, नियतकालिके या लोकांनी वाचायलाच हवीत. धम्म, राजकारण, अर्थकारण, समाजकारण, संस्कृतीकारण या सर्वच क्षेत्रांमधील समस्यांशी संबंधित गंभीर वाङ्मय या लोकांनी वाचलेच पाहिजे. त्यासाठी आपली वाचनसंस्कृती अद्ययावत ठेवण्याची गरज आहे. प्रत्येक आर्थिकदृष्ट्या संपन्न माणसाच्या घरी एक समृद्ध ग्रंथालय असलेच पाहिजे. संबंधित व्यक्तीने आणि घरातील इतरही व्यक्तींनी असे संपूर्ण जगाला जबाबदारपणाकडे नेणारे लेखन गंभीरपणे वाचलेच पाहिजे. कुटुंबात एक समृद्ध बौद्धिक पर्यावरण अशा माणसांनी जाणीवपूर्वक तयार करायला हवे.

चळवळीच्या तत्त्वज्ञानाशी एकनिष्ठा असली तर स्वार्थातीत संघटन शक्य आहे. इतर दुर्बल घटकांना आपल्या पातळीत आणण्याची प्रक्रिया शक्य आहे. चळवळ बौद्धिकदृष्ट्याही कंगाल होणार नाही; चारित्र्यदृष्ट्याही ती भणंग होणार नाही आणि आर्थिकदृष्ट्याही ती व्याकूळ होणार नाही. याची या आर्थिक स्वयंपूर्णता लाभलेल्या लोकांनी जबाबदारी घेतली पाहिजे. त्यासाठी या लोकांनी कुटुंबापुरते जगण्याचे सोडले पाहिजे. आपण तरलो. इतरांना तारूया. आपण जगतो. इतरांना जगवू या. अशी या लोकांची वृत्ती असली पाहिजे.

:१६:

आज परिस्थिती अगदी विरुद्ध टोकाला जाते की काय असे वाटायला लागलेले आहे. सरंजामदारांनी, धर्मांधांनी आणि भांडवलदारांनी जीवनाचा ढाचाच असा पुढे आणला आहे की या ढाच्यात अस्तित्व प्राप्त करून घेण्यासाठी, आपला अवकाश प्राप्त करून घेण्यासाठी माणसे जिकडे काही मिळण्याची शक्यता आहे तिकडे पळत आहेत. परिस्थिती भीषण आहे. यावेळी काही काळापूर्वी दुर्बल घटकांमधून बाहेर येऊन अर्थसंपन्न झालेल्या लोकांनी स्वतःच्याही संरक्षणासाठी आणि इतर दुर्बल घटकांना आपल्या पातळीत आणण्यासाठी आपले अर्थबळ आणि निष्ठाबळ पुढे केले, संघटनबळ पुढे केले तर आपल्याला खात सुटलेल्या वाताहतीवर आपण मात करू शकतो. ही खात्री या लोकांनी बाळगायला हवी. सर्व शक्य आहे. फक्त या सर्वच लोकांनी आंबेडकरी चळवळीच्या वैचारिक मिठाला जागावे. आपल्यातला आंबेडकरी चळवळीला अभिप्रेत माणूस अधिकाधिक प्रज्वलित करावा. त्याला मरू देऊ नये. त्याला अधिकाधिक तेजस्वी करावे. हे झाले तर पुढल्या क्रांतीचे ते शिल्पकार ठरतील.

# ४. वाताहतीतून बाहेर येण्याचा मार्ग

वाताहत झाली आहेच. निष्ठा, नैतिकता, राजकारण, समाजकारण अशा सर्वच पातळ्यांवर वाताहत झाली आहे. मराठे आणि ब्राह्मण सोडले तर आदिवासी, भटके-विमुक्त, बौद्ध, बौद्धेतर अस्पृश्य, मुस्लिम, ख्रिश्चन, स्त्रिया या सर्वांचीच वाताहत झालेली आहे. ज्यांची वाताहत झाली त्यांच्यातील प्रत्येकाच्याच मनात निराशा दिसते. अगतिकता दिसते. हरलेपणाची, तुटलेपणाची आणि आपण चारही बाजूंनी उद्ध्वस्त झालो अशी भावना दिसते. माणसे हतबल झालेली आहेत. आपला कोणी वाली नाही. सगळेच क्रूर प्रश्न आपल्यावर तुटून पडले आहेत. पोटजातींच्या, जातींच्या, धर्मांच्या, वर्गांच्या, जागतिकीकरणाच्या उन्मादाचे प्रश्न आहेत. महागड्या शिक्षणाचे, बेरोजगारीचे, वेगाने वाढणाऱ्या महागाईचे, सुरक्षिततेचे असे प्रश्नांचे रानचे रान भोवती पेटलेले आहे आणि या पेटत्या जंगलातून आपल्याला बाहेर पडता येईल की नाही या शंकेने माणसे हतबल झालेली आहेत. जीवनाला अर्थ देत जगणे दूरच राहिले पण चार घास खाऊन नीट जगता येणेही असंख्य लोकांना अवघड झाले आहे. साधे जिवंत राहणेही कठीण झालेले आहे. अशावेळी चांगले जगणे निर्माण करण्याची कल्पनाही कोट्यवधी लोकांना सुचणे शक्य नाही. गोरगरिबांच्या इच्छांना चिरडून टाकीत परिस्थिती उद्दामपणे चाललेली आहे.

१:

हे सर्व बदलता येईल काय? या वाताहतीतून बाहेर येता येईल काय? या पडझडीतून बाहेर कसे पडता येईल? या जळत्या जंगलातून बाहेर पडण्यासाठी काय करण्याची गरज आहे? या सर्व प्रश्नांचा विचार होण्याची, त्या दृष्टीने नियोजन होण्याची आणि कृती होण्याची गरज आहे. या लेखाच्या आरंभी म्हटल्याप्रमाणे आज सर्वच वंचित गटांची वाताहत झाली आहे हे खरे आहे. पण पराभूत व्हावे लागू नये, वाताहतच होऊ नये यासाठी बुद्धाने सात उपाय सांगितले आहेत. वैशालीच्या आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या वज्जींना लिच्छवी असे म्हटले जात असे. पराभव

टाळता येईल त्या सात गोष्टी अशा –

१. जोवर वज्जी अखंडपणे एकत्र जमत राहतील, विशाल संख्येने ऐक्य राखतील, तोवर त्यांची वृद्धीच होत राहील; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

२. ते जोवर एकजुटीने एकत्र येत राहतील, एकजुटीने बैठकीतून उठतील आणि एकजुटीने वज्जींच्या प्रजेबद्दलची कर्तव्ये पार पाडतील तोवर त्यांची वृद्धीच होत राहील; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

३. कायदा म्हणून मान्य झाल्या नाहीत त्या गोष्टींना कायदा म्हणून अमलात आणणार नाहीत. कायदा म्हणून ठरविलेल्या गोष्टी मोडणार नाहीत व वज्जींची जुन्या काळापासून चालत आलेली नियमावली मान्य करून वागतील तोवर त्यांची वृद्धीच होईल; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

४. आपल्यातल्या वयस्करांना मान देतील, त्यांचा सल्ला ऐकतील तोवर त्यांची वृद्धीच होईल; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

५. जोवर ते कुमारिका वा विवाहित कुलस्त्रियांना पळवून आणून आपल्या घरात ठेवणार नाहीत तोवर त्यांची वृद्धीच होत राहील; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

६. गावातील वा गावाबाहेरील चैत्यांचा ते आदर करतील आणि त्यांच्या संदर्भातील चालत आलेली धम्मकर्तव्ये पार पाडतील तोवर त्यांची वृद्धीच होईल; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

७. अरहंतांना संरक्षण देतील, नवे अरहंत येत राहतील तोवर वज्जींची वृद्धीच होत राहील; त्यांचा ऱ्हास होणार नाही.

वरील शिकवणुकीत संघटन, निर्धारित नियमांचे पालन, ज्ञानवृद्धांच्या ज्ञानाचा उपयोग, स्त्रियांचा सन्मान, चैत्यांचा आणि अरहंतांचा सन्मान या गोष्टींचा अंतर्भाव आहे. या गोष्टी पाळणाऱ्या लोकांचा विकास होईल, त्यांचा कधीही ऱ्हास होणार नाही हे बुद्धांचे वज्जींच्या निमित्ताने सर्वांनाच कळकळीचे सांगणे आहे.

दिसते ते हे की आजघडीला केवळ बौद्धांमध्येच नाही तर एकूणच वंचितसमूहांमध्ये सतत चिरफळ्या होत आहेत. हे समाईक नियमांच्या अनिश्चितीमुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे होत आहे. माणसे सुसंघटित होत नाहीत, प्रत्यक्ष काही कृतीकार्यक्रम करीत नाहीत त्याला अनेक कारणे आहेत. त्यातली अनेक लोकं आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाली, त्यांना इतर कोणाची गरज भासेनाशी झाली. माणसे या अर्थाने आर्थिक मध्यमवर्गात गेली आणि वैचारिकदृष्ट्या उच्चवर्णातील मध्यमवर्गाच्या श्रद्धा आणि अंधश्रद्धांच्या आहारी जाऊ लागली. सामाजिक बहिष्कृततेमधून आणि

आर्थिक दारिद्र्यातून त्यांना बाहेर काढणाऱ्या चळवळीचा विसर त्यांना पडला. १९५६ नंतरच्या पहिल्या आणि दुसऱ्या पिढीने–पूर्वीचा सामाजिक आणि आर्थिक अन्याय अनुभवला होता. नंतर आलेल्या अलीकडच्या तरुण पिढीला आर्थिक सुबत्ता आयतीच मिळाल्याने त्यांना संघर्षाची, संघटित होण्याची गरज वाटेनाशी झाली. आज कोणत्याच चळवळीत सामान्यतः तरुण पिढी दिसत नाही. त्यामागची मानसिकता याप्रकारे समजावून घेतली पाहिजे. शिवाय जागतिकीकरण, स्पर्धा, माहिती–तंत्रज्ञान या सर्व जंजाळात या पिढीचे बहुतांश सभासद गुरफटून गेल्यामुळे या पिढीचा चळवळीशी संबंध तुटला. माणसे स्वार्थाच्या दिशेने, स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने धावायला लागली. चळवळीचा संबंध तुटला. त्यांच्याप्रमाणे सामाजिक बहिष्कृतीकरणातून आणि आर्थिक दारिद्र्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न करणाऱ्या ग्रामीण भागातील आणि दुर्गम, अतिदुर्गम भागातील बांधवांचाही त्यांना विसर पडला. शहरातील वंचित बांधवांची आठवण त्यांना राहिली नाही. परिवर्तनाच्या आंबेडकरी चळवळीचा संदर्भच असा क्षीण होत गेला.

२:

दुसरीकडे प्रत्यक्ष समाजातील जाती, पोटजातींच्या बेटांनी, राजकारणातील, समाजकारणातील तटा–गटांनी आणि साहित्यातील, भिक्खूसंघातील भांडणांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात धगधगते आंदोलन झालेल्या समाजाच्या चिंध्या करून टाकल्या. समाजाच्या अशा चिंध्या करणारांचे अहंकार मात्र भयंकर आहेत. कोणीच कोणाचे ऐकायला, कोणीच कोणाला समजावून घ्यायला तयार नाही. वरील सर्व प्रकारांमुळे समूहनिष्ठा लयाला गेली आणि काटेरी व्यक्तिनिष्ठेचा उदय झाला. अनिर्बंध व्यक्तिनिष्ठा. काही सन्माननीय अपवाद जरूर आहेत पण बौद्ध समाज जीवनाच्या सर्वच पातळ्यांवर एक अवकाशशून्य समाज झालेला आहे आणि माणसे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेली तत्त्वे अडचणीची म्हणून झुगारून देऊन प्रतिक्रांतीच्या वेगवेगळ्या शामियान्यांकडे जमेल त्या मार्गांनी पळत सुटलेली आहेत.

३:

अनुसूचित समूहाची लोकसंख्या १६.२ टक्के म्हणजे सतरा कोटींच्या वर आहे. त्यात बौद्धांची संख्या पाच–सहा टक्के आहे. आज स्थिती अशी आहे की सर्व अनुसूचित समूह एकत्र येतच नाहीत पण पाच–सहा टक्के असलेल्या बौद्धांनाही संघटित होणे शक्य होत नाही. हे पाच–सहा टक्के लोक अनेक गटात विभागले गेले असल्याने या प्रत्येक राजकीय गटातील बौद्धांची संख्या अर्ध्या–पाव टक्क्याहूनही कमी होऊन जाते. हीच स्थिती सामाजिक संदर्भात कामे करणाऱ्या संघटनांची आहे

कितीतरी संघटना आहेत. छोट्या छोट्या सामाजिक संघटनांमध्ये बौद्ध समाज विखुरलेला आहे आणि राजकारणातल्याप्रमाणे समाजकारणातही हे पाच-सहा टक्के लोक पाव टक्क्याहूनही कमी लोकसंख्येचे होऊन जातात. भिक्खूसंघात, साहित्यात असेच गट आहेत आणि या पाच-सहा टक्क्यांचे याही क्षेत्रात छोटे छोटे तुकडे झालेले आहेत. म्हणजे अनुसूचित समूहांमधील केवळ बौद्धांचा विचार केला तरी त्यांचे हे फाटाफुटीकरण केवढे भयानक आहे त्याचा प्रत्यय आपणाला येऊ शकतो. शिवाय या सर्व क्षेत्रांमध्ये जे गट-तट आहेत त्यांचे अहंकार विलक्षण आहेत. प्रत्येक गटातटाला इतर गटातटाबद्दल प्रेम नाही. प्रत्येक गटातटाला इतर गटातटांना दुबळे करून आपले अस्तित्व टिकविण्याची निकड भासते.

याप्रकारे या सर्व अहंकारी तुकड्यांनी बौद्धसमाजाचे सामूहिक अस्तित्वच अशक्य करून टाकलेले आहे. एकूण समाजजीवनातील आपला त्या त्या क्षेत्रातील अवकाशच या सर्व विभाजनीकरणाने संपवून टाकलेला आहे. इतरांचे सोडा पण स्वतःला बौद्ध म्हणवणाऱ्या बौद्धांनीही बुद्धाने वज्जींना जो समृद्धीविचार सांगितला त्याचे धिंडवडे काढलेले आहेत आणि त्यामुळे या समाजाची वाताहत झाली आहे.

:४:

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एका व्यापक चळवळीचे, परिवर्तनाचा प्रचंड आवाका असलेल्या आंदोलनाचे सुतोवाच 'आरपीआय' च्या प्रारूपाद्वारा केले होते. त्यांच्या बौद्धिक जीवनाची एकूणच वाटचाल जातीय संघटनेकडून वर्गीय संघटनेकडे चाललेली होती याचा प्रत्यय आपणाला त्यांच्या लेखनातून आणि कार्यातून येतो. वर्गविग्रहाची मांडणी प्रथम मार्क्सने केली नसून भारतात वैचारिक आणि सामाजिक पातळीवरही वर्गयुद्धे झाली आहेत हे बाबासाहेबांनी आपल्या क्रांती-प्रतिक्रांतीवरील लेखनात स्पष्ट केलेले आहे. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना, आरपीआयचे प्रारूप, धम्म या सर्वच घटना देशातील सर्वच वंचितांना आणि परिवर्तनवाद्यांना एका सूत्रात बांधणाऱ्या घटना आहेत. धम्मात तर शत्रूंना शत्रू म्हणून आधी नीट ओळखा आणि त्यांचेही मित्रांमध्ये रूपांतर करून घ्या असा संदेश बाबासाहेब ग्रथित करतात. अंगुलीमालाची कथा या दृष्टीने फार सूचक आहे असे आपल्याला वाटले पाहिजे.

:५:

या पातळीवर आता सर्वांनी प्रथम सुसंघटित होण्याची गरज आहे यात वादच नाही. पोटजातीपासून जागतिकीकरणापर्यंतच्या प्रश्नांच्या आगीत आपण सापडलो आहोत. या आगीतून सुरक्षितपणे बाहेर पडायचे असेल तर प्रथम बौद्धांमधील वेगवेगळ्या क्षेत्रांमधील गटातटांनी आपले अहंकार गाडून संघटित व्हायला हवे. दुसऱ्या पातळीवर अनुसूचित समूहांमधील अकरा टक्के लोकांना आपल्यात सामावून

वण्याची मोहीम राबविली पाहिजे. अनुसूचित जमातीची संख्या ८.२ टक्के आहे. ५.५ टक्के भटके आहेत. महाराष्ट्रात मुस्लिमांची संख्या नऊ टक्के आहे. बिगरमराठी समाज पाच टक्के, उच्चजाती सुमारे पाच टक्के, लहान लहान मागासजातींची संख्या तीस टक्के आहे. यात चारेक टक्के संख्या ख्रिश्चनांची आहे असे म्हणता येईल.

जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा 'आम्हाला शासनकर्ती, सत्ताधारी जमात बनायचे आहे' असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. या म्हणण्याचा ऐतिहासिक संदर्भ आपल्याला माहीत आहे. त्याचा सूचकार्थही आपणाला माहीत आहे. पण आरपीआयच्या प्रारूपात बाबासाहेबांच्या भूमिकेला कालसंगत नवी परिमाणे लाभतात. धम्मात त्या परिमाणांना असीमता प्राप्त होते आणि आज तर जगाचा नकाशाच नव्या माहितीतंत्रज्ञानाने आणि भांडवली जागतिकीकरणाने पार बदलून गेला आहे. आरपीआयला या नव्या संदर्भचौकटीत आणखी नवी परिमाणे प्राप्त व्हायला हवीत. पण प्रत्यक्षात दिसते हे की मुळात असलेली, बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली परिमाणेही आरपीआयमध्ये काम करणाऱ्या नेत्यांनी नष्ट केली आहेत. आजवरच्या नेत्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चर्चाविश्वाचे (Discourse) पार धिंडवडे काढलेले आहेत.

अशा या अभूतपूर्व पडझडीच्या काळात देशाच्या सर्वांगीण जीवनात स्वतःचा अवकाश निर्माण करण्यासाठी बौद्धांनी प्रथम संघटित व्हावे. अहंकाराचे काटे जाळून टाकावेत. त्यानंतर इतर अनुसूचित समूहांना स्वतःशी जोडून घ्यावे. आदिवासींना, भटक्याविमुक्तांना, इतर मागाससमूहांना, मुस्लिम, ख्रिश्चन या समूहांना एकत्र करावे. त्यात स्त्रियांचाही अंतर्भाव आहेच. ही एकूण संख्या महाराष्ट्राचा विचार केला तरी सुमारे पंचाऐंशी टक्के होते. यातील पंधरा टक्के लोक मार्जिनबाहेर, कक्षेबाहेर राहिले तरी सत्तर टक्के लोक परिवर्तनाच्या परिघात आणता येतात.

:६:

महाराष्ट्राचे वा भारताचे राजकारण या दिशेने जायला हवे. सर्व वंचित याच मार्गाने सत्ताधारी होऊ शकतात. या देशात क्रांती प्रत्यक्षात आणू शकतात. मला शेटजी भटजींचे राज्य नको. मला पंचाऐंशी टक्क्यांचे राज्य हवे असे बाबासाहेब म्हणाले होते. बाबासाहेबांचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याची जबाबदारी बौद्धांनी घ्यायला नको? बौद्ध ही जबाबदारी घेणार नसतील तर या देशात ही जबाबदारी कोणीही घेणार नाहीत. बौद्धांनी ही जबाबदारी स्वीकारली नाही तर आजवर झाली तशी पुढेही केवळ बौद्धांचीच वाताहत होईल असे नाही तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले त्या पंचाऐंशी टक्क्यांचीही वाताहत अशीच होत राहील. ही सरसकट वाताहत थांबावी यासाठी बौद्धांनी स्वार्थ, अहंकार, स्वाभिमानशून्यता या गोष्टी प्रथम

संपविल्या पाहिजेत. मोठ्या मनाने पुढे आले पाहिजे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते त्या पंचाऐंशी टक्क्यांना एकत्र करून त्यांना पुढे केले पाहिजे. प्रखर इच्छाशक्तीची गरज आहे. निरपेक्ष वृत्तीची आणि प्रामाणिकपणाची गरज आहे. असीम मनाची गरज आहे.

एक आंधळा आणि एक लंगडा जंगलातून जात असताना जंगलाला आग लागली. आंधळ्याला आग दिसत नव्हती. लंगड्याला पळता येत नव्हते. दोघांचाही मृत्यू अटळ होता; पण त्यांच्या इच्छाशक्तीने त्यांना एक युक्ती सुचविली. आंधळा लंगड्याला म्हणाला, तू माझ्या खांद्यावर बैस आणि मला बाहेर पडता येणारी वाट दाखव. माझे पाय आणि तुझे डोळे यांना आपण एकत्र करू. एका ध्येयासाठी त्यांना एकत्र आणू. आपण दोघेही वाचू. एकत्र येणे एवढाच आपल्याजवळ वाचण्याचा मार्ग आहे. दोघांनाही परिस्थितीने हा विवेक दिला. आंधळ्याच्या खांद्यावर लंगडा बसला. त्याला वाट चालता येत नव्हती पण वाट दिसत होती. आंधळ्याला चालता येत होते पण वाट दिसत नव्हती. पण वाट दिसणारे डोळे आणि वाट चालणारे पाय एकत्र आले आणि लंगडा आणि आंधळा हे दोघेही आगीतून बाहेर पडले. वाचले. असे असंख्य पाय आणि असंख्य डोळे यांची बेरीज आजच्या जीवनाच्या वणव्यातून बाहेर पडण्यासाठी करण्याची गरज आहे. आगीत सापडलेल्या आंधळ्या-लंगड्यासारख्या सर्वच वंचितांनी निर्णय घेण्याची आणि कृती करण्याची तातडीची गरज आहे. हे होईल? हे व्हावे हीच कळकळीची सदिच्छा!

# ५. आम्ही भारताचे लोक

भारतात राहणारे, भारत नावाच्या विवक्षित भौगोलिक परिक्षेत्रात राहणारे सर्व लोक म्हणजे भारताचे लोक नाहीत. 'भारताचे लोक' हे भारताच्या संविधानातील समाजदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी जीव ओतून धडपडणाऱ्या निष्ठेचे, निर्धाराचे आणि कृती कार्यक्रमाचे नाव आहे.

भारताच्या संविधानातील सामाजिक आदर्श त्याच्या प्रास्ताविकेत पुढीलप्रमाणे आलेला आहे. या समाजात समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य असावे. त्यातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळायला हवा. या समाजात विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असावे. प्रत्येक व्यक्तीला दर्जाची व संधीची समानता असावी. राष्ट्राचे ऐक्य वर्धिष्णू करणारी बंधुता त्यात असावी. ही समाजरचना ज्यांना मान्य आहे आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी जे सर्व शक्ती एकवटून प्रयत्नरत आहेत ते लोक भारताचे लोक होत. ज्या लोकांना संविधानाला अभिप्रेत असलेली समाजरचनाच मान्य नाही आणि त्यामुळे भारतीय संविधानालाच जे या ना त्या पद्धतीने विरोध करतात ते लोक भारतात राहत असले तरी भारताचे लोक ठरत नाहीत. म्हणून 'आम्ही भारताचे लोक' म्हणजे भारतीय संविधानाच्या इच्छांना निष्ठापूर्वक अनुसरणारे लोक होत, असे म्हटले पाहिजे.

धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अशा कोणत्याही कारणावरून भारतातील लोकांमध्ये भेदभाव करणारे लोक भारतीय संविधानाला अभिप्रेत असे भारताचे लोक नाहीत. आदि-अंती मी केवळ भारतीय आहे असेच भारताच्या माणसाने म्हटले पाहिजे. या देशाला भारत न म्हणणारी आणि स्वतःला भारतीय न म्हणणारी माणसे भारताचे लोक असू शकत नाहीत. देशाला भारत न म्हणता त्याला आपल्या धर्माचे नाव देणारे लोक भारताचे लोक ठरू शकणार नाहीत. उदा. 'हिंदुस्थान' हे या देशाचे नाव नव्हे. संविधानातच (अनुच्छेद : १) या देशाच्या 'भारत' या नावाची नोंद झालेली आहे.

या देशात धर्मावरून केवळ भेदच करणारे लोक नाहीत तर धर्मावरून परस्परांचा भयानक द्वेष करणारे, धर्मावरून भांडणारे, दंगली पेटवणारे आणि रक्तपात घडवणारे लोक आहेत. मूलतत्त्ववादाच्या आणि दहशतवादाच्या आगीने लोकांमधील सलोख्याची राख करणारे लोक भारतातले लोक असू शकतात, पण संविधानाला अभिप्रेत भारताचे लोक असू शकत नाहीत.

वंश, जात, लिंग आणि जन्मस्थान या मुद्यांवरून स्वत:ला श्रेष्ठ आणि इतरांना दुय्यम समजणारे लोक इथे आहेत. वरील सर्वच मुद्यांवरून या देशात केवढे अत्याचार होतात ही बाब दररोजच्या वर्तमानत्रातील बातम्यांवरून आपल्या लक्षात येते. जातीय मानसिकता, पुरुषी मानसिकता आपल्या पूर्वापार कृत्रिम अहंकाराला सतत गोंजारित असते आणि त्यामुळे परंपरांनी खालच्या जातीचे मानलेल्या लोकांवर सततच अत्याचार होतात. ख्रिश्चनांच्या हत्या, त्यांना जाळणे, नन्सवर अत्याचर करणे, चर्चेसची मोडतोड करणे हे प्रकार जसे घडतात तसे अनुसूचित जातीच्या लोकांवर, स्वाभिमानाचे जगणे जगायला लागलेल्या बौद्धांवर आणि स्त्रियांवर नाना प्रकारचे अत्याचार होतात. या प्रांतातला माणूस त्या प्रांतात जाणार नाही, त्या प्रांतातला माणूस या प्रांतात येणार नाही, अशी बंदी घातली जाते. त्यावरून अत्याचार होतात. ही मानसिकता संविधान- मानवाची मानसिकता नव्हे.

माणसाच्या माणूसपणाचे अपहरण करणारी अस्पृश्यता नावाची भीषण रूढी इथे हजारो वर्षांपूर्वी निर्माण झाली. या रूढीने असंख्य लोकांना पशूंना मिळत होते तेही जगणे मिळू दिले नाही. संविधानाने अस्पृश्यता (अनुच्छेद-१७) नष्ट करून टाकली. अस्पृश्य म्हणजे दलित. अस्पृश्यता नष्ट केली याचा अर्थ संविधानाने दलितत्व नष्ट केले. पण येथील अनेक अभिजनांना अस्पृश्यत्व वा दलितत्व कायम राहावे असे वाटते. १९५६ साली बौद्ध झालेल्या काही थोड्यांनाही दलितत्व कायम वागवावेसे वाटते. या लोकांना दलित+बौद्ध असे मानावे की बौद्ध+दलित मानावे की बौद्ध-दलित मानावे, असा प्रश्न काही विवेकी लोकांना पडायला हवा.

भारतीय संविधानाने स्त्री-पुरुषांमधील लिंगभाव, जातीभाव, वंशश्रेष्ठत्व भाव आणि अस्पृश्यता या गोष्टी इतिहासात दफन केल्या पण, काही कनिष्ठ जाती आपले कनिष्ठपण वेगवेगळ्या प्रथा-परंपरांच्याद्वारा जपतच असतात. पुरुषी वर्चस्व स्त्रियांना दुय्यम लेखते पण, अनेक स्त्रियाही आपल्या पतीच्या जातीचे, धर्माचे आणि या गोष्टींशी संबंधित रूढी-परंपरांचे आदरपूर्वक पालन करून स्वत:चे दुय्यमत्व जपत असतात. याप्रकारे अनेक लोक गुलामी देणाऱ्या भूतकाळाच्या चौकटींचा त्याग करायला आजही तयार नाहीत. हा संविधानाचा पुरस्कार आहे की, संविधानाला नकार याचा विचार सर्वच संबंधितांनी गंभीरपणे करायला हवा.

इ.स.२००० वर्षाआधी इथे सिंधू संस्कृतीचा विकास झाला होता. मोठी नगर तिने निर्माण केली होती आणि येथील संस्कृतीची पायाभूत तत्त्वे : कर्मविषयक ऐहिक दृष्टिकोन, गणपद्धती म्हणजे सामूहिक लोकशाहीजन्य नेतृत्व, सर्वांप्रती समानता, विषमतेला विरोध, माणसाच्या शक्तीवर विश्वास आणि ईश्वर वा अशा कोणत्याही अलौकिक शक्तीला स्थान नसणे, आदरणीय पूर्वजांप्रती कृतज्ञता म्हणून त्यांची पूजा, स्त्रीला केवळच समान स्थान नव्हे तर पुरुषापेक्षा श्रेष्ठ स्थान, विज्ञानासंबंधी निष्ठा आणि सदाचार वा नैतिकता यांना जीवनात अनन्य स्थान अशी होती. आर्य इथे आले. त्यांनी सिंधू संस्कृती उद्ध्वस्त केली. येथील लोकांना दास केले. आर्यांनी वैदिक धर्माला जन्म दिला. कर्माची ऐहिकतेशी असलेली नाळ तोडली. परलोकाशी आणि विषमतेशी बांधलेला कर्मविपाकाचा सिद्धान्त तयार केला. श्रेष्ठ-कनिष्ठतेचे तत्त्व जीवनात आले, माणसांमध्ये विषमता भरली. ईश्वर आणि देवी-देवतांच्या कृपेवर जगण्याला लावणारे दुर्बल, परावलंबी मानसशास्त्र जन्माला घातले, स्त्रीला दुय्यमत्व दिले, तिला सर्व हक्कांपासून वंचित असलेली वस्तू केले, विज्ञाननिष्ठेला हद्दपार केले आणि सदाचारी नैतिकतेची वाट लावली.

भारतात या दोन जीवनशैलीमध्ये सतत संघर्ष झाला. आजवर हा संघर्ष वेगवेगळ्या पद्धतीने सुरूच आहे. सिंधू संस्कृतीच्या मूल्यांचा वारसा चार्वाकांनी वैदिकांचे अत्याचार सहन करत चालवला. हा श्रमणसंस्कृतीचा वारसा महावीराने आणि बुद्धाने चालवला. सम्राट अशोक, बृहद्रथ, जोतीबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालवला. हाच वारसा आपल्या संविधानाच्या रक्तवाहिन्यांमधून वाहत आहे. संविधानाची इच्छा ही आहे की, भारतातील सर्वच लोकांनी हा मूल्यवारसा स्वीकारावा आणि संवर्धित करावा आणि स्वतःला भारताचे लोक असे गौरवाने म्हणवून घ्यावे. ४४ व्या संविधान दुरुस्तीने एकतिसाव्या अनुच्छेदातील (ऊ) मालमत्तेचे स्वातंत्र्य काढून टाकण्यात आले आहे. या संदर्भात अनिर्बंध मालमत्ता बाळगतात आणि समान नागरी कायद्याला (अनुच्छेद-४४) जे विरोध करतात ते लोक भारतात राहत असले तरी भारताचे लोक नव्हेत. भारतीय संविधानाला अभिप्रेत भारताचे लोक नव्हेत असेच म्हटले पाहिजे.

आपण भारतासंबंधी बोलतो याचा अर्थ भारत या राष्ट्रासंबंधी बोलतो पण, वेगवेगळ्या जातींच्या तुकड्यांना राष्ट्र म्हणता येत नाही. वेगवेगळ्या धर्मांच्या परस्परांमध्ये भांडणाऱ्या बेटांना राष्ट्र म्हणता येत नाही. राष्ट्र म्हणजे समध्येयी लोकांचा समूह. राष्ट्र परस्परांना उन्नत करण्यासाठी झटणाऱ्या लोकांचा समूह! एक हृदय, एकचित्त, समान निष्ठा - समान दिशा हे सर्व लोकांचे मानसशास्त्र होते तेव्हा त्या लोकसमूहाला राष्ट्र ही पदवी प्राप्त होते. प्रत्येक व्यक्तीला जीवित राहण्याचा म्हणजे सन्मानाने जीवित राहण्याचा हक्क (अनुच्छेद-२१) संविधानाने दिला आहे. इथे

गरीब आणि परंपरेने बहिष्कृत मानलेल्या जातींवर उच्चजाती अत्याचार करतात. एका धर्मातील लोक दुसऱ्या धर्मातील लोकांना काळ्या पाण्यात पाहतात. डॉ.बाबासाहेब म्हणतात, "How can people divided into several thousands of castes be a nation? The castes are antinational. In the first place because they bring about seperation in social life. They are antinational also because they generate jealously and antipathy between caste and caste. But we must overcome all these difficulties if we wish to become a nation in reality." (लेखन आणि भाषणे : खंड१३, महा.शासन, पृ.१२१७) याच भाषणात पृ.१२१६ वर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे, "२६ जानेवारी १९५० ला आपण एका अंतर्विरोधग्रस्त जीवनात प्रवेश करत आहोत. राजकारणात तत्त्वतः आपणाला समता मिळेल पण, आपल्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात विषमता असेल. राजकारणात एक व्यक्ती - एक मत, एक व्यक्ती - एक मूल्य हे तत्त्व आपणाला दिसेल पण, आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण समाजाच्या विषमताग्रस्त सामाजिक आणि आर्थिक ढाच्यामुळे एक व्यक्ती - एक मूल्य या तत्त्वाला नकार देत राहू. आपण असे अंतर्विरोधग्रस्त जीवन किती काळ जगणार आहोत? आपण आपल्या सामाजिक-आर्थिक जीवनात किती काळ समता नाकारीत राहणार आहोत. आपण ही समता नाकारीत राहिलो तर आपण आपल्या लोकशाहीलाच अडचणीत आणू." आता डॉ.बाबासाहेब म्हणतात, त्यानुसारच याप्रकारे बहुसंख्य लोकांना आर्थिक आणि सामाजिक समता नाकारणारे लोक भारतात कदाचित राहत असतील पण ते भारतीय संविधानाला हवे तसे भारताचे लोक ठरू शकत नाहीत. आपल्या जातीचे, पोटजातीचे अहंकार जपणारे लोक भारताला राष्ट्र होऊ देत नाहीत. हे असे राष्ट्रविरोधी लोक भारताचे नागरिक कोणत्या अधिकाराने होऊ शकतात, असा प्रश्न आहे.

संविधानाचे पालन करणे हे प्रत्येक भारतीयाचे (अनुच्छेद:५१ क) मूलभूत कर्तव्य आहे. मग भारताला समाजवादी करणे ही जबाबदारी भारताचे लोक म्हणून आमच्यावर येत नाही काय? धार्मिक, भाषिक, प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेत एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे (अनुच्छेद : ५१ ड) आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावाद याचा विकास करणे (अनुच्छेद : ५१ ज) अशी मूलभूत कर्तव्ये भारताचे लोक म्हणून आम्ही करायची आहेत. पण धर्म, भाषा अशा भेदांच्या पलीकडे जाण्याचा कोणता कार्यक्रम आजचे राजकारण राबवते?

महाराष्ट्रापासून केंद्रापर्यंतचे बहुतेक सर्वच धुरीण नानाविध अंधश्रद्धांच्या जाळ्यात

अनुदाने सढळ हाताने ही मंडळी देतात. यातून सुधारणावाद, शोधकबुद्धी मारली जाते की जागवली जाते? भारतीय संविधानाला बांधील असणारे राजकारणच धर्मांधता वाढवण्यात सहभागी होत असेल तर संविधानाच्या पालनाच्या मुद्याचे काय होणार? टू-जी स्पेक्ट्रम, राष्ट्रकुल घोटाळा, आदर्श आणि असे शेकडो भ्रष्टाचार लोकप्रतिनिधीच करत असतील तर मानवतावादाचे दिवाळे निघणे अपरिहार्य नाही काय? राजकारणातील माणसांच्या नावावर असलेली जमीन, त्यांची इतर संपत्ती आणि स्विस बँकेतील हजारो-लाखो कोटी काळा पैसा या सर्वच गोष्टींची तपासणी संविधानाचे पालन करणाऱ्या देशातील यंत्रणा का करत नाहीत? कोणतेही उत्पादक काम न करणाऱ्या माणसांजवळ अशी डोंगराएवढी संपत्ती येते कुठून? हा लोकांचाच पैसा आहे की नाही? याचा अर्थ देशातील सर्वसामान्य जनतेचे सर्वश्रेष्ठ शोषक कोण आहेत आणि कुठे आहेत या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळते. सर्वसामान्य माणसे दारिद्र्यात, महागाईत होरपळत असताना संविधानाला आणि त्यातील मानवतावादाला मानणारे लोक हजारो कोटींचे मालक आहेत. निवडणुकीसाठी पन्नास-पन्नास कोटी रुपये उधळणारा उमेदवार लोकशाहीवादी आणि भारतीय संविधानाचा पाईक कसा होतो असा प्रश्न आहे.

संविधानाच्या ४४ व्या दुरुस्तीनंतरचे ३१ वे कलम या सर्व अवैध संपत्तीच्या मालकांनी कुठे गाडले त्याचा शोध कोण घेणार? हे लोक भारतीय संविधानाला अभिप्रेत भारताचे लोक आहेत काय? विज्ञाननिष्ठेच्या चिंध्या करणारे, धर्मांधतेची आग चेतवत ठेवणारे, जातींमध्येच गर्वाने वावरणारे आणि संविधानविरोधी मूल्यांच्या मानसिकतेत लोकांना डांबून ठेवणारे लोक संविधानाला हवे आहेत ते भारताचे लोक कसे असा प्रश्न आहे. या ना त्या प्रकारे भारताच्या संविधानाला फसवणारे लोक भारताचे लोक ठरू शकत नाहीत. जे लोक संविधानालाच आपली संस्कृती आणि अभंग जीवननिष्ठा मानतील तेच लोक 'आम्ही भारताचे लोक' या गौरवशाली बिरुदाचे धनी ठरू शकतील.

❖❖

# ४. भारतीयांचा मार्गदर्शक दिवस संविधान दिवस

आज 'संविधान दिवस'. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करावा असा आदेश २४ नोव्हेंबर २००८ साली महाराष्ट्र शासनाने काढला. आणि आता सर्वच संस्थांमध्ये हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला. याबद्दल महाराष्ट्र शासनाला आपण सर्वांनीच हार्दिक धन्यवाद द्यायला हवेत. खरे म्हणजे केंद्र शासनानेही देशातील सर्व राज्यांनी हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा करावा असा आदेश काढला पाहिजे आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करून घेतली पाहिजे. देशाच्या जीवनातला हा सर्वांत मूल्यसुंदर दिवस आहे.

:१:

नागपूर जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधून भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन दररोज व्हावे, सर्वांना दिसेल या पद्धतीने शाळेच्या दर्शनी भागात ठळक अक्षरात ही संविधानाची प्रास्ताविका लिहिली जावी ही कल्पना प्रथम सुचली ती इ.झेड. खोब्रागडे यांना. त्यावेळी ते नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी पदावर होते. २००५ च्या डिसेंबरपासून त्यांनी हा उपक्रम नेटाने राबवायला प्रारंभ केला आणि नागपूर जिल्ह्यातील सात लाखांच्यापेक्षाही जास्त विद्यार्थी या प्रास्ताविकेचे नियमित वाचन करायला लागले. वर्ध्याला जिल्हाधिकारी असताना त्यांच्याच प्रयत्नामुळे २००७-२००८ पासून राज्याच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधून हा उपक्रम सुरू झाला. उपक्रमाची व्याप्ती अशी वाढायला लागली आणि त्यांच्या चिकाटीमुळे हा व्याप आता अधिकच मोठा झाला. आता महाविद्यालयांनीही आणि तालुका-जिल्हा पातळ्यांवरील सर्व ठिकाणीही संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन झाले पाहिजे असा आदेशच महाराष्ट्र शासनाने काढला आहे. आपण सर्वांनीच महाराष्ट्र शासनाप्रती यासंदर्भात हार्दिक कृतज्ञता व्यक्त करायला हवी आणि हे सर्व ज्यांच्या कल्पक डोक्याला सुचले आणि ज्यांनी या उपक्रमाला अशा सर्वमान्य पातळीवर आणले त्या इ.झेड. खोब्रागडेंनाही

आपण मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत. कारण ही प्रास्ताविका डोक्यात घेणाऱ्या पिढ्यांचे हातच नवा भारत घडवतील. संविधान संस्कृती जन्माला घालतील.

:२:

२६ नोव्हेंबर हा दिवस आपण सर्वच भारतीयांनी 'संविधान दिवस' म्हणून का साजरा करायचा? या दिवसाला राष्ट्रीय महोत्सव का मानायचे? सर्वच भारतीयांनी क्रांतीदिवस म्हणून हा दिवस का साजरा करायचा? या सर्वच प्रश्नांचे हे उत्तर आहे की या दिवशी आपण सर्वांनी एका सर्वकल्याणकारी संविधानाचा स्वीकार केला. भारतीय संविधान म्हणजे आपल्या देशातील आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांना सर्वकल्याणकारी नैतिकतेचे व्यवस्थापन देणारा राष्ट्रग्रंथ आहे. भारताचे संविधान एकूणच माणसांच्या संपूर्ण सन्मानाचे महाकाव्यही आहे आणि जबाबदाऱ्यांचा विराट डोंगरही आहे. एकावन्नाव्या अनुच्छेदात सांगितल्याप्रमाणे धर्म, भाषा, प्रदेश, वर्ग आणि स्त्री-पुरुषांमधील सांस्कृतिक विषमता यांच्या पलीकडे जाऊन भारतीय लोकांमध्ये ऐक्य आणि बंधुता निर्माण करणे, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि उदंड मानवतावाद यांचा विकास करणे हा प्रकाशमार्ग संविधानाने आपल्या मनांपुढे अंथरून ठेवलेला आहे. हा प्रकाशमार्ग आपणा सर्वांनाच मानवी सौहार्दाच्या, निष्कंटक सहजीवनाच्या क्रांतीपर्वात घेऊन जाणारा आहे. संविधानाच्या कणाकणात हा आशय ओतप्रोत भरणारे या संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती तर आपण या दिवशी अपार कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.

:३:

हजारो वर्षे आपल्या देशात विषमतेला नीती मानले गेले. शूद्रातिशूद्र, आदिवासी, भटके-विमुक्त आणि स्त्रिया यांच्या दास्याला आपल्या देशात व्यवस्था म्हटले गेले. वरील सर्वांसाठीच माणूस होण्याच्या, मुक्त होऊन आपापली अर्थपूर्णता निर्माण करण्याच्या सर्व वाटाच बंद केल्या गेल्या होत्या आणि या निर्घृण दास्याला अपरिवर्तनीय आणि पवित्र वास्तव म्हणून सर्वमान्यता मिळवून देण्यात आपल्या देशातील शोषणयंत्रणा यशस्वी झाली होती. दासच आपल्या दास्याचे कडवे संरक्षक बनले होते आणि हे ज्या समाजात होते त्या समाजात समतेचे, भगिनीभावाचे आणि बंधुत्वाचे दिवाळे निघणे अटळच असते. शिवाय ही दिवाळखोरी पवित्र मानली जाते तेव्हा परिवर्तनाच्या प्रक्रियेसकट परिवर्तन हा शब्दही जीवनातून हद्दपार होऊन जातो.

:४:

या सर्व विषमतांनी मुमूर्षु (आसन्नमरण) करून ठेवलेल्या समाजासाठी भारतीय संविधान जिवंत जगण्याचा पर्याय होऊन आले. संविधानाचा सर्व भेदांचे निर्मूलन

करणारा पंधरावा अनुच्छेद वाचावा आणि एकावन्नावा अनुच्छेद काळजीपूर्वक वाचावा. या दोन अनुच्छेदांमध्ये संविधानाच्या प्राणाची ऊर्जा दाटली आहे ही बाब आपल्या लक्षात येते. सर्वांनीच आणि विशेषत: भगिनींनी या अनुच्छेदांना आपले मुक्तीअनुच्छेद मानावेत. सर्व माणसांच्या सन्मानाची आणि स्वाभिमानाची जपणूक ही या संविधानाची प्रतिज्ञा असून संकुचितता, द्वेष आणि हिंसा यांच्या पलीकडचे सुंदर मानवी संबंध हे त्याचे लक्ष्य आहे. आपली सर्वांचीच भावनिक आणि वैचारिक जीवनशैली, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक आणि बौद्धिक नैतिकता कशी असावी या सर्वच प्रश्नांच्या उत्तरांचा मूल्यकोश असे आपल्या संविधानाचे स्वरूप आहे.

५:

या संविधानातील नैतिकतेला स्थळकाळाचीही मर्यादा नाही. संपूर्णच मानवी जीवनाचे संविधान ठरू शकेल एवढी मूल्यांची असीमता या संविधानात आहे. चौथ्या भागापर्यंत संविधान एका सुंदर समतासंस्कृतीचा नकाशा देते आणि पुढल्या भागात त्याच्या राजकीय, सामाजिक अशा सर्वच पातळ्यांवरील उपयोजनांची मांडणी करते. संविधानाची रचना आधुनिक आहे पण या संविधानाचा विशेष हा आहे की संपूर्णच मानवी जीवनाच्या कल्याणाची तत्त्वे त्याने भारताच्या इहवादी, बुद्धिवादी नैतिक परंपरेतूनच घेतली आहेत. दक्षिण आफ्रिकेने आपल्या संविधानाचा नमुना पुढे ठेवून आपले संविधान बनविले आहे. इराकच्या लोकशाहीला आपल्या लोकशाहीचा आधार लागतो. एखाद्या अवघड पेचप्रसंगात अमेरिकाही भारतीय संविधानाला वाट विचारते. याचा अर्थ असा की आपले संविधान मूल्यदृष्ट्या सर्वार्थांनी सर्वकल्याणकारी आहे. एखादेवेळी संपूर्ण जगालाच आपले एकच संविधान असावे असे वाटले तर देशनाम, क्षेत्र असा तपशील बदलून आपल्या संविधानाचाच स्वीकार जगाला करावा लागेल इतकी या संविधानातील मूल्ये स्थल-कालातीत आहेत. म्हणजे विश्वाच्याही सुंदर आणि सर्जनशील जीवनाचे भारतीय नीतीशास्त्र असेच आपल्या संविधानाचे स्वरूप आहे.

# ७. डॉ.आंबेडकरांची जयंती : कृतज्ञता दिवस

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही केवळ एका प्रतिभावंत महामानवाची जयंती नव्हे; तर तो क्रांतीचा वाढदिवस असून तो कुठल्यातरी एका सामाजिक गटाने साजरा करावा हे मुळात या देशाला डॉ.आंबेडकर न समजल्याचे लक्षण आहे. देशातील सर्वच स्तरातील लोकांनी आंबेडकर जयंती कृतज्ञता दिवस म्हणून साजरी केली पाहिजे.

डॉ.आंबेडकरांची जयंती अर्थात क्रांतीचा वाढदिवस ज्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर साकार झाला, त्याचे सामाजिक, सांस्कृतिक मूल्य एकूणच जागतिकसंदर्भात अनन्यसाधारण आहे. त्यामुळे हा क्रांतीचा वाढदिवस साजरा करणाऱ्यावर मोठी जबाबदारी आहे.

## आंबेडकर:चिंतनाचा विषय

डॉ.आंबेडकर यांचे कार्य कुठल्याही एका जातीच्या, धर्माच्या आणि प्रदेशाच्या चौकटीत मावणारे नव्हते. संपूर्ण वैश्विक समाज हा डॉ.आंबेडकरांच्या चिंतनाचा मूलभूत विषय आहे; केवळ म्हणूनच पहिल्या पातळीवर देशातील महिला, भटके-विमुक्त, आदिवासी, मुस्लिम, शिख, जैन, ख्रिश्चन या सर्व अल्पसंख्याक आणि ज्यांना माणुसकीची आस आहे; त्या सर्व स्तरातील जबाबदार लोकांनी बाबासाहेबांची जयंती कृतज्ञता दिवस म्हणून साजरी केली पाहिजे. डॉ.आंबेडकरांची जयंती जर अशा पद्धतीने साजरी केली तर आज जयंतीला जे रंजनाचे, करमणुकीचे स्वरूप प्राप्त झाले आहे ते स्वरूप क्रमाने वजा होऊन या क्रांतीच्या वाढदिवसाला प्रबोधनाच्या महोत्सवाचे, वैचारिक प्रबोधन, सामाजिक सलोखा, देश सुसंघटित करण्याचे आणि वैचारिक अभिसरणाचे स्वरूप प्राप्त होईल.

डॉ.आंबेडकरांची जयंती या देशाकडून प्रगल्भ मानसिकतेची अपेक्षा करते. या मानसिकतेचा विचार बाबासाहेबांसंबंधी आदर बाळगणाऱ्या सर्वांनी गंभीरपणे केला पाहिजे.

सामाजिक समतेच्या अस्तित्वाबद्दल विचार व्हायला हवा. स्वातंत्र्याला आज ६२ वर्षे पूर्ण झाली; पण सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संधी आणि दर्जाची समता प्रस्थापित झाली, असे म्हणता येणार नाही. संविधानाला अभिप्रेत अशी समता प्रस्थापित तर झालीच नाही; पण नवभांडवलशाही व नवसाम्राज्यवादामुळे नवी विषमता प्रस्थापित व्हायला लागली आहे.

## देशाची नैतिक स्थिती हलाखीची

देशाची नैतिक स्थिती हलाखीची आहे. या देशातील बहुतांश लोकांना संविधान ठाऊक नाही. संविधानाच्या उद्देशिकेतील उद्देशही ठाऊक नाही. प्रामुख्याने समाजवाद हा शब्द सामान्यांच्या आणि राजकारण्यांच्याही मुखात येत नाही. त्यामुळे समता आणि समाजवाद या शब्दांना या सर्वांनी भूतकाळाकडे जाणाऱ्या प्रवाहात विसर्जित करून टाकले की काय असे वाटत आहे.

## विषमतेची पराकोटीची अवस्था

अनेकांना दिवसाला १० रुपयेही मिळत नाहीत; तर काहीजण दिवसाला लाखो रुपये कमवतात. लाखो रुपये लुटतात. या स्थितीला समाजवादाचा शत्रू आणि विषमतेची पराकोटीची अवस्था म्हटले जाते. नवसाम्राज्यवादामुळे जितक्या जाती आणि धर्म तितकी युद्धे सुरू झाली आहेत. हा समाज युद्धक्षेत्र झाला आहे. याचाच अर्थ समाजाने समता तत्त्वाकडे पाठ फिरविली आहे, असेच वाटते. हा समाज समृद्धीचा मुखवटा धारण करून अधःपतनाकडे निघाला आहे.

सध्याची विषमतेची स्थिती दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आहेत, या सवालाचा विचार व्हायला हवा. खरे म्हणजे या संपूर्ण स्थितीवर अत्यंत प्रभावी ठरू शकेल अशी योजना संविधानातच आहे. ही योजना नव्याने सांगण्याची गरज नाही; फक्त योजनेची अमलबजावणी करणारे शूरवीर राजकारणी पुढे आले पाहिजेत. हे झाले तर चित्र बदलू शकते.

## देशात संविधानाची मोडतोड

दक्षिण अमेरिकेतील शोषित देश पुढे आले आणि ते उत्तर अमेरिकेच्या दादागिरीला उत्तर देत आहेत. जगात इतरही ठिकाणी हेच चित्र दिसत आहे. भारतीय संविधान त्या देशांमध्ये नसताना संविधानाची फळे त्या देशात येत आहेत. भारतात मात्र संविधानाची मोडतोड केली जात आहे. ही स्थिती रोखण्यासाठी संविधानाच्या मूल्यांनुसार आणि संविधान डोक्यात वागविणाऱ्या माणसाप्रमाणे लढले पाहिजे.

❖❖

# ८. आंबेडकरी चळवळीतील वैचारिकतेचे अपहरण

चळवळ निश्चित अशा तत्त्वज्ञानावर उभी राहते. असे तत्त्वज्ञानच तिला निश्चित आणि रेखिव असे व्यक्तिमत्त्व देते. चळवळ टिकण्यामागेही या तत्त्वज्ञानाचाच रेटा असतो असे निश्चित तत्त्वज्ञान आणि त्यावरील अभेद्य निष्ठा यामुळेच चळवळ मोठी होते आणि टिकतेही. या गोष्टींमुळेच लोकांमध्ये लढण्याची ऊर्जा निर्माण होत राहते. या दोन गोष्टींच्या मूलाधारावरच जनसंघटना बुलंद होत राहते.

आंबेडकरी चळवळीचे तत्त्वज्ञान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्रच वाङ्मयात विखुरलेले आहे. पण त्याची सूत्रे आपणाला संविधानाच्या उद्देशिकेत, 'बुद्ध आणि त्यांचा धम्म'च्या तात्त्विक सारांशात आणि रिपब्लिकन पक्षाच्या खुल्या पत्रात दिसतात. या तिन्हींमधील सूत्रे परस्परपूरक आहेत. ती अत्यंत स्वच्छही आहेत. स्पष्टही आहेत. या सर्व सूत्रांचा सारार्थ बावीस प्रतिज्ञांमध्ये साकार झाला आहे.

आपल्या देशात पुरातन काळापासून सरंजामशाही सुरू आहेच. सरंजामशाही ही धर्म, वर्ण आणि जाती यांच्या संरक्षणाची सामाजिक यंत्रणाच होती. समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेच्या संरक्षणाचे कार्य हजारो वर्षे या सरंजामशाहीने इथे केले. या सरंजामशाहीत सामाजिक शोषण होतेच पण या शोषणात आर्थिक शोषणही समाविष्ट होतेच. याचा अर्थ असा की या सरंजामशाहीने जाती, वर्ण, दैववाद अशा शेकडो गोष्टींचा घोळ घालून समाजात शोषक आणि शोषित असे वर्ग निर्माण केले होते. 'वरून कीर्तन आतून तमाशा' प्रमाणे 'वरून जाती-वर्ण आणि आतून वर्ग' अशीच मांडणी सरंजामशाहीने केली होती. याचा अर्थ असा की असा सगळा अभिनय करूनही भारतीय सरंजामशाहीला आपला वर्गीय चेहरा लपविता आला नाही. विभाजनाचे कितीही देखावे उभे केले तरी समाजाचे वर्गीय रूप झाकता येत नाही. वैदिक आणि बौद्ध हे भारतीय समाजाचे तात्त्वज्ञानिकदृष्ट्या अत्यंत स्पष्ट असे पहिले वर्गीय स्वरूप आहे. अध्यात्म आणि इहवाद, समता आणि विषमता या मार्गाने भारतीय समाजाचे हे वर्गीय रूप आजवर चालत आलेले आहे. याचाही अर्थ येथील सामंतशाहीच्या पोटात भांडवलशाही होतीच पण भारतात

पाश्चात्यांकडून विज्ञानयुगात आलेल्या भांडवलशाहीपर्यंत विज्ञानपूर्व भांडवलशाहीने स्वत:ला सरंजामशाहीच्या पोटात राहण्यात यश मिळविले होते.

अलीकडच्या काळात मात्र भारतीय सरंजामशाहीचे हे कौशल्य अनेक विचारवंतांच्या लक्षात यायला लागले आहे. हे कौशल्य भारतातील सामान्य जनतेच्या पूर्णपणे लक्षात येईल तेव्हा खऱ्या अर्थाने भारतातील जातीयंत्रणेला सहज मृत्यू येईल. स्वत:च ही जातीयंत्रणा स्वत:ला जाळून घेईल.

आरक्षणरहीत वा जातीविहीन समाज निर्माण होण्याची योजना भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतच नोंदविली गेलेली आहे. समाजवाद ही ती योजना होय. समाजवादाच्या पोटी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय जन्माला येईल. हा समाजवाद इहवादाच्या पायांनी चालत गेला तरच त्याला माणुसकीच्या प्रज्ञानी राज्यात प्रवेश करता येईल. माणुसकीच्या या प्रज्ञानी राज्यात बावीस प्रतिज्ञांना आदर्श जीवनशैलीचे रूप प्राप्त झालेले असेल.

ही सर्व मांडणी लक्षात घेतली तर आंबेडकरी चळवळीच्या पायाभूत तत्त्वज्ञानाची कल्पना येऊ शकते. या तत्त्वज्ञानाचे ध्येय आणि दिशा ठरलेली आहे. या तत्त्वज्ञानाला आपल्या विरोधी छावणीशी कोणतीही तडजोड मान्य नाही. का मान्य नाही? तर अशी तडजोड किंवा अशा तडजोडी क्रांतीतत्त्वज्ञानाचे ध्येय आणि दिशा यांच्या मार्गातच संभ्रमाचे मोहक देखावे निर्माण करून ठेवतात आणि क्रांतीकडे समाजाला नेणारा परिवर्तनाचा मार्गच काट्या-गोट्यांनी भरून टाकतात. समाजाच्या संपूर्ण मानसशास्त्राचीच दिशाभूल केली जाते. इतिहास हे सांगतो की प्रतिक्रांती तडजोडीसाठी सतत प्रयत्न करीत असते. प्रतिक्रांती क्रांतीकडे निघालेल्या परिवर्तनाच्या मार्गात धोके उभे करते आणि परिवर्तनाचा मार्ग क्रांतीकडून प्रतिक्रांतीच्या दिशेने वळविते.

क्रांतीकडे निघालेल्या परिवर्तनाच्या प्रक्रियेला उद्ध्वस्त करण्यासाठी प्रतिक्रांती समरसतेचे शस्त्र सतत वापरते. त्यासाठी परिवर्तनाच्या चळवळीतील लोकांना नाना पदव्यांनी पुरस्कारांनी आणि इतरही मार्गांनी मोहीत करण्याच्या यंत्रणा ती राबवते. लाखावधी, कोट्यवधी रुपयांची मोहिनी टाकते. मोहिनीचे इतरही प्रकार वापरले जातात. या अशा आमिषांना बळी पडून खूप माणसे मग आपल्या निष्ठा प्रारंभी चोरून-लपून आणि पुढे उघडपणे-राजरोसपणे लिलावात काढायला लागतात. सगळ्यांना सोबत घ्यायला हवे, सांस्कृतिकीकरणाची प्रक्रिया, सामंजस्याची प्रक्रिया अशी दिशाभूल करणारी नावे ते या सर्व प्रकाराला देत असतात आणि क्रांतीकडे जाणाऱ्या परिवर्तनाच्या प्रक्रियेला ते रोखीत असतात. आम्ही क्रांतीकडे जाणारी परिवर्तनाची प्रक्रिया उद्ध्वस्त करीत आहोत असे ते स्पष्टपणे सांगत नसतात त्यामुळे परिवर्तनाच्या चळवळीतील माणसे सहज त्यांच्या पिंजऱ्यात अडकत असतात.

एक गोष्ट काळजीपूर्वक लक्षात ठेवायची असते ती ही की प्रतिक्रांतीच्या छावणीची

भाषा कधीच स्पष्ट नसते. तिचा उद्देश स्पष्ट असतो पण भाषा संदिग्ध असते. अस्पष्ट असते. प्रतिक्रांतीचे सभासद त्यांच्या मधुर हसण्याच्या मागील जहर दिसणार नाही याची काळजी ते घेतात. पोटात जहर वागविणारे तिचे राजकारणी हसणे परिवर्तनाच्या चळवळीतील लोकांना कापत राहील या तारतम्याने तिचा कार्यक्रम अव्याहतपणे सुरू असतो. तिचे हसणे हत्याराचे कार्य करीत असते. कुणालाही कळणार नाही या पद्धतीने तिचे हे घनघोर हिंसाकार्य शांतपणे सुरू असते.

क्रांतीकडे निघालेल्या परिवर्तनाच्या चळवळीतील माणसे या धूर्तपणाला बळी पडतात. पद, पैसा आणि कीर्ती यांच्या मोहाने ते प्रतिक्रांतीत सहभागी होतात. आता प्रतिक्रांती या लोकांवर पुढली जबाबदारी सोपविते. परिवर्तनाच्या चळवळीत जी इतर माणसे उरलेली असतात त्यांनाही प्रतिक्रांतीत आणण्याची ती जबाबदारी असते. मग आधी प्रतिक्रांतीत पोचलेली ही माणसे कधी प्रेमाने तर कधी आमिषे दाखवून तर कधी बळजबरीने इतरांना प्रतिक्रांतीत भरती करण्याचा हिंसक कार्यक्रम राबवितात.

आज हेच होताना दिसते. आंबेडकरी चळवळीतील माणसे कोणालाही न जुमानता आता बीजेपी, शिवसेना अशा पक्षांकडे जायला लागलेली आहेत. तिकडे कसे फायदे मिळतात ते सांगायला लागलेली आहेत. या सर्व विषारी प्रचाराला चिमणीच्या काळजाची माणसे वा लोभाची मांजरे बळी पडत आहेत. १९५६ साली किंवा त्यानंतर आपण धम्म घेतला याची आठवण ही माणसे विसरून चाललेली आहेत. त्यांना स्मृतिभ्रंश झालेला आहे. स्वार्थ हे या स्मृतिभ्रंशाचे कारण आहे.

या सर्वच प्रक्रियेत आपल्याला पैसा मिळतो पण आपल्या निष्ठेचे वाटोळे होते हेही या माणसांना कळत नाही. या सर्वच प्रक्रियेत आपल्याला आमदार, खासदार वा मंत्री अशी पदे मिळतात पण या प्रक्रियेत आपल्या निष्ठेचे, आंबेडकरनिष्ठेचे अपहरण होते हेही या स्वार्थधुंद माणसांना कळत नाही.

आपल्या निष्ठांचा विक्रय करून सत्तेत जाणाऱ्या वा मानसन्मान मिळविणाऱ्या या लोकांनी संघटित होऊन, इतर वंचितांना सोबत घेऊन सत्ता आपल्या हातात का घेऊ नये ? नाहीतरी प्रतिक्रांतीवादी राजकीय पक्षांमध्ये यांना अत्यंत बिनमहत्त्वाची पदे देऊन दुय्यमच ठेवले जाते. याचा आवश्यक तेवढा वापरच केला जातो. पण यांची त्या संदर्भात तक्रार नसते. बीजेपीच्या वा काँग्रेसच्या सत्तेत यांना दुय्यम ठेवलेले सन्मानाचे वाटते पण आंबेडकरी आणि वंचितांची चळवळ संघटित व्हायला लागली तर तिथे मात्र प्रत्येकच संबंधित नेत्याला प्रथमपदच हवे असते. या हेक्यामुळे संघटनच शक्य होत नाही. त्यामुळे या माणसांना सत्तेपर्यंत पोचताच येत नाही. आपल्या आंबेडकरनिष्ठेचे अपहरण होऊ देणे, तिकडे दुय्यमत्व गौरवाने पत्करणे यांना मान्य असते आणि त्यासाठीच ते संघटित होऊन सत्ताधारी होण्याचे टाळतात.

# ९. विद्यार्थ्यांपुढील नवी आव्हाने

अध्यापक आणि अभ्यासक हे समीकरण तोडण्याची प्रवृत्ती आता झपाट्याने वाढत आहे. अध्यापक श्रीमंत आणि अध्यापन गरीब ही नवी वस्तुस्थिती आता शैक्षणिक क्षेत्रात प्रतिष्ठा पावायला लागलेली आहे. आजचा अध्यापक ज्या मंदगती वास्तवातून आला त्याच्यात आणि आजच्या विद्यार्थ्याला उद्याला ज्या बादलगती वास्तवात शिरायचे आहे त्याच्यात केवढी आँणि कशी तफावत आहे त्याचा विचार आजच्या अध्यापकाने गंभीरपणे करायला हवा. असा विचार करणाऱ्या अध्यापकाच्या अध्यापनाची दिशा निश्चित असणे अपरिहार्य आहे. आपल्यापुढे बसलेला आपला विद्यार्थी उद्याच्या जीवनात पाय घट्ट रोवून उभा राहावा असे ज्या अध्यापकांना वाटते त्यांनी आपली नवी अध्यापनकौशल्ये आता घडविण्याची नितांत आवश्यकता आहे. आजच्या विद्यार्थ्यांपुढील आव्हाने डोळ्यांपुढे ठेवूनच अध्यापकाला आपल्या अध्यापनकौशल्याचे आणि बौद्धिककौशल्याचे स्वरूप निश्चित करता येईल.

१।

हजारो स्पर्धांनी पेटलेल्या उद्याच्या जगाच्या आकाशात आपल्यापुढे बसलेल्या विद्यार्थ्याला यशस्वीपणे उडता यावे ; त्याचे पंख जळून न जाता तो उद्याच्या वणव्यातून विजयी वीराप्रमाणे उडत राहावा यासाठी आपल्या विद्यार्थ्यांच्या पंखात आपण कोणते बळ भरायला हवे याचा विचार आजच्या प्रत्येकच विषयाच्या अध्यापकाने आज गंभीरपणे करायला हवा. माझा विद्यार्थी जागतिकीकरणाच्या गुंतागुंतीला घाबरणार नाही; तो त्या गुंतागुंतीवर मात करील इतकी ताकद जर मी माझ्या विद्यार्थ्याला देऊ शकत नसेल तर माझ्या अध्यापनाचे फलित काय? असा प्रश्न आजच्या प्रत्येकच अध्यापकाला पडला पाहिजे. परिस्थिती दरक्षणी सांधे बदलते आहे. दरक्षणी तिच्यात नवी गुंतागुंत दाखल होते आहे. आपल्या विद्यार्थ्याला न गोंधळता या गुंतागुंतीतून वाट काढायची आहे. आपली अर्थवत्ता न हरवू देता त्याला या गुंतागुंतीवर मात करायची आहे. याचे स्वच्छ भान आजच्या अध्यापकाला असणे आवश्यक आहे.

२:

आजच्या अध्यापकाने अध्यापनध्येय या दरक्षणी बदलत्या गुंतागुंतीनुसार आता बदलले पाहिजे. 'आजचा अध्यापक' म्हणवून घेण्यासाठी अध्यापकाला आज आपली अध्यापकीय भूमिका निश्चित करावी लागेल. अध्यापक आपल्यापुढे बसलेल्या विद्यार्थ्यांना शिकवितो. त्या विषयाच्या निमित्ताने तो भोवतीचे जीवनच शिकवीत असतो. आजच्या अध्यापकापुढील विषयाचा परिघ आता अख्खे जगच कवेत घ्यायला लागला आहे. म्हणजे आजच्या अध्यापकाने आपल्या विषयाची मांडणी आता जागतिक जीवनाच्या संदर्भचौकटीतच करायला हवी. अनेक कारणांमुळे अध्यापकापुढे बसलेल्या विद्यार्थ्यांना जागतिक संदर्भचौकटीचे गांभीर्य कदाचित कळणार नाही. कारण त्यांच्या जगण्याचे जहाज अजून जागतिक जीवनाच्या वादळलेल्या सागरात उतरलेलेच नसते. ज्यांचे जहाज सागराच्या वादळात हेलकावे खात असते त्यांची अवस्था आणि जे जहाजातच बसले नाहीत आणि सागरापासूनही दूर आहेत त्यांची अवस्था, या दोन्ही अवस्थांमध्ये अंतर पडणे साहजिकच असते. झाडाच्या बुंध्याला आग लागली तर आगीचे निरोप प्रथम फांद्यांना ऐकायला येतात. फांद्या हे निरोप फुलांपर्यंत पोचवतात. इथे बुंधा म्हणजे जागतिक जीवन. फांद्या म्हणजे अध्यापक आणि फुले म्हणजे विद्यार्थी. आजच्या अध्यापनयंत्रणेला हे सर्व रूपक समजावून घ्यावे लागेल आणि अशा अवस्थेत संभवणाऱ्या आपल्या भूमिकांची निश्चिती करून घ्यावी लागेल.

३:

विद्यार्थी या शब्दात दोन पदे आहेत. 'विद्या' हे एक पद आणि 'अर्थी' हे दुसरे पद आहे. अर्थी म्हणजे गरज, आवड, आस्था किंवा प्राप्त करून घेण्याची निकड. याचा अर्थ विद्येची ज्याला गरज आहे; आवड आहे; आस्था आहे वा ती प्राप्त करून घ्यायची उत्कट निकड आहे तो विद्यार्थी. ज्याला विद्येची उत्कट अशी तहान-भूक लागलेली आहे आणि कितीही मिळविली तरी जी पूर्णपणे मिळविली असे वाटत नाही असे ज्याला वाटते तो विद्यार्थी. अशी विद्यार्थ्यांची व्याख्या करता येईल. आता दरक्षणीच या विद्येची संदर्भचौकट बदलते आहे. क्षणाक्षणाला तिची कक्षा बदलते आहे. आजच्या विद्यार्थ्यांपुढे आज असे क्षणाक्षणाला बदलणारी विद्या हे टाळता न येणारे आव्हान आहे. आपला विषय बदलत्या जीवनाच्यासोबत बदलला पाहिजे. आपण शिकतो त्या विषयात हे बदल दाखल झाले पाहिजेत. जागतिकीकरणात आपल्या नागरिकत्वाचा आशय बदलला आहे. आपण एका विराट गुंतागुंतीचे नागरिक झालो आहोत. याचा अर्थ आपण ही विराट गुंतागुंत आपल्या विषयातून

शिकतो आहोत; आपल्याला ही गुंतागुंत शिकविली जात आहे असे विद्यार्थ्यांना वाटले पाहिजे. खुद्द विद्यार्थ्यांनीही ही गुंतागुंत समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जो विद्यार्थी हे करणार नाही त्याला उद्याच्या जगात नेणारी वाट दिसणारच नाही. तो मग पाय असूनही लंगडा ठरेल. डोळे असूनही आंधळा ठरेल आणि विचारशक्ती असूनही मतिमंद ठरेल. या दुनियेच्या संरचनेकडे, तिच्यातील स्पर्धांकडे पाठ फिरविणारा विद्यार्थी दुनियेच्या शिरगणतीतून बाद ठरविला जाईल. या नव्या संरचनेत बाद ठरायचे नसेल तर कालच्या विद्यार्थीपणाचा नमुना उद्याची दुनिया मान्य करणार नाही. या दुनियेला आता नवे-निराळेपण अपेक्षित आहे. आपण ज्या वाटेवरून जाऊ इच्छितो त्या वाटेवरील संकटांचा अभ्यास आपल्याला करावाच लागेल. नव्या दुनियेच्या मयसभेचे इंजिनिअरींग आपल्याला समजावून घ्यावेच लागेल. या नव्या वैश्विक आव्हानांचा अभ्यासक्रम आपणाला ज्ञात करून घ्यावाच लागेल. हे आजच्या सर्वच शाखांमधील विद्यार्थ्यांपुढचे अत्यंत जटिल असे आव्हान आहे.

४:

या आव्हानाकडे गंमत म्हणून पाहणे अंगलट येईल. सैल डोक्याने विचार करणाराला या आव्हानाचे गांभीर्य कळणारच नाही. जो विद्यार्थी या आव्हानाला खेळ मानेल त्याच्या जीवनाचा हे आव्हान खेळ केल्याशिवाय राहणार नाही. या आव्हानाने आपली वाताहत करू नये यासाठी आपण जबाबदार, गंभीर आणि ऊर्जावंत झालो पाहिजे असे विद्यार्थ्यांना उत्कटपणे वाटले पाहिजे. आपले कालचे स्वभाव हेही आपल्यापुढे आव्हान म्हणून उभे आहेत. आपल्या कालपर्यंतच्या सवयी आपल्यापुढे आव्हान म्हणूनच उभ्या आहेत. आपली कालवरची जीवनाभिरुची आपल्या मार्गात आडवी येत असेल तर आजच्या जीवनात उत्तीर्ण होण्यासाठी नव्या जिवंत जीवनाभिरुचीचा स्वीकार आपल्याला करावा लागेल. विद्यार्थ्यांच्या बुलंद निर्धारापुढे पराभव पत्करण्यात या आव्हानांना गौरव वाटेल असेच विद्यार्थीपण आजच्या विद्यार्थ्यांनी साकार करावे.

❖❖

# १०. निवडणुकीमुळे आंबेडकरी चळवळीचे ठिकाण कळले

देशात संविधानाला अभिप्रेत राजकारणच सुरू असले पाहिजे. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेत सामंजस्य व बंधुभाव वाढला पाहिजे. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग केला गेला पाहिजे. अस्पृश्यता, जाती, स्त्री-पुरुष विषमता या गोष्टी नष्ट झाल्या पाहिजेत. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, शोधक बुद्धी व सुधारणावाद या मार्गाने भारतीय संविधानाची उद्देशिका लोकाचरणातून साक्षात झाली पाहिजे. हे व्हावे यासाठी संविधान आहे, त्यातील लोकशाही आहे.

हे प्रामाणिकपणे करू शकणाऱ्या धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, वर्गीय, जातीय या सर्व भेदांच्या पलीकडे गेलेल्या संविधाननिष्ठ माणसांच्या हाती भारतातील मतदारांनी अत्यंत विवेकशील बुद्धीने शासनयंत्रणा सोपविली पाहिजे. असे झाले तर भारतात संविधानाला अभिप्रेत मूल्यांचे राजकारण सुरू होऊ शकते.

आज भारतात 'एक शून्य बाजीराव' प्रमाणे 'एक शून्य राजकारण' सुरू आहे. या राजकारणाला राजकारण तरी म्हणता येईल काय? संविधाननिष्ठ मन नसतानाही केवळ सत्तासंपादनासाठी चाललेले क्लेशदायक खेळ म्हणजे राजकारण नव्हे. ते सत्ताकारण आहे.

संविधान सुरू होऊन इतकी वर्षे झाली तरी या देशात संविधानाला अभिप्रेत मतदार नाहीत, संविधानाला अभिप्रेत लोकप्रतिनिधी नाहीत. काही सन्माननीय अपवाद आपण बाजूला ठेवू; पण अपवाद समाजाची कोसळण थांबवू शकत नसतात. त्यासाठी समूहांच्या निष्ठांची आणि प्रामाणिकपणाची गरज असते. निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी आहे आणि लोकशाही संविधानमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आहे; पण तत्त्व आणि व्यवहार यात आपल्या देशात जवळजवळ विरोधच आहे.

काय आहे प्रत्यक्षात? निवडणुकीला कोण उभे राहतात? कोण निवडून येतात?

लोकशाही कोणाच्या हातात सोपविली जाते. जे लोक पाच-पन्नास कोटी रुपये निवडणुकीसाठी खर्च करू शकतात आणि निवडून येऊ शकतात त्यांच्या हातात लोकशाही सोपविली जाते. ट्रकच्या ट्रक दारू, करोडो रुपये लोकांना निवडणुकीच्या पूर्वरात्री वाटण्याची क्षमता ज्याच्याजवळ आहे; निवडणूक काळात हजारो कार्यकर्त्यांच्या खाण्या-पिण्याचा प्रचंड खर्च करण्याची ऐपत ज्याच्यात आहे, इतर दुर्बल उमेदवारांना लक्षावधी रुपये देऊन समर्थन मिळविण्याची ताकद ज्याच्यात आहे तो करोडपती उमेदवार निवडून येतो. लोकशाही अशा लोकांच्या हाती सोपविली जाते. हे लोकतंत्र नव्हेच, हे अर्थतंत्र आहे. भोवतीच्या राजकारणात परिवर्तन होत नाही, समाजात परिवर्तन होत नाही, त्याचे हे कारण आहे.

ज्या महाभागांनी सत्तेत राहून हजारो कोटींची माया जमविली आहे ते किंवा ज्यांना अशा लोकांचे, भांडवलदारांचे पाठबळ मिळते तेच लोक निवडणुकीत यशस्वी होऊ शकतात.

निवडणुकीच्या संदर्भातला हा आर्थिक दहशतवाद भयंकर आहे. सत्तेचे दोर ठराविकांच्याच हातात राहावेत, यासाठी हा आर्थिक दहशतवाद निर्माण केला जातो. मध्यमवर्गातील कार्यकर्ते, विचारवंत, साहित्यिक, कलावंत यातल्या कोणालाही या क्षेत्राचा विचारही करण्याची हिंमत होणार नाही, अशीच ही योजना असते. ही योजना संविधानाच्या अर्थातच पूर्ण विरोधी असते.

आज स्थिती अशी आहे की, समाजपरिवर्तन व्हावे असे ज्यांना वाटते ते वैचारिकदृष्ट्या सबळ असले तरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत आणि जे आर्थिकदृष्ट्या सबल आहेत त्यांना समाजपरिवर्तनाची गरज भासत नाही आणि आर्थिक सबलतेमुळेच राजकारणाची सूत्रे त्यांच्याच हातात जातात. हा असा मोठा पेच आहे आणि राजकारणाचे उद्दिष्ट काय? संविधानाला अभिप्रेत समाजपरिवर्तन हेच राजकारणाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी निःस्वार्थी, बुद्धिजीवी आणि संविधाननिष्ठ लोकांच्याच हाती सत्ता जायला हवी. पूर्वी माणसे समाजपरिवर्तनाच्या चळवळीतून राजकारणात जात असत. आता घरातून राजकारणात जातात. संस्कृती, समाज, अर्थशास्त्र आणि विकासाच्या जागतिक यंत्रणा यांच्यातले मर्म ज्यांना कळत नाही जे धर्मांध आणि अंधश्रद्ध आहेत, त्यांच्या हातात राजकारण जाऊ नये. जे लोकांपुढे अंधश्रद्धांचे व स्थितीवादाचे आदर्श ठेवतात, त्यांच्या हातात राजकारण जाऊ नये. मतदार हा खऱ्या अर्थाने संविधानाला अभिप्रेत अर्थाने मतदार झाला तर तो देशात लोकशाहीला विजयी करू शकतो. संविधानाची क्रांतिशक्ती दुनियेला दाखवून देऊ शकतो. मी धर्म नाही, मी जात नाही. मी कोणता प्रांत नाही. मी भारतीय आहे. भारतीय हेच माझे एकुलते आणि सुंदर वर्णन आहे, असे वाटणारा भारतीय माणूसच

खरा मतदार होऊ शकतो. सत्ता उलथून टाकण्याची, क्रांतीला जीवनात खेचून आणण्याची ताकद आपल्या मतात आहे. या मताच्या शक्तीच्या जोरावर आपण जातिनिर्मूलन करू शकतो. स्त्री-पुरुषांमधील विषमता नष्ट करू शकतो. या देशातील वर्गनिर्मूलन करून आपण वर्गविहीन समाज आणि समाजवाद इथे जन्माला घालू शकतो. ही मताची ताकद मतदाराला कळली पाहिजे. मतदार जर हजार-पाचशे रुपयांत आणि एखाद्या दारूच्या बाटलीसाठी आपले मत लिलावात काढत असेल तर मतदार हा आपल्या मतदारपणाचा घोर अवमान करीत आहे, असा त्याचा अर्थ आहे.

आज पैसा तरी निवडून येतो किंवा बलाढ्य पक्षाच्या नावावर सामान्य वा परिवर्तनविरोधी सामान्य व्यक्ती तरी निवडून येते आणि मग लोकशाहीचे जे व्हायचे तेच होते. मग सत्ता आणि पैसा हीच माणसाची योग्यता होऊन बसते. जिकडे पैसा तिकडे लोक पळतात. जिकडे सत्ता तिकडे लोक गर्दी करतात. एरवी समाजात कोणीही लक्ष दिले नसते, अशा नगण्य व्यक्तीही मग गर्दीच्या धनी होतात आणि हे केव्हा? तर खूप मोठमोठी कामे ज्यांच्या खात्यावर आहेत, ज्यांनी आपल्या ध्येयांना वाहून घेतले आहे, अशी खूप बुद्धिजीवी आणि चारित्र्यसंपन्न माणसे समाजात असताना हे घडते, पण समजा असे घडले की माणसे आपापल्या बौद्धिक क्षेत्रातही मोठी आहेत आणि विशिष्ट वयात त्यांना राजकारणातही सक्रिय होता आले तर? तर सामान्य माणसे आणि सत्ता या समीकरणापेक्षा बुद्धिजीवी माणसे आणि राजकीय सत्ता हे समीकरण निश्चितच देशाला, लोकशाहीला आणि संविधानातील सामाजिक ध्येयाला उपकारक ठरू शकते.

पण यासाठी निवडणुकीचे पूर्ण स्वरूपच बदलता येईल काय? लोक योग्य त्या उमेदवाराला निवडून देतील, पैशांना वा पक्षाला निवडून देणार नाहीत, असे काही करता येईल काय?

वर म्हटले ते बुद्धिजीवी, विचारवंत, साहित्यिक, समाजपरिवर्तनांच्या चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते, कलावंत यांचे एखादे केंद्रीय संघटन उभे व्हायला हवे. त्या दृष्टीने तयारी करायला हवी आणि योजना राबवायला हवी. हे धर्मांचे वा जातींचे संघटन नसावे. ते निखळ आदी-अंती भारतीय असलेल्या संविधाननिष्ठांचे संघटन असावे आणि मतदारालाही हे सर्व नवे परिवर्तन समजावून सांगावे. त्याला संविधान समजावून सांगावे. त्याच्या मताचे मोल त्याला समजावून सांगावे. या संघटनेने कोणत्याही विद्यमान राजकीय पक्षाच्या माध्यमातून राजकारणात जाऊ नये. स्वतंत्रपणे आपले देशव्यापी संघटन राजकारणात न्यावे.

हे अवघड आहे. हे सर्व घडणे सोपे नाही; पण भारतात संविधानाला अभिप्रेत लोकशाही प्रस्थापित करायची असेल तर या प्रक्रियेला पर्याय नाही. हे झाले तर

स्वीस बँकेत कोणाचाही पैसा नसेल, भ्रष्टाचार नसेल, मारामाऱ्या नसतील. आपल्या देशातील काही लोकांजवळ हजारो कोटी रुपये आहेत, पण असंख्य लोक याचवेळी दारिद्र्यरेषेखाली आहेत आणि महागाईही वाढत आहे. भ्रष्टाचारही वाढत आहे. एका बाजूने काही लोकांचे पगार वाढत आहेत आणि दुसऱ्या बाजूने कुपोषण, दारिद्र्य, बेरोजगारी आणि महागाईही वाढत आहे. या अंतर्विरोधाचे उत्तर शोधायचे असेल तर या देशातील पीडित माणसाला नायक करणारी माणसे सत्तेत आली पाहिजेत. भ्रष्टाचाराला जहर मानणारी, स्वार्थाला मृत्यू मानणारी, जाती-अंधश्रद्धा अशा गोष्टींना गाडून टाकणारी निखळ माणसे सत्तेत आली पाहिजेत. याचा अर्थ असा की केवळ सत्ताकारण करू इच्छिणाऱ्या राजकारण्यांच्या हातात देशाचे राजकारण जाण्यापेक्षा संविधानाची इच्छा डोक्यात घेऊन समाजकारण करू इच्छिणाऱ्यांच्या हातात राजकारण जायला हवे. अशी निःस्पृह आणि त्यागी, प्रामाणिक आणि बुद्धिवादी, चारित्र्यसंपन्न आणि संविधाननिष्ठ माणसेच या देशात संविधानाला अभिप्रेत राजकारण करू शकतात. भारतीय मतदाराने आपले मतदारपण संविधानाच्या परीक्षेला बसवावे, त्यात उत्तीर्ण व्हावे आणि लोकांच्या हाततच देश देण्याचा निर्णय घ्यावा. ज्यांना विधायक बदल हवा आहे, त्यांना हे करावेच लागेल. परिवर्तनाची उत्कट इच्छा ज्यांच्या मनात दाटून येईल, त्यांच्यासाठी ही कठीण गोष्टही मग सोपी होऊन जाईल. हे होऊ शकते. फक्त कृतीची गरज आहे. आता थोडे माझ्या २००९ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवासंबंधी. २००९ च्या निवडणुकीत मला पराभूत केले गेले. त्याचे दुःख नाही. भंडाऱ्याच्या निवडणुकीत भारताच्या संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनाही पराभूत केले गेले होते. ज्ञानपीठ विजेते डॉ.शिवराम कारंथ यांचेही डिपॉझिट जप्त झाले होते. त्यामुळे दुःख पराभवाचे नाही. रिपब्लिकन आघाडीने मला आग्रह केला होता. लोकमोर्चाचे समर्थन होते. अनेक समर्थने जाहीर झाली होती. वाटले होते, नागपुरात सर्व परिवर्तनवादी माणसे एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. म्हणून पराभवाची चिंता न बाळगता, इच्छा नसतानाही लोकसभेसाठी उमेदवार झालो. मी पराभूत होण्याची किंमत सर्व परिवर्तनवादी माणसांच्या, गटांच्या एकत्रिकरणासाठी मोजायची मी तयारी केली; पण पुढे चित्र बदलत गेले. ता.१४ एप्रिलला म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या सदराखाली इथल्या प्रत्येक दैनिकात मोठमोठ्या जाहिराती आल्या. रिपब्लिकन पक्षाच्या जुन्या-नव्या नेत्यांनी काँग्रेसला मतदान करण्याचे आवाहन सर्व आंबेडकरी जनतेला केले. हे मानसशास्त्र अनेकार्थसूचक होते.

मला पराभूत केले गेले. दुःख पराभवाचे नाही. लोकांच्या या वृत्तीचे आहे. परिवर्तनाची चळवळ पार धुळीस मिळाली, त्याचे दुःख आहे. एक साहित्यिक म्हणून महाराष्ट्रातील असंख्य लोक माझ्यावर प्रेम करतात, पण नागपुरात आणि

[illegible] मी आरएसएसच्या समरसतेवर लिहिले. बोललो. इतके प्रखर बोललो की माझ्यावर अब्रूनुकसानीचा दावा टाकला गेला. मी ओशोंच्या विरोधात लिहिले, मी विपश्यनेच्या विरोधात लिहिले, मी अंधश्रद्धांच्या विरोधात लिहिले. त्यामुळे खुद्द नागपुरातही माझ्या विरोधाची बेटे सतत सक्रिय असतात. हे सर्व मला कळत होते. आपली प्रकृती, आपली भूमिका ही आपल्याला अप्रिय करणारीच आहे, हे मला ज्ञात होतेच. त्यामुळे परिणाम मला ज्ञात होतेच, पण परिवर्तनवादी माणसे, गट एकत्र येण्याच्या स्वप्नाखातर मी उभा राहिलो, पण त्यातून खूप गोष्टी कळल्या. लोकांच्या निष्ठांचा पोत तपासता आला. स्वतःला रिपब्लिकन म्हणवणारांच्या कॉंग्रेस, बीजेपी, शिवसेना यांच्याशी आतून जुळलेल्या मानसशास्त्राचा परिचय झाला. आंबेडकरी चळवळ कुठे आहे आणि कुठे नाही, त्याचे उत्तर मिळाले.

# ११. धम्ममर्म

धम्म म्हणजे सौंदर्यविज्ञान! मानवी जीवनाच्या अत्तदीपत्वाचे ऐहिक नीतीविज्ञान म्हणजे धम्म! विचारप्रक्रिया आणि विकासवृत्ती गोठवणाऱ्या ईश्वर, धर्म, परलोक, आत्मा आणि दैववाद अशा सर्वच गोष्टींना माणसाच्या मानसशास्त्रातून हद्दपार करणारे अत्तदीपायन म्हणजे धम्म! धम्माने सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा आणि अतार्किकता यांचे संपूर्ण निर्मूलन करून साकार झालेला बुद्धिवाद आणि करुणा यांच्या संयुक्त कर्मविपाक, स्वर्ग आणि चमत्कार असे सर्व दोर कापून काढले. यामुळे धम्माला मानवी जीवनाच्या समग्रलक्ष्यी उन्नयनाच्या ऐहिक संविधानाचे रूप प्राप्त झाले.

१:

पृथ्वीच्या पाठीवरून 'सब्बे सत्ता' ज्याच्या विचाराने आपल्या कवेत घेतली तो बुद्ध विचारवंत माणूसपणाचे परमरूप होता तो परममानव होता. बुद्धीचे डोके बंद करून वा गाफील मनाने कोणाचेही काहीही ऐकू नका आणि मान्य करू नका. घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे, कानावर येणाऱ्या प्रत्येक विचाराकडे चिकित्सापूर्वक पाहा. प्रत्येक गोष्टीची तपासणी करा. संपूर्ण मानवी जीवनाचे कल्याण हे ध्येय मनात सतत जागे ठेवा. या ध्येयाला विघातक असेल त्याचा विनाश करा आणि या ध्येयाला उपकारक असेल ते घेऊन पुढे जा असे बुद्धांचे सांगणे आहे.

बुद्धांची ही भूमिका स्वच्छपणे मुक्ततत्त्ववादी आहे. ही भूमिका कोणत्याही अर्थाने मूलतत्त्ववादी ठरूच शकत नाही. विचाराची व्याख्याच 'जो समग्र मानवी उन्नयनाला उपकारक तो विचार' अशी आहे. म्हणून धम्माला आपण विचारसौंदर्य मानतो आणि सौंदर्यविचार मानतो. थांबू नका. वाहते राहा. बदला. मनाला सतत नवी पालवी फुटू द्या. अधिकाधिक अर्थपूर्णतेकडे झेपावत राहा. बदलतो तो जिवंत राहतो. बदलणे नाकारतो तो डबक्यातील पाण्यासारखा आटून जातो. हा गतीचा सिद्धान्त आहे. हा प्रगतीचा प्रस्ताव आहे. सर्वांचे कल्याण होवो या उद्दिष्टातून बुद्धाचा धम्म जन्माला आलेला आहे. बुद्धाच्या प्रगमनशील तत्त्वातून आणि सर्वहितैषी

भूमिकेतून धम्म जन्मीला आलेला आहे. धम्म म्हणजे चौकट नव्हे. तो बदलत्या काळासोबत बदलत चालणारा प्रवास आहे.

धम्म हा थांबणे मान्य करणारा, गोठणे मंजूर असलेला विचार नव्हे. ज्याला दर नव्या काळात उपकारक अशी नैतिकतेची नवनवी पालवी येते असा तो सर्जनस्वभावी विचार आहे. हा विचार बदललेल्या प्रत्येकच काळाचे उजेडाशी लग्न लावून देतो. धम्म ही याप्रकारे थांबणे मान्य नसलेली ऊर्जा आहे. ही योजना सतत स्वतःला अद्ययावत करीत राहते. तीच तिची जीवनसंवादी प्रकृती आहे.

२:

हीच बुद्धाची विज्ञाननिष्ठा आहे. त्या त्या वेळी सत्याच्या परीक्षण नळीतून जी वाट बाहेर येईल त्या वाटेवरून चालत राहणे हा या विज्ञाननिष्ठेचा बाणा आहे. धम्माची ही विज्ञाननिष्ठा प्रज्ञेशी आणि करुणेशी बांधलेली आहे. मानवी जीवनाच्या, त्यातील प्रत्येक माणसाच्या परमसौंदर्याशी ती बांधलेली आहे.

धम्म आणि धर्म या दोन गोष्टींमध्ये कोणतेही साम्य नाही. या दोन संकल्पनांचा आशय पूर्णतः वेगवेगळा आहे. धर्म परंपरेने चालत आलेल्या गोष्टींची धारणा सांगतो. धम्म मानवी जीवनाची सुधारणा मांडतो. धर्म थांबलेपणाचा जयजयकार करतो. धम्म सर्वांना अर्थपूर्ण करीत चाललेल्या गतिमानतेचा उद्घोष करतो. धर्म माणसाला जीवनाचा नायक मानीत नाही. धर्म माणसाला कुठल्यातरी अदृश्य दैवी शक्तीला हातातील खेळणे बनवून टाकतो. माणसाला पराधीन करून टाकतो. माणूस म्हणून संभवणाऱ्या माणसाच्या स्वतंत्र विचारशक्तीला आणि त्याच्या मुक्तमनस्कतेला तो गोठवून टाकतो आणि तो उडू नये, तो उडून जाऊ नये म्हणून त्याचे पंख कापतो. धर्म माणसांच्या उडण्याच्या इच्छाच कापतो. त्यांची उडण्याची प्रक्रियाच अशी कापून टाकतो.

धम्म माणसाचे पंख तर कापत नाहीच पण त्याला दर नव्या क्षणाला नवनव्या भराऱ्या घेऊ देणारे नवनवे पंख येतील असे सांस्कृतिक पर्यावरण निर्माण करतो. धम्म माणसाला मानवी जीवनाचा नायक मानतो आणि या नायकपणाचे महाकाव्य होतो.

३:

'धम्म' या संकल्पनेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नवा आशय दिला. धर्माच्या आशयाच्या पूर्ण दुसऱ्या टोकाचा आशय त्यांनी धम्म या संकल्पनेत भरला. १९५६ पर्यंत बहुतेक सर्वच अभ्यासक बुद्धधर्म हा शब्दच बुद्धाच्या धम्माला उद्देशून वापरीत. एवढेच नाही तर बुद्धधर्म ही वैदिक धर्माचीच एक शाखा आहे असेही मानीत. आजही खूप लोक असेच मानतात. जाणीवपूर्वक मानतात. असे करून त्यांना

बुद्धधम्माचे निराळेपण पुसून टाकायचे असते आणि वैदिक धर्माचे मोठेपण लोकांच्या मनावर बिंबवायचे असते. वैदिक धर्माच्या तत्त्वज्ञानाविरुद्ध आणि वर्णसंस्थेविरुद्ध बुद्धधम्माने दिलेला लढा त्यांना नाकारायचा असतो. हा लढा लोकांच्या मनातून पुसून काढायचा असतो. म्हणून या प्रकारचा प्रयत्न ते करीत असतात. वस्तुतः वैदिक धर्म अध्यात्मवादी आहे. तो ईश्वर, आत्मा, परलोक या सर्व गोष्टी मानतो. सर्व प्रकारची सामाजिक आणि आर्थिक विषमता मानतो. बुद्धधम्म यापैकी कोणत्याही गोष्टीला मान्यता देत नाही. तो इहवादी आहे. बुद्धिवाद आणि मानवतावाद यांना तो आपले सर्वस्व मानतो. माणसाला आणि त्याच्या सर्वांगीण ऐहिक उन्नयनाला आपला एकमेव विषय मानतो. माणसाच्या ऐहिक कल्याणाशी ज्यांचा संबंध नाही त्या गोष्टींना तो अव्याकृते मानतो आणि त्यासंबंधीच्या निरर्थक चर्चांना मानवी चर्चाविश्वातून हद्दपार करतो. अशा वांझ चर्चा करण्यात वेळेचा आणि बुद्धीचा अपव्यय करू नका असे तो सांगतो. मृगजळामागे धावणाऱ्या आणि कासावीस झालेल्या तत्त्वज्ञानाला बुद्धाने एकमेव सुंदर आणि अन्वर्थक विषय दिला. या विषयाचे नाव आहे माणूस! या विषयाचे नाव आहे माणूस आणि त्याच्या भोवतीचे विश्व! माणसा-माणसांमधील परस्पर सुखावह संबंध! वैदिक धर्म आणि बौद्धधम्म यांच्यात तत्त्वज्ञानदृष्ट्या आणि व्यवहारदृष्ट्या हजारो वर्षे संघर्ष चालला. आजही चालूच आहे. हा संघर्ष अध्यात्म आणि इहवाद यांच्यातील संघर्ष आहे. हा संघर्ष विषमता आणि समता यांच्यातील संघर्ष आहे. हा संघर्ष अंधश्रद्धा आणि बुद्धिवाद यांच्यातील संघर्ष आहे. तुच्छता आणि करुणा यांतील हा संघर्ष आहे. तेव्हा वैदिक धर्म आणि बौद्धधम्म यांच्यात कोणतेही साम्य नाही. बौद्धधम्म ही जीवन जगण्याची एक स्वतंत्र, समग्रविश्वलक्ष्यी आणि सर्वहितैषी जीवनप्रणाली आहे. धम्म ही विज्ञाननिष्ठ, सततप्रवाही आणि सतत परिवर्तनशील जीवनप्रणाली आहे. हा धम्म व्यक्तीने आपल्या वर्तनातून आविष्कृत करायचा आहे. धम्म हा बोलण्याचा विषय नाही. तो सकलांना बंधू मानीत जगण्याचा प्रयोग आहे. तो उदात्त आणि उन्नत माणुसकीचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव कोणत्याही कर्मकांडाला जवळ येऊ देत नाही. कोणत्याही अंधश्रद्धेत तो फसत नाही. जन्माला आलेल्या, जन्माला येणाऱ्या प्रत्येकातच माणुसकीचे परमसौंदर्य दडलेले असते. धर्ममनस्कता, जातीमनस्कता आणि वर्गमनस्कता या गोष्टी माणुसकीच्या परमसौंदर्याला धर्मांच्या, जातींच्या आणि वर्गांच्या चौकटी देतात आणि माणुसकीचे हे परमसौंदर्य तुटूनफुटून जाते. माणुसकीच्या या परमसौंदर्यामधून माणसाला तोडण्याची प्रक्रिया ही वियुक्तीकरणाची म्हणजे एलिनेशनचीच प्रक्रिया असते. या वियुक्तीकरणाच्या पिंजऱ्यामधून माणसांना सोडवणे हाच धम्मापुढला प्रश्न आहे. या वियुक्तीकरणाच्या पिंजऱ्यांमधून माणसांना सोडविणे म्हणजे त्यांना त्यांच्यातील मूळ माणुसकीच्या परमसौंदर्यापर्यंत पोचविणेच होय. माणुसकीचे हे परमसौंदर्य म्हणजे बुद्धत्व. जन्माला आलेल्या प्रत्येकातच हे बुद्धत्व सुप्त रूपात असते.

जातींच्या पिंजऱ्यांमध्ये कोंडण्याचा कार्यक्रम शोषणयंत्रणा राबविते. माणसे बुद्धत्वापासून दूर जातात. येथून प्रश्नांच्या झडीला प्रारंभ होतो. तृष्णेच्या आगीत माणसे स्वतःही पेटत राहतात. इतरांनाही पेटवत राहतात. दुःखांच्या चिखलात माणसे स्वतःही फसतात. इतरांनाही फसवतात आणि एका अमानुष स्पर्धेला प्रारंभ होतो. ही असते एकमेकांना ओरबाडण्याची स्पर्धा. एकमेकांना दुःखी करण्याची स्पर्धा. एकमेकांचे माणूसपण चिंध्या करण्याची स्पर्धा.

:४:

माणसांना या आगीतून बाहेर काढणे हे धम्मध्येय आहे. एकमेकांना दुःखी करण्याची ही अमानुष स्पर्धा मुळापासून उपटून जाळणे हे धम्माचे ध्येय आहे. धम्म हे मनांचे वर्णन आहे. इतरांना आपल्या तळहातावरील फोडाप्रमाणे जपणाऱ्या आणि या अशा जपण्यालाच सुंदर जगणे मानणाऱ्या मनाचे वर्णन धम्म या शब्दाने आपण करतो. मनाच्या या अवस्थेसाठी, जगण्याच्या या परमशैलीसाठी बुद्धाने आपल्याला उजेड दिला. कोणत्याही अंधारात न विझणारा उजेड. कोणत्याही अंधाराला स्वतःसारखे करून घेणारा उजेड.

या उजेडावर शोषणयंत्रणेने काळाचे पहाड अंथरले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हे पहाड बाजूला सारून त्या उजेडाचा मार्ग मोकळा केला. १९५६ साली हाच उजेड डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला वाट म्हणूनही दिला आणि दीपस्तंभ म्हणूनही दिला. त्यांनी अथांग बुद्धधम्माचे सार बावीस प्रतिज्ञांमधून सांगितले. बावीस प्रतिज्ञांच्या सॉफ्टवेअरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाचा मूळ धम्म भरून ठेवला. बावीस प्रतिज्ञा म्हणजे धम्माचा प्राण होत. या बावीस प्रतिज्ञांमधून बुद्धाचा अधिकृत आणि येणाऱ्या कोणत्याही काळाला अभय देणारा, सुंदर जगण्याची हमी देणारा चेहरा आपणाला दिसतो.

:५:

धम्ममर्म डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ बावीस प्रतिज्ञांमध्ये सांगितले. हा उजेडाच्या महासागराचा संक्षेप मोठा आशयघनही आहे आणि कायम सर्जनशीलही आहे. ती सर्जनशील मानवी जीवनाची तत्त्वसंहिता आहे. धम्माचे ते बावीस अनुच्छेदांचे संविधान आहे.

महाराष्ट्राने, भारताने आणि जगानेही हे संविधान समजावून घेण्याची गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगसारखी, पर्यावरणाच्या असमतोलासारखी, भांडवली जागतिकीकरणासारखी, दहशतवादासारखी, लोकसंख्यावाढीसारखी अशी अनंत संकटे मानवी जीवनावर आक्रमण करू लागली आहेत. मरणाला भिणारा माणूसच आज स्वतःचे मरण झालेला

आहे. या महामृत्यूचा निर्माता माणूसच आहे. बुद्धाचे न ऐकता बुद्धापासून दूर गेलेला हा माणूसच आज स्वतःचा वैरी झालेला आहे. या महामृत्यूपासून, तृष्णेच्या त्सुनामींपासून माणसाला वाचवायला हवे. हे होण्यासाठी हा माणूस त्याच्यातील ज्या सुप्त बुद्धापासून दूर गेला त्या बुद्धापर्यंत त्याला परत नेणे आवश्यक आहे. मानवी जीवनाला या बुद्धमनस्कतेशी जोडण्याची, त्याला वाचविण्याची आणि हे त्याचे वाचणे सुंदर करण्याची एकमेव संधी मानवजातीच्या हातात आहे आणि ती संधी आहे धम्म! डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथराजात मांडलेला धम्म! डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हे धम्ममर्म शांतपणे, सुरक्षितपणे जगू इच्छिणाऱ्या कोणालाही वर्तनविषय करावाच लागेल.

# १२. निष्ठांच्या चळवळीचे संचालक:कृष्णा इंगळे

आयु.कृष्णा इंगळे यांना मी आरक्षणाचा ज्ञानकोश मानतो. त्यांच्या मेंदूला मी आरक्षणाची वेबसाईट मानतो. त्यांचे डोके मला आरक्षणविषयक सर्व कागदपत्रांच्या, शासकीय नियमावलींच्या फाईल्सनी भरलेल्या कार्यालयासारखे वाटते. चातुर्वर्ण्याबरोबर आरक्षण सुरू झाले. ते थोड्यांनाच हजारो वर्षे मिळाले. अलीकडच्या दोनशे वर्षात आरक्षणाचे प्रवाह बदलले. आरक्षणाचे कायदे झाले ; पण आजही सर्व कायदेशीर तरतुदी असूनही खऱ्याच दुर्बलांना नाना प्रकारच्या सबबी पुढे करून आरक्षणापासून आणि सामाजिक न्यायापासून कसे वंचित ठेवले जाते, अशा सर्वच गोष्टींची माहिती कृष्णा इंगळेंच्या डोक्याच्या संगणकात तयार असते. आरक्षण, शिष्यवृत्त्या, कर्मचाऱ्यांवर होणारे अन्याय यासंबंधीच्या माहितीकोशाने जर मानवी देह धारण केला तर तो तंतोतंत कृष्णा इंगळेंसारखाच दिसेल, असे मला खात्रीपूर्वक वाटते.

मंत्रालय, विद्यापीठे, महाविद्यालये यांच्यापासून छोट्या कार्यालयापर्यंत कोणत्या वर्षापासून आणि किती आरक्षण भरले गेले नाही, यासंबंधीच्या सर्व कथा आणि कादंबऱ्या इंगळेंना पाठ आहेत. खालच्या जातींची खोटी प्रमाणपत्रे वापरून कोणी आणि कसा आरक्षणाचा गैरफायदा घेतला, यासंदर्भातील सर्व घाणेरडी नाटकेही त्यांना पुराव्यासकट पाठ आहेत.

महाराष्ट्र पातळीवरील कास्ट्राइब कर्मचारी महासंघाचे ते १९८० पासून अध्यक्ष आहेत. १९७४ ते ८० या काळात शंकरराव सुरडकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आणि बौद्ध कर्मचारी कल्याण महासंघाचे ते संघटन सचिव होते. कास्ट्राइब महासंघाने आज २६ उपसंघटनांचे केंद्रिय जाळे तयार केले आहे.

कृष्णा इंगळेंच्या नेतृत्वाखाली कास्ट्राइबने केलेली काही महत्त्वाची कामे अशी : ४३९ बडतर्फ कामगारांना कामावर घेण्यास एस.टी. महामंडळास भाग पाडले. मागासवर्गीयांना नोकऱ्यांची दारे उघडून देणारा सेवा योजन विभाग शासनाकडून

आणला. १९८० मध्ये समाजकल्याण खाते बंद करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली. युती शासनाने मागासवर्गीयांविरुद्ध काढलेले १६ काळे जी.आर. रद्द करवले.

मागास विद्यार्थ्यांना निळा आणि उच्चवर्णीयांना आर.एस.एस.चा असा गणवेशभेद रद्द करविला. सबरवाल प्रकरणासंदर्भात गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली १९९७-९८ साली १८ बैठकी झाल्या. बिंदू नामावलीत १ ते ८७ बिंदू सुचवून यश मिळविले. नागपूर विद्यापीठात ६ उच्चवर्णीयांनी अनुसूचित जातीची खोटी प्रमाणपत्रे सादर करून नोकऱ्या मिळविल्या. तेव्हा पटेल आयोगामार्फत या आणि अशाच इतरही गैर नेमणुका रद्द करविल्या. शासकीय वसतिगृहे खासगी संस्थांना देण्याचा शासनाचा निर्णय बदलविला. जिल्हाधिकारी परिसरात आणि जिल्हा परिषद परिसरात संघटनेच्या कार्यालयासाठी जागा मिळवून घेतल्या. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये पगारपत्रकातील जातीच्या रकान्यात जात लिहिण्याच्या अनिष्ट प्रकारापासून मागासवर्गीयांवर होणाऱ्या इतरही दृश्यादृश्य अत्याचारांच्या निर्मूलनापर्यंतची असंख्य कामे आजवर कृष्णा इंगळेंच्या संघटनेने केली. त्यासाठी मोर्चे, आंदोलने, चर्चा हे सर्व मार्ग त्यांनी प्रभावीपणे अवलंबिले.

या सर्व कामांच्या डोंगराचे सूत्रधार कृष्णा इंगळे आहेत. या सर्वच कामांमुळे संघटनेचा दरारा आहे. कायद्याच्याच तरफेने अन्यायी शक्तींना वाकविण्याची ताकद या संघटनेने निर्माण केलेली आहे. आपल्याला मिळणारे लाभ कास्ट्राइबमुळे मिळत आहेत, हेही अनेक लाभार्थींना माहीत नसते. शिकलेले कमावते लोक संघटित राहिले तर संघर्ष केवढे यश मिळवू शकतो, याचा सुंदर वस्तुपाठ या संघटनेने निर्माण केलेला आहे. उत्कटता, निष्ठा सर्वसमावेशकता आणि ऊर्जा या सर्व गोष्टी या संघटनेच्या रक्तवाहिन्यांमधून आज उसळ्या मारीत धावत आहेत.

या एकदिल आणि एकमूठ संघटनेमागे कृष्णा इंगळे यांचे अभ्यासू, परखड आणि संघटनशील व्यक्तिमत्त्व उभे आहे. संघटितपणा म्हणजे शक्ती आणि शक्ती म्हणजे यश या सूत्रात संघटना बांधणाऱ्या कृष्णा इंगळे यांचा जन्म बुलडाणा जिल्ह्यातील वसाडी या खेड्यात धनाजी आणि हिराबाई या गरीब आईवडिलांच्या पोटी झाला. पण नावाप्रमाणेच त्यांचे वडील मनाने अत्यंत श्रीमंत होते, वडील जलशाच्या द्वारा १९४५ पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची क्रांती लोकांच्या मनात पेरण्याचे काम करीत.

शांताबाई दाणी यांनी उद्घाटित केलेली अस्पृश्य महिला परिषद सवर्णांनी उधळली होती. यावेळी हिराबाईच्या डोक्याला जखम झाली होती. याचा अर्थ असा की कृष्णा इंगळेंच्या मनात त्यांच्या आईवडिलांनीच चळवळीचे रोप लावले होते. जिद्दीचे बियाणे पेरले होते. या रोपाचा त्यांनी पुढे बोधिवृक्ष केला.

संकटांशी झगडा करण्याचे प्रशिक्षण त्यांना घराच्या जीवनपाठातच मिळाले होते. घर गरिबीने वाकले होतेच. पण कृष्णा दुसरीत शिकत असताना ते अधिकच अगतिक झाले होते. कपडे नव्हते. पुस्तके नव्हती. कारण वडिलांचा आजार! यावेळी गावच्या पाटलाच्या प्रेतावर फेकलेले पैसे गोळा करून कृष्णाने कपडे आणि पुस्तके विकत घेतली. यावेळी शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यालाही लहानग्या कृष्णाचा गौरव वाटला असेल. अडचणींचे नकार धुडकावून मॅट्रिक झालेला कृष्णा इंगळे आईवडिलांच्या चळवळीच्या वारशाचे बोट धरून औरंगाबादेच्या क्रांतिवनात १९६३ साली दाखल झाले. मिलिंद विज्ञान महाविद्यालयात त्यांना नवे जग मिळाले; पण बीएस्सीच्या दुसऱ्या वर्षाला असताना त्यांना समाजकल्याण खात्यात कनिष्ठ लिपिकाची नोकरी लागली; पण गरिबीने सोडायला लावलेले शिक्षण त्यांनी नोकरी करताना पुन्हा सुरू केले. ते बी.ए., एल.एल.बी. झाले.

श्रीगोंदा येथे नोकरी करताना काळजाला झालेली जातीय विषमतेची जखम घेऊन १९६६ ते १९७१ या काळात समाजकल्याण मुख्यालयात त्यांनी शिष्यवृत्ती विभागात काम केले. मिलिंद परिसराने त्यांना लढणारे मन दिले होतेच. त्या काळात मिलिंदचा परिसर निष्ठांनी, जिद्दीने आणि विद्रोहाच्या जाणिवेने पेटत होता. एक सैनिक पिढी इथे घडत होती. संविधानाच्या तोंडाला पाने पुसणारे राजकारण सुरू असलेल्या या काळात मिलिंदचा परिसर वाघ घडविणारी युद्धभूमी झाला होता. हे क्रांतिपर्व मनात घेऊनच कृष्णा इंगळे यांनी १९७२ साली सामाजिक प्रश्नांच्या आगीत उडी घेतली.

राणू सिरसाट या बौद्ध शिक्षकावर गावच्या सरपंचाने अत्याचार केला. तो वेडा झाला. इंगळेंनी हे प्रकरण उचलले. सिरसाट यांना परत कामावर घ्यायला लावले. त्याला पेन्शन मिळवून दिली; पण सिरसाट वेडेपणातून बाहेर येऊ शकले नाहीत. या स्थितीत त्यांच्या पत्नीला चतुर्थ श्रेणीत नोकरी मिळवून दिली. अशा असंख्य अत्याचारांनी त्यांना चळवळीत राहायला जाणे भागच पाडले.

हा काळ अत्यंत ज्वालाग्राही आणि या काळातील तारुण्य अत्यंत तेजस्वी होते. १९७२ मध्ये पँथर स्थापन झाली होती आणि १९७२ ते १९७४ या काळात दिल्लीच्या अ.भा.अनुसूचित जाती-जमाती अल्पसंख्यक कर्मचारी महासंघाच्या कार्यकारिणीत ते सदस्य होते. नागसेनवन ठिणग्यांनी बहरू लागले होते. डॉ.म.ना.वानखडे यांनी नागसेनवनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत क्रांतिसाहित्याची लागवड केली होती. नागसेनवन विचारांच्या, कृतींच्या विजांनी झळाळत होते. खेड्यापाड्यांतून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना इथे निखाऱ्यांच्या पदव्या मिळत. अन्यायाविरुद्ध लढण्याची भावनिक आणि वैचारिक ताकद इंगळेंनी इथेच मिळविली. त्यांच्या आयुष्यातले हे ऊर्जेचे मुद्दल आजवर वाढतच आहे. सबरवाल प्रकरणात कामाच्या व्यापामुळे नीट उपचार घेता न आल्याने त्यांना उजवा डोळा गमवावा लागला. प्रकाश आंबेडकरांच्या

राजकीय प्रस्थापनेत त्यांचा मोठा वाटा आहे. नागपूरच्याच एका कार्यक्रमात इंगळेंनीच प्रकाश आंबेडकरांना 'बाळासाहेब' ही उपाधी बहाल केली.

कृष्णा इंगळे पूर्णतः निर्व्यसनी आहेत. त्यांच्या एका डोळ्यातील दृष्टी आजही अनेक अधू डोळ्यांना प्रकाश वाटते. रात्रीच्यावेळी सामूहिक वंदना हा त्यांच्या घराचा नियम आहे. असे कृष्णा इंगळे स्वतःच एक आंदोलन आहेत. ते स्वतःच शिस्तीचा इ.आर. आहेत. निर्भयपणा ही त्यांची ताकद आहे. निधड्या छातीने आपले नेमके सत्य सांगताना हजारो असत्यांची रग जिरविण्याची त्यांची कुवत अफाट आहे. गोरगरिबांवरील अत्याचारांचा, अनुशेषाचा धगधगता नकाशा त्यांच्या दृष्टीपुढे फडफडत असतो. त्यांना प्रखर करीत असतो. आपल्या अभेद्य संघटनेला असा नॉन पार्लमेंटरी पॉलिटिक्सचा पाठ त्यांनी शिकविला आहे.

कृष्णा इंगळे तोंडाने फटकळ, पण मनाने निर्मळ आहेत. एक घाव दोन तुकडे ही सरळसोट भाषा त्यांची कार्यभाषा आहे ; पण चांगुलपणापुढे नम्र हेणारी संस्कृतीही कृष्णा इंगळेंनी मनात जपली आहे. हा माणूस काम करायला वाघ आहे. बेचैन वादळासारखा तो कायम धावत असतो. विश्रांतीला क्षमा मागत असतो.

भोवती सर्वत्र उलंगवाडी होत असताना एखादेच वावर पिकाच्या श्रीमंतीने बहरलेले असावे तसे कृष्णा इंगळे मला दिसतात. भोवताली सर्वत्र पानगळ सुरू असताना आपल्या पानांचा जिवंत हिरवेपणा जपणाऱ्या नायक झाडाप्रमाणे मला इंगळे दिसतात. हे झाड नक्षत्रांच्या पानांनी आणि फुला-फळांनी असेच फुलत राहो, हीच त्यांना एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करताना हार्दिक सदिच्छा.

# १३. भाऊ दांदडेंची विचारचित्रे

परवा सिस्फाच्या कलादालनात चित्रमित्र भाऊ दांदडे यांच्या चित्रांची मैफल पाहिली. त्यांनीच आपल्या एकेका चित्रावर एकेक कविता लिहिली होती. त्या सर्व कविता त्यांनी मला दिल्या. प्रदर्शनातील चित्रांमध्ये त्यांच्या मनातील कविता रंगांच्या भाषेतून चर्चा करीत होत्या. तर त्यांच्या कवितांमधील शब्दांमधून रंग-रेषांनी मांडलेले चिंतन मनात रुंजी घालत होते. माझ्यातल्या साहित्यिकाला भाऊ दांदडे यांची चित्रे विचारचित्रे आहेत, सामाजिक चित्रे आहेत हे प्रकर्षाने जाणवले. या सर्व चित्रांमध्ये मला रंगांचे वेल्हाळ दिसले आणि रेषांच्या वाक्‌वळणांचा मोहक उत्सव दिसला. ही चित्रसभा पाहताना मला हे जाणवले की भाऊ दांदडे हे रंगांच्या ओठात शब्द देतात आणि रेषांच्या हातात रंगांच्या प्रतिमा देतात. भाऊ दांदडेंची चित्रे पाहताना मला हे सारखे जाणवत होते की, आपल्या भोवतीच्या समाजातील अभावग्रस्तांची सोबत करणाऱ्या कविताच आपल्याला अस्वस्थ करीत आहेत. समाजातील बेचैनीला रंग व्हावेसे वाटले आणि इथे ती रंग झाली. समाजातील घुसमटीला रेषांचा हात धरावा असे वाटले आणि या घुसमटीने या चित्रांमधून रेषांचा हात धरला. ही चित्रे पाहताना मी विचार हा करीत होतो की भाऊंच्या चित्रांमधील रंग अडचणींशी इतके मन लावून, इतके जीव ओतून का बोलत आहेत? आपल्यालाही त्या अभावाच्या गुहांमध्ये आग्रहाने का घेऊन जात आहेत?

या प्रश्नांच्या मुळाशी भाऊ दांदडे यांचे जीवन उभे आहे. गरिबी ही प्रतिभेला जबाबदारीशीच जोडते. जीवनात वाट्याला आलेल्या काट्यांनाही या प्रतिभावंतांसोबत मग फुलांप्रमाणे वागण्याचा मोह टाळता येत नाही. सुखे माणसांच्या डोळ्यात बेसावधपणाचे धुके पसरतात आणि दुःखे? दुःखे माणसांच्या डोळ्यात सजगतेचे तारांगण फुलवतात. गरिबी कलावंताला केवळच सर्जनशील करीत नाही तर ती त्याला नैतिकतेची न वाकणारी नजर देते. भाऊ दांदडे यांच्या बालपणाला त्यांच्या गरिबीने पाच-पाच किलोमीटर पायपीट करायला लावली. आपल्या आगीत त्यांना जाळले. गरिबी वाईटच

पण माणसाला ती शिकविते तो समजुतदारपणा मात्र मोलाचा असतो आणि कलावंताला तर हा समजूतदारपणा उजेडाच्या मनाने वाट दाखवित राहतो. गरिबीने भाऊ दांदडेंची परीक्षा पाहिली आणि शिक्षण घेताना त्यांची होरपळही केली. पण अमूर्त रंगस्वप्ने मनाच्या ट्रंकेत घेऊन खिशातल्या दीडशे रुपयांसोबत भाऊ दांदडे नागपूर या महानगरात आले आणि त्यांच्या संघर्षाला आणखी नवा प्रारंभ झाला. रंग स्वस्थ बसू देत नव्हते आणि अडचणी धावू देत नव्हत्या. आणि जिद्द? जिद्द चैन पडू देत नव्हती. या जगण्याच्या लढाईत त्यांच्या रेषांमध्ये काव्य वस्तीला यायला लागले आणि रंगांना दरवेळी नवनवे आकाश मागणारे पंख फुटू लागले.

ते पूर्वी रामनगरात राहायचे. माझ्या एका पुस्तकाच्या मुखपृष्ठाच्या निमित्ताने त्यांची मी भेट घेतली. ही भेट म्हणजे आमच्या चित्रमय संबंधांची प्रस्तावना होय. पुढे त्यांनी माझ्या अनेक पुस्तकांची मुखपृष्ठे केलीत. नंतर तर ते माझ्या घराजवळच राहायला आले. या काळात त्यांची खूप रेखाटने मी बघितली. या रेखाटनांच्या धावपट्टीवरून धावणाऱ्या रेषांमधून ओथंबणारे काव्य मला नेहमीच हैराण करीत आलेले आहे. पण सिस्फातील चित्रमैफलीतील 'डोळा' मला माझ्या नजरेने हा सर्व चित्रोत्सव पाहा असेच सांगत होता. इथे एखाद्या चित्रात आईच्या चेहऱ्याला तिच्या सागराएवढ्या काळजाची खोली मिळते. एखाद्या चित्रात तरुणींच्या मनातील कल्लोळांची लय झेलली जाते तर आणखी एखाद्या चित्रात निर्मितीच्या क्षणाचे अमूर्त मूर्त करणाऱ्या रंगांची प्रतिमा साकार होते. आपला अवकाश मिळविण्यासाठी व्यक्ती जीवाचा आटापिटा करतात. पण हा झगमगता अवकाश प्राप्त होताच आपण जिथून बाहेर पडलो ती अभावाची पार्श्वभूमी विसरून जातात. बसच्या एका चित्रात संधीचे मानसशास्त्र चित्ररूप घेते. आपण जर कळत-नकळत संधी टाळली तर मग संधीच आपल्याला कशी टाळत जाते हा गहन आशय भाऊ दांदडे यांची संधीचा पाठलाग करणारी प्रतिभा मांडते. चौकटी तोडणारी सामूहिक ऊर्जा ही पराभवाच्या हाती कशी लागत नाही ते एक चित्र सांगते. कलावंताला जाळत, त्याच्या काळजावर तेजाब उधळीतच निर्मितीची सौंदर्यनगरी फुलत असते. आस्वादकाला हे सौंदर्याचे नवल दिसते पण तेजाबाने उधळलेल्या कलावंताच्या काळजावरील जखमा दिसत नाहीत.

अशी भाऊ दांदडेंची जीवनातील साध्या साध्या घटनांमध्ये गहन जीवन मर्मे शोधणारी आणि आपल्या रंगरेषांमधून या मर्मांना बोलत ठेवणारी ही चित्रदुनिया! ही चित्रे आस्वादकाला धुक्यात गुदमरवीत नाहीत. ही चित्रे अबोल नाहीत. ती पाहणाऱ्यांशी बोलतात. त्यांच्याशी चर्चा करतात. म्हणून चित्रकार भाऊ दांदडेंच्या या मिथक् चित्रांना मी रंगरेषांनी थिरकणाऱ्या कविता म्हणतो आणि आस्वादकांच्या मनात या कविता विचारांच्या शेकोट्या पेटवतात म्हणून मी त्यांना विचारचित्रे म्हणतो.

# १४. विजयी अस्वस्थ नायक:उत्तम कांबळे

सर्जनशील साहित्यिकाच्या जीवनात अस्वस्थता ही नवनवोन्मेषशाली शक्तिवर्धकाचे कार्य करते. हे अस्वस्थतेचे भांडवलच साहित्यिकांच्या शब्दात सतत पेटत राहणारी तहान बांधत राहते. हे भांडवल जितके असीम आणि तीव्र, तेवढी साहित्यिकाच्या साहित्यातील वाङ्मयीन धग जोरकस ठरते. जीवनाची मर्मे वाटत राहण्याचे आणि अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य साहित्यिकाला या अस्वस्थतेच्या प्रमाणातच प्राप्त होत असते. अशा साहित्यातून वाचकाला सतत वेचता येईल असा जीवन उजळून टाकणारा खूप उजेड सांडलेला असतो. अशा साहित्यिकाचे शब्द मग शब्द असण्याच्या फार पुढे निघून गेलेले असतात. अशा साहित्यिकाची वाक्ये जीवनातील मर्मबंधाच्या ठेवी बांधणारे प्रतिभावंत हात होऊन जातात. उत्तम कांबळे असे अस्वस्थ साहित्यिक आहेत. या साहित्यिकाने आपल्या कथांमधून, कवितांमधून, कादंबऱ्यांमधून, स्वकथनांमधून आणि वैचारिक लेखनातून अनंत अस्वस्थ नायकांचे एक जळते जगच चितारले आहे. हे अस्वस्थ नायक आपल्यासोबत बोलतात, आपल्याला बेचैन करतात. कारण हे असर्व अस्वस्थ नायक आणि अस्वस्थ नायिका जन्माला घालणारा साहित्यिकही एक पराकोटीचा अस्वस्थ नायकच आहे.

## चटक्यांचे पुस्तक

दुःख पाहणे वेगळे, दुःख अभ्यासणे वेगळे आणि दुःख भोगणे वेगळे. आशयाच्या मुद्दलातच या सर्व पायऱ्यांमुळे फरक पडत जातो. 'सांगे, पाहे, जेवी, अंतर, महदंतर तेवी पडताहे' तसे हे होते. वरील अवतरण तुकोबांचे आहे. त्यांनीच आणखी एके ठिकाणी म्हटले आहे, 'तुका म्हणे जन धावताती थडी, नच घेई उडी आत कोणी'. उत्तम कांबळेंच्या संदर्भात नदीच्या काठावरून चालण्याचा प्रश्नच नव्हता आणि प्रवाहातही उडी घेण्याचा प्रश्न नव्हता. मासोळीप्रमाणे त्यांचा जन्मच प्रवाहात झाला होता. प्रवाहातच ते लहानाचे मोठे झाले होते. प्रवाहातच त्यांनी सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या आगीचे चटके काळजाने झेलले होते. त्यांचे काळीज म्हणजे

या चटक्यांचे पुस्तक! हे सर्व चटके शब्दांमधून बांधायलाही ते या प्रवाहात शिकले, ज्या प्रवाहात ते जन्मले त्या प्रवाहानेच त्यांच्या मनाला आणि त्यांच्या प्रतिभेला कायम एक प्रवाहीपण दिले. हे प्रवाहीपण म्हणजे त्यांच्या साहित्याचे पेट्रोलच होय.

### प्रश्नांची जळती रेषा

उत्तम कांबळे केवळ प्रवाहात उभे नाहीत. ते प्रवाहाचा हात धरून आणि प्रवाहातील प्रत्येक थेंबाचे बोट धरून धावत आहेत. हे धावणे आत-बाहेर अस्वस्थ असलेल्या नायकाचेच धावणे आहे. कोणत्याही काळाच्या वर्तमानात त्याच्या स्वतःच्या अशा काही समस्यांची जळती रेषा असते. साहित्यिकाला त्या रेषेवरून चालत चालत लिहिणारा डोंबारी व्हावे लागते. उत्तम कांबळे नावाचा डोंबारी साहित्यिक त्या जळत्या दोरीवरून चालत अस्वस्थ मनाने अस्वस्थ नायकांचे, जळत्या प्रश्नांशी भांडणाऱ्या नायकांचे एक युद्धजग जन्माला घालतो आहे. ही जळती रेषा अनेक प्रश्नांची आहे. प्रश्न स्त्रियांचे आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत. देवदासींचे प्रश्न आहेत. मजुरांचे, बेरोजगारांचे, जागतिकीकरणाचे प्रश्न आहेत. कामगारांचे प्रश्न आहेत. कैद्यांचे प्रश्न आहेत. भ्रष्टचाराचे प्रश्न आहेत. पाण्याचे प्रश्न आहेत. वेगवेगळ्या जातींचे, राजकारणाचे असे खूप प्रश्न आहेत आणि या प्रश्नांच्या जळत्या रेषेवरून चालत कुठेही आपला तोल जाऊ न देता हा डोंबारी लेखक लिहितो आहे. सकस आणि दमदार लिहितो आहे.

### आस्थेचा अफाट परीघ

उत्तम कांबळेंच्या आस्थेचा परीघ अफाटच आहे. भोवतीच्या अगतिकीकरणापासून जागतिकीकरणापर्यंतच्या सर्व गुंतागुंतीचा अंतर्भाव या परिघात होतो; पण कांबळेंची ही आस्था पूर्णतः सतर्क आहे. पूर्णतः सजग आहे. भरडणारे कोण आणि भरडले जाणारे कोण, या संबंधीचा अद्ययावत तपशील कांबळेंच्या प्रतिभेची कायम सोबत करीत असतो. कांबळेंच्या कथा आणि कादंबऱ्या आपण वाचल्या तर आपल्या लक्षात येते की, हा साहित्यिक माणसाला अनेक पातळ्यांवरून आणि अनेक अंगांनी पाहतो. हा साहित्यिक माणसाला त्याच्या मूलभूत भावनांच्या गुंतागुंतीत पाहतो. शिवाय हा माणूस ज्या वर्गाचा असतो, त्या वर्गाच्या जाणिवाही या गुंतागुंतीत विशिष्ट दिशेची भर घालतात. हा माणूस कुठल्यातरी वंशाचा, जातीचा असतो आणि त्या वर्गाच्या वा वंशाच्या जाणिवाही या गुंतागुंतीत विशिष्ट दिशेची भर टाकत असतात. माणूस महानगरात राहतो किंवा ग्रामीण भागात राहतो आणि हा भूगोलही माणसांच्या मनांची गुंतागुंत वेगवेगळ्या दिशांनी वाढवीत नेतो. माणूस विशिष्ट धर्माचा आणि भूमिकेचा असतो आणि याही गोष्टी त्याच्या जाणिवेची गुंतागुंत त्या त्या तपशिलांनी वाढवित असतात. माणूस पुरुष असतो किंवा स्त्री असतो आणि हे लिंगविषयक विभेदीकरणही

व्यक्तींच्या जाणिवा-नेणिवांचा तपशील निर्धारित करीत असते. अशा असंख्य संदर्भांच्या गर्दीत जगणारा माणूस हे कधीही न संपणारे आव्हानच असते.

## निर्मितीतील चारित्र्यमुद्रा

उत्तम कांबळेंचे वैशिष्ट्य हे की ते माणसाकडे अशा सर्व संभाव्य दिशांनी पाहतात. या सर्व स्तरांवरील त्याच्या चारित्र्याची मर्मे निर्धास्तपणे मांडतात. 'रंग माणसांचे', 'कावळे आणि माणसे', 'कथा माणसांच्या', 'न दिसणारी लढाई', 'परत्या' हे कथासंग्रह आणि 'श्राद्ध', 'अस्वस्थ नायक' या कादंबऱ्या आणि 'वाट तुडवताना' हे त्यांचे स्वकथन पाहावे म्हणजे मी म्हणतो त्याचा प्रत्यय आपणाला येईल. शिवाय 'देवदासी आणि नग्नपूजा', 'कुंभमेळा साधूंचा की संधिसाधूंचा', 'अनिष्ट प्रथा' आणि 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक शोध', 'महात्मा फुल्यांची जलनीती', 'ओबीसींचे राजकारण' अशा छोट्या पुस्तिका पाहाव्यात. म्हणजे ही बाब प्रखरपणे आपल्या प्रत्ययाला येईल. उत्तम कांबळेंना एक विवक्षित वर्गचारित्र्य आहे. असे वर्गचारित्र्य कलावादी लेखकांसकट सर्वच लेखकांना असते. असे वर्गचारित्र्य लेखकाला नसते वा नसावे असे म्हणणाऱ्या ललित लेखकांना आणि समीक्षकांनाही वर्गचारित्र्य असतेच. लेखकांना धर्मचारित्र्य असते, जातिचारित्र्य असते, लिंगचारित्र्यही असते. साहित्यिकाच्या त्या त्या चारित्र्याच्या मुद्रा त्याच्या निर्मितीतून दृश्य-अदृश्य पातळीवरून उमटत असतातच. हे अपरिहार्यही असते आणि आवश्यकही असते. या सर्व सामग्रीद्वाराच साहित्यिक मूलभूत भावनांच्या धुमश्चक्रीपर्यंत पोचत असतो. या सर्व प्रवासात त्याचा दृष्टिकोन प्रकटत असतोच.

## सूर्यकुलाचा साहित्यिक

उत्तम कांबळे यांच्या अस्वस्थ नायकांशी आपण चर्चा केली तर कांबळेंचाही जीवनविषयक दृष्टिकोन ठसठशीतपणे आपल्यापुढे उभा राहतो. या दृष्टिकोनाच्या परिघातून कोणीही वंचित सुटत नाही आणि या वंचितांना वंचित करणारेही सुटत नाहीत. कांबळेंचा हा दृष्टिकोन विज्ञानलक्ष्यी आणि वंचितलक्ष्यी आहे. अंधश्रद्धा, सामाजिक आणि आर्थिक विषमता यांच्याविरुद्ध बंड होणारा हा दृष्टिकोन आहे. उत्तम कांबळे सूर्यकुलाचे जसे साहित्यिक आहेत, तसे सूर्यकुलाचेच पत्रकारही ते आहेत. त्यांचा आईवरचा आणि बाईवरचाही अग्रलेख वाचावा म्हणजे विचार, भावना यांना व्याकुळतेचे कसे धुमारे फुटतात ते आपल्या लक्षात येते. एक वेग, एक गती त्यांच्या अग्रलेखांमधून धावत येते आणि आपल्याला बिलगते. ही गती कधी आपणाला हळवे करते, कधी ताठ करते, कधी अंतर्मुख करते. खूप घडामोडी आपल्यात घडवते आणि उत्तम कांबळे प्रपातशैलीचे वक्ते आहेत. त्यांचे मुसळधार वक्तृत्व उभ्या महाराष्ट्राने अनुभवले आहे. त्या वादळी वक्तृत्वातूनही त्यांच्यातला खूप संदर्भातला

अस्वस्थ नायकच आपल्यापुढे साकार होतो.

## लोकउन्नयनासाठीच लेखन

उत्तम कांबळेंचे लेखन विपुल आहे. पण हे लेखन लोकप्रियतेसाठी मात्र नाही. हे लेखन लोकउन्नयनासाठी आहे. लोकसलोख्यासाठी आहे. म्हणून हे लेखन गंभीर आहे. त्यांच्या साहित्याची निर्मिती खुद्द एका जबाबदारीने, वंचितांची बाजू घेऊन पण सर्वांच्याच मानसिक पुनर्वसनाचा ध्यास घेऊन केलेले लेखन आहे. याचा उत्कट अनुभव हे लेखन वाचताना आपणाला येतो.

उत्तम कांबळे हे महाराष्ट्रातील फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीची निर्मिती आहेत. हा सर्वच मूल्यकोश त्यांच्या प्रतिभेचा मातृकोश आहे. आपल्या काळातील जळत्या प्रश्नांशी चर्चा करणारा, अशा प्रश्नांशी भांडणारा, सर्वच वंचितांची बाजू घेऊन लढणारा हा साहित्यिक अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष होणे ही बाब महाराष्ट्राच्या वाङ्मयीन संस्कृतीमधील भूमिकाबदलाची द्योतक आहे. म्हणून या घटनेला ऐतिहासिक मूल्य आहे. एका विचारवंत ललित साहित्यिकाचे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचा मार्ग विधायक प्रकाशाने उजळून टाकणारे मनोगत त्यांच्या चिंतनातून महाराष्ट्राला ऐकायला-वाचायला मिळेल, ही खात्री मला आहे.

# १५. महान लोककवी : नारायण सुर्वे

कवी नारायण सुर्वे यांनी कवितेला जिंदगी शिकविली आणि जिंदगीला क्रांतीची कविता शिकविली. वंचित माणसाला त्यांनी जीवनाचे महानायक मानले आणि या महानायकाचा सन्मान करणारी ताऱ्यांच्याही पुढची दुनिया कवितेत मांडण्याचा प्रयत्न केला. जगात माणसाएवढी सृजनशीलता त्यांना कुठेही दिसली नाही. माणूस हा उजेडाचा वारसदार आहे, ही खात्री त्यांनी आपल्या कवितेत मांडून ठेवली. सामान्य माणसांना मारणारांच्या दुनियेत सुर्व्यांनी सामान्य माणसाच्या सन्माननीय जगण्याची कविता लिहिली.

''संस्कृतीच्या व्यवहारात
हा एक दिलासा आहे
की सामान्य माणूस
कधीही मरत नाही
कितीही मारला तरी''

ही कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांची दुर्दम्य जीवननिष्ठा नारायण सुर्व्यांनी आपल्या कवितेतून सामान्य माणसांचे पुरावे देत साकार केली. सामान्य माणसाची ही नैसर्गिक जिद्द मांडण्यासाठी त्यांनी या सामान्य माणसांच्या जगण्यातूनच शब्द वेचले. सुर्वे युगकवी आहेत. लोकांच्या स्वाभिमानाची प्रस्थापना करण्यासाठी मुठींचे ध्वज त्यांनी उडविले. नव्या सृजनाचा आरंभ केला. ''दुनियेतील कामगारांनो एक व्हा, या युद्धात हातापायातील बेड्यांशिवाय गमवण्यासारखे तुमच्याजवळ काहीही नाही.' असे मार्क्सने सांगितले आणि 'हे आता जागे झालेत, रूपच बदलणार आहेत पृथ्वीचे' असे लेनिनने म्हटले आणि सुर्व्यांच्या विद्यापीठाचा अभ्यासक्रम निश्चित झाला. 'आपण सूर्यपुत्र आहोत' हे या अभ्यासक्रमाचे पायाभूत तत्त्व होते. 'सूर्यकुलातील लोकांना थांबणे माहीत नाही' ही या अभ्यासक्रमाची आचारसंहिता होती.

''वाटा सरळ होतील अन्
पुन्हा आयुष्य घेईल वळणे''

हे या अभ्यासक्रमाचे ध्येय होते. 'एका नव्या संघर्षासाठी रणधुमाळीत शिरणे' ही या अभ्यासक्रमाची अध्ययन पद्धती होती. भोवतीच्या बेइमान उजेडाच्या गर्दीत या वंचितांच्या वस्तीतून आपला सूर्य येईल, वंचितांच्या सन्मानाची पहाट उगवेल, हा या अभ्यासक्रमाचा ध्येयवाद होता. या विद्यापीठाला भाकरीचे शिक्षण द्यायचेच होते, पण या विद्यापीठाला 'आणखीही काही' हवे होते. हे 'आणखी काही' काय होते ? तर ती मानवत्वाची प्रतिष्ठा होती. स्वाभिमानासाठी बुद्ध होणारी ती मानसिकता होती. लोकांच्या क्रांतीची कविता लिहिणाऱ्या या कवीला विषमतेच्या कोडाने कुरूप झालेली वस्ती नको होती. माणसाच्या सृजनशीलतेला सर्व वाटा उपलब्ध करून देणारी, माणसांच्या सृजनशीलतेचा बाहू उभारून सन्मान करणारी वस्ती, केवळ उजेडाच्या सुगंधी फुलांनी फुलणाऱ्या एकहृदय आणि एकचित्त माणसांची दुनिया या कवीला हवी होती.

देवांना, संत-महंतांना, नियतीला, पराभवाला, निराशेला, व्यक्तिकेंद्रिततेला आणि दुर्बोधतेला नायक करणारी कविता मराठीत भरपूरच लिहिली गेली आणि या कवितेने वंचितांची डोकी भरपूरच सडवून ठेवली. आजवरही या क्रांतिमारक मानसशास्त्रातून आपण लोकांना बाहेर काढू शकत नाही. सुर्व्यांनी या पार्श्वभूमीवर माणसाला ऐहिक शोषणातून बाहेर काढणारी कविता लिहिली. असे करताना सुर्व्यांनी शोषणाबरोबर शोषणाचे समर्थन करीत असलेली भावनिक आणि वैचारिक सर्व सामग्रीही नाकारली. ते रूद्राक्ष, पोथ्या, ते खुंटीवर टांगलेले देव, कालच म्हणालीस, 'कुणीही भले केलेले नाही', 'धर्म एक कुलंगे हिंडते गल्लीबोळात' आणि

'संपलाच नाही
भाकरीचा मार्ग
ग्रंथातले स्वर्ग
कशापायी ?'

या सर्व वचनांमधून इहवादी नारायण सुर्वे आपल्यापुढे उभे राहतात. म्हणजे सुर्वे धर्मातीत, ईश्वरातीत आणि स्वर्गातीत होतात. याचा अर्थ सुर्वे या सर्व शोषण परंपरेच्या विरुद्ध छावणीत उभे राहतात. 'परमेश्वर सान्निध्य साधू पाहणारी ही पुरातन संस्कृती, आपली आपणच टवाळी करू नये तर काय करावे' असे सुर्वे म्हणतात तेव्हा ते माणसांचे सान्निध्य नाकारणाऱ्या संस्कृतीवरच विद्रोहाचा निर्णायक प्रहार करतात, हे लक्षात घ्यायला हवे. 'जातीयता हा इथला मोठा शाप आहे व धार्मिक आवरणाखाली देवांच्या खोट्या सत्ता व अस्तित्व दाखवले जात आहे. माणसातील अज्ञानाच्या,

इमल्यावर भक्कमपणे उभी असलेली चौकट फोडणे आवश्यक आहे.' असे 'सनद'च्या मनोगतात सुर्वे म्हणतात. ही सुर्व्यांची भूमिका धर्म, जात, वर्ग या सर्व शोषण चौकटी जपणाऱ्या स्त्रीवाद्यांनी, महानगरीय लेखकांनी आणि इतर नव्या-जुन्या परंपरावादी निर्मात्यांनी जरा काळजीपूर्वक लक्षात घेण्याची गरज आहे. साहित्यिकाला भूमिका असतेच. त्याचा प्रत्येक शब्द भूमिका घेऊनच जन्मलेला असतो. मराठी साहित्यातील शब्दांना कायम एक विद्रूपता चिकटलेली असते. ही विद्रूपता परखड भूमिका न घेणाऱ्या कुंपणावरच्या कावळ्यांनी निर्माण केलेली असते. सुर्व्यांच्या कवितेचे गोडवे गाणारांनी सुर्व्यांच्या या भूमिकेसंबंधीची आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. अन्यथा, नारळातले खोबरे फेकून देऊन करवंटी खात बसण्यासारखे ते होईल. महाराष्ट्राच्या एकूणच वाङ्मयीन अभिरुचीला मी हा सवाल करतो आहे. सत्य आणि असत्याचे बेमालूम आणि देखणे मिश्रण करून आपण आणखी किती काळ माणसांची फसवणूक करणार आहात, असा हा माझा सवाल आहे. या प्रश्नांचे उत्तर दिल्याशिवाय वाङ्मयीन चर्चा करीत राहणे, हा फसवणुकीचा विघातक खेळ आहे.

जीवनात निराशेचे क्षण येतात. 'या शहरावर, संस्कृतीवर, फुलांवर कसा ठेवावा विश्वास' या प्रकारे विश्वासघाताचेही क्षण येतात. अनंत आव्हाने दंश करीत राहतात पण तरी पराभवांचे आणि नियतीवादाचे पोवाडे कवी-लेखकांनी गायचे नसतात. थोड्याशा अंधाराला रात्र म्हणायचे नसते आणि झाडांच्या पानगळतीला निसर्गाचा मृत्यू मानायचे नसते. मानवी जीवनाचे आयुष्य नवी वळणे घेतच असते. सामान्य, वंचित माणूस जीवनाला नवनव्या शक्यतांचे नक्षत्रदेणे देतच असतो. व्यक्तिकेंद्री होणारांनी, देव-दैववादी असणारांनी, स्थितीवादाच्या पुरस्कर्त्यांनी, निराशावाद्यांनी, धर्मवाद्यांनी, जातीवाद्यांनी सुर्व्यांच्या कवितेतील ही रोकडी भूमिका ओळखावी. सुर्व्यांच्या कवितेचे गोडवे गाण्याची ही पूर्वअट आपण पाळणार आहोत काय?

# १६. विठ्ठल उमप : लोककलांचा महानायक

एखाद्या विराट वृक्षावर वेगवेगळ्या रंगांच्या आणि आवाजांच्या पाखरांनी सुंदर घरटी बांधावीत त्याप्रमाणे विठ्ठल उमपांच्या कलावंत व्यक्तिमत्त्वात नानाविध लोककलांची पूर्णवेळ मैफल रंगली होती. विठ्ठल उमपांचे आयुष्य कलावंताच्या झपाटलेपणाची अनन्य अशी व्याख्याच झाले होते. जीव ओतण्याच्या प्रक्रियेचे धनी फार कमी लोकांना होता येते. पण विठ्ठल उमप हा बुलंद रंगकर्मी मात्र जीव ओतण्याच्या प्रक्रियेचे कलंदर उदाहरणच झाला होता. कलांच्या वादळात माणूस सापडला की त्याच्या सामाजिक वर्गीकरणाचा कचरा पार कुठल्या कुठे उडून जातो. हा सामाजिक वर्गीकरणाच्या पराभवाचा आणि कलांच्या सर्जनशील विजयाचा पुरावा असतो. विठ्ठल उमपांचे कलाजीवन संकुचितपणाच्या सर्व हद्दी ओलांडून एका अंतहीन उजेडाचे नागरिक झाले होते. त्यांच्यातील परिपक्व कलाजीवनाने त्यांना वाङ्मयीन अर्हतपणाच्या पूर्णत्वावर सन्मानाने उभे केले होते. हे महाराष्ट्राच्या लोककलाविश्वाला उत्कटपणे जाणवले होते. म्हणूनच या लोककलाविश्वाने लोकमान्यतेची पुष्पवर्षा मागल्या अनेक दशकांपासून त्यांच्यावर आदरपूर्वक सुरू ठेवली होती. आपले हे झगमगते कलाजीवन स्वतः विठ्ठल उमपांनीच जन्माला घातले होते. मी म्हणजे कलावंत, कलावंत असणे हेच माझे अस्तित्व! मी तुमच्या कोणत्याही सामाजिक, धार्मिक चौकटींमध्ये मावूच शकत नाही. विठ्ठल उमपांचे आयुष्य या कलावंतपणाच्या विजयाची गाथाच होय असेच म्हटले पाहिजे.

मी विठ्ठल उमपांना लोककलांचा महानायक म्हणतो. २६ नोव्हेंबर २०१० रोजी हा लोककलांचा महानायक गेला तेव्हा महाराष्ट्रीय कलाजीवनाच्या पापण्या ओल्या झाल्या. लोककलांचा हा महानायक ऐंशी वर्षांचा होता. मृत्यू कोणालाही टाळता येत नाही. विठ्ठल उमपांनाही तो कधी ना कधी आलाच असता. पण विठ्ठल उमपांना दीक्षाभूमीवर मृत्यू आला. 'लॉर्ड बुद्धा' या वाहिनीचे लोकार्पण करण्यासाठी ते आले असताना जयभीम म्हणताना हा मृत्यू त्यांना आला. पुढे बसलेल्या हजारो लोकांच्या उपस्थितीत हा मृत्यू आला. हा जाहीर मृत्यू होता. दीक्षाभूमीवर मला मृत्यू आला,

भावनांचा मोहोर मनात फुलताना विठ्ठल उमपांना मृत्यू आला. मृत्यूलाही या लोककलांच्या महानायकाची इच्छा पूर्ण करताना धन्यता वाटली असणार. आपले पूर्वज नागपुरात राहिले आहेत. या कारणासाठी काही आपल्या एक्झिटसाठी त्यांनी नागपूर हे महानगर निवडले नव्हते. खरे म्हणजे नागपूर ही त्यांची प्रयाणासाठीची निवड नव्हतीच. निवड दीक्षाभूमी होती. हजारो वर्षांच्या गुलामीच्या ज्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चिंध्या केल्या त्या क्रांतिभूमीची निवड त्यांनी आपल्या प्रयाणासाठी करावी हा मुद्दाच आपल्याला एकाचवेळी दुःखाच्या आणि गौरवाच्याही सर्वोच्च शिखरावर नेऊन ठेवतो. आपण एका बाजूने विठ्ठल उमपांच्या मृत्यूने पराकोटीचे हैराणही होतो आणि विठ्ठल उमपांच्या सर्व अपेक्षांची फुले उधळत येणाऱ्या या मृत्यूने आपण अंतर्मुखही होतो. या मृत्यूने विठ्ठल उमपांच्या अपेक्षा पूर्ण केल्या म्हणून त्याचा रागही करता येत नाही आणि विठ्ठल उमपांना वत्सला ताईंपासून त्यांच्या नंदेश, संदेश, आदेश, उदेशपासून आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या आपणा सर्वांपासून त्यांना दूर नेले यामुळे मृत्यूचा गौरवही करता येत नाही. अशी आपली अवस्था होते.

विठ्ठल उमप लोककलावंत होते. लोककलांचे ते महानायक होते. ते लोकगायक होते. लोकगीतकार होते. त्यांनी स्वतःचे जीवनचरित्र लिहिले. अनेक लोकनाट्ये लिहिली. अनेक लोकनाट्यांमधून आणि चित्रपटांमधून त्यांनी अभिनय केला. ते मनस्वी लोकअभिनेते होते. विठ्ठल उमप वयाच्या आठव्या वर्षी गायनाच्या लोकविद्यापीठात भरती झाले. इथे त्यांच्या मनाला आलेली गायनाची भरती आयुष्यभर लोकांच्या मनात रिचवित राहिले. रंगमंचावर त्यांचा पहाडी गळा नाचायचा. या नर्तनातून कधी नाजूक हळव्या वेली फुलायच्या तर कधी पराक्रमाच्या विजा चमचमायच्या. या आवाजात आकांताच्या हाका होत्या. खूपदा खुद्द पहाडानेच आकाशाचा डफ हातात घ्यावा आणि ढगांचा गडगडाट ओतावा तसा भास विठ्ठल उमपांचे गायन ऐकताना होई. शाहिराचा परिपूर्ण गळा विठ्ठल उमपांना लाभला होता. तो आवाज खूपदा तक्रार मांडणारे वादळ व्हायचा. खूपदा कानामनात रेशमाची रंगपंचमी फुलवायचा. असे वाटायचे की हा आवाज महाराष्ट्राच्या गरीब घरांमधील सर्व अपेक्षांची बेरीज होऊन येतो आहे. रानातील झाडांना हलवत, त्यांना जागे करीत आणि त्यांच्या देठांवर उजेडाची फुले ठेवीत एखादा धमासान वारा वाहत राहावा तसा विठ्ठल उमपांचा आवाज लोकांच्या वस्त्यांमधून निकराची दवंडी देत फिरत असे. या बुलंद आणि बेगुमान आवाजाला मागल्या अर्ध्या शतकाने कृतार्थ मनाने मुजरा केलेला आहे.

विठ्ठल उमपांनी 'फु बाई फु' हे आपले जीवनचरित्र लिहिले. आपला सर्व कलाप्रवास त्यांनी त्यात मांडला. लोककलावंताला नकाराच्या काट्यांवरून आणि

आर्थिक अंधारातूनच वाट चालावी लागली. विठ्ठल उमपांनाही [illegible] अशी वाट चालावी लागली. पण या निर्दय परीक्षाकाळाने त्यांना कणखर केले. या काळाने त्यांचे शरीरच कणखर झाले असे नाही, मनही कणखर झाले. आवाजही कणखर झाला. परिस्थिती हेच त्यांच्यासाठी विद्यापीठ झाले आणि त्याने जिंदगीतील खाचखळगे ओलांडत कसे चालायचे हे विठ्ठल उमपांना शिकविले. त्यांना एकच व्यसन होते. गाण्याचे! ते सगळ्या अस्तित्वाने गायचे, प्राण ओतून गायचे. या व्यसनाशिवाय इतर कोणत्याही व्यसनाला त्यांच्याजवळ येण्याची हिंमतच झाली नाही. दारू अनेकांना मोहात पाडते. दारू विठ्ठल उमपांना मात्र नेहमीच घाबरली. विठ्ठल उमपांच्या आयुष्याची वजाबाकी 'फु बाई फु'मधून मांडली गेलेली आहे.

अनेक नाटकांमधून आणि चित्रपटांमधून त्यांनी अभिनय केला. अनेक दूरदर्शन मालिकांमधून पार्श्वगायन केले. अनेक कंपन्यांनी त्यांच्या गीतांच्या आणि त्यांनी गायिलेल्या गीतांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. जांभूळ आख्यानातील त्यांची द्रौपदी खूपच गाजली. त्यांनी कव्वाल्यांचे गायन केले. कव्वाल्या लिहिल्या. गीते लिहिली. सर्वच प्रकारची लोकगीते त्यांनी लिहिली. ही लोकगीते त्यांनी मराठमोळ्या भाषेत लिहिली आणि डोंगरपहाडांमधून घुमणाऱ्या स्वच्छंद मराठमोळा आवाजात गाईली. 'ये दादा आवर ये', 'बांदावाले घुमटे तुजं नाव काय', 'चिकना चिकना म्हावर माझा' ही त्यांनी गाईलेली कोळीगीते लोकांच्या मनीमानसी झाली. त्यांनी पोवाडे लिहिले. धनगरी गीते लिहिली. फटके लिहिले, लावण्या लिहिल्या. पांगुळ, वासुदेव, पोतराज, भारूड, गोंधळ असे लोकगीतांचे सर्व प्रकार त्यांनी हाताळले. अशा गीतांचे त्यांनी लेखनही केले आणि गायनही केले.

भारतात अनेक ठिकाणी, महाराष्ट्रात खेड्यापाड्यापासून मुंबईपर्यंत आणि परदेशातही त्यांचा दमदार आवाज घुमला. अनेक पुरस्कार आणि सन्मान त्यांना मिळाले. पण या सर्व सन्मानांपेक्षा 'लोकांचे प्रेम' नावाचा सर्वश्रेष्ठ सन्मान त्यांना मिळाला. उमाळा (गझलांचा संग्रह), गीत पुष्पांजली, माझी वाणी भीमाचरणी, माझी आई भिमाई, रंग शाहिरीचे हे त्यांचे गीतसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांचा शेवटचा गीतसंग्रह नागपुरातूनच त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित होतो आहे. या गीतसंग्रहात केवळ त्यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवरील गाणी आहेत. पोवाडा, लावणी, अभंग, वासुदेव, पांगुळ, छक्कड, गवळण, पोतराज अशा सर्वच लोकगीत प्रकारांमधून ही गाणी त्यांनी लिहिली आहेत. विठ्ठल उमपांना हे माहीत होते की लोकसंस्कृतीचा परिघ अभिजनसंस्कृतीपेक्षा मोठा आहे. लोकसंस्कृती मुंबईतील कामगार, मजूर आणि गरीब वस्त्यांमधूनही आहे आणि सगळा ग्रामीण भाग तिने व्यापलेला आहे. लोकसंस्कृती या लोकगायन प्रकारांमधूनच गाते आणि त्याचे लोकगायनप्रकारांमधून गीते ऐकणेही पसंत करते. या लोकगायनप्रकारांमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे

लोकसंस्कृती आपल्या ओठात बाबासाहेब आंबेडकरांसंबंधीची गीते वागवील आणि ओठावर पोचलेली ही गीते मग या लोकसंस्कृतीमधील माणसांच्या मनातही घरे करतील. या गीतांच्या वाटांनी या संस्कृतीच्या मनात बाबासाहेब पोचतील. त्यांचे जीवनस्वप्न पोचेल आणि तिथे एकदा ते पोचले की हे स्वप्नच मग क्रांतीत रूपांतरित होऊन जाईल. लोककलांच्या महानायकाच्या लक्षात ही गोष्ट आली होती. आणि हा उद्याचा परिणाम आजच लक्षात घेऊन या द्रष्ट्या कलावंताने ही गीते लिहिली. ही उद्याच्या क्रांतीची बांधणी होती. या गीतसंग्रहाला मीच नाव द्यावे हा त्यांचा आग्रह होता. मी नाव दिले आणि या गीतसंग्रहाला मीच प्रस्तावना लिहावी हा त्यांचा हट्ट होता. या मोठ्या भावाचा आदेश टाळणे मला शक्य झाले नाही. मी प्रस्तावना लिहिली. त्यांनी ती वाचली. ती त्यांना खूप आवडली. आता दुःख एवढेच आहे की, २६ नोव्हेंबरपर्यंत हा गीतसंग्रह प्रकाशित होऊ शकला नाही, असे झाले असते तर फार बरे झाले असते.

विठ्ठल उमपांच्या खुपदा भेटी झाल्या. कधी सहज झाल्या, कधी कार्यक्रमात झाल्या, कधी आम्ही एकत्र भाषणे केली. या सर्व भेटींमधल्या विठ्ठल उमपांच्या लहान मुलांच्या निर्व्याज हसण्याने, माझ्या काळजावर रांगोळ्या काढल्या. त्यांचा साधेपणा मनावर कोरला गेला. त्यांच्या मनस्वीपणाला तर किनारेच नव्हते. एवढा मोठा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा विराट कलावंत पण वागण्यात बोलण्यात अहंकाराचा कणही नाही. म्हणून त्यांच्यावरूनच मोठ्या माणसाची व्याख्या मला करावीशी वाटली. ती व्याख्या अशी. मोठा माणूस तो जो निगर्वी असतो.

विठ्ठल उमपांचा जन्म १९३१ साली १५ जुलै रोजी झाला आणि २६ नोव्हेंबर २०१० रोजी त्यांच्या स्वप्नाचा सन्मान करणारा मृत्यू त्यांना झाला. वयाच्या या ऐंशी वर्षातली सत्तराहून अधिक वर्षे ते गायक-कलावंत म्हणूनच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वावरले. त्यांचे गायन, त्यांचा अभिनय, त्यांची माणुसकी, त्यांचा निगर्वीपणा, त्यांची गीते आणि त्यांची आंबेडकरनिष्ठा या सर्वच गोष्टी आता महाराष्ट्राच्या जीवनातील मर्मबंधातील ठेवी झाल्या आहेत. त्यांचे झुंज देत जगणे आणि दीक्षाभूमीवर 'जयभीम' म्हणत त्यांना आलेला मृत्यू हाही आता महाराष्ट्राच्या भावजीवनात नक्षत्रांचा सोहळा झालेला आहे.

## १७. वामन निंबाळकर

गरीब आईवडिलांच्या पोटी जन्माला आलेले निंबाळकर औरंगाबादेच्या मिलिंद कला महाविद्यालयात शिकायला आले. मुळातच शांत न बसणारा धडपड्या स्वभाव असल्याने ते विद्यार्थ्यांच्या चळवळीत सहभागी झाले. इथे सुखराम हिवराळे, नरेश कुमार इंगळे यांच्या वाङ्मयीन चळवळीतही ते सहभागी झाले. इथेच त्यांचे कवितालेखन बहराला आले. मिलिंद महाविद्यालयात विद्रोही वाङ्मयीन चळवळ जन्माला येत होती. डॉ.म.ना.वानखडे, म.भि.चिटणीस, प्रा.रा.ग.जाधव यांच्या प्रयत्नातून अस्मिता हे नियतकालिक सुरू झाले. या चळवळीत सुखराम हिवराळे, इंगळे यांच्यासोबत वामन निंबाळकरही सहभागी होते. खेळांचे क्षेत्र निंबाळकरांचे आवडते क्षेत्र होते. चळवळी हेही त्यांचे जिव्हाळ्याचे क्षेत्र होते. ही दोन्ही क्षेत्रे सांभाळून निंबाळकर वाङ्मयीन चळवळीतही सहभागी होत असत. चळवळींशी संबंधित अनुभव शब्दबद्ध करण्यासाठी कविता हे माध्यम त्यांच्या प्रतिभेने निवडले होते.

१९६८ च्या सुमारास अस्मितादर्शच्या उभारणीत त्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला. ते अस्मितादर्शच्या संपादक मंडळातही होते. १९७२ साली पँथर स्थापन झाल्यानंतर ते पँथरच्या चळवळीत सामील झाले. पँथरच्या अनेक आंदोलनांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सहकारी पँथर्ससोबत पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या एका वक्तव्याच्या संदर्भात त्यांनी आंदोलन छेडले. पुढे नामांतराच्या चळवळीतही ते सक्रिय होते. अत्यंत हलाखीतून शिक्षण घेणारे निंबाळकर नोकरीत मात्र फारसे रमले नाहीत. मिलिंद कला महाविद्यालयाच्या काळात अल्पकाळ त्यांनी नोकरी केली; पण पुढे त्यांनी कधीही नोकरीचे तोंड पाहिले नाही.

नंतर निंबाळकर नागपूरला आले. इथे स्वतंत्र असे पोटापाण्याचे उद्योग त्यांनी केले. पण त्यातही त्यांचा जीव रमला नाही. औरंगाबादेपासून त्यांनी प्रकाशन व्यवसायाला प्रारंभ केला. प्रबोधन हे नियतकालिक त्यांनी दीर्घकाळ चालविले. अनेक पुस्तकेही त्यांनी प्रकाशित केली. प्राचार्य म.भि.चिटणीस यांचे समग्र वाङ्मय

त्यांनी प्रकाशित केले. ही त्यांची आंबेडकरी चळवळीतील कामगिरी महत्त्वाची मानायला हवी. डॉ.म.ना.वानखडे यांचे लेख आम्ही दोघांनी मिळून संपादित केले. अस्मितादर्शची पहिल्या नऊ वर्षांची वाटचाल त्यांनी मांडून दाखविली. याच धडपड्या स्वभावामुळे त्यांनी प्रबोधन प्रतिष्ठान स्थापन केले. या प्रतिष्ठानच्या वतीने त्यांनी पुरस्कारांची मोठी योजना सुरू केली. एक चांगले ग्रंथालय सुरू केले.

त्यांनी प्रामुख्याने कवितालेखन केले. गावकुसाबाहेरील कविता, महायुद्ध, वाहत्या जखमांचा प्रदेश असे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झाले. यावर्षी दिवाळी अंकांमध्ये त्यांच्या अनेक चांगल्या कविता वाचायला मिळाल्या. निंबाळकरांनी काही समीक्षालेखनही केले. 'दलित साहित्य स्वरूप आणि भूमिका', 'दलित कवितेतील आंबेडकर दर्शन' ही त्यांची समीक्षापर पुस्तके होत. 'महाकवी डॉ.आंबेडकर' अशी वैचारिक पुस्तकेही त्यांनी लिहिली. त्यांनी लघुकथाही लिहिल्या. अलीकडेच त्यांचा लघकथांचा एक संग्रह 'असाही एकलव्य' प्रकाशित झाला आहे. याप्रकारे कवी म्हणून, समीक्षक म्हणून, वैचारिक लेखक म्हणून, संपादक आणि कार्यकर्ते म्हणून त्यांची प्रतिमा महाराष्ट्राला माहीत आहे.

बाबुराव बागूल, केशव मेश्राम, दया पवार, नामदेव ढसाळ अशा पहिल्या पिढीतील आंबेडकरी लेखकांमध्ये वामन निंबाळकरांच्या साहित्य निर्मितीचा सन्मानाने उल्लेख केला जातो. त्यांची सर्व वाङ्मयीन कामगिरी अत्यंत मोलाची आहेच. त्यांच्या सामाजिक कार्याचे मोलही मोठे आहे. आंबेडकरी चळवळीतील एक कृतिशील लेखक, एक वक्ता आणि स्पष्टवक्ता म्हणून महाराष्ट्रात निंबाळकर ओळखले जातात.

पँथरच्या अनेक सभांमधून आम्ही भाषणे दिली. भुसावळच्या बौद्ध साहित्य संमेलनापासून अनेक ठिकाणी प्रवास केला. रात्री-अपरात्री फिरलो. सोबत भुपेश थुलकर असत. भिवाजी बडगे असत. सरोज मेश्राम असत. खूप कार्यकर्ते असत. साहित्य संस्कृती मंडळात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ प्रकाशन समितीत आम्ही एकत्र कार्य केले. अनेक लहानमोठ्या साहित्य संमेलनांमधून कविता वाचन केले. परिसंवादातून भाषणे केली. दलित साहित्य संसदेने भरवलेल्या चंद्रपूरच्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. पु.ल.देशपांडे उद्घाटक होते. कथाकार शांताराम प्रमुख पाहुणे होते. यावेळी मी दलित साहित्य संसदेचा अध्यक्ष होतो. कल्याणच्या अ.भा.दलित साहित्य संमेलनातही त्यांचा सहभाग होता. वडाळ्याला दलित साहित्य संमेलन झाले होते. तिथे आम्ही रात्रभर कविता वाचल्या. नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, दया पवार असे सर्वच कवी या कविसंमेलनात होते. मी कविसंमेलनाचा अध्यक्ष होतो. अशा खूप आठवणी या क्षणी मनात गर्दी करीत आहेत.

मधल्या काळात पुण्याला त्यांच्या कवितेवर एम.फिल. साठी एक शोधप्रबंध लिहिला गेला. तो प्रकाशित करायचे ठरवले तेव्हा अवचरे यांनी त्या पुस्तकासाठी माझी मोठी प्रस्तावना घेतली. तेव्हाही त्या प्रस्तावनेत मी त्यांच्या कवितेविषयी लिहिले. निंबाळकरांनी संपादने केली, कथा लिहिल्या, समीक्षा, वैचारिक लेखन केले तरी महाराष्ट्राच्या वाङ्मयीन नोंदबुकात त्यांची अत्यंत सन्मानाने नोंद झाली ती आंबेडकरवादी कवींच्या पिढीतील प्रमुख कवी म्हणून. त्यांच्या अनेक कविता, कवितासंग्रह बी.ए., एम.ए.च्या अभ्यासक्रमात समाविष्ट झालेले आहेत. शब्दावरची त्यांची कविता, माय ही कविता सहज लोकांच्या ओठावर येते. एक विशेष कविप्रतिभा त्यांच्याजवळ होती. या प्रतिभेला आज महाराष्ट्र मुकलेला आहे. दलित साहित्यसंमेलन घेण्याचा मोठा प्रकल्प त्यांनी उभारला होता. निंबाळकरांचे हे आकस्मिक जाणे दलितांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन चळवळीला खोलवर जखम करणारे आहे. मी वामन निंबाळकरांना आदरांजली अर्पण करतो ; पण ही आदरांजली अकस्मात वाहण्याची वेळ आमच्यावर तुम्ही का आणलीत, अशी घाई का केली, असाही प्रश्न त्यांना विचारून ठेवतो."

# १८. दारूचे फुटले बांध

महाराष्ट्रात सर्जनशीलता नाही अशी अत्यंत चुकीची समजूत महाराष्ट्राबाहेरील आणि भारताबाहेरील लोकांमध्ये पसरली आहे. महाराष्ट्राच्या प्रतिभेवर जळणाऱ्या एखाद्या दुष्ट डोक्याने ही अपसमजूत पसरविली असावी. उदा. गणपती दूध प्याला हे जगातील एकाही लघु किंवा अर्धलघु राष्ट्राला सुचले नाही. हे क्रांतिकारी तत्त्व महाराष्ट्राला सुचले. डार्विन आज असता तर या एका मुद्याखातरही आपण महाराष्ट्रात जन्माला आलो नाही, याचे दुःख त्याला झाले असते. आता तेवढीच क्रांतिकारी गोष्ट महाराष्ट्राच्या प्रतिभेला सुचली ती म्हणजे ज्वारी, मका, बाजरी यांच्यापासून दारू काढण्याची. इथेही मटकी, चवळी, उडीद, मूग, हरभरा अशा धान्यसमाजातील लोकांना आपला नंबर लागला नाही याचे वाईट वाटले असणार, पण शासनातली एखादी युगप्रवर्तक प्रतिभा याही प्रकारांना संधी देईल आणि त्यांची नाराजी दूर करील.

वरील धान्यापासून दारू काढण्याची कल्पना ज्या डोक्याला सुचली ते धन्य होय. महाराष्ट्रातील प्रत्येक गावातील लोकांना दारू पाजून त्या डोक्याचा सत्कार व्हावा, पुढील पिढ्यांनीही या डोक्याला उठता-बसता धन्यवाद द्यावेत. कारण, पृथ्वीच्या पोटातील पाण्याची पातळी सारखी खाली जात आहे. काही काळानंतर धुण्याला तर सोडाच पण पिण्यालासुद्धा पाणी मिळणार नाही. त्यावेळी लोकांना पाण्याऐवजी दारूच प्यावी लागेल. दारूनेच आंघोळ करावी लागेल. दारूचाच चहा प्यावा लागेल. यावेळी दारूची खूप गरज भासेल. त्यावेळीच धान्यापासून दारू काढणाऱ्या डोक्याचे महत्त्व लोकांना कळेल. सामान्य बुद्धीच्या लोकांना आज हा द्रष्टेपणा कळत नाही, म्हणून असे लोक या कल्याणकारी शोधावर टीका करतात. पण, असा आखूड विचार करणाऱ्यांनी समाजाच्या भवितव्याचा विचार करावा, या निर्णयातील क्रांती कळण्यासाठी हे आवश्यक आहे.

लोक काहीही बोलोत. लोकांना कोण पुसतो ? पण निर्णय घेणाराने हा निर्णय नशापाणी न केलेल्या अवस्थेतच घेतला असावा. कारण शंका घेता येईल असा

महाराष्ट्रपासून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. त्यातली दारूच दारू चहुकडे गं... ही गोष्ट तर पूर्णपणे विधायकच आहे.

या दारूविकासाला विरोध असणारे काही लोक म्हणतील की आधीच धान्य महाग आहे, गरिबांचे हाल होतात, पण असे ज्यांना वाटते त्यांनी हे समजावून घेतले पाहिजे की गरीब असतात कशासाठी? गरीब नसतील तर मग हाल कोणी भोगायचे? हे सत्य कळले की विरोधकांचा विरोध मावळून जाईल. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे हे की आजारी माणसाला सलाईनद्वारा पोषणद्रव्ये दिली जातात, त्याप्रमाणेच धान्याची दारू काढली, तर त्या दारूतून लोकांच्या पोटात धान्य जाईलच. त्यामुळे भाकरी, पोळ्या खाण्याची गरज संपेल. स्वयंपाकाची गरज उरणार नाही. चुलीत जळणारे इंधन वाचेल. स्वयंपाकाचा गॅस वाचेल. तो धान्यापासून दारू काढण्यासाठी वापरता येईल. दळणाऱ्या चक्क्यांची गरज संपेल. वीज वाचेल. स्त्री स्वयंपाकमुक्त होईल. तिला खूप आनंद वाटेल. किचनमध्ये लागणारी भांडीकुंडी घेण्याची गरज भासणार नाही. पैसा शिल्लक राहील. घरात पुढे स्वयंपाकघर बांधण्याची गरजच भासणार नाही. जगण्याला आवश्यक तो सर्व अन्नपुरवठा या दारूतूनच लोकांना होईल. वाचणारा पैसा लोकांच्या हातातून आणि रस्त्यातून खेळू लागेल. मुलांसाठी असतात तशी या पैशासाठी वेगळी खेळ मैदाने तयार करावी लागतील. सडक्या राजकारणापासून, सडक्या विचारांपासून आणि धान्यापासून दारू काढण्याची क्रांती लोकांना कळेल. तेव्हा सर्व महाराष्ट्र धन्यवाद देण्यासाठी बाटल्यांसह मंत्रालयापुढे जमा होईल. या काळात गावात राहायला कोणी उरणार नाही. मग गावातील डुकरांना आणि इतरही प्राण्यांना आपली गुलामी संपावर गेली असे वाटेल. तेही अशी दारू काढणारा मंत्री आपल्यातही व्हावा असे साकडे आपल्या परमअंधश्रद्धेतून घालतील. साकडे घालणे म्हणजे मूर्खपणा असे काही पाखंडी प्राणी म्हणतील. साकडे हा दारूचाच एक जुना प्रकार आहे, असेही काही नास्तिक प्राणी म्हणतील. मूर्खपणा सडवून दारू काढणे हे राजकारण्यांना फार गैरसोयीचे वाटेल.

सडवून दारू काढण्यात येणाऱ्या पदार्थात आता धान्यप्रकारांची भरती होत आहे. गहू, तांदूळ, यांचाही नंबर लागेलच. या संदर्भात एक विधायक प्रस्ताव असा की गोष्टी सडवून दारू काढण्यापेक्षा आधीच सडलेल्या गोष्टींपासून दारू काढली तरी महाराष्ट्राची ख्याती जगभर पसरू शकते. महाराष्ट्र या मार्गाने महासत्ताही होऊ शकतो. असे सडलेल्या गोष्टींचे विपुल साठे महाराष्ट्रात आहेत. राजकारण भ्रष्टाचाराने, अंधश्रद्धांनी सडलेले आहे. जातींनी अनेकांची डोकी सडलेली आहेत. धर्मांनी, विघातक रूढी-परंपरांनी, अहंकारांनी, घृणांनी अनेकांची डोकी सडलेली आहेत. अनेक विचार, अनेक नजरा आणि अनेक हसऱ्या चेहऱ्यांमागचे वास्तव इथे सडलेलेच आहे. सत्यसाईप्रमाणे अनेक बाबा, बुवा, माया, अम्मा, यांच्यावरील

जन्मांध भक्तीने गावागावातील स्वच्छता किडलेली आहे.

अशा असंख्य गोष्टींपासून दारू काढण्यासंबंधीचे माझे संशोधन मी शासनाला विनामूल्य देतो. या गोष्टींपासून दारू काढली तर प्रत्येक गावात दारूसाठी एकेक जायकवाडी धरण आणि एकेक अरबी समुद्र तयार करावा लागेल. घरोघरी दारू पोचवणारी नळयोजना लोक मंजूर करणार नाहीत. कारण त्यामुळे दारूच्या तलावात वा समुद्रात बुडून बेपत्ता होण्याच्या आनंदाला लोक मुकतील. त्यामुळे दारूच्या तलावात वा समुद्रात पोहणे व्यायामाच्या दृष्टीने लोक पसंत करतील. पोहताना दारू प्याल्याने बाटल्यांचा खर्च वाचेल, त्यामुळे आर्थिक विकासाला हातभार लागेल. काही लोक तर तलावात-समुद्रातच मुक्कामी राहतील. कार्यालये ओस पडतील. दारूच्या समुद्रावर तरंगणारी गावे निर्माण होतील. मोकळ्या होणाऱ्या जमिनीवर केवळ दारू काढण्यासाठी धान्य पिकवा असा विचार रुजविता येईल.

आणखी एक होईल, तलावात आणि समुद्रात भेदभाव विसरून लोक दारू पीत पोहतील. जातीय आणि आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत. इतर विषमतांचे काहीही न करता निर्मूलन करता येईल. वर सांगितलेल्या सडक्या गोष्टींपासून काढलेली दारू विषारी असणे शक्य आहे. त्यामुळे ही दारू पिण्याआधी लोकांमध्ये विष पचवण्याची ताकद वाढविण्यासाठी धडक कार्यक्रम शासनाला राबवावा लागेल. अन्यथा महाराष्ट्राची लोकसंख्या कमी करण्यासाठी ही युक्ती योजिली, असा बिनबुडाचा आरोपही काही अर्धवट डोकी करतील, असा आरोपही दारूच्या टोपलीत टाकणे संबंधितांना सहजशक्य होईल.

कविता वगैरे लिहिणाऱ्या आमच्यासारख्या काही लोकांनाच फक्त प्रतिभावंत म्हटले जाते ही भयंकर वाईट गोष्ट आहे. प्रतिभा या शब्दाचा तो घोर अवमान आहे. खरे प्रतिभावंत तर राजकारणीच असतात. त्यांना ओळखण्यातच सर्वांचे कल्याण आहे. दारूत मेंदू बुडवल्याशिवाय ज्यांना लिहिता येत नाही, त्या साहित्यिकांचे तर विशेषच कल्याण आहे. हे पेटंट जगाला विकले तर, महाराष्ट्र जगातली सर्वात मोठी आर्थिक महासत्ता होऊ शकतो. महाराष्ट्राच्या राजकारणातील या महान प्रतिभांचा गौरव करण्यासाठी, या प्रतिभांचे मोल दारू न पिणाऱ्यांनाही कळावे या सद्हेतूने मी हे कळकळीने लिहिले आहे. हे लेखन कोणाला आवडले नाही तर, मला फार धन्यता वाटेल. जास्तच दुःख झाले तर हा माझा लेख उराशी कवटाळून दारूच्या समुद्रात उडी घ्यावी. उद्या जाऊन तोही महाराष्ट्राच्या कल्याणाचा एक ओलाचिंब प्रकार ठरेल. इन्किलाब, दारूबाद! 'दारूचे फुटले बांध...'

# १९. भाषाच जेव्हा दारू पिते...

धान्यापासून दारू निर्माण करण्याला विरोध करणाऱ्यांना उसाच्या दांडक्याने हाणू ही राज्याचे पाणीपुरवठा मंत्री लक्ष्मण ढोबळे यांची भाषा स्वतःच दारू प्यायलेली आहे. आपण दारू पुरवठा मंत्र्यासारखे बोलून गेलो हे त्यांच्याही वक्तृत्वाला कळले नाही. उत्साहाची कोण आणि कशी समजून काढणार? उसाचे कांडके ढोबळे कोणाकोणाच्या पाठीत हाणणार? चंद्रशेखर धर्माधिकारी, अण्णा हजारे, अभय बंग, नरेंद्र दाभोळकर, महेश एलकुंचवार, यशवंत मनोहर, प्रकाश आमटे, सु.श्री.पांढरीपांडे, प्रवीण बर्दापूरकर आणि असे खूप लोक आहेत. महाराष्ट्रात जे धान्यापासून दारू काढण्याला विरोध करतात. या सर्वांना ढोबळे उसाच्या कांडक्याने मारणार आहेत काय?

आहेत ती दारूची दुकाने गावा-शहरात भगिनी बंद पाडताहेत. कारण त्यांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. मुलांवरही तेच संस्कार होत आहेत. या भगिनी दारूला विरोध करतात. ढोबळे या भगिनींना उसाच्या कांडक्यांनी मारणार आहेत काय?

लक्ष्मण ढोबळेंनी संविधान वाचले असते तर ते असे बोलले नसते. भारताच्या संविधानाचे सत्तेचाळीसावे कलम असे म्हणते की, 'आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यापैकी असल्याचे मानील आणि विशेषतः मादक पेये व आरोग्याला अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.' ढोबळेंनी या कलमाचा अर्थ धान्यापासून दारू निर्माण करण्याला जे आम्ही विरोध करीत आहोत त्यांना समजावून सांगावा. दांडक्याचा उद्देश आणि दिशा कशी बदलते ते त्यांच्या लक्षात येईल. ढोबळे केवळ जाणत्या विचारवंतांनाच, साहित्यिकांनाच मारत नाहीत तर भारतीय संविधानाच्या सत्तेचाळीसाव्या कलमाचीही पाठ शेकत आहेत. आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना स्वतः लक्ष्मण ढोबळेही भारताच्या संविधानाचे शिल्पकार मानत असतील तर मग आता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे काय करायचे, असा प्रश्नही त्यांना पडला पाहिजे.

लक्ष्मण ढोबळेंना एक जैविक बाब माहीत नाही, असे दिसते. ती ही की दारूशिवाय माणूस जगू शकतो. अन्नाशिवाय जगू शकत नाही. गरज आणि चोचले यात फरक असतोच. दारूमुळे मनुष्य मरू शकतो. खूप उदाहरणे देता येतील पण दारूशिवाय माणूस उत्तम जगू शकतो. आता प्रश्न महसूलाचा. सर्व राजकारण्यांजवळचे हजारो कोटी रुपये सरकारात जमा करावे. लोकांना मारणाऱ्या दारूपासून मिळणाऱ्या महसुलाची राज्याला आणि देशालाही गरज भासणार नाही. कुठलाही उत्पादक व्यवसाय न करता चार-दोन वर्षांत राजकारणी माणूस हजारो कोटी रुपयांचा मालक या महसुलाची चोरी करूनच होतो की नाही? मग ही चोरी केली नाही तर दारूपासून मिळणाऱ्या महसुलाची गरज नाही आणि महसुलाची गरज नाही तर दारू काढण्याची गरज नाही.

भ्रष्टाचार थांबवा. दारूपासून मिळणाऱ्या महसुलाची गरजच उरत नाही. सगळे व्यवस्थित होते पण, मग राजकारणात जाईल कोण? निरपेक्ष समाजसेवा करायला राजकारणात जाणे परवडण्यासारखे नाही.

ढोबळेंनी दुसऱ्या दिवशी अत्यंत दयनीय आवाजात माफी मागितली. अशा राजकीय माफीने नैतिक बेजबाबदारपणाचे परिमार्जन कसे होणार? मुंबई उच्च न्यायालयाने आता अन्नधान्यापासून दारू निर्माण करण्याला स्थगिती दिली आहे. दारू काढण्याची परवानगी मिळालेल्या राजकारण्यांच्या नातेवाईकांना दिलेले करोडो रुपये परत करण्याचे आदेश दिलेले आहेत. चेतन कांबळेंना आणि मुंबई उच्च न्यायालयाला सर्व मराठी जनतेने हार्दिक धन्यवाद द्यायला हवेत.

## २०. स्वप्नाची इच्छा

मानवी मन स्वप्नांच्या झाडासारखं आहे. ते सारखं स्वप्नांनी फुलत असतं. मन वावरासारखं आहे. स्वप्नांच्या पिकाशिवाय त्याला करमत नाही. मन वाऱ्यासारखं असतं. ते सारखं एका स्वप्नानंतर दुसऱ्या स्वप्नाकडे धावत असतं. मानवी जीवनाचा इतिहास स्वप्नं पाहण्याचा आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपडण्याचा इतिहास आहे. आपल्या पूर्वजांनी स्वप्नं पाँहिली. कष्ट उपसून ती प्रत्यक्षात आणली. आपण त्या प्रत्यक्षाच्या उत्सवात जगतो आहोत. याचा अर्थ आपण स्वप्नं पाहिली आणि घाम गाळून ती प्रत्यक्षात आणली तर पुढील पिढ्यांसाठी त्या उजेडाच्या भेटी ठरतील, प्रेरणांच्या कार्यशाळा ठरतील असा आहे.

निसर्गानं माणसाला मन हे क्रांतिकारी इंद्रिय दिलं. त्याच्याकडे स्वप्नं पाहण्याचं काम दिलं. माणसानं हे स्वप्नं पाहणारं मन मरू देऊ नये. ज्याची उणीव आपल्या जीवनात आहे त्याचा उत्कट ध्यास म्हणजे स्वप्नं पाहणं. प्रत्यक्षात नसलेल्या पण आपल्याला हव्या असलेल्या गोष्टीची मनानं केलेली निर्मिती म्हणजे स्वप्नं. स्वप्न भावरूप असतं आणि ते अभावाच्या बेचैनीतून जन्माला येतं. मन स्वप्नाची निर्मिती करतं. याचा अर्थ स्वप्नाच्या जन्माला प्रतिभा कारण असते. स्वप्न एका सर्जनशीलतेची निर्मिती असते. साहित्यकृती ही साहित्यिकाची स्वप्नाकृतीच असते. जे प्रत्यक्षात नाही त्याची रचना मन स्वप्नाच्या रूपानं करतं. स्वप्न ही याप्रमाणं मानवी मनाला हवं त्याची संरचनाच असते. संहिताच असते.

आशावाद आणि स्वप्न यांच्यात फरक असा असतो की स्वप्न हे ध्येय असतं आणि हे ध्येय प्रत्यक्षात येईल या माणसाच्या उत्कट वाटण्याला आशावाद म्हणतात.

स्वप्नं पुढील काही गटात वाटता येतात. काही स्वप्नं व्यक्तिगत पातळीवरची असतात. व्यक्तीची सुखं एवढाच त्यांचा परिघ असतो. काही स्वप्नांना विशिष्ट गटाचे परिघ असतात. पण स्वप्नांचा तिसरा प्रकार संपूर्ण मानवी जीवनालाच आपला विषय मानतो.

पाहत असतो. पहाटेला वंचित राहिलेला माणूस पहाटेचं स्वप्न पाहतो. या स्वप्नाचा तपशील त्यानं आधीच ठरवलेला असतो. हा तपशील घेऊन त्या स्वप्नाच्या आशयाकडे तो धावत असतो. तो आशय प्रत्यक्षात उतरावा ही आशा त्याला स्वप्नाकडं खेचत राहते. याप्रमाणं स्वप्नाकडे धावण्याचा इतिहास हाच जीवनाच्या प्रगतीचा इतिहास ठरतो. जी माणसं स्वतःच किंवा इतरांच्या भीतीनं स्वप्नं पाहण्याचं बंद करतात ती माणसं जिवंतपणीच मरून जात असतात.

म्हणून जगणाऱ्या माणसानं स्वप्नं पाहणारं आपलं मन मरू द्यायचं नसतं. आणि या मनानं पाहिलेली स्वप्नंही मरू द्यायची नसतात. उद्याकडे जाण्याचं उद्दिष्टच नष्ट झालं तर माणसाचं आजचं जगणंही व्यर्थ होऊन जाईल. माणूस केवळ जुन्याचं गाठोडं वाहणारा प्राणी होऊन जाईल. हे टाळण्यासाठी मी स्वप्न पाहतो म्हणून मी आहे असं माणसानं सतत वागत राहिलं पाहिजे.

पण आयुष्यभर नुसती स्वप्नं पाहत बसणारा माणूस आयुष्याला वठलेलं झाड करून ठेवील. हे टाळण्यासाठी स्वप्नं पाहणारांनी ती प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावावी. ही जगण्याची जिवंत प्रक्रिया असते. स्वप्नं माणसापासून दूर कधीच पळत नाहीत. माणूसच त्यांच्यापासून दूर पळतो आणि स्वप्नं हाती लागत नाहीत म्हणतो. हे आळशी माणसाचं स्वतःच्या निष्क्रियतेचा बचाव करणारं तत्त्वज्ञान आहे. अशी माणसं स्वप्नालाच घाबरतात. स्वप्नांचीच धास्ती घेतात. कारण ही माणसं कष्टांना भितात. कष्टांपासून दूर पळणाऱ्या माणसांपासून स्वप्नही दूर पळतात. स्वप्नं जुन्या सवयींच्या विरोधात असतात. जुन्या सवयी माणसांना त्यांच्या चौकटीबाहेर जाऊ देत नाहीत. खेड्यातील माणसं अडचणीत जगतात. अडचणीत जगण्याची सवय त्यांना चौकटी तोडू देत नाही. स्वप्नही पाहू देत नाही. पण यातीलच काही माणसं चौकटी तोडतात तेव्हा असीम अवकाशात उडायला लागतात.

जातींनी, धर्मांनी लादलेल्या चौकटी तोडा. मुक्त व्हा. आपलं निखळ माणूसपण खुरटणार नाही याची काळजी घ्या असं स्वप्न म्हणतं. तुम्हा-आम्हा भारतीयांना स्वप्न म्हणतं, 'मी संविधानात राहतो. तिथे मला भेटा. माझ्याजवळची उजेडाची वाट मी तुमच्या स्वाधीन करतो. कोणत्याही जातीवर्गविहीन, अंधश्रद्धाविहीन मनांना आणि स्त्री-पुरुषविषमता न पाळणाऱ्या चांगुलपणाला, विज्ञानदृष्टीला माझा पत्ता विचारा असं स्वप्न म्हणतं. जगातील सर्वच शब्दांमध्ये सर्वांत सुंदर शब्द माणूस हाच आहे. मी या सुंदर शब्दाचं भाषांतर आहे असं समजा आणि माझ्याकडे पाठ फिरवू नका हीच या स्वप्नाची इच्छा आहे.

# २१. संस्कार

माणसाचं मन सुसंस्कृत करणारी शिकवण म्हणजे संस्कार! संस्कृती वेगवेगळ्या स्तरांवर वावरते. व्यक्तीची संस्कृती, कुटुंबांची संस्कृती, गावाची संस्कृती, प्रांतांची संस्कृती, आणि जगाची संस्कृती असे संस्कृतीचे वेगवेगळे परिघ असले तरी हे संस्कृतीचे सर्व परिघ एका महासंस्कृतीच्या पोटातच समाविष्ट होत असतात. ही महासंस्कृती म्हणजे विश्वसंस्कृती होय. विश्वातील सर्वच लोकांच्या कल्याणाची सारखीच काळजी वाहणारी संस्कृती म्हणजे विश्वसंस्कृती होय. आर्थिक वा सामाजिक भेद न करता सर्वांना पोटाशी घेणाऱ्या संस्कृतीला आपण सुसंस्कृती म्हणतो. या संस्कृतीचे महत्त्व माणसांच्या मनांवर बिंबविणाऱ्या शिकवणुकीला आपण सुसंस्कार म्हणू आणि माणसांच्या मनांना परस्पर घृणा, द्वेष आणि अविश्वास शिकविणाऱ्या प्रक्रियेला आपण कुसंस्कार म्हणू.

याचा अर्थ असा की संस्कार सुसंस्कार आणि कुसंस्कार असे दोन भागात वाटता येतात. कुसंस्कार म्हणजे विघातक संस्कार! मानवी मनांना अमानुषता शिकविणारे संस्कार म्हणजे कुसंस्कार! आता अमानुषता म्हणजे काय ते पाहिलं पाहिजे. माणसांनी एकमेकांना काळ्या पाण्यात पाहणे म्हणजे अमानुषता. माणसांना भांडणांची विद्या शिकवणं म्हणजे अमानुषता! हा आपला, तो परका, हे उच्च, ते नीच असं मुलांना शिकवणं म्हणजे त्यांच्या मनात अमानुषता भरणं. मुलांना दैववाद शिकवणं, त्यांना अंधश्रद्धा शिकवणं आणि आळस शिकवणं म्हणजे त्यांच्यावर कुसंस्कार करणंच होय. मुली-मुलं आणि समाजातील सर्वांवरच आज सुसंस्कार करणं म्हणजे काय? तर पाण्याची नासधूस करू नका. पाणी साठवा. जपून वापरा. विजेचा गैरवापर करू नका. फटाके फोडू नका. कोणत्याही सणाच्या निमित्तानं लाकडे जाळू नका. लोकसंख्येला आळा घाला. झाडे लावा. झाडे वाढवा. अंधश्रद्धा नष्ट करा. वाट्याला आलेलं काम जीव ओतून करा. आळस करू नका. वेळ फुकट घालवू नका. आपण मनात आणलं आणि त्यासाठी कष्ट घेतले तर भोवतीचं जग आपण चांगलं करू शकतो यावर विश्वास ठेवा. खोटं बोलू नका. कोणाचं शोषण करू नका. भ्रष्टाचाराला

पृथ्वीच्या पाठीवर आपण जन्माला आलो. एकमेकांना सहकार्य करीत जगू! या छोट्याशा आयुष्यात सर्वच लोकांच्या भल्यासाठी जगू. विज्ञानातले शोध लावू. तत्त्वज्ञानं निर्माण करू. साहित्याची आणि इतरही कलांची निर्मिती करू. एकमेकांना समृद्ध करू. एकमेकांना काळजाच्या नात्यानं सहकार्य करू. कोणी कोणाचा गुलाम असणार नाही. कोणी कोणाचा मालक असणार नाही असं जग निर्माण करायचा प्रयत्न करू. धर्मांधता, दहशतवाद, भीषण स्पर्धा, भ्रष्टाचार, यांत्रिकता, क्रौर्य, चंगळवाद या सर्वच गोष्टी आज दुनियेच्या जिवावर उठलेल्या आहेत. यावेळी माणसानं मागं पहावं. पण मागं जाऊ नये. कुटुंब, साहित्य, शिक्षणसंस्था, प्रसारमाध्यमं या सर्वांनीच आता दुनियेला वाचवणाऱ्या संस्कारांची निश्‍चिती करायला हवी. तुच्छता, भ्रष्टाचार, असहिष्णुता शिकवणारे संस्कार गाडून टाकण्याची आणि माणसं परस्परांना तळहातावरच्या फोडाप्रमाणं जपतील असे विश्‍वतारक संस्कार करण्याची आज गरज आहे.

तरुण पिढी म्हणजे देशाचं उज्ज्वल स्वप्न. समाजाचा आधारस्तंभ. देशाला गौरव वाटेल अशा संस्काराशी तरुण पिढीनं स्वत:ला जोडून घेतलं पाहिजे. आजची तरुणाई बुद्धिमान आहे. अष्टावधानी आहे. या पिढीच्या खांद्यावरच राष्ट्राच्या भवितव्याची धुरा आहे. म्हणून तरुणाईनं तिला प्रकाशमान करील आणि राष्ट्रालाही गौरव वाटेल अशा संस्कारांची निर्मिती करावी आणि ही पिढी अशा विधायक संस्कारांशी जोडून घेईल ही खात्री मला आहे.

# २२. संकल्प

मानव हा संकल्प करणारा प्राणी आहे. आजवरची मानवी जीवनाची वाटचाल संकल्पांचे बोट धरूनच झालेली आहे. संकल्प माणसाला सतत प्रयत्न करायला लावतात. सतत धडपड करायला लावतात. माणूस संकल्प करतो आणि ते प्रत्यक्षात यावे यासाठी आटापिटा करीत राहतो. संकल्प पूर्ण व्हावा म्हणून तो शक्ती पणाला लावीत राहतो. ही प्रक्रियाच माणसाला वाहते ठेवते. या प्रक्रियेमुळेच माणूस विकासाच्या पायऱ्या चढत राहतो. भौतिक आणि नैतिक स्थलांतराची ताकद या प्रवृत्तीमुळेच माणसाला प्राप्त होत जाते.

त्यामुळेच आजवरच्या मानवी जीवनाचा इतिहास हा मानवाने केलेल्या संकल्पांचा आणि या संकल्पांच्या सिद्धीसाठी केलेल्या धडपडीचा इतिहास आहे असं म्हणावं लागेल. कारण संकल्प हे मानवी मनाला जगण्याचे प्रयोजन देतात. संकल्प मानवी मनाला गोठू देत नाहीत. ते मानवी मनाला निष्क्रिय होऊ देत नाहीत. मुळात मानवी जीवनाला कोणत्याही पायऱ्या नसतात. मानवी मन संकल्प करते आणि मानवी जीवनाच्या पायऱ्या तयार होतात. संकल्पिलेल्या शेवटच्या पायरीवर मानवी मन पोचले की परत मानवी मन नव्या संकल्पाची पायरी मनात निर्माण करते. त्या पायरीवर पोचण्यासाठी शक्ती पणाला लावतं. नवा संकल्प करणं, तो सिद्ध व्हावा यासाठी आपल्या शक्तींना कामाला लावणं, तो संकल्प सिद्ध झाला की परत नव्या संकल्पाची निर्मिती करणं ही प्रक्रियाच मोठी सुंदर आहे. कारण ही प्रक्रियाच मानवी जीवनाला प्रयोजन देते. दिशा देते आणि अर्थपूर्णताही देते.

माणूस ज्या ठिकाणी आला तिथून पुढल्या ठिकाणी जाण्याची प्रेरणा हे संकल्पच माणसाच्या मनात चेतवतात. माणसाचं जिवंतपण असं या संकल्पांशी बांधलेलं आहे. संकल्प करण्याची शक्ती मानवी मनाला लाभली नसती तर मानवी जीवनाला कोणती नवी पालवीच आली नसती. ते कायम लोळागोळा होऊन पडलं असतं. संकल्पाचं पोषणद्रव्य नसतं तर मानवी जीवनाचं बी जमिनीतच कुजून मेलं असतं. आणि आज दिसतो तो नाना फांद्यांचा, नाना रंगांचा, नाना सुगंधांचा आणि नाना फुला-फळांचा

असं म्हटलं पाहिजे.

संकल्प व्यक्तिगत पातळीवरचे असतात. सामूहिक पातळीवरचे असतात तर काही राष्ट्रीय पातळीवरचे असतात. भारत नावाच्या आपल्या राष्ट्रानं आपला संकल्प आपल्या संविधानाच्या उद्देशिकेत मांडला आहे आणि तो संकल्प प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार केला आहे. प्रत्येकच व्यक्ती जीवनात सतत संकल्प करीत असते. समाजातील व्यक्तींचे समूहसुद्धा संकल्प करीत असतात. विद्यार्थी, उद्योजक, साहित्यिक, शिक्षक, शेतकरी, भगिनी, संस्था, विद्यापीठ, मजूर सर्वच आपापल्या प्रकृतीनुसार संकल्प करीत असतात. वाढदिवस, नव्या वर्षाची सुरुवात अशा वेगवेगळ्या निमित्तानंही संकल्प केले जातात.

पण संकल्प समाजाला सुसंस्कृत करणारे असावेत. सर्वांच्याच हिताची काळजी संकल्पांनी गंभीरपणे वाहावी. संकल्प प्रबुद्ध आणि प्रज्ञानी असावेत. इतरांना ओरबाडणारे आणि दुःख देणारे संकल्प अमानुष आणि बेजबाबदार असतात. संविधानाच्या उद्देशपत्रिकेला गौरव वाटेल असेच संकल्प आपण करायला हवेत.

❖❖

# २३. जयंती

जन्माला येणाऱ्या प्रत्येकालाच जन्मदिवस असतो. जे आपल्या मर्यादांवर मात करीत सतत वाढत असतात त्यांच्या जन्मदिवसाला वाढदिवस म्हटलं जातं. आणि जे जीवनातील सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमतेविरुद्ध संग्राम सुरू करतात आणि विजयी होतात त्यांचे जन्मदिवस जयंती म्हणून साजरे केले जातात. जे भोवतीच्या मर्यादांवर विजय मिळवितात त्यांची जयंती साजरी केली जाते. सर्वांना समान न्याय देणाऱ्या जीवनाचे नकाशे निर्माण करतात त्यांची जयंती साजरी केली जाते. जे जीवनातील असमतोलाविरुद्ध युद्ध करतात आणि त्यात जयवंत होतात त्यांची जयंती साजरी होते. अज्ञानाविरुद्ध जे संघर्ष करतात आणि त्यात यशस्वी होतात त्यांची जयंती केली जाते. अशा जयवंतांचे जन्मदिवसही जयंती होतात. त्यांचे वाढदिवसही जयंती होतात. आयुष्य विजयी होत जाते आणि जन्मदिवस जयंती होतो. जयंतीचा संबंध असा जयाशी, विजयाशी वा जिंकण्याशी असतो.

काही आयुष्ये माणुसकीच्या जिवावर उठलेल्या संकटांवर विजय मिळवितात. काही आयुष्ये विषमतेच्या छावण्यांवर विजय मिळवितात. काही प्रज्ञा विषमतेच्या तत्त्वज्ञानांवर विजय मिळवितात. जी आयुष्ये उजेडाचे ग्रंथ होतात आणि अंधारांच्या ग्रंथांना पराभूत करतात, त्यांची जयंती होते. असे माणुसकीचे रस्ते स्वच्छ करणारे विजय ज्या कर्तृत्वाच्या खात्यावर जमा होतात त्यांची जयंती होण्यात जयंतीलाही गौरव वाटतो.

अशी जयंती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, भारतातच नव्हे तर संपूर्ण विश्वात ही जयंती साजरी केली जाते.बाबासाहेबांची जयंती अशी जयंती आहे की जी त्यांच्या हयातीतच सुरू झाली आणि त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर आजवर दिसामासी मोठीच होत आहे. या जयंतीचा दिवसेंदिवस अवकाश विस्तृत होत आहे आणि तिच्यामागील कृतज्ञतेची खोलीही दिवसेंदिवस वाढत आहे.

संपूर्ण जगातीलच बहिष्कृतांच्या जगावर परिवर्तनाचा मांडव घालते. लाचारीच्या हातात नव्या युगाची अक्षरं देते. अन्यायग्रस्तांच्या हातात अंधार जाळणारे सूर्य देते. ही जयंती जगभर प्रेरणांचे दिवे लावते आणि त्यांच्या उजेडात क्रांतीच्या इतिहासाला नव्या वाटा दिसतात.

लाखो वर्षांच्या नंतर जन्माला येणाऱ्या या क्रांतीमानवाची जयंती दुनिया क्रांतीची जयंती म्हणून साजरी करते. जगभरच्या वंचितांना ही जयंती नव्या स्वाभिमानी जीवनाचं आश्वासन देते. दुनियेतील सर्वच अन्यायग्रस्तांना ही जयंती आपल्यावरील अन्याय नष्ट करणाऱ्या औषधासारखी वाटते. तुरुंगातून बाहेर पडता येणाऱ्या उघड्या दारासारखी वाटते.

ज्या युगनायकाची ही जयंती आहे त्यानं दुःखांमध्ये भेद केला नाही. लोभी माणसांनी निर्माण केलेल्या दुःखांविरुद्ध त्यानं महायुद्ध सुरू केलं. मानवी जीवनाला त्यानं दुःखमुक्तीची सनद दिली. दुःख आदिवासींचं असो. भटक्याविमुक्तांचं असो. स्त्रियांचं असो, अल्पसंख्याकांचं असो, दुःख या वस्तुस्थितीलाच त्यानं आव्हान दिलं. तो दुःखनिर्मूलनाचा महान तत्त्वज्ञानी ठरला. सर्वच दुःखितांना तो आपलं दुःख नष्ट करणारी विश्वासू माय वाटला. म्हणून दुनिया कृतज्ञतेनं भीमाईची जयंती साजरी करते. दुनियेतील सर्वच दुःखितांना ही जयंती उजेडाची, महासूर्याची, क्रांतीची जयंती वाटते. नव्या जगाच्या सर्जनाची जयंती वाटते. या जयंतीला सारी दुनिया मुक्तीचे विद्यापीठ मानते.

# २४. साहित्य

साहित्य म्हणजे मानवी जीवनावरचं जबाबदार भाष्य! जीवन म्हणजे माणसांच्या संबंधांचं जाळं. या संबंधांची गुंतागुंत! या गुंतागुंतीत सर्वच असतं. क्रौर्य असतं. जिव्हाळा असतो, प्रेम, द्वेष, लोभ असतो. दानत असते, औदार्य असतं, संकुचितपणा असतो. कोसळणं असतं, उसळणं असतं, निराशा असते, स्वप्नं असतात, अगतिकताही असते. शक्तीचा उद्रेक असतो. सौहार्द, हृदयशून्यता, वैर आणि करुणाही असते. मृत्यूसारखी निसर्गानं दिलेली दुःखं असतात. माणसांनी निर्माण केलेली सामाजिक, आर्थिक विषमतेची दुःखं असतात. माणूस या सर्व जटिल गुंतवळ्याच्या गर्दीत मनासारखं जगण्याची धडपड करीत असतो.

या प्रक्रियेत तो कधी इतरांना ओरबाडतो आणि जीवनावर रक्ताचे डाग पडतात. कधी मनासारखं जगता येत नाही म्हणून खुद्द माणूसच स्वतःला खात बसतो. हे जीवन म्हणजे आव्हानांचा महासागर आहे.

साहित्य या आव्हानांच्या महासागराची मर्म मांडतं. सागर उपसता येत नाही. जीवनाचंही असंच असतं. जीवन कितीही उपसलं तरी जीवनाच्या व्यवहाराचं अखेरचं मर्म हाती लागत नाही. साहित्याचा त्यामुळे सतत मर्मशोध सुरू असतो. हा शोध कधी संपत नाही. जीवनाच्याही नवनव्या मर्मांनी फुलण्याच्या स्वभावाला अंत नाही. साहित्य ही जीवनाच्या मर्मशोधाची प्रक्रियाही त्यामुळे अखंडच असते. जीवनाचं आणि साहित्याचं असं नातं आहे. हे नातं कधीच संपत नाही.

साहित्य बदलतं. कारण जीवन बदलतं. जीवनात भौतिक बदल दाखल होतात. हे बदल जीवनाला नवनव्या तपशिलांची गर्दी देतात. ही गर्दी मानवी संबंधांना नवनवे आयाम देते. या संबंधांची गुंतागुंत या गर्दीसोबत वाढतच जाते. जग बदलतं असं आपण म्हणतो. या म्हणण्याचा अर्थ तपशील बदलतो असा असतो. साहित्यानं या बदलत्या तपशिलामुळे मानवी संबंधांना जी नवी पालवी येते तिची मर्मे समजावून घ्यायची असतात आणि कलापूर्ण पद्धतीनं साक्षात करायची असतात.

सहित चालतं ते साहित्य. जीवन तपशिलासोबत चालतं. साहित्य या जीवनासोबत चालतं. जीवनाच्या सुखदु:खासोबत चालतं. साहित्य जीवनासोबत हसतं. जीवनासोबत रडतं. जीवनाच्या साऱ्याच परिसरावर साहित्याची नजर पसरलेली असते. या सर्व भौतिक तपशिलातून वाट चालणारा आणि संबंधांचे बदल अंगावर घेणारा माणूस हाच साहित्याचा एकमेव विषय आहे. जीवनात घडणाऱ्या एकूणच घडामोडींचं प्रतिनिधित्व माणूस करतो. तोच या घडामोडी निर्माणही करतो आणि त्यांच्या परिणामांची बरी वाईट फळंही भोगतो. समुद्रावर तरंग, लाटा-लहरी उसळत असतात तसे मानवी संबंधांचे तरंग आणि लाटा लहरी मानवी जीवनावर उसळत असतात.

साहित्य या सर्व बदलांची मर्मे टिपतं आणि या तपशिलाच्या संबंधांच्या गुंतवळ्यातून मानवी सौहार्दाच्या वाटा निर्माण करून ठेवतं. साहित्य केवळच प्रश्न मांडत नाही. या प्रश्नमांडणीतच प्रश्नांच्या सोडवणुकीची सूत्रं अदृश्यरूपात गुंफून ठेवतं. साहित्याला हे करावंच लागतं. या मार्गानंच साहित्याला मानवी मनाच्या मूलभूततेचं प्रकाशन करण्याचं उदंड सामर्थ्य लाभतं.

# २५. भाषा आणि समाजविकास

भाषेचे प्रवाहीपण समाजाच्या प्रवाहीपणावर अवलंबून असते. जो समाज जीव ओतून जीवनाची सतत नवनव्याने निर्मिती करतो आणि त्याला जातिवर्गविहीन करण्यासाठी अग्रक्रमाने झटतो त्याची भाषाही नवनव्याने निर्माण होत असते. जो समाज सतत घडत राहतो त्याची भाषाही सतत घडत राहते. भाषेचा जिवंतपणा ही समाजाच्या जिवंतपणाचीच खूण असते. जो समाज ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि साहित्य अशा क्षेत्रात सतत नवनवी क्षितिजे जन्माला घालतो; 'जीवाचा जणू हाचि धर्म दिसतो जावे पुढे–त्यापुढे!' या वृत्तीने जीवनाला विकासाची दारे प्रयत्नपूर्वक उघडून देतो तो समाज स्वतःही जगतो आणि जीवनालाही जगवतो. त्याच्या भाषेला ग्रीक, लॅटिन वा संस्कृत या भाषा होण्याची भीती नसते. कारण असा समाज आपल्या भाषेलाही मरू देत नाही. जो समाज आपल्या वर्तमानकाळाला आपल्या भूतकाळापेक्षा वेगळे आणि अद्ययावत करण्यात यशस्वी होतो तो समाज आपल्या आणखी वेगळ्या आणि प्रदीप्त भवितव्याचा निर्माता ठरत असतो. अशा समाजाची भाषाही प्रवाही राहते. ती नवनवी रूपे धारण करते. समाज आपले भावनिक आणि वैचारिक असे सगळेच जगणे भाषेतून मांडत असतो. समाजाचा आणि भाषेचा; समाजाच्या विकासाचा आणि भाषेच्या विकासाचा असा सेंद्रिय संबंध आहे. जीवन सतत निर्माण करण्याच्या प्रक्रियेत प्राणपणाने गुंतलेल्या समाजाने आपल्या भाषेची काळजी करण्याचे कारण नसते.

१

भाषा ही सतत घडत राहणारी आणि वाढत राहणारी प्रक्रिया आहे. ती आपल्या भाषकाइतकीच परिवर्तनशील आणि संवर्धनशील असते. तिच्या भाषकाचे प्रवाहीपण हेच तिचे प्रवाणीपण असते. त्यामुळे भाषकाच्या परिवर्तनाचा वेग हाच भाषेच्याही वृद्धीचा वेग ठरतो. भाषा त्या त्या समाजाची भावनिक, वैचारिक आणि व्यावसायिक अभिव्यक्ती करते. समाजाच्या गरजांनुसार भाषा बदलते. म्हणून जो समाज नवनव्या गरजांची निर्मिती करतो तो समाज आपल्या भाषेलाही वाढवितो. जीवनाचे संवर्धन

करणाऱ्या अलक्षित क्षेत्रांचा धांडोळा समाज ज्या प्रमाणात घेतो त्या प्रमाणात त्याची भाषा बहुपल्लवी आणि बहुशाख होत जाते. जीवनाच्या वेगवेगळ्या शाखांमध्ये माणसे शिरतात, त्या शाखा समृद्ध करीत जातात आणि त्या शाखांमधील शब्द भाषेच्या खात्यावर जमा करीत जातात. हे ज्या प्रमाणात घडते त्या प्रमाणात भाषेचा शब्दसंसार आणि संज्ञा संकल्पनाचा प्रपंच वाढत जातो. श्री.म.माटयांनी फार पूर्वीच हे भाषाभिवृद्धीचे सूत्र सांगितले आहे. जीवनाची वृद्धी म्हणजे त्याच्या भौतिक साधनांची वृद्धी आणि ज्ञानविज्ञानांची वृद्धी भाषेत जमा होते. भाषेची श्रीमंती याप्रकारे वाढत जाते. या अर्थानेच भाषा ही सामाजिक संस्था आहे असे ख्रिस्तोफर कॉडवेल म्हणतो. संदेशन हे भाषेचे अंगभूत कार्य आहे; पण समाजातील प्रज्ञा आणि प्रतिभा नवनिर्मिती करीत ज्या प्रमाणात जीवनाचे व्याप वाढवितात त्या प्रमाणात त्या व्यापांच्या यथार्थ संदेशनासाठी भाषेला सतत अद्ययावत राहणे आवश्यक असते. पुढे जाणाऱ्या समाजाची भाषा मागे राहत नाही. जिवंत समाजाची भाषा मरत नाही. समाजाचे थांबणे हे भाषेचेही थांबणे ठरते. समाजात निर्माण झालेले आवर्त भाषेलाही कुंठित करते. जो समाज चालतो त्याची भाषा चालते. जो समाज धावतो त्याची भाषा धावतो. जो समाज भराऱ्या घेतो त्याची भाषा भराऱ्या घेते. एखादा समाज मागे जातो तेव्हा त्याची भाषाही मागे जाते. समाज परंपरावादी होतो तेव्हा भाषाही परंपरावादी होते. समाजाची संवर्धनशीलता वा समाजाची अवरुद्धता अशा सर्वच गोष्टीची बखर भाषेतूनच लिहिली जात असते. बाराव्या-तेराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत मराठी भाषा अध्यात्माच्या स्थितीशील परिघातच वावरली. या भाषेने समाजालाही ऐहिकाची दारे बंद ठेवली आणि स्वतःलाही तिने विकासापासून वंचित ठेवले. एकोणिसाव्या शतकापर्यंतची मराठी भाषेतील शब्दांची संख्या मोजली आणि ऐहिक जीवनाशी आणि इतर भाषांशी मराठी समाजाचा संपर्क आल्यानंतर तिची वाढलेली शब्दसंख्या मोजली तर भाषेच्या थांबण्याचे आणि प्रवाहित्वाचे सूत्र आपणाला सापडू शकेल.

२

आपापल्या धर्मात आणि जातीत जगणाऱ्या आणि इतर प्रवाही समाजांचे संपर्क टाळणाऱ्या लोकांच्या भाषा निष्पर्ण होत जातात. या भाषांना नवी पालवी येण्याची प्रक्रियाही थांबते. इतर भाषकांच्या आणि भाषांच्या संपर्कामुळे आपल्या भाषेची शुद्धता नष्ट होईल असे ज्या भाषकांना वाटते त्यांच्या भाषा आटून जातात. म्हणूनच जिवंत राहू इच्छिणाऱ्या, अन्वर्थक राहू इच्छिणाऱ्या जगातल्या कोणत्याही भाषेने परभाषकांच्या संपर्काला आणि देवाणघेवाणीला जीवनसत्वे मानायला हवे. आपली भाषा शुद्ध आहे आणि ती आपण शुद्धच ठेवायला हवी असे वाटणारे मानवी समूह

होणाऱ्या नव्या जीवनघटितांपासून आणि त्या लोकांच्या भाषांपासून पोषणद्रव्ये स्वीकारीत भाषांनी प्रवाही राहणे होय हे आता मान्य करायला हवे. मृत्यूच्याही संकटापासून भाषा वाचवू इच्छिणारांनी आपल्या भाषेला इतर भाषांच्या गर्दीत वावरू द्यावे. भाषांच्या संपर्कात वावरणे म्हणजे भाषकांच्या जीवनव्यवहाराचा परिचय करून घेणे होय. तसेच त्यांनी निर्मिलेल्या नवनव्या घटितांशी आणि त्या घटितांच्या परिभाषेशी नाते जोडणे होय. हे सर्जनशील नाते भाषकांना आणि त्यांच्या भाषांनाही समृद्ध करीत असते.

इतर भाषांचा संपर्क टाळणारे; इतर भाषकांना टाळणारे आणि इतर प्रांतामधील आणि इतर देशांमधील लोकांना टाळणारे समाज स्वयंकेंद्रित होतात. आपल्या उणिवा त्यांच्या लक्षात येत नाहीत. या उणिवा लोकांच्या लक्षात येऊ नयेत यासाठी स्थितीवाद्यांचे राजकारण सुरू असते आणि असे स्वयंतुष्ट समाज मग विकासाचा हात सोडून स्वतःला निर्वातात ढकलत असतात. आदानप्रदान, देवाणघेवाण ही प्रक्रिया नाकारणारा समाज आपला परिघ कधीही विस्तारू शकत नाही आणि विस्तार टाळणारा परिघ स्वतःच्या ऱ्हासाचा शिल्पकार होण्याशिवाय दुसरे काहीही करू शकत नसतो.

३

एकेका भौगोलिक टापूतही अनेक बोली बोलल्या जात असतात. बोली त्या त्या विवक्षित समूहाचे संपर्कमाध्यम असते तसे त्या बोलींमध्ये वाङ्मयही निर्माण होत असते. झाडीबोली, वऱ्हाडी, मराठवाडी, खानदेशी, कोकणी, आगरी, कोळी, आदिवासींच्या बोली, भटक्याविमुक्तांच्या विविध बोली अशा खूप बोली आहेत. शहरांमधील झोपडपट्ट्यांमध्ये अनेक बोलींचा गुंतवळा झालेला असतो. ती ती बोली बोलणाऱ्या लोकांचे उच्चार वेगवेगळे असतात. शब्दरूपे वेगवेगळी असतात. भौगोलिक पार्श्वभूमीनुसार वस्तुरूपेही वेगवेगळी संभवतात. त्या संदर्भात वेगवेगळी शब्दरूपेही संभवतात. बोलींची ही वेगवेगळी शब्दरूपे, त्यांचे अपभ्रंश वा त्यांचे उच्चार अशुद्ध आहेत असे म्हणणे योग्य नव्हे. कोणतीही बोली अशुद्ध नसते. त्या त्या प्रदेशातील विवक्षित समूहात ती बोली संदेशनाचे कार्य व्यवस्थित करीत असते. संदेशनाचे आपले कार्य उत्तमरीत्या करणारी कोणतीही बोली अशुद्ध आहे म्हणून तिला नाके मुरडणे हे बोलीविज्ञानाच्या वा भाषाविज्ञानाच्या शिस्तीत बसत नाही. ही गोष्ट भाषिक सुसंस्कृतपणाची द्योतक ठरू शकत नाही. तेव्हा बोलींची शुद्धता मान्य करायलाच हवी.

आता एखाद्या प्रांतात वा प्रदेशातही वेगवेगळ्या धार्मिक समूहांच्या वा सामाजिक समूहांच्या वेगवेगळ्या बोली असतात; पण या सर्व बोली बोलणारांच्या शैक्षणिक

सौकर्यासाठी एखादी प्रमाणभाषा निश्चित करावी लागते. सर्व बोलींचे प्रतिनिधित्व करणारे भाषारूप असेच प्रमाणभाषेचे रूप असायला हवे. याचा अर्थ प्रमाणभाषा बोलींच्या खांद्यावरच उभी असते. सर्व बोलींच्या समूहांनी आपल्या भाषकांसाठी तयार केलेले सर्वांना समाईक असलेले भाषारूप म्हणजे प्रमाणभाषा होय. सर्व बोलींच्या सभासदांना समजू शकेल अशी भाषाच या सर्व भाषकांची प्रमाणभाषा ठरली पाहिजे. पुण्याच्या सदाशिवपेठेतील भाषा म्हणजेच प्रमाणभाषा हे समीकरणच चुकीचे आहे. असे समजणारे लोक आपल्या प्रमाणभाषेचीही वाढ खुंटवीत असतात. पुण्यातील ब्राह्मणी भाषा हीच प्रमाणभाषा असे म्हणणारे लोक एकतर इतर बोलीभाषकांचा अवमान करीत असतात आणि भाषासंबंधीचे अज्ञानही प्रकट करीत असतात. प्रमाणभाषा हे सर्व बोलींचेच संमेलन असले पाहिजे. प्रमाणभाषा ही सर्व बोलींमधील शब्दांच्या अधिष्ठानावर उभारली गेली पाहिजे आणि या सर्व बोलीकडून प्रमाणभाषेने सतत शब्द घेतले पाहिजेत. बोलींनीही इतर बोलींकडून आणि इतर समूहांचा, नवनव्या भौतिक विकासाच्या प्रक्रियेतून शब्द घेऊन स्वतःला प्रवाही ठेवले पाहिजे आणि या प्रवाही बोलींपासून प्रमाणभाषेने सतत आपले भरणपोषण करीत राहिले पाहिजे. बोली असोत की प्रमाणभाषा असोत या सर्वच भाषासंस्थांनी इतर प्रांतांच्या, इतर देशांच्या बोलींकडून आणि प्रमाणभाषांकडून सतत शब्द घेतले पाहिजेत आणि स्वतःला प्रवाही, अन्वर्थक, अद्ययावत, स्वागतशील आणि जागृत ठेवले पाहिजे. हे पथ्य पाळणाऱ्या बोलीही मग मरत नाहीत आणि त्यांच्या जिवावर बहरणाऱ्या प्रमाणभाषाही मरत नाहीत. प्रमाणभाषांनी बोलींच्या आणि बोलीसमूहांच्या शोषणाचे कार्य मात्र करू नये. त्यांनी सामान्यांची दिशाभूल करू नये. सर्व दुष्ट युक्त्या वापरून त्यांना परिघाबाहेर सडवू नये. प्रमाणभाषांनी गरिबांचे गळे कापण्याचे हिटलरी कार्य करू नये. असे झाले तर प्रमाणभाषा कृतघ्न आहेत असे सिद्ध होईल आणि त्या आपली नैतिकता गमावून बसतील.

४

आणखी एक असे की राजकारणाची भाषा संविधानाच्या प्रास्ताविकेकडे पाठ फिरविणारी नसावी. राजकारणाची भाषा संविधानातील समाजवादाची प्रतारणा करीत असेल तर ती भाषा संविधानद्रोही आहे आणि भारतीय संविधानाची फसवणूक ती करीत आहे असा त्याचा अर्थ होईल. म्हणून राजकारणाच्या भाषेने संविधानाचा सन्मान केलाच पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी की भाषेचे राजकारण करणे म्हणजे भाषेची आणि ती भाषा बोलणाऱ्या लोकांची निव्वळ फसवणूक करणे ठरते. महाराष्ट्राचे आणि देशाचेही कळीचे प्रश्न जातीनिर्मूलन, आर्थिक विषमतेचे निर्मूलन, अंधश्रद्धानिर्मूलन, भ्रष्टाचार-निर्मूलन, दहशतवादनिर्मूलन, धर्मांधतानिर्मूलन, बेरोजगारीचे निर्मूलन आणि महागाईचं

नियंत्रण ठेवणे, स्त्रियांना मानवाधिकार देणे, मतदारांना प्रशिक्षण देणे आणि देशातील सर्वहारांना क्रांतिकारी शिक्षण देणे हे आहेत. पण हे कळीचे प्रश्न दुर्लक्षिले जातील असे भावनिक प्रश्न केवळ सत्तेची पोळी भाजण्यासाठी निर्माण केले जातात. भाषेचेही राजकारण या उद्देशाने केले जाते. पण या राजकारणाने संविधानातील प्रास्ताविकेचे राजकारणही धोक्यात येते आणि भाषेचाही विकास थोपविला जातो. भाषा लोहचुंबकासारखी असावी लागते. तिने जगातील कोणत्याही भाषेतील शब्द ओढून घेतले पाहिजेत आणि कोणत्याही देशातील समाजाच्या ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रातील संकल्पना आपल्याकडे खेचून घेतल्या पाहिजेत. भाषांचे सक्षमीकरण आणि भाषांचा विकास याच मार्गाने होऊ शकतो. आता माहिती-तंत्रज्ञानाच्या स्फोटाच्या काळात आणि इंटरनेट, मोबाईल, संगणक यांच्या काळात दुनियेतील कोणत्याही समूहाला आणि त्यांच्या भाषेला मागे राहण्याचा अवकाशच उरला नाही. एकमेकींना समृद्ध करीतच यापुढे जगातील सर्व भाषांना जगता येणार आहे. ही संकल्पना परकी. हा शब्द परका. हा सोवळेपणा आता कोणत्याही भाषेला परवडण्यासारखा नाही. हा सोवळेपणा बाळगणारी भाषा आता आपला जगण्याचा आणि विकासाचा हक्क गमावून बसेल हे पक्के ध्यानात ठेवावे. तेव्हा भाषेचे राजकारण भाषेच्या जिवावर उठण्याचेच फक्त काम करील. आज कळीच्या प्रश्नांना भिडण्यानेच आणि जीवन गतिमान करण्यानेच भाषेचे संवर्धन होईल अशी विधायक भूमिका घेण्याची गरज आहे.

५

आता शिक्षण आणि भाषा यांच्या संबंधाचा विचार करू. त्या त्या टापूतील समूहांच्या बोलीतूनच सुरुवातीचे शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे आणि हळूहळू त्यांची प्रमाणभाषेचीही समज वाढवावी. प्रत्येक व्यक्तीला तिची बोली, तिची प्रमाणभाषा, राष्ट्रभाषा आणि इंग्रजी इतक्या भाषा किमान यायला हव्यात. जगाच्या कल्लोळांपासून कोणीही आता स्वतःला अलिप्त ठेवू शकत नाही. या कल्लोळाचा सर्व आविष्कार व्यक्तीने आपल्या बोलीतून, प्रमाणभाषेतून करावा पण या कल्लोळाशी जोडणारी इंग्रजीसारखी भाषाही व्यक्तीला अवगत असणे गरजेचे आहे. या प्रक्रियेतून बोलीही अद्ययावत होतील, प्रमाणभाषाही अद्ययावत होतील आणि असे होण्यातूनच समाजही आपला विकास साधत जाईल. भाषेचा विकास हा समाजाचाच विकास ठरतो आणि समाजाचा विकास हाच भाषेचा विकास ठरतो. या दोन्ही विकासप्रक्रिया परस्परोपकारकच असतात. या परस्परोपकारकतेकडे समाजातील सर्वच लोकांनी कधीही दुर्लक्ष करू नये.

# २६. मराठी कवितेचे छंदशास्त्र

आच्छादित करतो वा सुरक्षा देतो तो छंद असे यास्काचार्यांने म्हटले आहे. आनंद देतो तो छंद असे शाकटायनाने म्हटले आहे. वरील समजुती कवितेच्या बाह्यांग रचनेशी आणि या रचनेने मिळणाऱ्या विशिष्ट आस्वादाशी संबंधित आहेत. कवितेतील क्रिटिसिझम ऑफ लाईफशी; कवितेतील आशयाच्या प्रकृतीशी इथे संबंध जोडला जात नाही. निदान भारतीय छंदशास्त्रात तरी असे घडत नाही.

अगदी सुरुवातीला मानव बोलू लागला त्यावेळी त्याची भाषा कशी होती? या संदर्भात अनेक उपपत्ती सांगितल्या गेल्या आहेत. त्यातील एक उपपत्ती असे म्हणते की ही भाषा लययुक्त वा छंदोबद्ध असावी. या उपपत्तीनुसार छंदोमय भाषा आदिमानवापासून चालत आलेली आहे असे म्हणता येते.

विशिष्ट लयसूत्रात केलेली ध्वनींची, अक्षरांची आणि शब्दांची बांधणी म्हणजे छंद होय. या बांधणीच्या वैविध्यानुसार वेगवेगळे लयबंध तयार होतात. त्यानुसार छंद, जाती, वृत्ते आणि मुक्तछंद अशा छंदप्रकारात कविता विभागता येतात. याप्रकारे छंदांची उत्पत्ती, त्यांची परंपरा, त्यातील वेगवेगळे प्रकार, जाती, लक्षणे, रचना, छंदांची संख्या, त्यांचे वर्गीकरण या सर्व छंदविषयक गोष्टींचे विवरण करणाऱ्या शास्त्राला छंदशास्त्र म्हटले जाते.

लयबद्ध शब्दरचना हे पद्यरचनेचे लक्षण मानले जाते. रचनेतील लयबद्धता ध्वनी, अक्षरे आणि शब्द यांच्या विवक्षित बांधणीमुळे शक्य होते. पद्यरचनेच्या पद्धतीला छंदोरचना म्हटले जाते. विशिष्ट क्रमाने ध्वनींची बंदीश केली जाते. ही बंदीश लयबद्ध असते. त्यामुळे छंदांच्या पायांनी काव्यरचना चालते असे म्हटले जाते. छंद भाषेला नृत्यमयता बहाल करतो. म्हणून छंद हा शब्द वृत्त वा पद्य या अर्थाने वापरला जातो.

सिंधू श्रमणसंस्कृतीमधील लोक भाषा बोलतच होते. कृषिकर्मे करताना वा इतर उत्सवांच्यावेळी हे लोक विशिष्ट लयीमध्ये वा तालात गाणी गातच होते. अक्षरनिर्भर

प्रकारासहित वाजसनेयी संहितेत आला आहे. या छंदांचा संबंध आर्य भारतात येण्यापूर्वीच्या सिंधू संस्कृतीमधील गेयपरंपरेशी असावा. या प्रकारे गेयरचना सिंधूसंस्कृतीपासून चालत आलेल्या असल्या तरी भारतात छंदशास्त्राचा प्रत्यक्ष आरंभ शौनकाच्या ऋक्प्रातिशाख्यात, कात्यायनाच्या सर्वानुक्रमाणीत, शांखायनाच्या श्रौतसूत्रात आणि त्यानंतर इ.स.पूर्व २०० वर्षे होऊन गेलेल्या पिंगलाच्या छंदसूत्रात छंदोरचनेच्या विचार झालेला आहे. बौद्धवाङ्मयातील छंदविचार आणि छंदांचे उपयोजन झालेले आहे. ग्रीक भाषेत इ.स.पूर्व चौथ्या शतकात छंदाचा अभ्यास अत्यंत प्रगल्भ पद्धतीने झाला होता.

मराठी छंदोरचनेचे नाते संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश भाषांमधील छंदोरचनांशी आहे. इ.स.बाराव्या-तेराव्या शतकात मराठीत ओवी-अभंग या छंदाचा वापर व्हायला लागला. त्यांचा संबंध लोकसंस्कृतीमधील गेयरचनांशी आणि प्राकृतातील रचनांशी आहे.

लययुक्त शब्दरचना हे मराठी पद्यरचनेचेही लक्षण आहे. शब्दांची विशिष्ट पद्धतीने बांधणी केली की रचनेत लयबद्धता निर्माण होते. अक्षरे, मात्रा, शब्द यांची ठराविक पद्धतीने बांधणी केली की रचनेत लयबद्धता निर्माण होते. या सूत्रानुसार मराठी कवितेतील सर्व रचना छंद, मात्रारचनेशी निगडित जाती, संस्कृतातून आलेली वृत्ते आणि १९३० नंतर मराठीत आलेला मुक्तछंद या चार भागात वाटता येतात.

ज्या रचनांमधील लयबद्धता अक्षरांच्या संख्येवरून ठरते त्या रचनांना छंद असे म्हटले जाते. मराठीत स्त्रियांच्या ओव्यांची रचना या पद्धतीने होते. अभंगरचनाही अक्षरांच्या संख्येशीच निगडित आहे. त्यातील गेयताही अक्षरांच्या बांधणीशीच संबंधित आहे आणि ओवी, अभंगांमधील लयबद्धतेला लघू-गुरुत्वाचा नियम लागू होत नाही.

जातीरचना ही मात्रांच्या बंदिशीवरून ठरते. लघूअक्षरांची एक मात्रा आणि गुरू अक्षराच्या दोन मात्रा मानल्या जातात. या प्रकारातील रचना आठ, सात, सहा, पाच तर कधी चार मात्रांच्या ओळींनी केली जाते. साकी, फटका, आर्या अशा असंख्य रचना जाती या वर्गात मोडतात.

वृत्तरचना हा छंदांचा तिसरा वर्ग होय. या प्रकारातील रचना अक्षरांच्यानुसार आणि त्यांच्या लघुगुरुत्वाच्या संख्येनुसार होत असल्याने या प्रकाराला अक्षरगणवृत्ते असे म्हटले जाते. भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका, मंदाक्रांता, पृथ्वी, हरिणी, शिखरिणी, शार्दूलविक्रीडित, इत्यादी वृत्तांमध्ये मराठीत लेखन झालेले आहे. संस्कृतवृत्ते मध्ययुगात पंडित कवींनी स्वीकारली. नंतरच्या म्हणजे केशवसुत, बालकवी यांच्या काळातही वृत्तांमधून कवितालेखन झालेले दिसते. अलीकडच्या

नाही.

लघू-गुरु मात्रांच्या अनुसार गझलेतही अक्षरांची बांधणी केली जाते. गझलेतील दोन ओळींच्या कडव्याला शेर म्हणतात. शेराच्या दोन चरणांपैकी एक चरण प्रस्तावनारूप असतो तर दुसरा समारोपस्वरूप असतो. गझलेतील या पदांना मिसरा अशी संज्ञा आहे. गझलेतील पहिला शेर सयमक असतो. या यमकाला मत्ला असे म्हटले जाते. गझलेतील अखेरच्या शेराला मतला असे म्हटले जाते. गझलेच्या पहिल्या शेरातील यमक पुढे समरचरणांमधून येते. या यमकाला काफिया तर अंत्ययमकाला रदीफ हे नाव आहे. मुसलसिल आणि गैरमुसलसिल हे गझलेचे दोन प्रमुख प्रकार मानले जातात. पहिल्या प्रकारात एकाच विषयाशी संबंधित शेरांची वा एकाच भाववृत्तीशी संबंधित शेरांची गुंफण केली जाते. या गझलप्रकाराची प्रकृती भावकवितेप्रमाणे वा भावगीताप्रमाणे असते. माधवराव पटवर्धनांनी अशा गझलेला मराठीत प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

गझलेच्या दुसऱ्या प्रकारात एकेका शेरात प्रकृतितः वेगवेगळे विषय वा भाववृत्ती मांडल्या जातात. या शेरांना यमक आणि वृत्त या गोष्टी एकत्र आणीत असतात. या दुसऱ्या प्रकारची गझल सुरेश भटांनी मराठीत लोकप्रिय केली.

पेशवाईतील कवी अमृतराय आणि मोरोपंत यांनी गझलसदृश्य लेखन केल्याचा उल्लेख केला जातो. पण पटवर्धनांच्या नंतर मराठीत विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, दिलीप चित्रे, आरती प्रभू, हिमांशू कुलकर्णी, संगीता जोशी, श्रीकृष्ण राऊत, भाऊ पंचभाई, नीलकांत ढोले, प्रमोद वाळके, सूर्यकांत मूनघाटे, इलाही जमादार, प्रदीप निफाडकर, ह्रदय चक्रधर, सिद्धार्थ भगत अशा अनेक गझलकारांनी गझलेला समृद्ध केले.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी युरोप-अमेरिकेत पद्यरचनेच्या संदर्भात मोठे परिवर्तन झाले. इंग्लंडमध्ये स्पंद ऱ्हिदमची सुरुवात झाली होती. त्यात फ्रेंच Verse Libre आणि अमेरिकेतील फ्रीव्हर्सच्या उपयोजनामुळे पद्यरचनेत मूलभूत परिवर्तन होऊ लागले होते. गणमात्रांवर आधारित रचनांचा काळ संपायला लागला होता. स्पोकन ऱ्हिदमला अनुसरणारा मुक्तछंद प्रतिष्ठित होऊ लागला होता.

एकोणिसाव्या शतकात भारतातील पद्यरचनाविचारही मुक्तछंदाकडे प्रवास करू लागला होता. यावेळी पयार छंदाचे अमित्राक्षरी म्हणजे निर्यमकी प्रवाही रूप मायकेल मधुसूदन दत्त यांनी सुरू केले आणि इतरही भारतीय भाषांप्रमाणे मराठीतही निर्यमक छंदाचे प्रयोग होऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी घंटय्या नायडू यांनी निर्यमक कविता लिहिली. विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात एकनाथ पांडुरंग

रदाळकर यांनी निर्यमक कविता लिहिली. पुढे वि.दा.सावरकरांनी वैनायक हे निर्यमक वृत्त जन्माला घातले. मुक्तछंद हा वृत्त, जाती वा इक्षरछंद या पारंपरिक पद्यप्रकाराहून पूर्णत: वेगळा छंद आहे. मुक्तरचना हीच त्याची प्रकृती आहे. तालबद्धतेवर आधारित आवर्तने हेच त्याचे लक्षण आहे. मुक्तछंद गेय नाही पण त्यात अंतर्गत लय मात्र असतेच. कविता डोळ्यांनी वाचावी आणि मनाने आस्वादावी असेच मुक्तछंदाचे म्हणणे जणू आहे. शब्दांमधील अर्थावर, आशयावर आघात देत मुक्तछंदातील कवितेचे वाचन केले जाते. १९३०-३५ नंतर मराठीत क्रमाने वृत्त जाती, छंद हे प्रकार कालबाह्य होत गेले.

मराठीत १९३०-३१ च्या सुमारास मुक्तछंदातून कवितालेखन व्हायला लागले. कवी अनिल, पु.शि.रेगे, वा.ना.देशपांडे, मनमोहन अशा कवींनी सुरुवातीला मुक्तछंदात लेखन केले. त्यांनी आपल्या रचनांना वेगवेगळी नावेही दिली. पु.शि.रेग्यांनी त्याला सहजकाव्य म्हटले. व्यंकटेश वकिलांनी त्याला बेबंद काव्य म्हटले तर श्रीशालीनदत्त शिदोरे यांनी त्याला छंदोविहीन काव्य म्हटले.

मुक्तछंद आला आणि वृत्त, मात्रा रचना हे छंदप्रकार मागे पडले. संस्कृत गणवृत्तेही इतिहासजमा झाली. आज वृत्तांमध्ये लेखन करणारा कवी मराठीत अपवादानेच दिसतो. गझललेखन करणारे कवी मात्र आहेत. पण तरीही मराठी कवितेची निर्मिती आज मुख्यत्वे मुक्तछंदातूनच होताना दिसते.

कुसुमाग्रज, मुक्तिबोध, विं.दा.करंदीकर, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, सदानंद रेगे, वसंत आबाजी डहाके, अरुण कोलटकर, चंद्रकांत पाटील, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, अरुण काळे, भुजंग मेश्राम, व्रजेश सोलंकी अशा अनेक कवींनी आणि नीरजा, अनुराधा पाटील, कविता महाजन, प्रज्ञा पवार अशा अनेक कवयित्रींनी मुक्तछंदातूनच लेखन केलेले आहे.

## मराठीत मुक्तछंदाचा अभ्यास

प्राचीन मराठीत छंदांसंबंधी लेखन झाले नाही. संत नामदेव, भीष्माचार्य, लक्ष्मीधर अशा लेखकांच्या लेखनातून अभंग ओवी यांचा उच्चार झाल्याचे दिसते. पेशवेकालात दैवज्ञ रामजोशी यांनी छंदोमंजरी या नावाने लिहिलेले प्रकरण थोडे महत्त्वाचे आहे. पण त्याला खूप मर्यादा आहे. परशुरामपंत गोडबोले यांनी 'वृत्तदर्पण' लिहिले. या पुस्तिकेत त्या त्या गणवृत्तातच रचना करून त्यांनी त्या त्या वृत्तांची लक्षणे सांगितली. त्यानंतर पाळंदे, केमकर, वैद्य, गोसावी, पाठक आणि वैशंपायन यांनी अनुक्रमे पद्यरचना, वृत्तमणिमाला, सद्‌वृत्तबोध, वृत्तादर्श, वृत्तमंजरी, वृत्तप्रकाश ही पुस्तके विद्यार्थ्यांसाठी लिहिली. वि.का.राजवाड्यांनी 'मराठी निबंध' या निबंधात ओवी, अभंग या छंदांचा विचार केला. या संदर्भातले मराठीतले पहिले

छंदविचाराचा भक्कम पाया होय. यापुढले या संदर्भातले मोठे कार्य ना.ग.जोशी यांनी 'मराठी छंदोरचना', 'मराठी छंदोरचनेचा विकास' आणि 'तुलनात्मक छंदोरचना' असे मोठे ग्रंथ लिहून केले.

शेवटी हे सांगितले पाहिजे की अमुक छंद, वृत्त वा मुक्तछंद यातून लिहिलेली प्रत्येक कविता चांगलीच असते वा वाईटच असते असे म्हणता येत नाही. छंद कसे सांगितलेशी निगडित आहे. 'काय सांगावे' यासबंधीचा विचार छंदशास्त्राच्या कक्षेत येत नाही. प्रतिगामी वा पुरोगामी, स्थितवादी वा प्रगतीशील, संकुचित वा असीम, स्थानिय वा वैश्विक अशा काव्याशयाची निश्चिती करण्यासाठी संघर्षशील काव्यशास्त्राचीच गरज आहे. आशय आणि त्याचा छंद यांच्याही अभिन्नतेचा एकजीव विचार असे काव्यशास्त्रच करू शकते.

कवी केशवसुतांनी 'नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमनासाठी जाणा' असे म्हटले ते या संदर्भात समजावून घेण्याची गरज आहे. 'अभिव्यक्तीचे सारे खतरे उठाने होंगे' असे गजानन माधव मुक्तिबोध का म्हणतात तेही लक्षात घेण्याची गरज आहे. 'गजल में बंदिशे अल्फाज नही, सब कुछ, जिगर का खून भी कुछ चाहिये असर के लिये' असे एखादा गजलकार का म्हणतो तेही समजावून घेण्याची गरज आहे. कवीच्या आतला उजेड प्रभावीपणे मांडण्यासाठी छंद आहे. जीवन विषयक मर्मशून्यता काहीही केले तरी छंद तारून नेऊ शकत नाही. कविता छंदात असेलच असे नाही. काव्यत्व मात्र छंदाशिवायही असू शकते. कवींनी ट ला ट च्या पुढे जाण्यास भाग पाडणाऱ्या अपरिहार्य अभिव्यक्तीच्या सतत शोधात असले पाहिजे.

# २७. विज्ञान, तत्त्वज्ञान आणि साहित्य

विज्ञान, तत्त्वज्ञान आणि साहित्य या तिन्ही प्रक्रिया अत्यंत गतिशील आहेत. विज्ञान काल्पनिक गोष्टींवर विश्वास ठेवीत नाही. प्रयोग हे विज्ञानाचे प्रमाण आहे. परीक्षणनलिका सांगते तेवढेच विज्ञानाचे सत्य असते. विज्ञानाने वेळोवेळी सांगितलेल्या सत्याच्या पावलांनीच दुनिया आजवर प्रगतीच्या वाटा चालत आलेली आहे.

''पूर्णाच्याही पलीकडे मन पुढे गूढे पहाया उडे
जीवाचा जणू हाचि धर्म दिसतो जावे पुढे - त्यापुढे।''

या प्रवृत्तीशी एकनिष्ठ राहतो तो खरा माणूस. तोच खरा तत्त्वज्ञानी आणि तोच खरा साहित्यिकही असतो.

एकूणच मानवी जीवनाचा इतिहास बघितला तर ही गोष्ट आपल्या मनावर प्रकर्षाने ठसते. माणूस मूलतः संशोधकच आहे. कमरेभोवती झाडाची पाने बांधणे, गुहा, अग्नी, कंद-मुळांचा खाण्यात उपयोग, शेती आणि तिच्यात पिकणारे धान्य हे अगदी प्रारंभकाळातील या माणसातील वैज्ञानिकाने लावलेले शोधच होते. प्रयत्न-प्रमाद पद्धतीने, चुका आणि शिका या पद्धतीने आज संगणक, इंटरनेट, मोबाईल, क्लोनिंग इथपर्यंत माणसातला हा वैज्ञानिक आला. तो चंद्रावर उतरला. मंगळावर त्याने पाणी असल्याचा शोध लावला. हा या माणसातील 'जावे पुढे-त्यापुढे' या प्रवृत्तीचाच परिपाक आहे.

या विज्ञानाबरोबर जीवन बदलत आले. तत्त्वज्ञाने विज्ञानासोबत बदलली. साहित्य तत्त्वज्ञानासोबत बदलले. खूपदा विज्ञानाला परंपरावाद्यांनी विरोध केला. खूपदा या परंपरावाद्यांनी वैज्ञानिकांचा, तत्त्वज्ञांचा आणि साहित्यिकांचाही छळ केला. खूपदा लोकांनी विज्ञानाने दिलेल्या सोयीसुविधांचा वापर केला, पण विज्ञानदृष्टीचा अंगीकार केला नाही. विज्ञानदृष्टीचा अंगीकार करणे न जमलेल्या लोकांनीच वैज्ञानिकांचा आणि त्यांना अनुसरणाऱ्या तत्त्वज्ञांचा आणि साहित्यिकांचाही छळ केला.

विज्ञानासोबत उत्पन्नाची साधने बदलली. भौतिक परिस्थिती बदलली. भौतिक विकासाचे मजल्यावर मजले चढले. शेकोटी ते विद्युत इथपर्यंतचे उजेडाचे वेगवेगळे आविष्कार आपण पाहिले. विज्ञानाने जगाची सगळी संरचना आणि माणसाच्या मनाचा पोत वेळोवेळी बदलून टाकला. औद्योगिकीकरण विज्ञानामुळे झाले. भांडवलशाही या नव्या आर्थिक संरचनेतून निर्माण झाली. मार्क्सला भांडवलशाहीच्या निर्मूलनाचे तत्त्वज्ञान मांडावे लागले. आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादाने कालकल्पनेची परिमाणे बदलून टाकली आणि दुनियेच्या मानसशास्त्राचा नवा प्रवास सुरू झाला. साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेत मोठ्या उलथापालथी झाल्या. ईश्वर न मानणाऱ्या फ्राइडने मानवी मनाची नवी दालने उघडून दिली. स्वप्नाची मीमांसा केली. असे खूप सांगता येईल; पण डार्विनच्या उत्क्रांतीवादाने जगाच्या समजुतींना मुळापासून हलविले. माणूस कसा निर्माण झाला हे त्याने उत्क्रांतीच्या तत्त्वाने समजावून सांगितले. पाश्चात्त्य धर्मसंस्थेच्या श्रद्धांना तडे गेले. सर्व जीवांमधील समता स्पष्ट होण्यासाठी आणि हजारो अंधश्रद्धांना मूठमाती देण्यासाठी उत्क्रांतीवादाचा मोठा उपयोग झाला. बायबल असो, वेद असोत की मनुस्मृती असो अशा सर्वच ग्रंथांमधील विश्‍व, वर्ण, जाती यांच्या निर्मितीच्या थियऱ्या कोसळून पडल्या. दुनियेतील अंधश्रद्धा चितेवर चढल्या. आपल्याकडील कर्मविपाकाच्या सिद्धान्ताची स्थिती पराकोटीची दयनीय झाली. तत्त्वतः त्याची भयानक बेअब्रू झाली. अर्थात आपल्याकडे अडीच-तीन हजार वर्षांपूर्वीच चार्वाकांनी आणि बुद्धाने हे त्यांच्या पद्धतीने सांगितले होतेच.

विज्ञानाने पृथ्वीवरील मानवाला अशा खूप चांगल्या गोष्टी दिल्या. पण काही लोभी आणि दुष्ट माणसांनी त्यांचा दुरुपयोगही केला. युद्धात त्यांचा विध्वंसक उपयोगही केला गेला. हजारो माणसे मारली गेली. दुसऱ्या महायुद्धात विज्ञानाचा विध्वंसक वापर कसा झाला हे आपण जाणतोच. पण महायुद्धामुळे सार्त्रला मानवाच्या अस्तित्वाचे पुन्हा महत्त्व पटवून देण्यासाठी अस्तित्ववादी तत्त्वज्ञान मांडावे लागले. त्याहीपूर्वी विज्ञानामुळेच आधुनिकीकरणाला प्रारंभ झाला. साहित्यात नवे दिवस उगवले. आज आपण जागतिकीकरणात प्रवेशलो. त्याच्या मुळाशी विज्ञानच आहे. जागतिकीकरणाच्या संदर्भात नवी तत्त्वज्ञाने, नवे साहित्य जन्माला येत आहे. आजचे युग 'आधुनिक मूल्ये' आणि 'प्रतिआधुनिक मूल्ये' यांच्या संघर्षाचे युग आहे. आधुनिकता समाजवाद घेऊन पुढे जात आहे तर प्रतिआधुनिकता मूलतत्त्ववाद, दहशतवाद, संवेदनशून्यता आणि मूल्यशून्यता यांचा पुरस्कार करीत आहे. या संदर्भात विज्ञानाची भूमिका तटस्थ आहे. विस्तवाचा वापर घर जाळण्यासाठीही करता येतो आणि स्वयंपाक करण्यासाठीही करता येतो. विस्तव ज्या हातात असतो त्या हातावर आणि त्या हातामागे असते त्या मनावर त्या विस्तवाचा विघातक किंवा विधायक उपयोग संभवतो. विज्ञान याप्रमाणेच निरिच्छ आहे. माणूस विध्वंसक असेल तर विज्ञानाचा उपयोग तो विध्वंसनासाठी

करील. माणूस सर्वहितैषी असला तर विज्ञान विधायक कार्ये करील.

इथे विज्ञानाचा, तत्त्वज्ञानाचा आणि साहित्याचा नीतीशी संबंध येतो. विज्ञानाला इच्छा नसते. धर्म नसतो. वर्ग नसतो. पण स्वार्थांध माणसे आपापल्या धर्मासाठी, वर्गहितासाठी विज्ञानाचा गैरवापर करीत असतात. इथे तत्त्वज्ञानाची आणि साहित्याची भूमिका सुरू होते. तत्त्वज्ञानाने आणि साहित्यानेही विज्ञानाला, वैज्ञानिकांना आणि विज्ञानाचा वापर करणाऱ्या सत्तांना सर्वकल्याणी मानवी नीतीशी जोडण्याचे कार्य करायचे असते. ही नीती पृथ्वीच्या पाठीवरील सर्वांच्याच सन्मानाची नीती असायला हवी. त्यासाठी तत्त्वज्ञांनी आणि साहित्यिकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वकल्याणी आणि सर्वांच्या सन्मानाची नीती स्वीकारायला हवी.

ग्लोबल वॉर्मिंग, मानवाच्याच चुकांमुळे बदललेले ऋतुमान आणि उद्ध्वस्त झालेला पर्यावरणाचा समतोल, बर्फाचे वितळणे आणि समुद्रांनी भूप्रदेश गिळायला प्रारंभ करणे, लोकसंख्यावाढ, वृक्षतोड, निरनिराळ्या मार्गांनी होणारे कार्बनचे अतिरिक्त उत्सर्जन या पार्श्वभूमीवर आपण मानवी जीवनाच्या संरक्षणाचा विचार करीत आहोत. उद्याला पृथ्वीवरील मानवी जीवनावर विनाश अंथरला गेला तर त्याची सर्व जबाबदारी आपल्या बेजबाबदारपणावर असेल. म्हणून तत्त्वज्ञानांनी, साहित्याने प्रतिआधुनिकतेच्या मूल्यशून्यतेची, संवेदनशून्यतेची, बेजबाबदारपणाची तरफदारी करायची की समता, बंधुता, सामाजिक न्याय, समाजवाद यांची आणि दुनियेचा विध्वंस टाळणाऱ्या जबाबदार मानवी वर्तनाची बाजू घ्यायची याचा गंभीरपणे विचार करायची गरज आहे. मला स्वतःला मनापासून तत्त्वज्ञानांनी आणि साहित्याने दुसरी बाजू घ्यावी असे वाटते. आज आपणा सर्वांच्याच जगण्याचे तेच हमीपत्र ठरू शकते.

# २८. रौप्यमहोत्सव : आनंद आणि जबाबदारी

एखाद्या शिक्षणसंस्थेचा रौप्यमहोत्सव ही घटना त्या संस्थेच्या आयुष्यातील एका प्रगल्भतेची द्योतक असते. संस्थेने आता विकासाशी स्वयंवर करायचे असते. मोखारे, उमाठे महाविद्यालयाच्या संस्थेचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष. या पंचवीस वर्षात संस्थेने शैक्षणिक गौरव वाटावा असा स्वतःचा विस्तार केला आहे. नदी जशी उगमापाशी लहान असते तशी संस्थाही जन्माच्यावेळी लहानच असते. अण्णाजी उमाठे यांनी संस्थेचे रोपटे अडचणींच्या मातीतच लावले. त्याला इलाजच नव्हता. पण प्रारंभीची ही अडचणींची माती पुढे सुविधांचे वावर होत गेली. अण्णाजी उमाठेंच्या जिद्दीमुळे संस्थेला विकासाचे पंख प्राप्त झाले. संस्थेला प्रारंभी काट्याकुट्यांमधून, दगडा-धोंड्यांमधून आणि चिखलातून वाट काढावी लागली. नानाविध अडचणींशी मुकाबला करावा लागला. कामे उभी करणारांच्या मार्गात अडचणी उभ्या असतातच. पण विरोधकही अडचणी निर्माण करतात आणि अडचणींमध्ये भर पडत जाते. संस्थाचालकाची ही कसोटीचीच वेळ असते. अशा अडचणींवर जो संस्थाचालक मात करतो तो सिकंदर ठरतो. तो संस्थेला एकेक पायरी चढायचे बळ देतो. तो संस्थेला एकेक मजला उभारायचे बळ देतो. अण्णाजी उमाठेंना हे कौशल्य साधले. त्यांनी संस्थेला पाय दिले. संस्था चालू लागली. संस्था जागा बदलू लागली. मोहरण्यासाठी अधिकाधिक चांगल्या जागा तिने निवडल्या.

संस्थेचे शैक्षणिक कार्य ज्या भागात चालते तो नागपूर शहरातला जवळजवळ ग्रामीण भागच आहे. आता हा ग्रामीण भाग शहरी होत चाललेला आहे. ते अपरिहार्यही आहे. पण हे खरे असले तरी या संस्थेत मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय मुले-मुलीच शिक्षण घेतात. संस्थेने अशा दुर्बल घटकांसाठी याप्रकारे या भागात शिक्षणाची सुवर्णसंधीच निर्माण करून ठेवली आहे. भामटी, परसोडी, जयताळा, या वस्त्यांच्या परिसरात ही शिक्षणसंस्था आहे. आज या भागात नव्याने एखाददुसरी शिक्षणसंस्था सुरू झाली आहे. पण ज्यावेळी या भागात गोरगरिबांच्या शिक्षणाची कोणती सोय नव्हती त्यावेळी अण्णाजी उमाठे यांनी या भागात शिक्षणाची

सोय या भागातील वंचितांसाठी सुरू केली. या गोष्टीचे ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक मूल्य नाकारता येणार नाही.

अण्णाजी उमाटेंनी आपल्या हयातीतच महिला आरक्षणाचे धोरण प्रत्यक्षात आणले. आपल्या संस्थेत महिलांना जास्तीत जास्त प्राधान्य दिले. हासुद्धा वंचितांना न्याय देण्याच्याच त्यांच्या प्रवृत्तीचा आविष्कार होता असे म्हणता येते. त्यामुळे एक गोष्ट सहज साध्य झाली, संस्थेत राजकारण शिरले नाही. संस्थेतील शिक्षणकारणाला त्यामुळे कोणतीही इजा पोचू शकली नाही. प्राध्यापिकांना आणि प्राध्यापकांना त्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागविले. त्यातही त्यांनी एक विवेक कटाक्षाने बाळगला. प्राध्यापिका आणि प्राध्यापक यांच्यासंबंधीचा कौटुंबिक जिव्हाळा जिव्हाळ्याच्या जागी ठेवला आणि संस्थेतील शिस्त संस्थेच्या जागी ठेवली. हे त्यांचे वैशिष्ट्य आज मनाला विशेषच मोलाचे वाटते. संस्थेला त्यांनी स्वप्न दिले. स्वप्नाचे पंख दिले. संस्थेच्या वाटेतले अवरोध वेचून बाजूला केले. वाट निष्कंटक केली. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात त्यांच्यावर दुःखांनी काही निर्दय प्रहारही केले. पण त्यातूनही सावरण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

आज संस्थेत अनेक अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. दुनिया बदलली. दुनियेला नवा वेग आला. क्षणाक्षणाला दुनियेला जागा बदलावी लागत आहे. क्षणाक्षणाला दुनिया नवी होते आहे. निराळी होते आहे. ती आज धावते त्या वेगाने तिच्यापुढे असंख्य आव्हाने उभी केलेली आहेत. कालचे शिक्षण आता प्रश्नार्थक होत आहे. दर पाच-दहा वर्षांनी शैक्षणिक सिद्धान्त कोसळून पडत आहेत. बदलती दुनिया बदललेले शिक्षण मागत आहे. दुनियेच्या वादळी वेगाचे पंख आता शिक्षणाला लाभले पाहिजेत. दुनियेच्या परिवर्तनाचा हात धरून शिक्षणाने चालायला हवे. दुनियेची आणि तिच्यातील स्पर्धांची भूक आज शिक्षणाला भागविता यायला हवी. विज्ञानासोबत दुनिया बदलते. या बदलामागे दुनियेतील तत्त्वज्ञाने, साहित्यादी कला धावत असतात. आपल्या अन्वर्थकतेसाठी त्यांनी असे धावावेच लागते. कारण कोणताही गाफील क्षण आपल्याला निरर्थक, कालबाह्य ठरवू शकतो ही बाब या सर्वच शास्त्रांच्या आणि कलांच्या लक्षात आलेली आहे. संस्था गाफील राहिली तर अध्यापक गाफील राहील. अध्यापक गाफील राहिला तर विद्यार्थी गाफील राहील. नवे काय शिकवायचे हे आज सजगपणे ठरविणे जसे अगत्याचे आहे त्याप्रमाणे जुने काय आणि का नाही शिकवायचे याचाही विचार संस्थेला करावाच लागतो.

हे भान बाळगून आज अण्णाजी उमाटेंनी स्थापन केलेली संस्था सजग मनाने प्रयत्न करीत आहे. आज अर्थशास्त्राच्या पावलांनी जग चालत आहे. विज्ञानाच्या पंखांनी ते उडत आहे. दरक्षणी नवे प्रश्न दुनियेपुढे रुजू होत आहेत. धर्मांधतेचा प्रश्न उग्ररूप धारण करतो आहे. धर्मांच्या मूलतत्त्ववादांच्या पोटी दहशतवादाचे संकट

दुनियेला छळू लागले आहे. लोकसंख्यावाढीचा प्रश्न दुनियेपुढील जीवन कठीण करीत आहे. विकसनशील देशांमधील वाढत्या कार्बन उत्सर्जनामुळे एकूण दुनियेचेच पर्यावरण दुषित झालेले आहे. त्यामुळे दुनियेचे तापमान वाढून दुनियेतील जीव भाजून निघतील आणि देशचे देश समुद्र पोटात घेईल. त्यामुळे फटाके उडविणे, होळ्या पेटविणे, पोळ्याला मेढे जाळणे अशा असंख्य प्रकारांमधून या कार्बन उत्सर्जनाच्या प्रक्रियेत आपण सहभागी होऊ नये. कारखान्यांद्वारा उत्सर्जित होणारा कार्बन कमी करायला हवा. या मार्गाने आता पर्यावरणाचे शिक्षण या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. अंधश्रद्धांच्या जाळ्यांमधून मुला-मुलींची मने बाहेर पडतील असे शिक्षण आज हवे आहे. दहशतवादापासून, परस्परद्वेषापासून आणि बेजबाबदारपणापासून ही मने वाचावीत असे शिक्षण मुलांना दिले गेले पाहिजे.

हे सर्व ध्येय आजच्या शिक्षणाने बाळगले नाही तर हे शतक संपायच्या आधी पृथ्वीवरील मानवी जीवनच संपून जाईल आणि त्याची जबाबदारी केवळ आपली असेल. तेव्हा अण्णाजी उमाठे यांच्या संस्थेने मुलांना काय शिकवू नये तेही लक्षात घेतले पाहिजे आणि स्वतःला आणि पृथ्वीला वाचविण्यासाठी काय शिकवायला हवे तेही गंभीरपणे ठरविले पाहिजे. अण्णाजी उमाठेंची ही शिक्षणसंस्था या भयावह परिस्थितीला सामोरी जाईल आणि दुनियेला वाचवू पाहणाऱ्या नागरिकांच्या रांगेत आपला विद्यार्थी समर्थपणे उभा राहील यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करील ही खात्री मला आहे. संस्थेला सदिच्छा

## २९. पराभूत ब्राह्मण्याचा राष्ट्रविघातक कांगावा

पराभूत व्यक्तीचे वा समूहाचे एक मानसशास्त्र असते. हे मानसशास्त्र बेताल असते आणि बेजबाबदारपणाच्या खुंटाला ते पक्के बांधलेले असते. अतार्किक चिडचिड असेच या मानसशास्त्राच्या सर्व आविष्काराचे स्वरूप असते. सांस्कृतिक संदर्भात वा मानसशास्त्राला प्रतिक्रांतीवादी मानसशास्त्र असे म्हणायला हवे. या मानसशास्त्राचा प्रत्यय २००७ च्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यांमध्ये लोकांना आला.

तात्या टोपेनगर नागरिक मंडळ, दक्षिण मध्य क्षेत्र, सांस्कृतिक केंद्र, वैदर्भीय हरिकीर्तन संस्था आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सत्तावन्न ते सुभाष' हा राष्ट्रीय कीर्तन महोत्सव २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २००७ या काळात पार पडला. शिवाय २८ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र ब्राह्मण सेवक संघाने सोलापूरला होऊ घातलेल्या अ.भा.नाट्यसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष रमेश देव यांचा सत्कार केला. या कीर्तनांमधून आणि सत्कारामधून जे मानसशास्त्र साकार झाले ते पराभूत आणि राष्ट्रविघातक मानसशास्त्र आहे.

राष्ट्र जात्यतीत आणि धर्मातीत व्हावे म्हणजे सेक्युलर व्हावे असे मला मनापासून वाटते. मला वाटते ते अवघड आहे हेही मला माहीत आहे आणि हे वाटणे शक्यही होऊ शकते याचीही मला जाणीव आहे. अडचणींच्या गर्दीची जाणीव असली तरी जबाबदार, निस्पृह, परस्परांचा सन्मान जपणारी आणि प्रामाणिक 'माणसे' अशा गर्दीवर मात करून बाहेर येऊ शकतात हा विश्वास मला आहे. जात वा धर्म हे मानवी मनाचे मूळ वास्तव नव्हे. हे अवास्तव आहे. कृत्रिम आहे. या सर्वांच्या अतीत असलेले बुद्धिवादी माणूसपण हेच मानवी जीवनाचे खरे आणि मूळ वास्तव आहे. या वास्तवापासून, या सौंदर्यापासून आणि या सर्वकल्याणकारी सत्यापासून माणसे जातीच्या आणि धर्मांच्या अवास्तवात शिरली. याचा अर्थच त्यांनी असुंदराची आणि असत्यांची ओझी खांद्यावर आणि डोक्यात घेतली असा आहे. हा मूठभरांच्या अमानुष

हितसंबंधाचाच आविष्कार होता. मी या अवास्तवाच्या बाहेर जाऊन विचार करू इच्छितो. सर्वांनीच असा विचार करावा असे मी मानतो. त्यामुळे कोणत्याही जातीचा उच्चार करावा लागतो तो समाज मला समाजच वाटत नाही. आपल्या किंवा इतरांच्या जातींचा उच्चार करण्याची इच्छा असणे ही वृत्ती अराष्ट्रीयच असते. जाती जपायला सांगणारी, धर्म जपायला सांगणारी वा इतरांना आपल्यापेक्षा दुय्यम मानून अप्रतिष्ठित करायला सांगणारी कुठलीही वृत्ती, कुठलाही शब्द एकाच वेळी अराष्ट्रीयही असतो आणि अमानवीही असतो.

आता संस्कृतीची आणि सुसंस्कृतपणाची व्याख्या बदलायला हवी. जाती-धर्मातीत माणुसकी शिकविते त्या संस्कारसमुच्चयाला संस्कृती म्हणावे. देव, धर्म, जात अशा कोणत्याही सबबीवर सर्वांच्याच मानवी प्रतिष्ठेचा बळी देत नाही त्या वृत्तीला सुसंस्कृतपणा म्हणावे. जाती, धर्म, वर्ग ही मानवी जीवनातली भांडणांची झाडे होत. या झाडांवर बसून माणसे चर्चा, संवाद वा सुसंवाद करूच शकत नाहीत. या झाडांवर फुलणाऱ्या आणि बसणाऱ्या माणसांना भांडणांशिवाय दुसरे काहीही करता येणे शक्य नाही. जातींचा, धर्मांचा, वर्गांचा इतिहास पाहिला तरी ही बाब कोणाच्याही लक्षात येईल.

सर्वांनाच समान मानवी सन्मान देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान आपली जीवनशैली म्हणून आपण स्वीकारले आहे. संविधानाच्या शब्दाशब्दातून 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' हा आशय साकार झालेला आहे. हे संविधान सर्वांच्याच वागण्या-बोलण्यातून फुलले पाहिजे. यात कोणाचेही अहित नाही कारण यात सर्वांचेच समान हित आहे. एकविसाव्या शतकातील आपण सर्वांनीच हा सकल मानवी सौंदर्याचा आदर्श गौरवाने स्वीकारला पाहिजे. मला हे उत्कटपणे वाटते म्हणून कोणत्याही जातीचा निर्देश करणे मला उचित वाटत नाही. पण रमेश देव यांनी जे वक्तव्य केले त्या वक्तव्यात जातीचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याच्या अनुषंगाने विवेचन करताना अत्यंत नाइलाजाने मला जातीचा निर्देश करावा लागणार आहे.

पण रमेश देव, प्रभाकर पणशीकर आणि कीर्तनकार यांच्या प्रतिपादनाच्या संदर्भात माझी काही भूमिका मांडण्याआधी मी सर्वच प्रांतांमधील जातींच्या, धर्मांच्या नावाने असणाऱ्या संस्था, संघटना यांना तातडीने बंद करावे अशी विनंती या संस्थाचालकांनाही करतो आणि शासनालाही करतो. जातीय, धार्मिक संघटनांना आणि अंधश्रद्धा, दैववादी वृत्ती वाढविणाऱ्या कोणत्याही संस्थांना शासनाने आर्थिक अनुदान देऊ नये कारण असे करणे संविधानाच्या धोरणाच्या विरोधी आहे. वरील सर्वच संस्था कायम ठेवून आणि त्यांना आर्थिक मदत देऊन आपण भांडणांच्या झाडांना खतपाणी देत आहोत हे शासनाला कळले पाहिजे. असो.

मी माणसाच्या सन्मानाच्या, समान मानवी प्रतिष्ठेच्या सिद्धान्ताशिवाय दुसरा कोणता सिद्धान्तच मानीत नाही. पण रमेश देवांसारखी जी माणसे कर्मविपाकाचा सिद्धान्त वंदनीय मानतात. त्यांनी 'ब्राह्मण वर्गच आता उपेक्षित होतो आहे' (१९-११-२००७, देशोन्नती) या वास्तवाविरुद्ध तक्रार करून ईश्वरद्रोही का ठरावे? कर्मविपाकानुसार वाट्याला आले ते न्याय्य मानूनच कर्मविपाकासंबंधी आदर व्यक्त करता येईल. 'ब्राह्मण वर्गच आता उपेक्षित होतो आहे' हे विधान रमेश देव यांचे आहे. अ.भा.मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष झाल्याबद्दल आयोजिलेल्या त्यांच्या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. संदर्भ नाट्यसंमेलनाचा आहे तेव्हा मराठी नाटकांसंबंधी, त्यातील बऱ्यावाईट गोष्टींसंबंधी त्यांनी चार गोष्टी जबाबदारीने सांगायला हव्या होत्या. असे त्यांचे बोलणे समुचित ठरले असते. पण त्यांनी जबाबदारीने बोलणे टाळले की त्यांना जबाबदारीने बोलणे योग्य वाटत नाही? नाट्यसंमेलनाचा विषय नाटक आहे. ब्राह्मण नाही. रमेश देव यांचा थोडाबहुत तोल गेला असता तर तेही आपण समजू शकलो असतो. पण त्यांचा तोल जास्तीत जास्त जाणे शक्य आहे त्याहून अधिक गेला. बुद्धिमान कोण? तर केव्हा, कुठे आणि कसे बोलावे हे रेखीवपणे ज्याला कळते तो बुद्धिमान! पण मग रमेश देव यांना कोण बुद्धिमान आहे आणि बुद्धिमान नाही हे कसे कळले? हा प्रश्न कोणत्याही साधारण बुद्धिमान असलेल्या माणसाला पडायला काहीच हरकत नाही.

इथेच एक गोष्ट सांगून ठेवायला हवी, ती ही की सर्वच कीर्तनकार, प्रभाकर पणशीकर आणि रमेश देव ही सर्वच मंडळी कर्मविपाक श्रद्धापूर्वक मानतातही आणि हिताचा प्रश्न आला तर नाकारतातही. आपल्याला सर्वोच्च स्थान देणारी वर्णसंस्था सांगते तेवढ्यापुरता कर्मविपाक ठीक आहे. पण इतर कोणी सर्वोच्च स्थानी येत असतील तर कर्मविपाक काय उपयोगाचा? सांभाळ रे कर्मविपाका. तुझे काही खरे नाही बरे! कारण सोयीसाठी तुला असे तुझ्या जन्मापासूनच वापरलेही गेले आणि ठोकरलेही गेले. असो.

कर्मविपाक ज्यांच्या डोक्यातून आला ती माणसे चलाख होती. स्वार्थी होती. बुद्धिमान नव्हती. चलाखी आणि बुद्धिमत्ता यात फरक आहे. खूप फरक आहे. पण याहूनही एक विशेष गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती ही की २८ ऑक्टोबरपासून १८ नोव्हेंबरपर्यंत वरील सर्वच मंडळी एकाच सूत्रात बोलताना दिसतात. याचा अर्थ असा की या सर्व बोलण्यामागे काही नियोजन आहे. काही निश्चित अजेंडा आहे. कीर्तनकारांच्या तोंडी येणारा आशय आणि प्रभाकर पणशीकर, रमेश देव या अभिनेत्यांच्या वक्तव्यातून येणारा आशय यात वृत्तीसाम्य आहे. खूप शब्द सारखे आहेत. धोरण निर्देशिणारी वाक्ये सारखी आहेत. हे वाचून सर्वसामान्य माणसालाही या सर्वांच्या बोलण्यामागे काहीएक नियोजन आहे हे कळल्यावाचून राहात नाही.

१९ तारखेच्या नागपूर सकाळमध्ये रमेश देव यांचे वक्तव्य पुढीलप्रमाणे आले आहे. ''ब्राह्मण समाज बुद्धिवान, चतुर आणि धोरणी असतो...'' परंतु महत्त्वाकांक्षी नसल्याने ऐपत नसलेले लोक ब्राह्मणांवर सत्ता गाजवत आहेत... इतिहासाची पाने चाळली असता लक्षात येईल की आजपर्यंत लढण्याचे काम क्षत्रियांनी केले. क्षत्रियांना बुद्धी देण्याचे काम ब्राह्मणांनी केले. ब्राह्मण कधीच राजा झाला नाही. तो सल्ला देणारा प्रधानच राहिला. महत्त्वाकांक्षी नसणे हे ब्राह्मणांचे दुर्दैव आहे. यामुळेच ज्याला धड लिहिता-वाचताही येत नाही, असे लोक ब्राह्मणांवर राज्य करीत आहेत.'' रमेश देव यांनी ब्राह्मण बुद्धिवान आहेत असे म्हटले आहे. ब्राह्मणही बुद्धिवान आहेत असे म्हटले नाही. असे म्हटले असते तर इतरही बुद्धिमान आहेत असा त्याचा अर्थ झाला असता पण त्यांना तसे अजिबात म्हणायचे नाही. उलट ऐपत नसलेले आणि ज्यांना धड लिहिता-वाचताही येत नाही असे म्हणून ते ब्राह्मण वजा जाता इतर सर्वांनाच बुद्धिशून्य ठरवित आहेत. सम्राट अशोक, यादव राजे, शिवाजी महाराज यांना बुद्धि नव्हती. हे सर्व बुद्धिमान नव्हते असे रमेश देव सिद्ध करू शकतील काय? महाराष्ट्रापुरते आणि अलीकडच्या काळाच्या संदर्भात बोलायचे झाले तर यशवंतराव चव्हाण, शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, छगन भुजबळ, शंकरराव चव्हाण, वसंतराव आणि सुधाकरराव नाईक, दादासाहेब रूपवते ही राजकारणातली माणसे बुद्धिवान नाही असे रमेश देव यांनी सिद्ध करून दाखवावे. शिवाय राजकारणाला दिशा देणारी किंवा राजकारण न करणारी फुले, आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, बाबुराव बागूल, कॉ.शरद पाटील, रावसाहेब कसबे, भारत पाटणकर, प्रा.रा.ग.जाधव, राजा ढाले अशी हजारो-लाखो माणसे ब्राह्मण नव्हेत पण बुद्धिमान आहेत. त्यांची सांस्कृतिक महत्ता महाराष्ट्राने मान्य केलेली आहे. काहींची देशानेही आणि जगानेही मान्य केली आहे. मला तर अत्यंत नम्रपणे हे सांगावेसे वाटते की प्राचीन भारतात बुद्धाएवढा बुद्धिवान माणूस दुसरा कोणीही नाही आणि बुद्धानंतर आजपर्यंतच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांएवढा बुद्धिवान माणूस दिसत नाही. हे प्रज्ञासूर्य नागवंशाचे होते. ब्राह्मण नव्हते आणि या दोघांच्याही महामहाप्रतिभांनी संपूर्ण वैश्विक समाजाचेच 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' सौंदर्यशास्त्र मांडले. आपल्यात पराकोटीची गरिबी आणि श्रीमंती असली पाहिजे; स्त्रभ-पुरुष यांच्या गुलाम-मालक हे नाते असले पाहिजे हे सांगणारा कोणीही माणूस, कोणताही विचार आदर्श आणि आदरणीय असूच शकत नाही हे जर आपण समजावून घेऊ शकलो तर 'सब्बे सत्ता सुखी होन्तु' हे संपूर्णच मानवी जीवनाचे सौंदर्यसंविधान मांडणारे बुद्ध आणि आंबेडकर हेच खरे आदर्श आणि आदरणीय ठरू शकतात हे पटणे कठीण जाणार नाही. जातींचे कळप, वर्गांचे आणि धर्मांचे कळप आणि यांच्याच मूलतत्त्ववादांचे कळप मानवी जीवन सततच उद्ध्वस्त करीत आलेले आहेत आणि विज्ञानप्रकर्षाच्या पुढल्या काळात तर ते पृथ्वीवर महामृत्यू अंथरल्याशिवाय राहणार नाहीत.

तेव्हा सूज्ञ माणसांनी आता जाती-धर्मांच्या कळपांचे मानसशास्त्र त्यागले पाहिजे. आपापल्या मनातील विलगीकरणाचे विषाणू जाळून टाकले पाहिजे. भांडणे, मृत्यू आणि सर्वविनाश जन्माला घालणारे सर्व कारखाने आता तातडीने नष्ट करा हे सांगणे गुन्हा ठरत असेल तर हा गुन्हा करणाऱ्या माणसांची संख्या वाढली पाहिजे. एवढेच नव्हे तर असा गुन्हा न करणारा कोणीही माणूस पृथ्वीवर कुठेही दिसणार नाही. यासाठी आपण यापुढे सर्वांनी झटले पाहिजे. पृथ्वीवरचे जीवन जगवण्यासाठी आता याची गरज आहे.

म्हणून रमेश देव यांच्या वक्तव्यामुळे मला फार वाईट वाटले. हळूहळू जातींचे जहर उतरत आहे. पण रमेश देव परत जातीअस्मितेचा ध्वज खांद्यावर घेऊन, सामाजिक अशांतीच्या, अराजकाच्या दिशेने निघालेले आहेत. शरद पवार, विलासराव देशमुख, आर.आर.पाटील यांच्यात आणि त्यांच्यासोबत राजकारण करणारांमध्ये खरेच राजकारण करण्याची ऐपत नाही? खरेच यांना धड लिहिता-वाचताही येत नाही? ही माणसे बुद्धिवान नाहीत? ही माणसे बुद्धिशून्य आहेत, त्यांच्यात सत्ता चालविण्याची ऐपत नाही असे मला अजिबात वाटत नाही. त्यांचा अपमान रमेश देव यांनी केला, पण त्याबद्दल राजकारणातील वरील एकही माणूस बोलला नाही. राजकारणातील त्यांचे कोणी अनुयायी बोलले नाहीत. का? वरील सर्वच मंडळींच्या कानावर रमेश देव यांचे म्हणणे गेले नाही काय? की या सर्वांनाच रमेश देव यांचे वरील बोलणे सामाजिक सामंजस्य, सलोखा टिकविण्यासाठी व्यक्त झालेली कळकळ होय असे वाटते? मला नम्रपणे असे वाटते की रमेश देवांच्या वरील बोलण्यामुळे समाजाचे, परिवर्तनाचे सांस्कृतिक आरोग्य बिघडू शकते. कोणाचातरी सन्मान करण्याच्या उत्साहात कोणाचातरी अपमान का केला जातो? ही वृत्ती सामाजिक सलोख्याला मारक आहे.

रमेश देवांना सत्कारात परशुरामाची मूर्ती दिली गेली. एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची धादांत खोटी कथा ज्या परशुरामाच्या नावावर सांगितले जाते त्या परशुरामाची मूर्ती भेट देण्यामागचे मन नीट लक्षात घेण्याची गरज आहे. आख्यायिकेतील पृथ्वी म्हणजे काय? भारताचा काही भाग म्हणजे पृथ्वी? एकदा पृथ्वी निःक्षत्रिय केल्यावर क्षत्रिय पुनःपुन्हा म्हणजे एकवीसवेळा नष्ट होण्यासाठी आले कुठून? डोकेच न वापरणारांचे ठीक आहे पण बुद्धिवान म्हणवणारांची बौद्धिक हालत किती हाताबाहेर गेली आहे किंवा खालावली आहे हे वरील प्रकार पाहिल्यानंतर लक्षात यायला वेळ लागत नाही.

'ब्राह्मण कधीच राजा झाला नाही' असे रमेश देव म्हणतात. पण ते खरे नाही. धम्मानुयायी सम्राट अशोकाने कुलदेवतांच्या मूर्ती काढून टाकल्या. डॉ.बाबासाहेब

आंबेडकर म्हणतात, "हा ब्राह्मणांवर फार मोठा प्रहार होता. कारण त्यामुळे त्यांच्या उपजीविकेला व धूर्त प्रचाराला फार मोठा धक्का बसला आणि ते त्याचा बदला घेण्यास सिद्ध झाले. ब्राह्मण पुरोहितांची पूर्वी अशी धारणा होती की सर्व राजेलोक मेल्यानंतर नरकात जातात कारण राज्यशासन चालविताना त्यांना पुष्कळशी पापकृत्ये करावी लागतात. यामुळे तशी संधी प्राप्त झाली तरीही ब्राह्मण लोक राज्यभार आपल्या शिरावर घेण्यास तयार नव्हते. मात्र राजसिंहासनावर बसण्यास ते तयार नसले तरी मंत्री किंवा पुरोहित म्हणून राजाला सल्ला देण्याचे कार्य करीत असत. त्याचप्रमाणे कायदेकानून तयारी करीत होते. परंतु कुलदेवतेची पूजा बंद झाल्यामुळे त्यांची जेव्हा खूप मोठी हानी झाली तेव्हा राज्यशासन न चालविण्याच्या आपल्या सिद्धान्ताचा त्याग करून ते राज्यावर व सिंहासनावर ताबा मिळविण्याच्या प्रयत्नाला लागले. अशा तऱ्हेच्या अगणित घटना भारतीय वाङ्मयात सापडतात. काही ठिकाणी असेही आढळून येते की जेथे स्वतःच्या बळावर राज्य करणे अशक्य होते तेथे त्यांना धार्जिणे असलेल्या क्षत्रियांना हाताशी धरून किंवा त्यांना समोर करून म्हणजे त्यांना आपल्या हातातील बाहुले बनवून राज्यकारभार ते करीत असत.'' (लेखन आणि भाषणे : म.शासन खंड १८ भाग-३, पृ.२१०) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगतात त्या दोन्ही गोष्टी इतिहासात झाल्या आहेत.

प्रत्यक्ष राजा झालेला पुष्यमित्र शुंग कोण होता? बौद्ध भिक्खूंचा छळ करणारा, त्यांचे विहार उद्ध्वस्त करणारा आणि "How pitiless was the persecution of Buddhism by Pushyamitra can be gauged from the Proclamation which he issued against the Buddhist monks. By this proclamation Pushyamitra set a price of 100 gold pieces on the head of every Buddhist monk." (Burnouf-L'Introduction :'Historie on Buddhisme Indien (2nd Ed.)P.388) उद्धृत : डॉ.बी.आर.आंबेडकर (w.a.s. Vol. 3, P.269) याप्रकारे एका बौद्ध भिक्षूला मारून त्याचे शिर आणणाराला शंभर सुवर्णमुद्रा देण्याचे जाहीर करणारा पुष्यमित्र कोण होता? बौद्धधम्मीय सम्राट अशोकाचा नातू असलेल्या बृहद्रथाचा वध करणारा वैदिक धर्माभिमानी पुष्यमित्र कोण होता? माणसासारख्या माणसांच्या गळ्यात मडके आणि कमरेला झाडू बांधणारे पेशवे कोण होते? असे हे भयंकर अत्याचार केवळ ब्राह्मणांच्या राजवटीतच झाले. हे खरे नाही काय? भारत स्वतंत्र झाल्यावर कोणीही ब्राह्मण पंतप्रधान वा मुख्यमंत्री झाले नाहीत? रमेश देव यांनी हे वास्तव सर्व लोकांना सांगायला हवे होते. लोकांना हेही कळले पाहिजे. इतिहाससंबंधी बोलणाऱ्या व्यक्तीने या भयंकर पातळीवरून सत्याची अवहेलना करू नये. 'पूर्वजांनी ज्यांच्या गळ्यात मडके बांधले त्यात आमचा काय दोष?' असे देव म्हणतात. दोष कसा नाही? ज्यांनी काही लोकांच्या गळ्यात मडके बांधले त्यांचा रमेश देव यांना गौरव वाटतो

की नाही? ज्या धर्मग्रंथांनी, स्मृतींनी चातुर्वर्ण्य निर्माण केले आणि त्याचे पावित्र्य लोकमानसावर बिंबविले त्यांचा रमेश देव यांना अभिमान वाटतो की नाही? ज्या समाजरचनेत ब्राह्मणाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे त्या रचनेचा कोणाच्यातरी गळ्यात मडके बांधण्याशी संबंध आहे की नाही? देव यांना चातुर्वर्ण्याबद्दल आदर आहे की नाही? म्हणजे मडके बांधण्यामागील सर्व यंत्रणेचा, सर्व कारणांचा एकविसाव्या शतकातही गर्व वाटत असेल आणि मडके बांधणारांना बुद्धिवान म्हटले जात असेल तर रमेश देव यांच्या मनात आजही मडके आहेच असे म्हणावे लागेल.

आता आरक्षासंबंधी! रमेश देव आरक्षणाच्या विरोधात असणे साहजिकच आहे. पण आरक्षणाची तरतूद संविधानात डॉ.आंबेडकरांनी कशासाठी केली? 'एक माणूस-एक मूल्य' अशी समता प्रस्थापित करण्यासाठी केली हे उघड आहे. खरे म्हणजे कोणाला तरी आरक्षण द्यावे लागणे हे आदर्श समाजाचे लक्षण नव्हे. विषमतेने समाज खंगलेला आहे म्हणून जे विषमतेचे बळी असतील त्यांना आरक्षण द्यावे लागते आणि कोणत्याही गोष्टींमुळे काही लोकांना आलेला सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणा घालवून संपूर्ण समाज समपातळीत आणणे ही एकूणच आरक्षणाची उद्देशपत्रिका आहे. आरक्षण ही मानवी प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचा कार्यक्रम आहे. केवळच आर्थिक नव्हे तर एकूणच सांस्कृतिक समाजवादाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली ती प्रक्रिया आहे. याचा अर्थ असा की केवळ आर्थिक विषमता घालवून संविधानाची ध्येयपूर्ती होत नाही. त्यासाठी जातीविषमतेचे, जातींचेही निर्मूलन होण्याची गरज आहे. समाज जातीविहीन आणि वर्गविहीन झाला की कोणाला आरक्षण देण्याची गरजच भासणार नाही. आरक्षण वर्षांमध्ये मोजणे योग्य नाही. ते माणुसकीत मोजले पाहिजे. 'समता' आणि 'बंधुता' जोवर प्रस्थापित होत नाही तोवर आरक्षणाची गरज कशी काय संपते असा प्रश्न आहे.

आता आरक्षणाचाच मुद्दा सुरू आहे म्हणून सांगतो. ब्राह्मण केवळ जन्मामुळे श्रेष्ठ मानावा असे धर्मसूत्रे सांगतात. राजाची सत्ता प्रजेवर असते, मात्र ब्राह्मणांवर नाही असे गौतम म्हणतो. (९.१) त्याच्या मते ब्राह्मण कोणत्याही अपराधासाठी अवध्य व अदंड्य असतो. बोधायनही ब्राह्मणाला अवध्य मानतो. ब्राह्मण करमुक्त होता. राजाने त्याचे धन घेऊ नये असे आपस्तंब व वसिष्ठ म्हणतात. ब्राह्मणांनी सतत वेदाध्ययन करावे, एका दिवसाच्या गरजेपेक्षा जास्त धनसंचय करू नये अशी ब्राह्मणाची लक्षणे शास्त्रकारांनी सांगितली आहेत. पण अशी लक्षणे नसणाऱ्या ब्राह्मणांनाही पूज्य मानावे असे धर्मशास्त्राचे म्हणणे आहे. ब्राह्मण सच्छील असो वा दुःशील असो; सुसंस्कृत असो वा हीन असो, ब्राह्मणाचा अवमान करू नये असे वृद्धगौतमस्मृती म्हणते. (संदर्भ : भारतीय संस्कदृतिकोश:संपा.महादेवशास्त्री जोशी, खंड सहावा, १९७०, पुणे, पृ.३२४) आता मनुस्मृती काय सांगते ते पाहा-

विसृज्य ब्राह्मणः शूद्राद्‌द्रव्योपादानमाचरत्।
नहि तस्यास्ति किंचित्स्वं भर्तृहार्यधनो हि सः'' (८-४१७)

''अविद्वांश्चैव विद्वांश्च ब्राह्मणो दैवतं महत्।'' (९-३१७)

''एवं यद्यप्यनिष्टेषु वर्तन्ते सर्वकर्मसु।
सर्वथा ब्राह्मणाः पूज्याः परमं दैवतं हि तत्।'' (९-३१९)

या श्लोकांचा अर्थ असा : राजांनी ब्राह्मणांना भरपूर दानदक्षिणा देत राहिले पाहिजे. शूद्राचा सर्व पैसाअडका ब्राह्मणाने हिरावून घ्यावा. ब्राह्मण ज्ञानी असला काय वा नसला काय तो दैवतच आहे. ब्राह्मणांनी कितीही निंद्य कामे केली तरी ते मोठे दैवतच असल्याने पूज्यच असतात. हेच रामदासस्वामी आपल्या दासबोधात सांगतात. ते म्हणतात- ''गुरू तो सकळांसी ब्राह्मण। जऱ्हीं तो जाला क्रियाहीन। तरी तयासीच शरण। अनन्यभावे असावे।।'' आणि ''सकळासि पूज्य ब्राह्मण। हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण। वेदविरहिते ते अप्रमाण। अप्रिये भगवंता।।'' याचा अर्थ असा की ब्राह्मणांना वेदकाळापासून या विशेष सवलती दिल्या गेल्या आहेत. या शंभर टक्के आरक्षणाचा लाभ ब्राह्मणांनी हजारो वर्षे घेतलेला आहे. या देशातील बहिष्कृतांना मिळणारे थोडेबहुत आरक्षण केवळ साठ वर्षांचे झाले. या साठ वर्षांत तरतुदीनुसार ते पूर्णतः दिलेही गेले नाही. स्त्रियांच्या आरक्षणाचा प्रश्न आहेच. भटक्या-विमुक्तांचे, आदिवासींचे शिक्षणाचे प्रमाण किती आहे? गरज असताना आणि तरतूद असतानाही देशात आरक्षण नीट दिले गेलेच नाही पण जे थोडे-बहुत दिले गेले त्याबद्दल रमेश देवांच्या पोटात दुखत आहे. पण ब्राह्मणांनी हजारो वर्षे शंभर टक्के आरक्षण घेतले आहे आणि आजही किमान सत्तर-ऐंशी टक्के नोकऱ्यांवर तेच बसलेले आहेत. त्या आरक्षणाबद्दल रमेश देव बोलत नाहीत. याचा अर्थ रमेश देव यांच्या डोक्यात वर्णसंस्था पक्की ठाण मांडून बसली आहे आणि तिच्या हेतुनुसार तिला इतर कुणाचा उत्कर्ष सहनच होत नाही असा आहे.

''आजपर्यंत समाजात ब्राह्मणांनी परिवर्तन आणले आणि समाजाला विधायक दिशा दिली. पुरोगामित्वाचा प्रचार-प्रसार ब्राह्मणांनीच केला आणि इतर जातींच्या उन्नयनाकडे लक्ष दिले.'' (देशोन्नती:१९-११-२००७) असे रमेश देव म्हणतात. त्या संदर्भात आता विचार करू.

प्राचीन काळातल्या ब्राह्मणांनी समाजाला वर्णसंस्थेशी बांधून ठेवण्याचे काम अत्यंत प्रामाणिकपणे केले. हे परिवर्तन होय; ही विधायक दिशा होय; हे पुरोगामित्व होय अशी रमेश देवांची भूमिका असेल तर ही भूमिका केवळ प्रतिगामी आणि समाजाला ब्राह्मणवर्चस्वाचे महत्त्व सांगणारी विषमतावादी भूमिका आहे यात शंका

नाही. अव्वल इंग्रजीत झालेल्या ब्राह्मण सुधारकांची भूमिका ब्राह्मणांच्या कौटुंबिक प्रश्नांची चर्चा करणारी आणि ब्राह्मण समाजाला नव्या वातावरणाशी जुळते घ्यायला सांगणारी भूमिका होती. येथील सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या मूळ तात्त्विक अधिष्ठानाला कोणी नकार दिला? विषमतेची इमारत नाकारायची असेल तर तिचा तात्त्विक पाया पूर्णतः प्रथम नाकारावा लागतो. हे लोकहितवादींनाही जमले नाही आणि आगरकरांनाही जमले नाही. विषमतेवर उभ्या असलेल्या समाजाचे तात्त्विक अधिष्ठान ज्या ताकदीने जोतीराव फुल्यांनी नाकारले त्याही ताकदीने ते नाकारणे कुणाही ब्राह्मण सुधारकाला जमले नाही. पण प्रस्थापितांतर्गत काही सुधारणा सुचवणाऱ्या लोकहितवादी, आगरकर अशा सुधारणावादी ब्राह्मणांची गत ब्राह्मण समाजाने काय केली? लोकहितवादींना प्रायश्चित्त घेणे भाग पडले. आगरकरांची प्रेतयात्रा काढली. त्याकाळी अल्पायुषी मृत्यू आलेल्या बाळशास्त्री जांभेकरांसंबंधी, पक्षघात झालेल्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसंबंधी ब्राह्मण समाज काय म्हणाला हे देवांना माहीत नसले तर त्यात नवल वाटण्यासारखे काहीही नाही. समाजक्रांतीची निर्णायक भूमिका घेणाऱ्या फुल्यांवर ब्राह्मणांचे आदरणीय चिपळूणकर यांनी कशी आणि कोणत्या पातळीवरची टीका केली हे रमेश देवांना माहीत नसावे. रमेश देव म्हणतात त्याप्रमाणे ब्राह्मण पुरोगामी होते तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मंदिर प्रवेशाला, हिंदू कोडबिलाला, त्यांच्या संविधानाला आणि वर्णसंस्था मोडीत काढणाऱ्या क्रांतिकारी धम्मस्वीकाराला विरोध कोणी केला? बुद्धिमान, परिवर्तनवादी आणि पुरोगामी ब्राह्मणांनी चोखामेळ्याला का मारले? तुकोबाला का मारले? शिवाजीराजांना राज्याभिषेक का नाकारला? जोतीबा फुल्यांवर मारेकरी का पाठविले? राजर्षी शाहू महाराजांना वेदोक्त मंत्र का नाकारले? या प्रश्नांची उत्तरे त्यांनी द्यायला हवीत.

अव्वल इंग्रजीच्या काळात सार्वत्रिक शिक्षणाला विरोध कोणी केला? आरक्षणाला विरोध कोणी केला? पुनर्विवाहाला विरोध कोणी केला? सतीप्रथेची बाजू कोणी घेतली? इंग्रजी राजवटीच्या प्रारंभकाळात स्त्रियांच्या शिक्षणाला विरोध कोणी केला? वर्णव्यवस्थेला पवित्र कोणी आणि का म्हटले? धर्मचिकित्सेला विरोध कोणी केला? असे शेकडो प्रश्न उभे करता येतील. अशा अनंत संदर्भात परिवर्तनाला विरोध करणारी माणसे; वर्णसंस्थेला आणि तिला जन्म देणाऱ्या अधिष्ठानभूत तत्त्वज्ञानांना धक्का लावू न देणारी आणि आपली जात, तिच्याशी संबंधित सर्व रूढी-परंपरा गर्वाने जपणारी माणसे परिवर्तनवादी, पुरोगामी कशी होतात असा अत्यंत साधा प्रश्न आहे. या प्रश्नाचे रमेश देवांकडे कोणते उत्तर आहे? असल्यास ते त्यांनी जरूर द्यावे.

रमेश देव यांना भ्रष्टाचाराचे, कुपोषणाचे, बेरोजगारीचे, अंधश्रद्धेचे, महागाईचे, गोरगरिबांवरील अत्याचाराचे आणि स्त्रियांच्या भयंकर शोषणाचे प्रश्न दिसत नाहीत. त्यांच्या लेखी आता हे आणि इतर सर्वच प्रश्न सुटले आहेत. फक्त ब्राह्मण हा एकच

प्रश्न उरलो आहे. पण असे असले तरी रमेश देवांच्या वरील श्रद्धांना आपण महत्त्व देण्याचे कारण नव्हते. या श्रद्धांचा थोडा विचार यासाठी करायचा की या श्रद्धा रमेश देव यांच्या मुखातून बाहेर पडल्या असल्या तरी त्या एका अजेंड्याचा भाग आहेत. हा अजेंडा अर्थातच आर.एस.एस.चा आहे.

या अजेंड्याचा भाग म्हणूनच प्रभाकर पणशीकरही बोलत आहेत. राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशीच्या सत्राचे उद्घाटन त्यांनी केले. त्याचा वृत्तान्त ३० ऑक्टोबरच्या 'लोकमत'मध्ये आलेला आहे. ''आता देशाला गरज आहे अविचारी तरुणांची'' असा या वृत्तान्ताचा मथळा आहे. त्यांनी म्हटले आहे आजच्या तरुणांमधून एक नवा चाणक्य, नवा शंकराचार्य, नवा समुद्रगुप्त निर्माण होणे आवश्यक आहे. असे तरुण देशाला हवे आहेत की जे राज्यकर्त्यांना सांगतील की तुम्ही नपुंसक झाला आहात.''

चाणक्याने बुद्धोत्तर काळात नंदाला (नंद हा न्हाव्याचा मुलगा होता. म्हणजे शूद्र होता. म्हणजे आजचा ओबीसी होता.) राजगादीवरून पदच्युत करण्यासाठी आणि चंद्रगुप्ताला मगधाची गादी मिळवून देण्यासाठी उपाय योजिले. हे उपाय कुटील होते. म्हणून चाणक्याला कौटिल्य हे नाव पडले. तर असा चाणक्य निर्माण व्हावा असे पणशीकरांना वाटते.

समुद्रगुप्त का निर्माण व्हावा? तर अश्वमेध यज्ञ करून त्याने प्राचीन वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन केले. गुप्त घराणे ब्राह्मण धर्माचे अभिमानी होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील राजकीय तत्त्वांचा अवलंब करून त्याने आक्रमक धोरण पत्करले. (भारतीय संस्कृती कोश : खंड ९, पृ.६५६, ५७) वस्तुतः गुप्त हे वैश्य होते. पण पणशीकरांना त्यांचा वर्ण इथे बिनमहत्त्वाचा वाटतो कारण गुप्त हे ब्राह्मण धर्माचे अभिमानी होते. आपल्या हितसंबंधाचे म्हणजे वर्चस्वाचे संरक्षण करणाऱ्या कोणालाही चांगले म्हणण्याचा हा प्रघात तर जुनाच आहे. ब्राह्मण नसणारे राम आणि कृष्ण पूज्य का? तर त्यांनी ब्राह्मणाचे समाजातील सर्वोच्च स्थान सुरक्षित ठेवले म्हणून! शंकराचार्यांनी तर चातुर्वर्ण्य चिरंतन राहावे आणि वैदिक धर्माचा ध्वज सतत फडकत राहावा यासाठी जिवाचे रान केले. बौद्धांमुळे चातुर्वर्ण्याला लागलेली ओहोटी थांबवावी आणि त्याला भरती यावी यासाठी शंकराचार्य झटले. बौद्धांच्या अनेक स्तूपांना आणि विहारांना त्यांनी वैदिक मंदिरांमध्ये रूपांतरित केले. पुरीचे जगन्नाथाचे मंदिर, तिरुपतीचे बालाजी मंदिर, पशूपतीनाथाचे मंदिर, बौद्धगयेचे मंदिर अशा अनेक मंदिरांच्या साक्षी यासंदर्भात काढता येतील. पंढरपूरचे विठ्ठल मंदिर पूर्वी बौद्धक्षेत्र होते असे बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे तेही लक्षात घेण्याची गरज आहे. ''विरोधी मतवाले लोक भारताच्या पुण्यक्षेत्रांमध्ये आपापले आखाडे स्थापून बसले होते. आचार्यांनी त्यांना तिथून हटवले आणि सगळी तीर्थक्षेत्रे वैदिक धर्माच्या

कक्षेत आणली.'' (भारतीय संस्कृती कोश : संपा. महादेवशास्त्री जोशी, खंड ९, पृ.१९२) हेही लक्षात घेतले म्हणजे प्रभाकर पणशीकरांना नव्या शंकराचार्यांची गरज का वाटते याचे प्रत्यंतर आपल्याला येईल. पणशीकरांनी आजच्या ज्या राज्यकर्त्यांना नपुंसक म्हटले आहे त्याची नावे त्यांनी दिली असती तर बरे झाले असते. म्हणजे पणशीकरांनी केलेला राज्यकर्त्यांचा हा गौरव त्यांनी ज्यांना नपुंसक म्हटले त्या आजच्या राज्यकर्त्यांच्याही स्पष्टपणे लक्षात आला असता.

शिवाय या वृत्तान्तात पणशीकर असे म्हणतात की ''ठिकठिकाणी हिंदूंना मानहानी सहन करावी लागत आहे. अविचारी हिंदुस्थानवादी तरुणच परिवर्तन घडवून आणतील.'' इथे दोन मुद्दे लक्षात घेण्यासारखे आहेत. संविधानात आपल्या देशाचे नाव 'भारत' असे आहे. हिंदुस्थान नाही. पणशीकर भारत न म्हणता हिंदुस्थान का म्हणतात याचे कारण लोकांच्या लक्षात येतेच. देशाचे नाव धर्माशी बांधले जाऊ नये ते धर्मातीत असावे. पण या लोकांना हे मान्य नाही असेच म्हटले पाहिजे. तरी पणशीकरांच्या डोक्यात केवळ ब्राह्मणांच्या हिताचा विचार असताना हे 'हिंदू' हा शब्द का वापरीत आहेत? कारण तसे केले की जाती, वर्ण यांचा पुरस्कार आपोआप होऊन जातो. हिंदूधर्माचे नाव घेतले की ब्राह्मण नसलेल्या हिंदूंचे समर्थनही आपोआपच मिळून जाते. हे एका अर्थी ब्राह्मणांच्यासाठी हिंदूंचा वापर करणेच ठरते. जोतीराव फुले म्हणतात - ''मोघम नाव हिंदूंचे आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण.'' (म.फु.स.वा.पृ.४९३) इतिहास पाहिला तर फुल्यांच्या म्हणण्याची प्रतीती आपल्याला येईल. पणशीकरांनी आपल्या वक्तव्यात 'हिंदू'चा आधार घेतला यात एक शिळी मुत्सद्देगिरी आहे पण रमेश देव हे सरळ ब्राह्मण जातीचा उच्चार करून मोकळे झाले. म्हणजे पणशीकरांनाही तेच म्हणायचे होते पण त्यांनी रमेश देव यांचेच म्हणणे जरा आडपडद्याने मांडले एवढेच.

आणि कीर्तनकारांनीही तर हीच भूमिका कीर्तनांमधून मांडली. 'टाळ वीणा सोडून हाती रिव्हॉल्व्हर घ्या!'; 'विद्रोही साहित्यावर खटले भरा' असे मथळे कीर्तनकारांच्या नावाने वर्तमानपत्रांमधून आले आणि 'एकजात सारे बुवा गांधीजींच्या द्वेषाने पछाडलेले दिसले. सगळ्यांनी या महात्म्यावर जमेल तेवढे तोंडसुख घेतले.'' अशी प्रतिक्रियाही आली.

या कीर्तनमहोत्सवाच्या आयोजकांमध्ये द.म.क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्रही आहे आणि विदर्भ साहित्य संघही आहे. दक्षिण मध्ये क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्र ही सरकारची संस्था आहे. याचा अर्थ सरकारचे हे आयोजन आहे असे कोणाला वाटण्याची शक्यता असली तरी तसे ते नाही. द.म.क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्राचे जे अधिकारी आहेत त्यांचे ते आयोजन आहे. या अधिकाऱ्यांनी हे असे आयोजन का केले याबद्दल चौकशी सरकारने केली पाहिजे आणि कीर्तनकारांचे म्हणणे मान्यच असलेले अधिकारी इथे

विदर्भ साहित्य संघ ही वाङ्मयीन संस्था आहे आणि वेळोवेळी या संस्थेला शासनाने लाखो रुपये दिलेले आहेत. वाङ्मयीन उपक्रम राबविण्यासाठी वर्षालाही साहित्य संघाला लाखो रुपयांचे अनुदान सरकार देते. महाराष्ट्रात सत्तेवर असणाऱ्या विलासराव देशमुख, आर.आर.पाटील अशा सर्वांनाच कोणीतरी आता हे विचारले पाहिजे की 'तुम्ही नपुंसक आहात', 'तुमच्यात राज्य चालविण्याची ऐपत नाही' आणि 'तुम्हाला धड लिहिता-वाचताही येत नाही' ही मुक्ताफळे उधळण्याची ताकद आयोजित कार्यक्रमातील वक्त्यांना लाभावी म्हणून तुम्ही या संस्थेला लाखो रुपयांचे अनुदान देता काय?

आपण एकविसाव्या शतकात राहणारे लोक आहेत. हे संगणकाचे आणि इंटरनेटचे युग आहे. जागतिकीकरणाने आता अनंत प्रश्न आपल्यापुढे उभे केलेले आहेत. एन्ड ऑफ हिस्टरी, एन्ड ऑफ आइडियालॉजी असे लेखन होऊ लागले आहे आणि दुनियेतले भांडवलदार, मूलतत्त्ववादी हे सर्व खरे म्हणजे 'एन्ड ऑफ मॅन' करायलाच निघालेले आहेत. मानवी जीवन आज एका विलक्षण टप्प्यावर उभे आहे. आता एका जातीपुरता, एका धर्मापुरता विचार करण्याची अजिबात वेळ नाही. सामान्य माणूस, मजूर माणूस आणि शेतकरी यांची काय अवस्था आहे? शेतकरी जीव देत आहेत आणि जीव न देणारीही अनेक माणसे मेलेले जीवनच जगत आहेत. खऱ्या आणि सज्जन माणसाला जगता येणे केवळ अशक्य होत चाललेले आहे. हे माणसाच्या सुसंस्कृत अस्तित्वासंबंधीचे प्रश्न कोणत्याही माणसाला पराकोटीचे अस्वस्थ करणारे प्रश्न आहेत. या अशा विलक्षण प्रश्नकाळात सर्वच माणसांनी आता अधिकच जबाबदार होण्याची गरज आहे. जाती माणसाला आणि त्याच्या माणुसकीला जगू देत नाहीत. जाती निर्माण करणारांनाही जाती जगू देत नाहीत. वर्ल्ड सोशल फोरम आजच्या भांडवली जागतिकीकरणाविरुद्ध उभा राहिलेला आहे. आता विश्वासाठी बुद्धाला आणि डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत असलेली जाती-वर्गविहीन आणि धर्मविहीन समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी माणसे पुढे आली पाहिजेत.

जातीय आणि धार्मिक विद्वेष पसरविणारी वक्तव्ये आपण टाळली पाहिजेत. हिंसा, दहशतवाद, वैर यांनी प्रश्न सुटणार नाहीत. जात, वर्ग, धर्म मनात घेऊन प्रश्न सोडवायला निघणे म्हणजे आगीने आग विझविण्याचा प्रयत्न करणे होय किंवा भांडणाने भांडण मिटविण्याचा प्रयत्न करणे होय. या संदर्भात बुद्ध म्हणतो ते आपण सर्वांनीच शांतपणे लक्षात घेण्याची गरज आहे.

> 'न हि वेरेन वेरानि सम्मन्तीध कुदाचनं
> अवरेन च सम्मान्ति एस धम्मो सनन्तनो'

वैराने वैर कधीही नाहीसे होत नाही. ते प्रेमानेच नाहीसे होऊ शकते हा जीवनाचा अबाधित नियम आहे. हा नियम आपण सर्वांनीच समजावून घेण्याची आणि सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी झटण्याची गरज आहे. जात्यंधता आणि धर्मांधता मानवी जीवनाला सुखाच्या दिशेने नेऊच शकत नाहीत. जातींच्या आणि धर्मांच्या परिभाषेत बोलणे इत:पर आपण सर्वांनीच टाळले पाहिजे. आपण वैश्विक माणसाच्या, वैश्विक माणुसकीच्या परिभाषेतच बोलण्याची सवय स्वत:ला लावून घेतली पाहिजे.

आपण समतेला विरोध करता कामा नये. आपण बंधुत्वाला विरोध करता कामा नये. जगा आणि जगू द्या हीच प्रशांत सामंजस्याची भूमिका आपण प्रत्येकानेच स्वीकारली पाहिजे. याच संदर्भात अविचारी तरुण हवेत. हिंदुस्थानवादी अविचारी तरुण हवेत. रिव्हॉल्व्हर हातात घ्या, विद्रोही साहित्यावर खटले भरा ही सर्वच भाषा समाजात अशांतता, अराजक, बेदिली, हिंसा, जातीवाद, धर्मांधता पुरस्कारणारी भाषा आहे की नाही ? आजच्या विराट मानवी पर्यावरणात ही संकुचित भाषा आपण कशासाठी वापरतो ? आपण सर्वांनीच स्वत:ला असे संकुचित करून घेतले तर काय होईल? याचा विचार आपण केला पाहिजे. विद्रोही साहित्य काय म्हणते ? त्याचे ध्येय काय आहे ? त्याचा विरोध कोणाला आहे ? या प्रश्नांची उत्तरे आपण समजून घ्यायला हवीत. विद्रोही साहित्याला शोषणविहीन, अन्याय-अत्याचारविहीन समाज हवा आहे. याचा अर्थ विद्रोही साहित्याला सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विषमता सांगणारी चातुर्वर्ण्याची, जातींची समाजरचना नको आहे. सर्वांनी समानतेने आणि भावाभावांप्रमाणे वागावे असे या साहित्याला वाटते. स्त्रीला कोणत्याही अर्थाने दुय्यमत्व दिले जाणार नाही असा समाज या साहित्याला पाहिजे. या साहित्याला समाजात अंधश्रद्धा नको आहेत. या साहित्याला हे वाटते ते खरेच वाईट आहे काय ? हे तर बुद्धाचेच स्वप्न आहे. हे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेच स्वप्न आहे. खरे म्हणजे विद्रोह हे साधन आहे. साध्य नव्हे. ते मानवी संस्कृतीच्या परिवर्तनाचे मर्मसूत्र आहे. माणूस या स्वयंभू आणि स्वयंसिद्ध परममूल्याची प्रस्थापना हेच विद्रोहाचे ध्येय आहे. इहलोकातील माणूस आणि त्याचे संपूर्ण उन्नयन हाच विद्रोहाचा एकमेव विषय आहे. विद्रोह सामाजिक चांगुलपणाला, सांस्कृतिक इष्टाला कधीच विरोध करीत नाही. माणसाला आणि त्याच्या माणुसकीला कुरूप करणाऱ्या असुंदराविरुद्ध, असत्याविरुद्ध आणि अनिष्टांविरुद्ध विद्रोहाचा विरोध असतो. तेव्हा एक गोष्ट स्वच्छपणे लक्षात घ्यायला हवी ती ही की ज्यांचा समतेला, माणुसकीच्या प्रस्थापनेला विरोध आहे तेच फक्त विद्रोहाला विरोध करीत असतात. म्हणजे विद्रोहामुळे ज्यांच्या भावना दुखावतात त्यांच्या भावना अन्यायाने, विषमतेने सुखावतात असा निष्कर्ष निघणे अपरिहार्य आहे. रमेश देव म्हणतात ती बुद्धिमान माणसे समतेला विरोध करीत आहेत आणि विषमतेचा सत्कार करीत आहेत पण खरे हे आहे की समतेला केला

जाणारा विरोध हा द्रोह ठरतो. याचा अर्थ विषमतेला आदेश मानणारे लोक समतेची प्रस्थापना करू पाहणारांवर खटले भरा असे म्हणत आहेत.

विद्रोही साहित्य सर्वच प्रकारची विषमता नाकारते. विद्रोही साहित्य यात कोणती चूक करते ? विद्रोही साहित्य विषमतेची कारणे आणि तत्त्वज्ञाने नाकारते. हे करणारे विद्रोही साहित्य कोणती चूक करते ? विद्रोही साहित्य कोणालाही दुय्यम लेखणाऱ्या, कोणाचेतरी शोषण करणाऱ्या, कोणाला तरी असन्मानित आणि अप्रतिष्ठित करणाऱ्या अमानुषतेला नाकारते. असे करणारे विद्रोही साहित्य कोणती चूक करीत आहे ? वर्ण, वर्ग आणि जाती नसलेल्या समाजाचे स्वप्न विद्रोही साहित्य पाहते. हे स्वप्न फार वाईट स्वप्न आहे काय ? तुम्हाला हे स्वप्नच वाईट वाटत असेल ; समतेचाच, सद्भावाचाच आणि विवेकशीलतेचाच तुम्हाला राग येत असेल तर मग प्रश्नच वेगळा होऊन जातो. विद्रोही साहित्य नकार देते हे खरे आहे. पण नकार कशाला ? शोषणाला ! हे शोषण सामाजिक असो, आर्थिक असो वा कोणत्याही स्वरूपातले असो विद्रोही साहित्य त्याला नकार देते. माणसाच्या प्रतिष्ठेची प्रस्थापना करण्यासाठी विद्रोही साहित्य माणसाला अप्रतिष्ठित करणाऱ्या सर्वच यंत्रणांना नकार देते. हा नकार वाईट आहे काय ? आणि विद्रोही साहित्याला विधायक असे मानवी जीवन घडवायचे आहे. एकवर्णी समाज, एकमय समाज निर्माण करणे हा या साहित्याचा ध्यास आहे. खरे म्हणजे या ध्येयाच्या प्राप्तीसाठी चाललेल्या उठावात आपण सर्वांनीच सामील झाले पाहिजे. नकार हे विद्रोहाचे स्वप्न नव्हे. ती मानवी प्रतिष्ठेची प्रस्थापना करण्याच्या प्रक्रियेची आवश्यक अशी अटच आहे. जात वा धर्म पाळून आपण माणुसकीची प्रस्थापना नाही करू शकत ! म्हणून जाती-धर्मांना नकार देणे आवश्यक आहे. विद्रोही साहित्यावर खटले भरा म्हणणारांनी विद्रोहाचे वाङ्मयीन आणि सामाजिक सौंदर्यशास्त्र नीट समजावून घेतले पाहिजे. नकार ही सर्जनशीलताच आहे. नकार देण्याचे सामर्थ्यच माणसाला नग्नावस्थेपासून इथवर घेऊन आले. विटा-सिमेंटची घरे, आगगाड्या, मोटारी, विमाने, संगणक, इंटरनेट, दूरध्वनी, मोबाईल, विज या गोष्टी आपण सर्वच वापरतो. घड्याळे, छापखाने, वर्तमानपत्रे अशा अनंत वस्तू चार लाख वर्षांपूर्वी, दोन लाख वर्षांपूर्वी, इंग्रजी राजवट येण्यापूर्वी इथे नव्हत्या. या गोष्टी आधुनिक काळात आपणास उपलब्ध झाल्या. माणूस होता तिथे थांबला नाही. आहे त्या विरोधांना आणि उणिवांना नकार देत आणि नकारातून नव्या जीवनाची निर्मिती करीत तो निघालेला आहे. विद्रोही साहित्यावर खटले भरा म्हणणारांनी या सर्वच गोष्टी निर्माण केल्या नाहीत पण या सर्व गोष्टींचा वापर ते करतात की नाही ? गणपती दूध प्यायला ही खोटी वार्ता फोनवरूनच सांगितली गेली. फोनचा वापर न करता ही बातमी अवघ्या काही मिनिटात जगभर पसरली असती काय ? याचा अर्थ असा की मर्यादांना नकार देत, स्थितीवाद्यांचा छळ सहन करीत या सर्वच गोष्टी ज्यांनी निर्माण केल्या त्या गोष्टींचा जास्तीत जास्त वापर ही मंडळी करतात की नाही आणि परत नकार देत नवे विधायक आणि उपकारक

निर्माण करणारांना नाकारण्यासाठी ते त्यांनीच निर्माण केलेल्या उपकरणांचा वापर करतात की नाही? हे भयंकर विपरीत आहे. धर्मवाद्यांकडून होणारे अत्याचार सहन करीत ज्यांनी या सर्व गोष्टी निर्माण केल्या त्या सर्व गोष्टी धर्मवाद्यांनी का वापराव्यात? असे जर होत असेल तर 'तुझे दात तुझ्याच घशात' असे हे वर्तन आहे असा त्याचा अर्थ होईल आणि तो दांभिकपणाचा द्योतक ठरेल.

आता आपले राष्ट्रच केवळ नव्हे तर संपूर्ण विश्वच एकमय होण्याची गरज आहे. हे झाले नाही तर या दुनियेत कोणालाही सुखाने जगता येणार नाही. पृथ्वीच्या पाठीवरील एकूणच मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न आपणा सर्वांपुढेच महाप्रश्न म्हणून उभा आहे. धर्मांमधल्या आणि त्यांच्या मूलतत्त्ववादांमधल्या लढायांनी आजवर मानवी जीवनाला खूपदा पुरेसे रक्तबंबाळ केले आहे. इतिहासाची पाने रक्ताने खूपदा भिजली आहेत. पृथ्वी खूपदा या धर्मांमधील आणि त्यांच्या मूलतत्त्ववादांमधील मारामाऱ्यांनी रक्तात न्हाऊन निघाली आहे. एका बाजूने पृथ्वीवरील आणि पृथ्वीभोवतीच्या पर्यावरणाचा फाटत चाललेला समतोल पृथ्वीवरील मानवाच्या जीवांवर नजिकच्या काळात उठण्याच्या तयारीत आहे आणि दुसऱ्या बाजूने धर्म आणि त्यांचे मूलतत्त्ववाद मानवी जीवनाच्या जीवावर उठायला लागलेले आहेत. पण इतिहासात धर्मांमधील युद्धांनी इतिहासाची पाने रक्ताने भिजली पण यापुढली धर्म आणि त्यांच्या मूलतत्त्ववादांमधली युद्धे मानवी जीवनाच्या भवितव्यासकट, वर्तमानासकट अख्खा इतिहासही राख राख करून टाकतील. आपण सर्वच आज या आणि जागतिकीकरणाने अंथरलेल्या मृत्यूप्रदेशात उभे आहोत. पूर्वी लोक विनाश झाल्यावर शहाणे होत. ही संधी त्यांना असे. आता विनाश झाल्यावर तुम्हा-आम्हा कोणालाही शहाणे होण्याची संधी नाही. कारण शहाणे होण्यासाठी आपल्यापैकी कोणी उरणारच नाही. तेव्हा आपणापुढे एकच संधी आहे; एकच उपाय आहे. विनाश ओढवण्याआधी शहाणे होणे ही ती संधी होय. यावेळी आपण तुझी जात, माझी जात, तुझा धर्म, माझा धर्म या गोष्टींवरून भांडणे कितपत हिताचे आहे ते आपण सर्वांनीच समजावून घेण्याची गरज आहे. जहाजाला खालून छिद्र पडलेले आहे. जहाज बुडायला लागलेले आहे. अशावेळी एकमेकांच्या जातीधर्मांवरून या बुडत्या जहाजातील माणसे परस्परांशी भांडायला लागली तर परिणाम काय होईल? ते आपण सर्वच जाणता. यावेळी तुम्हा सर्वच लोकांना हे वाटायला हवे. प्रकर्षाने हे वाटायला हवे की सर्वांनी आता जहाजाला बुडण्यापासून वाचविले पाहिजे. त्याला पडलेले छिद्र बुजवले पाहिजे. माझा हा लेख वाचणाऱ्या सर्वांनाच जहाज वाचवले पाहिजे; त्यासाठी त्याला पडलेले छिद्र बुजवले पाहिजे असे प्रकर्षाने वाटले तर मला फार बरे वाटेल. फार फार बरे वाटेल. धन्यवाद!

# ३०. मी पुस्तकपुत्र

झाडाला येणारी नवी पालवी हा झाडाच्या वर्धिष्णू जिवंतपणाचा पुरावा असतो. या पालवीच्या पावलांनीच झाड स्वतःबाहेर पडत असते आणि विकासाच्या वाटेवरून चालत असते. ही पालवी झाडाला पुढे नेते. त्याला नव्या अवकाशाशी जोडते. त्याच्या पदरात नव्या जीवनाचा उजेड टाकते. ही पालवी म्हणजे झाडाच्या परिवर्तनाची कविता. सर्जनशील मानवी जगणे या जीवनशैलीची व्याख्या साक्षात करण्यासाठी धडपडते.

पुस्तके मला झाडांच्या पालवीची प्रतिरूपे वाटतात. ती माणसाने मानलेल्या पूर्णांकांना अपूर्णांकांमध्ये परावर्तित करतात. या अपूर्णांकांना पुनःपुन्हा नवनव्या पूर्णांकांकडे धावायला लावतात. 'भागो नहीं बदलो' चे नवनवोन्मेषशाली इंजिनिअरींग शिकवितात. या प्रक्रियेतून जीवनाच्या सौंदर्याचा अंतहीन सर्जनसोहळा उगवत राहतो.

खरी पुस्तके म्हणजे जीवनाचा अधिकृत अहवाल! जीवनाचे मर्म सांगण्यासाठी धडपडणारी स्पष्टीकरणे! जीवनाचा अर्थ सांगणारे अर्थ म्हणजे पुस्तके. सर्वांच्याच सन्मानाचा सूर्य डोक्यात असलेल्या प्रतिभांनी घेतलेल्या जीवनाच्या तलस्पर्शी मुलाखती म्हणजे पुस्तके. खरी पुस्तके माणूस या परमसत्याच्या परमसौंदर्याची प्रस्थापना करण्याच्या उद्देशाच्या पोटी जन्माला येतात.

आजवर मी खूप पुस्तके वाचली. त्यातील काहींनी मला जीवन शिकविले. जीवन कसे असू नये तेही शिकविले. कसे असावे तेही शिकविले. या पुस्तकांनी मला खोट्या पुस्तकांशी लढायला आणि त्यांचा पराभव करायला शिकविले. असत्यांशी, अनिष्टांशी आणि कुरूपतेशी भांडण्यासाठी मला या पुस्तकांनी नवनवी रणनीती शिकविली. काही पुस्तकांनी मला अस्वस्थतेचे पराकोटीचे नवनवे आयाम दिले. माझ्यातील अशांततेला सतत धगधगत ठेवले. कोणत्याही चौकटीत अडकू नकोस. आकाशासारखा चौकटविहीन हो. बुद्धासारखा, बाबासाहेबांसारखा असीम हो हे या पुस्तकांनी मला सांगितले. करुणेच्या पौर्णिमेला कधी पारखा होऊ नकोस आणि मनातल्या बुद्धिवादाच्या सूर्याला कधी मावळू देऊ नकोस हे या पुस्तकांनीच मला शिकविले.

जिथे जीवन उगवत नव्हते अशा स्मशानात माझा जन्म झाला. या निर्दय निर्वातात जीवन उभारणारी जिद्द पुस्तकांनीच मला दिली. उकळत्या अभावांच्या कढईतून या पुस्तकांनीच मला बाहेर काढले. या पुस्तकांनीच मला पहाडी निर्धार केले. धारदार करार केले. बाणेदार केले. या पुस्तकांनी मला टोकाचे व्याकूळही केले आणि अभेद्यही केले.

पुस्तकांचे दोन प्रकार आहेत. पुस्तकांच्या आकारातील पुस्तके आणि मानवाच्या, संस्थेच्या, चळवळीच्या आणि खुद्द जीवनाच्या आकारातील पुस्तके. जन्माला आल्यानंतर पहिल्यांदा जे मला वाचावे लागले ते आई नावाचे पुस्तक मानवी आकारात होते. या करुणेच्या पुस्तकाने मला माणसाच्या काळजाचा अभ्यास करायला शिकविले. या पुस्तकाच्या आसवांनीही मला निखारेच चारले. खोटे बोलू नकोस. कोणाला ओरबाडू नकोस. कोणाला फसवू नकोस हे या पुस्तकाने माझ्यावर ठसवले.

मिलिंद महाविद्यालय या पुस्तकाला शैक्षणिक संस्थेचा आकार होता. या पुस्तकाने मला संघर्षाची लिपी शिकविली. संघर्षातीत होण्याचे अवघड शिक्षणही त्याने बुद्धाच्या कळकळीने मला दिले. शाळेत शिकत असतानाच चळवळीने माझा हात धरला होता पण मिलिंद महाविद्यालयाने चळवळीचे पेटते पुस्तकच माझ्या हातात दिले. आजवरही हे पुस्तक माझ्या भावविश्वाचे नियोजन करीत आहे. वरील तिन्ही पुस्तकांनी जीवन नावाच्या विराट पुस्तकाचे वाचन कधी थांबवू नकोस हे पुनःपुन्हा सांगितले. जीवनाचे पुस्तक म्हणजे पुस्तकांचे पुस्तक! त्याचा आकार विराट. त्याची पृष्ठसंख्या अथांग! या पुस्तकाने माणसांच्या संबंधाचे घनदाट जंगल माझ्या मनापुढे मांडले. या संबंधांमधील दहशतवादाच्या गुहा मला समजावून सांगितल्या आणि त्यातील निसरड्या जागांचे पत्ते मला सांगितले. या नात्यांमधील माधुर्य कधी ओथंबून येते आणि त्यातील क्रौर्य केव्हा आणि कसे उफाळून येते त्याचाही प्रतीत्यसमुत्पाद या पुस्तकाने मला शिकविला. अमानवी झालेल्या, व्हायला लागलेल्या नात्यांना मानवी आणि सर्जनशील कसे करता येते हेही या पुस्तकाने मला सांगितले. जीवनाच्या या पुस्तकाने मला जीवन वाचायला आणि जीवनासंबंधी लिहिली गेलेली खरी-खोटी पुस्तकेही चिकित्सापूर्वक वाचायला शिकविले.

पुस्तकांच्या आकारातीलही अनेक पुस्तके मी वाचली. त्यातील काही पुस्तकांनी मला लोकमान्य भ्रमांपासून, लोकप्रिय अतार्किकापासून, वंदनीय असत्यांपासून, जीवनातल्या आणि साहित्यातील पूजनीय अंधश्रद्धांपासून कसे वाचायचे ते सांगितले. सर्वच पुस्तकांना नितळ लोककल्याणाचा बुलंद कणा देणारे 'भारतीय संविधान' हे पुस्तक माझ्या हाती आले. आणि या संविधानाची उद्देशिका माझ्याही प्रतिभेची उद्देशिका झाली. डोक्यात संविधान शिरले आणि न गोंधळता डोके भोवतीच्या गर्दीत शिरले. गर्दीच्या वर्गीकरणाचे, अंधार-उजेडाच्या वर्गीकरणाचे प्रमाणशास्त्र मी

झाली. संविधानाच्या सूर्याने माझ्या प्रतिभेला अंधारात जाणेच अशक्य करून टाकले. संविधानाच्या पुस्तकाने माझ्या विचाराला समग्रलक्ष्यीपण दिले. समता, बंधुता अशा सर्वच सर्वहितैषी मूल्यांचे एक रॅशनल एस्थेटिक्स दिले.

सदाशिव आठवलेंच्या 'चार्वाक:इतिहास आणि तत्त्वज्ञान' या पुस्तकाने एका मोहक खोटेपणाचा सामना जडवादाने कसा केला त्याची हकिकत मला सांगितली. माझ्यातल्या नास्तिकाचे बौद्धिक शस्त्रागार त्यामुळे समृद्ध झाले. तर्कतीर्थांच्या 'हिंदू धर्माच्या समीक्षेने' मला धर्मसंस्थेचा विघातकपणा पटवून दिला. माझ्यातला बुद्धिवाद त्यामुळे झळाळून निघाला. माझ्यातील करुणेच्या आणि इहवादाच्या पाठीशी बुद्ध नावाचा हिमालय उभा राहिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांती–प्रतिक्रांतीच्या विश्लेषणाने आणि श्री.ग.सरदेसाई यांच्या 'भारतीय तत्त्वज्ञान:सामाजिक संघर्ष' या पुस्तकातील मीमांसेने भारतातील सामाजिक, आर्थिक शोषणाचा संतप्त करणारा नकाशा माझ्यापुढे मांडला. फुल्यांच्या गुलामगिरीने असेल त्या गुलामगिरीवर आग ओतायला सांगितले. पाटणकरांच्या सौंदर्यमीमांसेने, सार्त्रच्या व्हाट इज लिटरेचरने आणि रिचर्डसच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ लिटररी क्रिटिसिझम'ने माझ्या रॅशनल जीवनदृष्टीशी सुसंगत सौंदर्यमूल्यांची निश्चिती करण्याची ताकद मला दिली. जीवनातील विषमतेला आणि शोषणाला मूक संमती देणारे वा त्यांची बाजू घेणारे एक अनीतीशास्त्र असते. तसे माणसांच्या सम्यक मुक्तीसाठी संघर्ष करणारे नीतीशास्त्रही जीवनात असते. साहित्यातील विषमतेची आणि शोषणाची बाजू घेणारे 'सौंदर्यद्रोहीशास्त्र' असते आणि माणसाच्या सम्यक मुक्तीसाठी रान उठवणारे साहित्याचे सौंदर्यशास्त्रही साहित्यविश्वात असते. जीवनाचे आणि साहित्याचे असे वर्गीकरणशास्त्र मला वरील काही पुस्तकांनी समजावून सांगितले. तुला हवा तसा तुझा इतिहास तू निर्माण करू शकतोस हेही मला या पुस्तकांनी सांगितले. कोणाच्याही माणुसकीचा अपमान करणारे साहित्य, साहित्य नसून साक्षात बेइमानी आहे हे या पुस्तकांनीच शिकविले. मानवी जीवनाचे सत्य निर्भयपणे सांग, माणसाचे परमसौंदर्य कोणत्याही कुरूपतेची पत्रास न बाळगता सांग हेही सांगितले. खऱ्या गोष्टी खोट्या ठरतील असे वागू, बोलू नकोस. खोट्या गोष्टी खऱ्या ठरतील असे चुकून जगू नकोस असे या पुस्तकांनीच मला सांगितले. या पुस्तकांनी मला कलदार जीवन शिकविले आणि या जीवनाच्या शिक्षकाने मला साहित्य आणि साहित्यशास्त्र शिकविले. जीवनाचा अधिकृत अहवाल ठरणारी, उजेडाचा दर्जा वाढविणारी आणि चांगुलपणाला विजयी करणारी पुस्तके लिही असे या पुस्तकांनीच शिकविले.

मी काहीही नव्हतो. कोणीही नव्हतो आणि या पुस्तकांनी मला पुस्तकांचे एक छोटेसे झाड केले आणि माझ्या प्रतिभेला या झाडाची पालवी व्हायला सांगितले.

डॉ. यशवंत मनोहरांनी बुद्धिवाद आणि माणुसकी यांचे एकजीव फ्यूजन आपल्या सर्वच लेखनात केलेले आहे. असे काटेकोर आणि संपूर्ण तार्किक फ्यूजन मराठी वैचारिक लेखनात फार कमी ठिकाणी दिसते. 'घार हिंडते आकाशी, लक्ष तिचे पिलापाशी' मधील घारीप्रमाणे डॉ. यशवंत मनोहर आपल्या एकूणच साहित्यात जीवनातील सौंदर्य आणि जीवनातील समतोल साधणाऱ्या वरील मूल्यांकडे कधीही दुर्लक्ष होऊ देत नाहीत. या मूल्यनिष्ठेने त्यांच्या वैचारिक लेखनाला पाषाणी पीळ प्राप्त झाला आहे. हे लेखन वाचकाला बुद्धिवादाच्या आणि माणुसकीच्या परम उंचीवरून यत्किंचितही ढळू देत नाही.

डॉ. इंद्रजित ओरके यांनी संपादित केलेल्या 'विचारमुद्रा' या पुस्तकातील लेखनातही याचा अत्यंत गौरवशाली प्रत्यय वाचकाला येईलच यात शंका नाही.

युगसाक्षी प्रकाशन,